भारत-देश आणि लोक

पारशी



नवज्योत समारंभ (सौजन्य : पेसी इ. मेहता)

पारशी

मूळ लेखिका

पिलू नानावटी

अनुवादिका

लीला बावडेकर

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

1987 (शक 1908)

रू. २०.००

PARSI *(Marathi)*

प्रकाशक
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए. 5, ग्रीन पार्क, नवी दिल्ली 110016

मुद्रक
दि. भि. धाक्रस, नाग मुद्रणालय, रुईकर मार्ग, नागपूर 440 002

प्रास्ताविक

डी. एफ. कराकांनी लिहिलेल्या 'हिस्टरी ऑफ द पारसीज' (दोन भाग, लंडन, १८८४) ह्या पुस्तकानंतर ह्या विषयावर खास विचारात घेण्यासारखे पुस्तक झाले नाही. भारतातील पारशांच्या जुन्या इतिहासाबद्दल एस. के. होडीवाला, आर. बी. पेमास्टर आणि इतर अनेकांनी लिहिलेली पुस्तके दुर्दैवाने सध्या उपलब्ध नाहीत. 'हायलाइटस ऑफ पारसी हिस्टरी' (मुंबई, १९६३) ह्या पी. पी. बलसारांच्या पुस्तकाची सहावी आवृत्ती आता निघत आहे. आणि त्यात ह्या जमातीचा तपशीलवार इतिहास दिला आहे. अलीकडेच प्रसिद्ध झालेली [illegible]र कोयाजी मिर्झा ह्यांचे 'आउटलाईन ऑफ पारसी हिस्टरी' (मुंबई, १९[illegible] [illegible] इकेहार्ड कुल्के ह्यांचे 'द पारसीज इन इंडिया' (म्युनिक आणि दिल्ली, [illegible]७४) ही दोन पुस्तके पारशांच्या इतिहासातील खास करून, धार्मिक, सामाजिक व राजकीय वैशिष्टयांबद्दल सांगून जातात. त्यात ह्या समाजाच्या आजतागायतच्या इतिहासाचा तपशीलवार उल्लेख नाही.

आणि नेमकी हीच उणीव भरून काढायचा ह्या पुस्तकाचा उद्देश आहे. मात्र हेही पुस्तक विस्तृत नाही. ह्यात अपरिचित परंतु महत्त्वाच्या घटनांवर भर दिला आहे. शेवटच्या प्रकरणात ह्या अल्पसंख्य जमातीला भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार केला आहे. एक छोटा अल्पसंख्य गट म्हणून पारशी जमात तगून राहणार की नामशेष होणार आहे, हे त्या जमातीवरच अवलंबून आहे. एक बलवान, स्वावलंबी, नवा भारत बनवण्यासाठी पारशी लोक कोणता हातभार लावू शकतात ह्याची वाचकाला ह्या पुस्तकाने नव्याने जाणीव करून दिली तरी ह्या पुस्तकाचे उद्दिष्ट साध्य झाले, असे म्हणता येईल.

नवी दिल्ली
नोव्हेंबर, १९७६

— पिलू नानावटी

ऋणनिर्देश

मला खालील मंडळींचे कृतज्ञतापूर्वक आभार मानायचे आहेत. दारा मार्शल. ते मुंबई विद्यापीठाचे प्रोफेसर एमेरिटस आहेत. त्यांनी माझ्या हस्तलिखिताचा पहिला मसुदा अथपासून इतिपर्यंत वाचला आहे. त्याशिवाय दस्तुर के. जमास्प असा ह्यांचे. त्यांनी पहिली तीन प्रकरणे वाचून त्यातील उणिवा, विसंगती दूर केल्या. ॲलन आणि अन्विन ह्यांनी त्यांच्या 'सॉंग्ज ऑफ झरतुष्ट्र' (लंडन, १९५२) पुस्तकातील प्रास्ताविक व काही मजकूर वापरण्याची मला परवानगी दिली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी फिरोझ गांधींवरील मजकूर काळजीपूर्वक वाचून त्यावर सूचना केल्या. त्यातील काही टिपणी ह्या पुस्तकात उद्धृत केली आहे; मिथान आर. चोकशी, जय बी. गोदरेज, अलू दस्तुर, नाजू दस्तुर आणि बची जे. करकरिया ह्यांनी मला पारशी महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत केलेल्या कामगिरीची माहिती दिली. मेहेर जमशेद पटेल ह्यांनी कराचीहून जमशेद एन. मेहता (जमशेद नसरवानजी) ह्यांच्यावरील पुस्तके उपलब्ध करून दिली; श्यावक्ष डी. नार्गोलवालांनी दाखवलेली उत्सुकता व दिलेले प्रोत्साहन; ह्याबद्दल त्यांचे, त्याशिवाय सर्व तऱ्हेची माहिती व मदत दिल्याबद्दल खालील लोकांचे : जमशेद जे भाभा, संस्थापक–विश्वस्त; प्राध्यापक रुस्तम चोकशी, कार्यकारी विश्वस्त आणि डॉ. व्ही. के. नारायण मेनन, कार्यकारी संचालक, नॅशनल सेंटर फॉर पर्फामिंग आर्टस; कूवरजी एच. भाभा–बँकर आणि भारत सरकारचे माजी व्यापार मंत्री, दस्तुर फ्रामरोझ अर्देशीर बोदे; पेसी. ई. मेहता, चंदन पटेल, हिल्ला जे. के. दारुवाला, माणेक के. एफ. नरीमान, मेहेर डी. एन. वाडिया, जेरू आर. जे. वकील, फिरोझा एच. सीरवाई, मेहरा मसानी, सिल्लू–फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ ह्यांच्या पत्नी, सिल्लू आणि रुसी एस. वाच्छा, होमाय आणि फिरोझ ई. दस्तुर, खुशवंत सिंग, रुस्तम टी. सकलाथ–कलकत्त्याच्या पारशी झोराष्ट्रियन असोसिएशनचे सचिव, 'पारसियाना'चे संपादक–प्रकाशक जहांगीर आर. पटेल, 'इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया'चे माजी क्रीडा संपादक जाल इंजिनियर, भारत सरकारच्या मुंबई येथील अणू ऊर्जा खात्याचे प्रकाशन अधिकारी, टाटा मूलभूत संशोधन संस्था, मुंबई, ह्यांचे जनसंपर्काधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे जनसंपर्काधिकारी आणि टाटांचे जनसंपर्काधिकारी.

ऋणनिर्देश

अखेरीला मला आभार मानायचे आहेत, ते के. आर. कामा ओरिएंटल इन्स्टिटच्यूट, मुंबई ह्यांचे कर्मचारी, नवी दिल्ली येथील नॅशनल आर्काइव्हजचे संचालक, नवी दिल्लीच्याच जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे ग्रंथपाल ह्यांनी मला दाखवलेल्या सौजन्याबद्दल व त्यांच्या प्रेमळपणाबद्दल.

पारशांवरील ग्रंथांची तपशीलवार सूची कोणाला हवी असेल तर त्याने एकहार्ड कुल्के ह्यांचा ' द पारशीज इन इंडिया ' (म्युनिक व दिल्ली, १९७४) हा ग्रंथ वाचावा अशी मी शिफारस करते.

— पिलू नानावटी

अनुक्रमणिका

प्रार्थना

माझदाची पूजा करणाऱ्या झोराष्ट्रियनांनो उठा, आपल्या पायावर उभे राहा; हात सिद्ध ठेवा. मस्तक उंच करा. दक्ष राहा. कायदेशीर, वेळेवर आणि गौरवार्ह कृत्ये करण्याची काळजी घ्या. बेकायदेशीर, अवेळीची आणि काळिमा लावणारी कृत्ये दूर सारा. उद्योगशील बना, चांगली कृत्ये करा. निराश्रितांना मदत करा, दु:खी लोकांचे सांत्वन करा.

(विष्पेराद, १५.१)

१. मूळ

पारशी हे नावाप्रमाणेच पर्शियन—इराणी—वंशाचे. पारशी ह्या शब्दाचा अर्थ पार्स किंवा फार्स—प्राचीन—पार्सा म्हणजे दक्षिण इराणातील ग्रीक पर्सेपोलीस ह्या ठिकाणचे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ०.०१६ टक्के लोकसंख्या पारशांची आहे.

एकूण, सुमारे ९०,००० संख्या असलेल्या ह्या जमातीचे मूळ आर्यांच्या इंडो-युरोपीय (भारतीय–युरोपीय) शाखेत आढळते. १०,००० वर्षे किंवा त्याहीपूर्वी आर्यांच्या टोळ्या मध्य तुर्कस्तानातील उंच पामीरवर राहत असत, ह्याबाबत इतिहास-संशोधकांचे एकमत आहे. त्यातल्या काही टोळ्या नंतर युरोपात जाऊन राहिल्या, तर काही पश्चिम आशियात विखुरल्या. तिथे त्या जास्ती करून इराणमध्ये गेल्या–तिथून अफगाणिस्तान आणि मग भारतात आल्या.

आवेस्ता हा पारशांचा धर्मग्रंथ. त्यात त्यांची धर्म-सूत्रे एकत्रित केली आहेत. आवेस्ताने सांगितले आहे, की ही पृथ्वी सात विभागांत–प्रदेशांत–विभागली आहे. त्यातील मध्यविभागात ऐर्याना वालजा, म्हणजे आर्यांचे वसतिस्थान आहे. आवेस्तातील वेंदिदाद ह्या एका सूत्रात सांगितले आहे की पहिला मानव गाया मरेतन हा ऐर्याना वालजा येथेच जन्माला आला. त्याच्यापासून आपली उत्पत्ती झाली असे प्राचीन इराणी मानीत. इराण हा आवेस्तातील ऐर्याना, संस्कृतातील आर्य–यान ह्या शब्दांवरून आला. ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ आर्यांचा मार्ग असाच होतो. दोन्ही शब्दांचा अपभ्रंश झाला इर्य–अन आणि त्याचे संक्षिप्त रूप झाले इराण.'

प्राचीन इराणच्या इतिहासाचे, कालमानानुसार, पाच भाग (कालखंड) पडतात. त्यातला पहिला काळ होता पिशदादियन राजघराण्याचा. हा पिशदादियन वंश प्रागैतिहासिक काळापासून खि. पूर्व २००० वर्षांपर्यंत राज्य करीत होता. त्याच काळात प्राचीन इराणचा प्रेषित झरतुष्ट्र जन्माला आला, असे मानले जाते. पारशी आजही झरतुष्ट्राच्या शिकवणुकीला मान देतात.

पिशदादियन काळातील लोककथांनुसार हायोशांग (होशांग) हा प्राचीन इराणचा पहिला राजा मानला जातो. हा राजा महान योद्धा होता. त्याने सरहद्दीवरील चोरट्या टोळ्यांशी लढा दिला. राज्यात कालवे खोदले. पाणीपुरवठ्याच्या योजना पार पाडल्या. आपल्या प्रजेला लोखंडाची हत्यारे वापरायला आणि अग्नीचा उपयोग करा-

यला ह्यानेच शिकवले.

त्याचा वारस होता तखमा उरुपी (तेहमुरऽप), तो राक्षस संहारक मानला जातो. त्याने सरहद्दीवरील चोरट्या, अनार्य टोळ्यांचा पुरता बंदोबस्त केला. त्याने आर्यांना एक पक्की लिपी दिली. त्यांना विणायची कला शिकवली.

विवांघयंतचा मुलगा यीमा उर्फ जमशेद हा पिशदादियन घराण्यातील तिसरा थोर राजा. वेदातील विवस्वताचा मुलगा यम म्हणजेच मृत्यू किंवा काळ आणि हा यीमा एकच असावेत, असे मानले जाते. यीमाने आपल्या लोकांची विभागणी चार वर्गांत केली—पुरोहित, योद्धे, कारागीर आणि कामगार. यीमाने दीर्घकाळ राज्य केले. त्याच्या दीर्घ आणि दैदीप्यमान राजवटीत जहाजे समुद्रमार्गे सफरी करीत. रस्ते बांधलेले होते. सोने, रुपे आणि रत्नांच्या खाणी खोदण्यात आल्या होत्या. ह्या मौल्यवान धातू-रत्नांचा उपयोग स्त्रिया दागिन्यांसाठी करीत. यीमाचे सिंहासन रत्नखचित होते. ते सिंहासन जगातले एक आश्चर्य मानले जाई. उसातून रस काढला जाई. यीमाच्या कारकिर्दीत प्रथमच मद्याचे उत्पादन करण्यात येऊ लागले. त्याच्या दरबारातील सेवक नक्षीच्या प्याल्यातून हे मद्य पाहुण्यांना देत.[२]

ह्याच सुमाराला सेमिटिक वंशाचा राजा अझी दाहाक ऊर्फ झोहाक ह्याने इराण्यांवर हल्ला करून त्यांना जिंकून घेतले. पुढे अनेक वर्षे तो त्यांच्यावर सत्ता चालवीत होता. त्याच्या दुष्टपणाबद्दल तो इतिहासात कुप्रसिद्ध आहे. अनेक ज्यू इतिहासकारांनी त्याची तुलना बॅबिलोनच्या निमरोदशी केली आहे.

प्रजा शेवटी त्याच्याविरुद्ध बंड करून उठली. कावा नावाच्या एका लोहाराने आपले चामड्याचे चिलखत भाल्याच्या टोकावर टोचून धरले. शेतकऱ्यांत त्याने जागृती घडवून आणली आणि त्यांना घेऊन तो थ्रेटाओना (ऊर्फ फरीदुन) ह्याच्या शोधार्थ निघाला. अथ्वाया घराण्यातील थ्रेटाओना हा इराणच्या सिंहासनाचा खराखुरा वारस होता. तो लपून राहत होता. कावा व त्याचे साथीदार ह्यांनी त्याला शोधून काढले, तेव्हा थ्रेटाओनाने त्यांच्या बंडाचे नेतृत्व करण्याचे मान्य केले. त्यांनी झोहाकवर चाल केली. त्याला पकडले आणि साखळीने एका पर्वतावर बांधून ठेवले. तिथेच तो काही दिवसांनी तडफडून मरून गेला.

थ्रेटाओनाने आपल्या हयातीतच आपल्या राज्याची विभागणी आपल्या तीन मुलांत करून टाकली. त्याचे दोन थोरले मुलगे लोभी होते. त्यांनी आपल्या धाकट्या भावाचा खून केला. त्यामुळे राज्यात अंदाधुंदी माजली. शेवटी थ्रेटाओनाचा नातू मिनुचे चेर (ऊर्फ मिनोचहेर) ह्याने अनार्यांच्या टोळ्यांवर आपले आधिपत्य प्रस्थापित केले. तरीसुद्धा सरहद्दीवरील तुराणी टोळ्यांशी अधूनमधून चकमकी उडतच होत्या. ह्या चकमकी पिशदादियन राजवटीच्या अखेरपर्यंत, म्हणजे खि. पू. २००० वर्षांपर्यंत

चालूच होत्या.

ख्रि. पूर्व २००० ते १५०० ह्या काळात आर्यांच्या टोळ्या दोन गटांत विभागल्या गेल्या. फ्रेंच पुरातत्त्ववेत्ता रोमान गिरशमान ह्याच्या मते दक्षिण रशियातील भारतीय युरोपीय (इंडो-युरोपीय) टोळ्या पश्चिम आशियात वसतीला गेल्या; तर पश्चिमेकडील गट आशिया मायनॉरमध्ये गेला. तिथे त्यांनी हिटाइट राज्य (कॉन्फेडरेशन) स्थापन केले. पूर्वेचा गट हिंदी–इराणी गट म्हणून ओळखला जातो. ह्या गटाने कास्पियन समुद्र ओलांडला आणि तो पूर्वेकडे हुरियनांबरोबर राहू लागला. त्या दोघांनी मिळून मिट्टानी राज्य स्थापन केले. हे राज्य अंदाजे ख्रि. पूर्व १४५० मध्ये भरभराटलेले होते. गिर्शमानच्या मते हा हिंदी–इराणी गट ख्रि. पू. १५०० च्या सुमारास भारतात आला.

इराणमध्येच राहिलेल्या टोळ्यांवर कायानी वंशाने राज्य केले. (ख्रि. पू. २००० ते ७००). त्यांच्यामागून पिशदादियन घराणे राज्यावर आले. ह्या सर्व राजांनी आपल्या नावामागे कावा हे नाव मोठ्या गौरवाने धारण केले होते. इराणचे स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या त्या गरीब लोहाराचा ते गौरव करीत. ऋग्वेद आणि फिर्दोसीचा शाहनामा ह्या दोन्ही ग्रंथांत कायानी काळातील अनेक प्रसिद्ध राजांच्या नावांचा उल्लेख आहे. उदा कावा हुस्रवाह (कै खुश्रो), कावा उसा (कै कौस) आणि कावा विश्ताष्प (कै गुश्ताष्प).

इराणी इतिहासातील कावानी काळ हा शूर-वीरांचा काळ मानण्यात येतो. सॅम–नरीमान, सोराब–रुस्तम ह्यांच्या शौर्यगाथा आजही गायिल्या जातात; तर जाल व र्‍होदाबेहांच्या प्रेमाची तुलना रामायणातील राम–सीतेच्या एकनिष्ठ वैवाहिक प्रीतीशी केली जाते.

ख्रि. पूर्व ७०८ ते ५५८ ह्या काळात मिडीस व पर्शियन घराणी उदयाला आली. त्यांनी इराणला एक बलाढ्य राष्ट्र बनवले. मिडियन घराण्याचा संस्थापक दाईउक्कु ह्याने सर्व मेडियन टोळ्यांची एकजूट केली. ख्रि. पू. ६५३ साली त्याचा मुलगा निनेवेहच्या लढाईत मारला गेला आणि शकांनी मीदियावर हल्ला चढवला. शकांनी ख्रि. पू. ६५३ ते ६२५ ही २८ वर्षे मीडियावर राज्य केले.

कायानी घराण्यानंतर इकिमिनियन घराणे राज्यावर आले (ख्रि. पू. ५५८ ते ३३०). इकीमीनियन घराण्याचा संस्थापक इकिमिनीज (अवेस्ता–हाकामनीश) ह्याच्या नावावरून त्या घराण्याला इकिमिनियन असे नाव पडले. त्या इकिमिनिजने मेदिस आणि पर्शियन ह्या राज्यांचे एकत्रीकरण केले. त्याच घराण्यात थोर सायरस (ख्रि. पू. ५५९ ते ५३०) आणि दर्युष (ख्रि. पू. ५२२ ते ४८६) हे राजे होऊन गेले. गिर्शमान लिहितो– ' आग्नेय इराणच्या पायथ्याशी वसलेल्या एका छोट्या राज्यातून

इकिमिनियन्सनी, एका पिढीतच, प्रचंड राज्य प्रस्थापित केले !'

सायरस थोर मुत्सद्दी होता तसाच निष्णात शासकही होता. त्याला लोक मान देत, तसेच त्याच्यावर लोभ करीत. ज्यू त्याला ' देवाने अभिषिक्त केलेला ' मानीत; तर ग्रीक त्याला ' मालक ', ' कायदेकर्ता ' म्हणत. त्याची स्वतःची प्रजा त्याला ' पिता ' म्हणे. त्याच्या कबरीवर लिहिलेले शब्द आता पुसून गेले आहेत. परंतु दोन ग्रीक लेखकांना ते आपल्या लिखाणात नोंदवून ठेवले आहेत. हा मृत्युलेख अत्यंत साधा आणि सुटसुटीत आहे.

' हे मानवा, मी सायरस आहे. कॅम्बिसेसचा पुत्र. मीच हे पर्शियन साम्राज्य स्थापन केले आणि आशियाचा राजा झालो. मला एवढी ही जमीन नाकारू नकोस !' ४

सायरसच्या मृत्यूनंतर अंदाधुंदी माजली. त्यात भर टाकली ती मॅगियन ग्वामाटाने. त्याने ख्रि. पूर्व ५२२ मध्ये स्वतःच्या नावाने राजा म्हणून द्वाही फिरवली. त्याने आपल्या कारकिर्दीतील पहिली तीन वर्षे करच रद्द करून टाकले होते. त्यामुळे त्याला लोकांचा भक्कम पाठिंबा मिळाला. उभी असलेली मंदिरे त्याने धार्मिक सुधारणेच्या नावाखाली, पाडून टाकली !

ह्याच वेळी ' सात कटवाले ' पुढे आले. हे साती जण इकिमिनिस राजघराण्यातले होते. त्यांनी दर्युषला आपला राजा निवडले (ख्रि. पू. ५२२ ते ४८६).

दर्युषने ग्वामाटाला सुळी दिले आणि एकूण १९ लढायांत नऊ राजांचा निःपात केला. ह्या कामगिरीत त्याला त्याच्या ' दहा हजार अमर योद्ध्यां 'नी मदत केली. हे दहा हजार अमर योद्धे म्हणजे निवडक धनुर्धारी आणि पायदळ ह्यांचे खास पथक होते. आपल्या मृत्यूपर्यंत दराश त्या पथकाचा सेनापती होता.

दर्युषच्या पराक्रमांचे चित्रण करणारी चित्रे कर्मनशाह आणि हमादान ह्या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील उंच कड्यांवर बास रिलीफमध्ये खोदण्यात आलेला आहेत. त्याखेरीज, सुसा आणि पेर्सेपोलीस येथील राजवाड्यांमध्येही शिलालेख व भित्तिचित्रांतून दर्युषचा पराक्रम चित्रित केला आहे. असेच वर्णन नक्ष–इ–रुस्तमचे शिलालेख व तेथील कबरी ह्यांच्यावरही केलेले आहे. ही वर्णने जुन्या पर्शियन, बॅबिलोनियन आणि इलेमाईट ह्या भाषांतून केलेली आहेत. दहा हजार अमर योद्ध्यांचे पुतळे पर्सेपोलीस येथील दगडांत खोदले आहेत. सुसाच्या राजवाड्यातही एनॅमलच्या विटांवर त्यांची रंगीत चित्रे काढलेली आहेत.

अफाट पसरलेल्या आपल्या साम्राज्याचा विकास व्हावा, ते एकसंघ बनावे, ह्यासाठी दर्युषने राज्यामध्ये कर–आकारणीची पद्धती योजली. राज्यकारभारात सुधारणा घडवून आणल्या आणि काटेकोर न्यायपद्धती अमलात आणली. मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कामे सुरू करण्यात आली. खाजण प्रदेशातून पाण्याचा निचरा करण्यात आला.

कालवे (म्हणजे घनाट) खोदण्यात आले. त्यातला सर्वात प्रचंड व नेत्रदीपक कालवा म्हणजे नाईल नदीपासून सुवेझपर्यंतचा कालवा. ह्या कालव्यावर दर्युषचा खालील शिलालेख खोदलेला आहे.

" राजा दर्युष म्हणतो : ' मी इराणी (पर्शियन) आहे. पर्शियामधूनच मी इजिप्त जिंकले. पर्शियाजवळ पसरलेल्या समुद्राला मिळणाऱ्या इजिप्तच्या नाईल नदीवर हा कालवा खोदण्याची आज्ञा मीच दिली. माझ्या आज्ञेप्रमाणे हा कालवा खोदला गेला आणि मग ईजिप्तमधून जहाजे ह्या कालव्यातून पर्शियाला येऊ लागली, तीही, माझी तशी इच्छा होती म्हणूनच !' " ५

शेती, शिकार आणि मासेमारी हे मोठे उद्योगधंदे झाले होते. इमारती लाकडाचा धंदा जोरात चालू होता. खाणी खोदायला उत्तेजन मिळत होते.

गिर्शमानच्या मतानुसार ख्रि. पू. २००० ह्या वर्षी मेसोपोटेमियामध्ये पतपेढी (बँक)–व्यवहार चालत असे. दर्युषने मात्र खाजगी पतपेढ्यांना सुरुवात केली. जेकोब–याला ' बॅबिलोनचा इगिबी ' म्हणून ओळखतात. हा ज्यू इतिहासकार लिहितो की कर्ज दिले जाई, ठेवी ठेवल्या जात. घरे, शेती, गुलाम आणि गुरे ह्यांच्यात भांडवलगुंतवणूक होत असे. चालू ठेव खाते (करंट अकाउंट) ही उघडता येई. चेकचा वापरही होत असे. निप्पूरच्या मुराशू अँड सन्स ह्या बँकेने लीज दिले होते; कालवे खोदले होते आणि ती शेतकऱ्यांना पाणीही विकत असे. लिडियाच्या क्रोअेससने आपल्या कारकिर्दीत प्रथम नाणेपद्धती सुरू केली. दर्युषने त्या पद्धतीचा वापर पुढे आपल्या साम्राज्यात केला. परिणामत: व्यापार वाढला. बॅबिलोनिया आणि ग्रीस प्रथम एकमेकांशी व्यवहार करू लागले. दक्षिण युरोपने पश्चिम आशियाशी मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरू केला.

कला, वास्तुशिल्प ह्यांची भरभराट झाली. नवीन शहरे वसवण्यात आली. राजवाडे बांधण्यात आले. सुसा आणि पर्सेपोलीसच्या राजवाड्यांत तर प्रचंड प्रमाणात कोरीव काम करण्यात आले.

अग्निमंदिरेही मोठ्या प्रमाणात बांधण्यात आली. आता त्यातली फक्त तीनच उरलीत–एक पसारगेडेचे–इथेच मुस्लिम–हल्ल्यापूर्वीपर्यंत इराणी राजांचा राज्याभिषेक होत असे; दुसरे नक्ष–इ–रुस्तमचे–हे दर्युषच्या कबरीसमोर उभारले आहे; आणि तिसरे सुसामध्ये आहे.

इकिमिनियन्सचा धर्म हा काहीसा सामूहिक धर्म असावा हिरोडोटस लिहितो–पर्शियन (इराणी) लोक आहुर माझदाप्रमाणेच मिथ्र (सूर्य), माह (चंद्र), झाम (पृथ्वी), अ तार (अग्नी), आपम–नापट (पाणी) आणि वायू (वारा) ह्यांचीही उपासना करीत. बॅबिलोनची जल व प्रजोत्पत्ती देवता अनाहिता फार लोकप्रिय होती. तिच्या खास पूजा बांधल्या जात आणि तिचे पुतळेही उभारले जात.

इकिमिनियन्सच्या काळात मागी ह्या मेदेसमधील पुजाऱ्यांचा वर्ग फार मातब्बर झाला होता. हे मागी धार्मिक कृत्यांत वापरला जाणारा होआमा (सोम) रस तयार करीत. सेनेबरोबर युद्धावर जात. अग्निदिव्य आणि धातुदिव्य ह्या प्रसंगी न्यायाधीशाचे काम करीत. ते गणिती होते, खगोलशास्त्रज्ञ होते. इतर समाजापासून ते अलिप्तच राहात.

ख्रि. पूर्व ४८६ साली दर्युष वारला आणि राज्यात गोंधळ माजला. तो त्या नंतरच्या बारक्यासारक्या राजांना सावरणे शक्य झाले नाही.

त्या काळात मॅसिडोनियाचा फिलिप काही निवडक लोकांच्या सहकार्याने ग्रीक हुकूमत झुगारून देण्याची तयारी करीत होता. फिलिपने आपला मुलगा अलेक्झांडर ह्याच्या मदतीने ख्रि. पूर्व ३३८ पूर्वी ग्रीकांचे स्वातंत्र्य नष्ट केले. पण त्यानंतर लगेचच फिलिपची हत्या करण्यात आली. पाठोपाठ इराणच्या बादशहाचीही हत्या झाली. ख्रि. पूर्व ३३० साली इराण अलेक्झांडरच्या कबजात आला.

इराणचे ग्रीकीकरण करण्याचा प्रयत्न अलेक्झांडरने केला; पण त्यात त्याला यश मिळाले नाही. बंड, कट, ह्यांना ऊत आला. ख्रि पू. ३२३ साली अलेक्झांडर मृत्यू पावल्यानंतर पुढची ४० वर्षे सगळीकडे गोंधळ माजून राहिला होता. ख्रि. पूर्व ३०१ साली इप्ससची लढाई झाली, आणि पर्शियन साम्राज्य त्रिभंगले. युरोपमध्ये मॅसिडोनियन साम्राज्य अस्तित्वात आले. इजिप्तमध्ये टोलेमाई राज्य झाले आणि आशिया सेल्युसिडच्या आधिपत्याखाली गेला.

सेल्युसिड वंशाने इराणमध्ये ख्रि. पूर्व २८० ते ख्रि. पूर्व १६० ही ऐंशी वर्षे राज्य केले. पण हा सर्व काळ इराणमध्ये वेगवेगळे कट शिजत होते. बंडे होत होती. सेल्युसिड वंशानंतर इराणमध्ये पार्थियन–अर्सेसिड वंशाने राज्य केले. (ख्रि. पूर्व १६० ते इ. सन २२५).

ख्रि. पूर्व ३७ साली मार्क अँटनीचा निःपात झाला आणि अर्मेनियावर पार्थियन अर्सेसिडसचे राज्य आले. त्याच सुमारास वलक्श (वोलोगेसेस पहिला) ह्याच्या नेतृत्वाखाली नव इराणच्या पुनरुत्थानास प्रारंभ झाला होता. ह्याच काळापासून नाण्यांवर प्रथमच पहेलवी–अर्सेसिड लिपीतील शब्द दिसू लागले. त्या नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर अग्निमंदिरे आणि पुजारी ह्यांची चित्रे आढळतात. ह्याच काळात आवेस्ता ह्या धर्मग्रंथाचे संकलन–संपादन सुरू झाले. हे काम पुढे कित्येक शतके चालू होते. ते बहुधा, सहाव्या शतकात सासानी वंशाच्या राजवटीत पूर्ण झाले असावे.

पार्थियनानंतर सासानी घराणे राज्यावर आले. (सन २२६ ते ६५१) त्यांच्यातील सासान हा इश्तखारच्या अनाहिता मंदिरातील वरिष्ठ अधिकारी होता. त्याच्यावरून ह्या वंशाला सासानी वंश असे नाव पडले. त्याचा मुलगा पापक ह्याने एका छोट्या

स्थानिक राजाच्या मुलीशी लग्न केले आणि २०८ साली कट करून त्या राजाचे राज्य हिरावून घेतले. पापकचा पुत्र अर्देशीर पापकन. ह्याने त्याला होणारा सारा विरोध मोडून काढला आणि २२६ साली स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. त्याने दीर्घ काळ राज्य केले आणि आपल्या राजवटीत इराणचे नवे साम्राज्य उभे केले.

इराणचे पुनरुत्थापन करण्याच्या त्याच्या कामात अर्देशीरला त्याचा मुलगा शापूर पहिला (मृत्यू २७२) ह्याची फार मदत झाली. शापूर सुसंस्कृत होता. चौकस बुद्धीचा होता. त्याच्या कारकिर्दीत झुंड-इ-शापूर हे प्रसिद्ध विद्यापीठ स्थापन करण्यात आले. नवव्या शतकातील 'डेंकार्ट' ह्या पहेलवी भाषेतील ग्रंथात लिहिले आहे :

अर्ताभरे (अर्देशीर) चा मुलगा राजांचा राजा शापूर ह्याने इतस्तत: विखुरलेले अपास्तक (आवेस्ता) ग्रंथ एकत्र करून त्यात वैद्यक, खगोलशास्त्र, वेग (गति) शास्त्र, काळशास्त्र, अंतरिक्ष, पदार्थ (सब्स्टन्स), निर्मिती (क्रियेशन) जोनीसीस, मृत्यू, बदल व वाढ, कला, हस्तकला ह्या भारत, 'रोम' व इतर देशांत विखुरलेल्या शास्त्रांची भर घातली.' [६]

अशा तऱ्हेने अनेक संस्कृत व ग्रीक ग्रंथांची रूपांतरे केल्याचे पाश्चात्य संशोधक पुराव्यासह सांगतात. त्यात भारतीय तर्कशास्त्र, व्याकरण, वेळाचे गणित म्हणजेच कुंडलीशास्त्र, भारतीय 'कोष' आणि टोलेमीचे 'अलमागेस्ते' ह्यांचा समावेश आहे.[७]

ह्या सगळ्यांवरून वाटते की झुंद-इ-शापूर विद्यापीठात ग्रीक तत्त्वज्ञान, आयुर्वेद, भारतीय महाकाव्ये, इत्यादी शिकवली जात असावीत.

शापूर पहिला, ह्याच्या कारकिर्दीतच मणि नावाचा एक सुधारक होऊन गेला. ह्या मणीने झरतुष्ट्र, बुद्ध व ख्रिस्त ह्यांच्या शिकवणुकींचे एकत्रीकरण करून एक नवीन जागतिक धर्म प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पर्शियातील सामान्य माणसे व विचारवंत ह्या दोघांनाही तो पसंत पडला. शापूरला मणीबद्दल सहानुभूती होती. त्याने त्याला अभय दिले होते आणि त्याला आपल्या धर्माचा प्रसार करण्याकरिता प्रवास करण्याची परवानगीही दिली होती. पण २२७ साली शापूर वारला आणि मणीला पकडून त्याला ठार मारण्यात आले.

पहिल्या शापूरचा मुलगा दुसरा शापूर (सन ३०९ ते ३७९) ह्याने आपल्या वडिलांचे कार्य पुढे चालू ठेवून ते पक्क्या पायावर उभे केले. स्वत: सज्ञान झाल्यावर त्याने कुषाण साम्राज्य जिंकून घेतले. त्या राज्यावर त्याने बाल्ख (अफगाणिस्तान) राजांची एक नवीन वंशावळ सुरू केली.

आर्मेनियाचा राजा कॉन्स्टंटाईन ह्याने ख्रिश्चन धर्म स्वीकारला, तेव्हा तो देशही ख्रिश्चन बनला. मग आर्मेनियन ख्रिश्चन राजकारणात संशयास्पद ठरले; आणि इराण आणि रोम ह्यांच्यात नव्याने युद्धे सुरू झाली.

सासानी सम्राटांना आपल्या देशाच्या अंतर्गत समस्यांऐवजी परराष्ट्र धोरण आणि इतर महान राष्ट्रांबरोबरचे सांस्कृतिक संबंध ह्याचीच फिकीर पडलेली असे. बेहराम गारे (४२३–४३८) हा भारतात आला होता. त्याने एका भारतीय राजकन्येशी विवाहही केला होता. ४३६ साली तो कनौजच्या राजाच्या भेटीसाठी आला होता. त्याने इराणमध्ये भारतीय संगीताचा आणि भारतीय साहित्याचा (वाङ्मयाचा)प्रसार केला. राजस्तानातील मालवा राजे आपणाला गारेचे वंशज मानीत. ओमर खय्यामच्या काव्यात 'खंदा शिकारी' म्हणून गौरवलेला पुरुष बेहराम गारेच आहे.

युद्ध आणि दुष्काळ ह्यांनी इराणची पाठ सोडली नव्हती. सरदार, पुजारी आणि आम जनता ह्यांच्यात सत्तेसाठी दीर्घकाळ स्पर्धा चालली होती.

त्यात माझदाक ह्या क्रांतिकारकाने भर टाकून समस्या आणखी बिकट केली. माझदाकने स्थावर–जंगम इस्टेट सामायिक असावी, त्याप्रमाणेच स्त्रियांवरही सामायिक मालकी असावी, असा प्रसार करायला सुरुवात केली. कावाद (४८८ ते ५३१) ४९९ साली राज्यावर पुन्हा आला. आणि त्याने माझदाक आणि त्याचे साथीदार ह्यांची हत्या करविली. तरीसुद्धा माझदाकच्या चळवळीची लोकप्रियता ओसरली नाही. तिचा प्रसार गुप्तपणे चालूच होता.

५३१ साली कावाद मृत्यू पावला. त्याचा मुलगा पहिला खुश्रू राज्यावर आला. हाच पुढे नौहोखान–ए–आदिल (न्यायी नौहोखान) म्हणून प्रसिद्ध झाला. ५३१ ते ५७९ अशी पन्नास वर्षे त्याने राज्य केले. आपल्या कारकिर्दीत त्याने इराणला पुन्हा वैभवाच्या शिखरावर नेऊन बसवले. असे वैभव इराणने इकीमिनियन घराण्यातील सायरस आणि दरायस ह्या राज्यांच्या कारकिर्दीनंतर अनुभवले नव्हते.

पहिल्या खुश्रूने, माझदाकच्या साथीदारांनी पळवून नेलेल्या बायका–मुलांना कायद्याने औरस करून घेतले. त्याने जमीन सुधारणा अमलात आणल्या. सर्वसामान्य नागरिकांसाठी शिक्षणाची सोय केली. आपल्या आधिपत्याखालील टोळयांना त्याने सरहद्दीवर वसाहती करायला लावून देर्बंद खिंडीवर भक्कम तटबंदी बांधली. त्यामुळे भटक्या टोळयांना इराणमध्ये घुसणे अवघड झाले.

खुश्रूच्या कारकिर्दीत परराष्ट्रसंबंधही चांगल्या प्रकारे जोपासले गेले. विन्सेंट स्मिथ आणि इतर काही इतिहासकार म्हणतात की, खुश्रूचे एक प्रतिनिधीमंडळ पहिला पुलकेशी ह्याच्या दरबारात आले होते. त्या घटनेचे एक भित्तिचित्र अजिंठा लेण्यांत रंगवलेले आहे. बायझन्टाईन राजाबरोबर त्याने एक 'कायम शांतते'चा करार केला होता.

खुश्रूच्या कारकिर्दीत सांस्कृतिक बाबींकडेही लक्ष पुरवण्यात आले. 'पंचतंत्रा'चे पेहलवीत भाषांतर करण्यात आले. पेहलवी ही सासानी लोकांची राज्यकारभाराची

भाषा. भारतातील बुद्धिबळाचा प्रसार झाला होता. सरदार–उमरावांत शिकारी आणि पोलो ह्या क्रीडा लोकप्रिय होत्या.

तरीही किरकोळ लढाया चालूच राहिल्या. दुसरा खुश्रू ह्याला विजयी खुश्रू म्हणून ओळखण्यात येते. तो राज्यावर आला तेव्हा विहराम चोबिन नावाचा त्याचा एक सेनापती लोकांत फार प्रिय होता. त्याने राजधानी जिंकली आणि स्वत: राजा झाल्याचे जाहीर केले. खुश्रू रोमला पळून गेला. तिथे त्याने सैन्याची जमवाजमव केली आणि आपले राज्य परत जिंकून घेतले.

खुश्रूची विजयी दौड चालूच होती. ६१० पर्यंत त्याने आर्मेनिया पुन्हा जिंकले होते. एडेसा आणि सिझेरियावर कबजा मिळवला होता. ॲंटिऑक आणि दमास्कसमचा पाडाव झालेला होता. ६१४ साली जेरुसलम जिंकण्यात आले. ५०,००० ख्रिश्चनांची कत्तल करण्यात आली आणि पवित्र क्रुसाचे (होली क्रॉस) अवशेष इराणमध्ये आणण्यात आले. दोन वर्षांनंतर गाझा जिंकण्यात आले व इजिप्तवर हल्ला करण्यात आला. बॅबिलोन आणि अलेक्झांड्रिया ह्यांचा पाडाव झाला.

ख्रिश्चनांची कत्तल आणि पवित्र क्रुसाच्या अवशेषांचा कबजा ह्यामुळे सारे ख्रिश्चन जग खवळून उठले होते. सम्राट हिरॅक्लिअसने जोरदार प्रतिहल्ले चढवले व त्यांत तो यशस्वी झाला. इराणी सेनापतींनी बंड पुकारले. त्यांनी ' खुश्रूने हिरॅक्लिअसशी शांतता-करार करावा ' अशी मागणी केली. आजारी, मृत्युपंथाला लागलेल्या खुश्रूने त्याला नकार दिला. तेव्हा त्याच्याच मुलाने–बायझन्टाईनच्या मारिया ह्या राजकन्येपासून झालेला राजपुत्र–त्याचा खून केला.

पर्शियन साम्राज्याचा विनाश जवळ येत चालला होता. पुढच्या चौदा वर्षांत कमीतकमी बारा राजे राज्यावर येऊन गेले. यझदेगार्द दुसरा हा त्यांच्यातला शेवटचा राजा.

६३३ साली, प्रेषित महमुदाच्या मृत्यूनंतर बरोबर एक वर्षाने, नवनिर्मित अरब राष्ट्राने पहिले पवित्र युद्ध (होली वॉर) सुरू केले. अरबांनी इराकवर हल्ला करून तो देश जिंकून घेतला. तेव्हा इराणी लोकांना चिंता पडली. त्यांनी अरबांचा हल्ला थोपवण्यासाठी आपला सेनापती बेहमन जादुये ह्याच्या आधिपत्याखाली सैन्य पाठवले. मारवाहच्या लढाईत–यालाच पुलांची लढाई म्हणतात–अरबांचा पराभव झाला (६३४). परत पराभव पत्करून पळणाऱ्या अरबांचा पाठलाग मात्र इराणी सेनापतीने केला नाही. कुमक घेण्यासाठी तो माघारी परतला. पुढील दोन वर्षे अरबांनी आपली ताकद वाढवण्यात खर्च केली. त्यांनी क्वादेस्ये येथे इराणी फौजांशी लढाई केली (६३६). तीन दिवस चाललेल्या या युद्धात इराणी फौजांचा पराभव झाला. त्यांचा सेनापती रुस्तम फर्रोखझाद मारला गेला.

तेव्हा यझदेगार्द ह्याचे धाबे दणाणले. खोरासन, राय आणि हमादान येथून त्याने ५०,००० माणसांची जमवाजमव केली. आणि निहावंद येथे ६४१ मध्ये अरबांशी झुंज घेतली. त्यातही अरबांचाच जय झाला. यझदेगार्द मेर्वला पळून गेला. पुढे दहा वर्षे तो लपून बसला होता. शेवटी त्याच्याच एका सेनापतीच्या हाती तो सापडला (६५१). तेव्हा त्याने यझदेगार्दला ठार मारले. अरबांचा पूर्ण विजय झाला होता. झरतुष्ट्राने उपदेशिलेला धर्म पाळण्याची ज्यांची इच्छा होती, ते लोक कोहिस्तानच्या डोंगरात पळाले. तिथे त्यांनी शंभर वर्षे मोठ्या जिकिरीने, लपून छपून, काढली. उरलेल्यांना सक्तीने धर्मांतर करावे लागले.

१. पी. पी. बलसारा– हायलाईटस ऑफ पारसी हिस्टरी
मुंबई, १९६९, पान १
२. एम. एन. धल्ला– झोराष्ट्रियन सिव्हिलायझेशन,
न्यूयॉर्क, १९२२, प्रकरण १
३. रोमन गिर्शमान– इराण, १९५४, पान–६१ तळटीप
४. धल्ला– वरील पुस्तक, पान २१७
५. धल्ला– वरील पुस्तक, पान २१६
६. झाक डॉशने–गुईलमीन– रिलिजन ऑफ एन्शंट इराण–
इंग्रजी भाषांतर– के. एम. जमास्प आसा, मुंबई, १९७३, पान ३२
७. Idem.

२. झरतुष्ट्र

आपला धर्म आचरण्याचे स्वातंत्र्य आणि स्वास्थ मिळावे, ह्या हेतूने पारशी भारतात आले. म्हणूनच, त्यांचा प्रेषित झरतुष्ट्र ऊर्फ झोराष्ट्र ह्याच्या जीवनाबद्दल व शिकवणुकीबद्दल माहिती मिळवणे आवश्यक ठरते.

प्राचीन इराणमध्ये अनेक धर्म नांदत होते. धर्माविषयीचा सर्वांत प्राचीन उल्लेख सापडतो तो प्रजोत्पादनाच्या देवतेच्या पूजेविषयीचा. ह्या देवतांपैकी अनाहिता ह्या देवतेचा उल्लेख आवेस्तातही आहे. तिची आजही पूजा केली जाते. देव अनेक होते. त्यांपैकी काही मानवाला आशीर्वाद देत, त्याचे भले करीत. तर काही दुष्काळ, रोगराई आणि मृत्यूचे संकट त्याच्यावर आणीत. एखादे मोठे संकट आले की इराणचे शेतकरी भयभीत होऊन आपल्या गुरांपैकी निदान ५०० गुरे तरी देवाला बळी देत–त्याला संतुष्ट करण्यासाठी.

धार्मिक विधीमध्ये हाओमा (म्हणजेच वेदातील सोम) पंथही प्रामुख्याने होता. हाओमा हा एफेड्रा झाडाचा रस. हा रस मानवाला अमरत्व देतो, असा समज आहे. परंतु प्रमाणाबाहेर घेतला तर तो चढतोही. मागी (आवेस्तातील माहावन, संस्कृतातील माघ आणि ग्रीक मॅगस) ही मेडियन आदिवासी जमात जनावरे बळी देणे, व हाओमाचा विधी, ह्या दोन प्रसंगांचे पौरोहित्य करीत असे. मागींचा उल्लेख गाथांत–दैवी गीतांत–प्रामुख्याने केलेला आहे. गाथा झरतुष्ट्राने लिहिली. त्यात त्याने मागींचा उल्लेख महान मागा कुटुंब असा केला आहे. त्यांना झरतुष्ट्राची शिकवण संपूर्ण व सर्वंकषपणे कळली आहे, असे म्हटले आहे. पॉरफायरी 'मॅगस' ह्या शब्दाचे विश्लेषण, देवाविषयीचे ज्ञान असलेला आणि दैवी शक्तींची सेवा करणारा, असे करतो. इकिमिनियन राजांचे ते गुरू होते. त्यांना 'सर्वश्रेष्ठ पर्शियन' मानले जाई. ते तत्त्वज्ञानी होते, गणिती होते, खगोलशास्त्रज्ञ होते. त्यांच्यावर शालदियन ज्योतिषशास्त्राचा फार मोठा प्रभाव पडला आहे.

प्रत्येक झोराष्ट्रियन कमरेभोवती जी कश्ती (पवित्र करगोटा) बांधतो ती प्रथा झरतुष्ट्राच्या आधीपासूनच प्रचलित होती, असे दिसते. प्रेषिताच्या पौराणिक चरित्रात लिहिले आहे की, विसाव्या वर्षी जेव्हा झरतुष्ट्र आई–वडिलांना सोडून एका गुहेत राहावयास गेला, तेव्हा त्याच्या वडिलांनी, आपली आठवण म्हणून त्याला एक कश्ती

दिली होती. मात्र ह्या कश्तीच्याबरोबरीने वापरला जाणारा सद्रा (सद्रेह किंवा पवित्र सदरा) ह्याचा त्या वेळेला कुठे उल्लेख सापडत नाही. ही सद्रा किंवा कश्ती पारशी आजही वापरतात. कश्तीची प्रार्थना आजही मूळ भाषेतूनच म्हटली जाते.

अविचारीपणाने गुरांचा बळी देणे, रक्ताचा नैवेद्य दाखवणे, ह्या गोष्टींना झरतुष्ट्राचा विरोध होता. गुरे ही आदिवासींची मौल्यवान संपत्ती होती. झरतुष्ट्राला मद्यातिरेकही पसंत नव्हता. तत्कालीन जादूटोणा, चेटूक, ह्यांच्या तो विरुद्ध होता. मुख्य म्हणजे तो, अनेक देवांच्या पूजेविरुद्ध होता. त्याच्या मते आहुर माझदा—जीवन व ज्ञान ह्यांची देवता—हा एकमेव देव होता. त्याचे आणि त्याच्या शिकवणुकीचे निर्मळ ज्ञान मिळवणे, महत्त्वाचे होते.

झरतुष्ट्राचा नक्की काळ कोणता ह्याबद्दल वादच आहेत. त्याबाबत तीन मुख्य परंपरा आज मानल्या जातात—त्यातील सासानी परंपरेला पाश्चात्य विद्वानांचा पाठिंबा आहे. ह्या परंपरेनुसार झरतुष्ट्र अलेक्झांडरपूर्वी २५८ वर्षे जन्माला आला होता. 'गाथा'तील काव विस्ताष्प म्हणजेच पहिला कॅंबिसेसचा मुलगा आणि थोर दर्युषचे वडील इकिमिनियन विस्ताष्प, अशा समजुतीवर ही परंपरा आधारलेली आहे. परंतु ह्या दोन विस्ताष्प राजांची वंशावळ अगदी भिन्न आहे.[१] भाषाशास्त्राच्या दृष्टीनेही हे विधान टिकू शकत नाही. गाथा आणि ऋग्वेदाचा सुरुवातीचा काही भाग, ह्यांतील भाषा, तांत्रिक परिभाषा, गायत्री आणि त्रिष्टुभ यासारखे छंद, ह्यांत बरेच साम्य आहे. पाश्चात्य विद्वानांच्या मते ऋग्वेदाचा काळ ख्रि. पूर्व १५०० च्या आसपासचा असावा. त्यामुळे झरतुष्ट्र ख्रि. पू. ६०० च्या सुमाराला होऊन गेला, असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. गाथातील, आता प्रचलित नसलेल्या काही व्याकरण संज्ञा ऋग्वेदातीस काही अप्रचलित शब्दांवर प्रकाश टाकतात. हे लक्षात घेतले तर ह्या विधानातील विसंगती आणखीनच स्पष्ट होते.[२]

झरतुष्ट्राचा काळ ठरवणारी दुसरी परंपरा असे मानते की झरतुष्ट्राचा जन्म प्लेटोच्या ६००० वर्षे आधी झाला होता ! आपल्या ह्या म्हणण्याला ते आधार देतात तो 'देकार्त' ह्या नवव्या शतकातील एका पहेलवी ग्रंथाचा. ह्या ग्रंथात म्हटले आहे की झरतुष्ट्र ह्या पृथ्वीतळावर मानवरूपात जन्म घेण्यापूर्वी ६००० वर्षे तो दैवी स्वरूपात अस्तित्वात होता. ही परंपरा दुर्लक्षण्याजोगीच आहे.

तिसरी परंपरा गाथा आणि ऋग्वेद ह्यांच्यातील भाषेच्या तौलनिक अभ्यासावर आधारलेली आहे. आर्यांच्या टोळ्या विभागल्या गेल्या तेव्हा त्यांची एक शाखा भारतात आली, एक इराणातच राहिली. झरतुष्ट्राने प्रचलित केलेल्या सुधारणा हे ह्या टोळ्यांच्या विभाजनाचे एक कारण सांगण्यात येते. ह्या परंपरेनुसार झरतुष्ट्राचा काळ ख्रि. पू. २००० च्या आसपासचा मानला जातो आणि हाच सिद्धान्त जास्त

विश्वसनीय वाटतो.

झरतुष्ट्राच्या जीवनाचा अभ्यास करावयाचा ठरविला तर आणखी अडचणी येतात. त्याबाबतीत संशोधनाचे दुर्भिक्ष्यच जाणवते.[१] झरतुष्ट्राच्या घराण्याचे नाव स्पितामा होते. हे नाव त्याला त्याच्या नवव्या पूर्वजापासून मिळाले होते, असे पहेलवी ग्रंथ सांगतात, एवढीच त्याच्याबद्दलची माहिती मिळू शकते. त्यावरूनच प्रेषिताचा उल्लेख अनेकदा 'झरतुष्ट्र स्पितमान' किंवा 'झरतुष्ट्र द स्पिटॅमिड' असा केला जातो. त्याच्या वडिलांचे नाव पौरुषाष्प होते त्यांच्याकडे खूपसे घोडे होते. झरतुष्ट्राच्या आईचे नाव होते दुधदोवा ती गवळीण होती तिचे घराणे ह्वोसाय होते. शहस्त्राष्टनी (१०८६ ते ११५३) आणखी सांगतो की पौरुषाष्प अझरबैजानचा होता. दुधदोवा ही राय किंवा राहा ह्या मेदियातील गावची होती. झरतुष्ट्र हा एक किताब आहे. त्याचा अर्थ सुवर्ण–प्रकाश. झरतुष्ट्र प्रेषित (साधक) बनला तेव्हा त्याला हा किताब देण्यात आला. तर पाश्चात्य विद्वान म्हणतात की झरतुष्ट्राचा अर्थ विटकरी रंगाच्या उंटांचा मालक.

प्रेषिताच्या मृत्यूनंतर अनेक शतकांनी लिहिलेल्या पहेलवी ग्रंथांमध्ये प्रेषिताच्या आयुष्याबाबतच्या अनेक दंतकथा व आख्यायिका सांगितलेल्या आहेत.

खूप खूप वर्षांपूर्वी मेदियातील राय ह्या प्राचीन नगरीत फ्राश्म–रावा नावाचा एक दयाळू व भला माणूस राहत होता. त्याला दुधदोवा नावाची एक सुंदर मुलगी होती. ती पंधरा वर्षांची झाली तेव्हा तिचे सारे शरीर विलक्षण तेजाने प्रकाशू लागले. जिथे जिथे ती जाई, तिथे तिथे तो प्रकाश झळके. तिला पाहणारे सर्व लोक आश्चर्यचकित होऊन जात. काहींना तिचे भयही वाटे. त्यांना ती चेटकीण वाटे. म्हणून तिच्याशी वडिलांनी तिला अझरबैजानमधील आरक ह्या गावी नेऊन ठेवले. तिथे पैतिराष्पने तिच्याशी ओळख करून घेतली आणि आपला मुलगा पौरुषाष्प ह्याच्याशी तिचा विवाह लावून दिला.

आरक गाव मोठे सुरेख होते. त्या गावाभोवती डोंगराचे कडे होते. त्या गावाच्याच नावाची एक नदी गावातून वाहत होती. आजही आरक नदी कॉकेशस पर्वतात उगम पावते, आर्मेनियातून आणि अझरबैजानमधून वाहत जाते आणि मग कॅस्पियन समुद्राला जाऊन मिळते. ह्याच सुंदर आरक नगरात वसंतऋतूतील एका प्रसन्न सकाळी झरतुष्ट्राचा जन्म झाला.

यीमा उर्फ जमशेद ह्याने प्रथमच २१ मार्च ह्या उत्तरायणाच्या दिवशी नवीन वर्ष-दिन साजरा केला. आजही इराणात हा नववर्षदिन पाळण्यात येतो. ह्या नववर्ष दिनाच्या पाचच दिवस नंतर प्रेषिताचा जन्मदिवस परंपरा पाळते. पारशी लोक हा दिवस खोर्दाद साल–पूर्णत्वाचे वर्ष–म्हणून साजरा करतात.

लोककथांतून गुंफलेल्या प्रेषिताच्या चरित्रात अनेक अद्भुत कथा सांगितल्या आहेत.

इतर मुले जन्माला येतात, तेव्हा रडतात. पण झरतुष्ट्र जन्माला आला तोच हसत हसत, असे लोककथा सांगते. ग्रीक इतिहासकार प्लीनी लिहितो की ह्या नवजात बालकाचा मेंदू एवढ्या जोरजोरात हलत होता की त्याच्या डोक्याला कोणी हातही लावू शकत नव्हते !

त्या काळात दोरासारून नावाचा एक दुष्ट राक्षस राहत असे. तो व त्याचे साथीदार ह्यांनी ह्या मुलाला मारायचे खूप प्रयत्न केले. एकदा त्यांनी बालझरतुष्ट्राला पळवून नेले आणि अलबुर्झ डोंगराच्या पायथ्याशी नेऊन ठेवले. एका गरुड पक्षिणीला ते बाळ सापडले. तिने त्याला आपल्या घरी नेले. तिथे तिने त्याला आपल्या पिलाबरोबर खाऊ–पिऊ घातले. काही दिवसांनी रडत रडत दुधदोवा तिथे आली. तिचे पाय रक्तबंबाळ झाले होते. तिने तिचे हरवलेले बाळ शोधून काढले व ती त्याला घरी घेऊन गेली. पुन्हा एकदा जादुगारांनी त्या बाळाला मारून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्याला एका धळीत फेकून दिले. त्या जागेवर सूर्यास्ताला गुरांचा एक कळप पाण्याच्या शोधासाठी येत असे. असाच तो कळप त्या दिवशी आला तेव्हा एक धष्टपुष्ट गाय त्या बाळाला चारी पायांच्या मध्ये घेऊन उभी राहिली आणि तिने त्या सुसाट धावणाऱ्या कळपापासून त्या बाळाचे संरक्षण केले. पुन्हा एकदा दोरासारूनने बाळाला पळवले आणि एका लांडग्याच्या कळपात फेकून दिले. त्या लांडग्यांच्या पिलांना त्याने आधीच मारून टाकले होते. लांडगा–लांडगी जेव्हा त्या बाळाला फाडायला धावले, तेव्हा त्यांचे जबडेच निश्चेष्ट झाले. तेवढ्यात तिकडून दोन शेळ्या आल्या आणि बाळ झरतुष्ट्राला घेऊन गेल्या. त्यांनी, बाळाच्या आईने त्याला शोधून काढीपर्यंत, त्याला आपले दूध पाजून वाढवले.

चिडून–संतापून जादुगारांनी पुन्हा बाळाला पळवले आणि त्याला अग्नीत फेकून दिले. पण त्या अग्निज्वाला गुलाबपाकळ्यांप्रमाणे थंड व सुवासिक बनल्या.

शेवटी दोरावरून एकदा बाळ झोपला होता त्या खोलीत हलकेच शिरला. त्याने बाळाला भोसकण्याचा प्रयत्न केला. पण चमत्कार झाला. त्याचा हात वरच्या वरच राहून हातातला भाला जमिनीवर पडला.

झरतुष्ट्र मोठेपणी विचारी आणि दयाळू झाला. गरिबांचे दुःख पाहून तो कष्टी होई. एकदा राज्यात दुष्काळ पडला होता. अनेक लोक मृत्युमुखी पडले; तेव्हा त्याने आपली सारी संपत्ती कुळांना वाटून टाकायची विनंती वडिलांना केली. त्याच्या वडिलांनी ती विनंती मान्य केली आणि मग झरतुष्ट्राचे कुटुंबही त्यांच्या कुळांप्रमाणेच गरीब बनले. परंतु त्यांना त्या कुळांचे प्रेम लाभले आणि ते समाधानी झाले.

वयाच्या पंधराव्या वर्षी झरतुष्ट्राने सर्व ऐहिक सुखांचा त्याग केला आणि तो अहोरात्र आहुरमाझदाच्या सेवेत मग्न झाला.

तो वीस वर्षांचा झाला तेव्हा त्याने आपल्या आई–वडिलांचा निरोप घेतला आणि तो साधना करण्यासाठी एका गुहेत गेला. त्याच्या वडिलांनी त्याच्यासाठी खूप भेटी–बक्षिसे तयार ठेवली होती. परंतु झरतुष्ट्राने, आठवण म्हणून, फक्त कश्ती तेवढी घेतली.

गौतमबुद्ध आणि महावीर ह्यांच्याप्रमाणेच झरतुष्ट्रालाही जीवनाचे रहस्य जाणून घ्यायचे होते. ह्या जगात मृत्यू का आहे ? कष्ट दुःख का आहेत ? काही लोक दरिद्री–उपाशी असतात आणि काही श्रीमंत आणि भरलेल्या पोटाने कसे राहू शकतात ? ह्या जगात दुष्ट प्रवृत्ती कशा झाल्या ?

दहा वर्षे तो त्या गुहेत एकटा राहिला. उशीदारेन पर्वताच्या शिखरावर ही गुहा होती. तिथे तो कंदमुळे आणि फळे खाऊन राही. तिथे अनेक शेळ्या येत. त्या त्याला आपले दूध देत. ' उशीदारेन 'चा अर्थ– ' ज्ञानप्राप्ती करून देणे. ' ह्याच पर्वतावर झरतुष्ट्राला ज्ञानप्राप्ती झाली. आहुरमाझदाने त्याला साक्षात्कार दिला. झरतुष्ट्राने आहुरमाझदाला अनेक शोधक, सखोल प्रश्न विचारले.

वयाच्या तिसाव्या वर्षी झरतुष्ट्र ह्या मर्त्य जगात परतला. त्याने आपल्याला झालेले ज्ञान इतर मानवांना द्यायला सुरुवात केली. त्याचा पहिला शिष्य होता त्याचाच भाऊ मैध्योमाओंघा. पुढची कित्येक वर्षे हे दोघे गावोगाव फिरत होते. ज्ञानाचा प्रसार करीत होते. पण बेंडवा, ग्रेहमा, कार्पण, कवया, उशिस अशा टोळ्यांनी झरतुष्ट्राची शिकवण साफ झिडकारून लावली.

एक दिवस हे दोघे भाऊ दैत्य उर्फ ऑक्सस ह्या नदीच्या किनारी आले. त्या वाहत्या पाण्याच्या काठावर झरतुष्ट्र ध्यानस्थ बसला. तेव्हा आहुरमाझदापासून निघालेली एक दिव्य शक्ती–अमर प्रकाश–झरतुष्ट्रासमोर येऊन उभी राहिली. ही शक्ती म्हणजे दैदीप्यमान वेष परिधान केलेली वोहुमान–उत्तम मन–होते.

वोहुमानाने झरतुष्ट्राला प्रश्न केला, " तुला काय जाणून घ्यायची इच्छा आहे ?" झरतुष्ट्राने उत्तर दिले, मला जीवन व ज्ञान ह्यांच्या देवतेला भेटायचे आहे. मला तिच्याकडे घेऊन जा." तेव्हा वोहुमानाने सांगितले, " डोळे मीट." झरतुष्ट्राने डोळे मिटले. क्षणार्धातच त्या दिव्य शक्तीने झरतुष्ट्राला अंगार रौचो–अमर्याद प्रकाश–च्या क्षेत्रात आणून पोहोचवले. हेच आहुरमाझदाचे वसतिस्थान. झरतुष्ट्र तिथे उभा राहिला. तो त्या दिव्य प्रकाशात न्हाऊन निघाला होता. तिथे उभे राहून त्याने आहुरमाझदाला अनेक शोधक प्रश्न विचारले. दुष्ट प्रवृत्तीची उत्पत्ती, पवित्र अग्नीचे–अतारचे–महत्त्व, मानव व जग ह्यांची नियती ह्याबाबतचे ते प्रश्न होते. ह्या सर्व प्रश्नांबाबतच्या झरतुष्ट्राच्या जिज्ञासेचे समाधान झाले, तेव्हा वोहुमानाने त्याला परत पृथ्वीवर आणून सोडले.

फिरत फिरत प्रेषित बॅक्ट्रिया या पूर्व इराणमधील एका छोटया राज्यात आला.

तिथे कावा विस्ताष्प राज्य करीत होता. त्याची राणी हुतौशा ऊर्फ हुताक्षी आणि त्याचा राजपुत्र होता अस्कंधार. दोन विश्वासू, मंत्री जमाष्पा व त्याचा भाऊ फ्रावोष्ट्र हे व्होग्वाय कुळाचे होते.

झरतुष्ट्र त्या राज्यात पोचला त्याच्या आदल्याच रात्री राजाला स्वप्न पडले होते की झरतुष्ट्र एका सोनेरी सिंहासनावर बसून छपरातून त्याच्या शयनगृहात उतरला आहे. प्रेषिताच्या एका हातात एक अग्निगोल होता आणि दुसऱ्या हातात आवेस्ता आणि होआमा झाडाची एक डहाळी होती. झोपेतच कावा विस्ताष्पने ती होआमाची डहाळी घेतली आणि जमिनीत रोवली. तेव्हा होआमा दिव्य स्वरूपात प्रगट होऊन त्याच्याशी बोलू लागली.

'हे भल्या राजा, ऐक. ह्या जगात एकच देव आहे–आहुर माझदा–जीवन आणि ज्ञान ह्यांचा देव. त्याने दएना वांगुई–खरा धर्म–त्याचा प्रेषित झरतुष्ट्र ह्याला सांगितला आहे. ह्या खऱ्या देवाने पाठिंबा दिलेल्या ह्या धर्माचा तू स्वीकार कर. तो धर्म ह्या आवेस्ता ग्रंथात लिहिलेला आहे.'

स्वप्नातच झरतुष्ट्राने आपल्या हातातील तो अग्निगोल राजाच्या हातात ठेवून त्याला सांगितले–'हा अग्नी प्रज्वलित ठेवण्यासाठी कोणत्याही इंधनाची आवश्यकता नाही. हातात धरला तरी त्याने हात जळत नाही, त्यावर पाणी किंवा माती टाकली तरी तो विझत नाही. हा अग्नी म्हणजे खऱ्याखुऱ्या, एकमेव देवाचे, आहुर माझदाचे, प्रतीक आहे. त्याला नीट सांभाळ.'

आणि शेवटी झरतुष्ट्राने राजा विस्ताष्पच्या हाती आवेस्ता ग्रंथाची प्रत ठेवली.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजाचा प्रतिहारी सिंहासनासमोर उभा राहून सांगू लागला, "महाराज, महाद्वाराबाहेर एक माणूस आला आहे. त्याला आपली भेट हवी आहे."

"काय नाव त्याचं ?" राजाने विचारले.

"झरतुष्ट्र म्हणवतो तो स्वत:ला."

"त्यांना ताबडतोब आत घेऊन ये." राजाने आज्ञा दिली. ह्या घटनेचे त्याला मनोमन आश्चर्य वाटत होते.

विस्ताष्पच्या दरबारात झरतुष्ट्राने तीन दिवस धार्मिक वादविवाद केला. आपला नवा धर्म त्याने लोकांना समजावून दिला. त्यामुळे जादूगार आणि चेटूक करणारे हादरून गेले. त्यांनी प्रेषितालाही जादू व चेटूक करावयाचे आव्हान दिले. त्या जादुगारांनी आकाशात एकाच वेळी दोन सूर्य समोरासमोर प्रकाशत ठेवले. तेव्हा झरतुष्ट्राने आवेस्तातील सर्वात पवित्र अशी आहुनावैर्य प्रार्थना म्हटली. त्याबरोबर एक भली थोरली धातूची थाली खणखणत जमिनीवर पडली !

सगळ्या शंकांचे निरसन केल्यानंतर झरतुष्ट्र राजाला म्हणाला, " हे राजन्, मी आहुरमाझदाचा संदेश घेऊन तुझ्याकडे आलो आहे. तो संदेश ह्या ग्रंथात लिहिला आहे. ह्या ग्रंथाचे नाव आहे आवेस्ता. ह्या आवेस्तातील सूत्रे तू समजावून घे. आशो-पथ—आशेचा मार्ग, परमेश्वरी सत्य, दैवी न्याय आणि सद्‌गुण ह्यांच्या मार्गाने चाल. त्यानेच तुला मोक्ष मिळणार आहे. तुझ्या प्रजेलाही मिळणार आहे. मी उद्या परत येईन. तेव्हा तू मला तुझे उत्तर दे."

राजाने हा नवीन धर्म स्वीकारला तर दरबारातील आपला प्रभाव नाहीसा होईल, अशी भीती दरबारातील पुरोहित आणि सरदार ह्यांना वाटली. म्हणून त्यांनी झरतुष्ट्र उतरला होता त्या खाणावळीच्या मालकाला लाच देऊन फितवले. आणि झरतुष्ट्राच्या बिछान्याखाली सडकी हाडे, प्रेताचे केस आणि नखे, मेलेल्या कुत्र्या–मांजरांची मुंडकी अशा वस्तू ठेवून दिल्या.

दुसऱ्या दिवशी झरतुष्ट्र जेव्हा विस्ताष्पच्या दरबारात येऊन दाखल झाला तेव्हा सगळीकडे खळबळ माजली. पुरोहित–जादुगारांनी झरतुष्ट्राला जादूटोणा येतो, असा आरोप केला. त्यांनी झरतुष्ट्राच्या खोलीची झडती घेतली तेव्हा तिथे त्या सगळ्या घाणेरड्या वस्तू जशाच्या तशा सापडल्या त्या पाहून राजा संतापला त्याने झरतुष्ट्राला तुरुंगात टाकले. त्या अंधारकोठडीत झरतुष्ट्र रात्रंदिवस प्रार्थना करीत बसे. प्रेषिताच्याभोवती सदासर्वकाळ देदीप्यमान प्रकाश दिसे. तो पाहून तुरुंगाचा पहारेकरी घाबरून गेला.

थोड्याच दिवसांनी अस्पा सिहा (काळा घोडा) नावाचा राजाचा आवडता घोडा पक्षघाताने आजारी पडला. त्याचे चारी पाय आखडून जाऊन त्याच्या पोटाला चिकटले आणि तो वेदनेने जमिनीवर गडबडा लोळू लागला. राजाच्या तबेल्याचा प्रमुख ही बातमी द्यायला धावतपळत राजाकडे गेला. राजवैद्य आले. राज्यातले सगळे हकीम जमा झाले पण अस्पा सिहाच्या दुखण्याला उतार पडला नाही.

झरतुष्ट्राला त्याच्या पहारेकऱ्याकडून ही घटना कळली तेव्हा त्याने राजाला निरोप पाठवला, " मी तुमच्या घोड्याला बरं करतो." राजाने झरतुष्ट्राला दरबारात हजर राहण्याचा हुकूम फर्मावला. झरतुष्ट्राने स्नान केले. स्वच्छ कपडे घातले. प्रार्थना म्हटली आणि तो दरबारात गेला. गेल्याबरोबर त्याने तिथे जमलेल्यांना आशीर्वाद दिले. मग त्याने राजाला सांगितले, " मी अस्पा सिहाला बरं करू शकलो तर तुम्ही माझ्या चार मागण्या मान्य करा." राजाने ते कबूल केले.

झरतुष्ट्राने पहिली विनंती केली ती ही की, विस्ताष्पने झरतुष्ट्राचा धर्म स्वीकारावा आणि आयुष्यात कधीही त्यापासून ढळू नये. राजाने ही विनंती मान्य केली, तेव्हा झरतुष्ट्राने घोड्याच्या एका खुराला स्पर्श केला. ताबडतोब, पोटाला चिकटलेला तो

पाय सुटून त्याची शक्ती परत आली.

दुसरी विनंती करण्यापूर्वी झरतुष्ट्राने शूर राजपुत्र अस्फंद्यार ह्याला बोलावून घ्यायला सांगितले. राजपुत्र दरबारात आल्यावर झरतुष्ट्राने त्याला तरवारीवर हात ठेवून शपथ घ्यायला सांगितली 'मी नवीन धर्माचा स्वीकार करीन आणि त्याचा देशभर प्रसारही करीन.' राजपुत्राने त्याप्रमाणे शपथ घेतली. त्यानंतर झरतुष्ट्राने अस्पा सिहाच्या दुसऱ्या पायाला हात लावला. तसा तोही पाय सुटून त्याचीही ताकद परत आली.

नंतर झरतुष्ट्राने आपल्याला राणी हुताओशा हिच्या अंतःपुरात घेऊन जायची विनंती केली. तिथे तो राणीला आपल्या धर्माची सूत्रे समजावून सांगणार होता. तेव्हा एक सेवक झरतुष्ट्राला अंतःपुरात घेऊन गेला. राणीने मोठ्या आनंदाने झरतुष्ट्राची शिकवण ऐकली आणि तिला ती सूत्रे पटल्यावर तिने त्याच्या धर्माचा स्वीकार केला. तेव्हा प्रेषिताने अस्पा सिहाच्या तिसऱ्या खुराला हात लावला. तावडतोब त्याने पाय पुढे केला आणि त्याची ताकद परत आली.

चवथ्या विनंतीनुसार झरतुष्ट्राने त्या खानावळवाल्यास बोलावून घेण्यास सांगितले. प्रेषिताच्या बिछान्याखाली त्या घाणेरड्या वस्तू आल्या कशा हे त्याला पुन्हा विचारायचे होते. त्याप्रमाणे खाणावळवाल्याला बोलावण्यात आले. राजाने त्याला जरब दिली— " खर खरं काय ते सांग, नाहीतर तुला सुळावर देईन. " तेव्हा खाणावळवाल्याने आपला गुन्हा कबूल केला. ह्या पापकर्मात सहभागी होण्यासाठी ज्यांनी त्याला सक्ती केली होती त्यांची नावेही त्याने राजाला सांगितली. त्या जादुगार व चेटक्यांचा शिरच्छेद करण्याचीच आज्ञा राजा देणार होता. परंतु झरतुष्ट्र मध्ये पडला. त्याने त्यांच्यावर दया करण्याची विनंती राजाला केली, आणि सांगितले– " त्यांना फक्त हद्दपार करा. एवढीच शिक्षा पुरे आहे त्यांना. " राजाने झरतुष्ट्राचे म्हणणे मानले. मग झरतुष्ट्राने अस्पा सिहाच्या चौथ्या पायाला हात लावला, तेव्हा तोही पाय सरळ झाला व त्याच्यातली शक्तीही परत आली. ते उमदे जनावर चारी पायांवर उभे राहिले आणि आनंदाने खिकाळले.

झरतुष्ट्राचे वय ह्या वेळेस ४२ वर्षांच्या आसपास होते. त्याने फ्राशोष्ट्राची मुलगी हवोवी हिच्याशी विवाह केला. त्याला तिच्यापासून तीन मुलगे आणि तीन मुली झाल्या. इसतवस्तर, उर्वततनर, आणि खुर्शिद-चिचर हे त्याचे मुलगे होते आणि फ्रेनी, थ्रिटी आणि पाओरुचिष्टा ह्या त्याच्या मुली होत्या.

झरतुष्ट्राला विस्ताष्पच्या दरबारी सुखाने जीवन व्यतीत करता आले असते. तरीसुद्धा तो फिरत राहिला. कधी पायी, तर कधी घोड्यावरून; कधी उंटावरून तर कधी याकच्या पाठीवरून. आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी तो जागोजागी

जात होता. फिरत फिरत तो तिबेट व चीनपर्यंत आला होता, असे म्हणतात. त्याचे धर्मप्रसाराचे हे काम तीस वर्षे सातत्याने चालू होते. त्यानंतर तो बॅक्ट्रिया (अफगाणिस्तान) ची राजधानी बाल्ख येथे येऊन राहिला.

झरतुष्ट्राचा मृत्यू दुर्दैवी तसाच अचानक होता, असे पुराणात सांगितले आहे. वयाच्या ७७ व्या वर्षी तो बाल्खमधील एका अग्निमंदिरात (अग्यारीत) प्रार्थनेसाठी चालला होता. त्याच वेळी शहरावर तुराणी टोळ्यांनी हल्ला केला. त्यांचा नेता तुर-बारा-तुर ह्याने झरतुष्ट्राला शोधून काढले आणि त्याच्या पाठीत खंजीर खुपसला. झरतुष्ट्र तेव्हा प्रार्थनेत गढलेला होता. नंतरची पुराणे सांगतात की, झरतुष्ट्राने हातातील जपमाळेचे मणी मारेकऱ्याच्या मस्तकावर फेकले आणि तो पुटपुटला— ‘अहुरा तुला क्षमा करो. मी ती केलीच आहे’ आणि तत्क्षणी तो मारेकरीही तिथे मरून पडला.

झरतुष्ट्राच्या शिकवणीचे सार पुढीलप्रमाणे सांगता येईल[४] : जगात एकच ईश्वर आहे. तो म्हणजे आहुरमाझदा. (असे सांगणारा मानवी इतिहासातील, बहुधा, तो पहिलाच प्रेषित असावा.) आहुरमाझदाला तो जीवन व ज्ञान, तेज आणि सत्य, सद्गुण आणि न्याय, प्रेम व दया ह्यांची देवता मानतो. तिचे अत्यंत विशुद्ध सत्त्व व दृश्य रूप जाणून घेणे आवश्यक आहे, असे तो सांगतो. त्या परमेश्वराच्या लेकरांनी आपण-हून सर्व जाणून घेऊन भक्तीने व प्रेमाने ईश्वराप्रत जावे, अशी त्याची इच्छा आहे. म्हणून आवडी–निवडीचे स्वातंत्र्य हे झरतुष्ट्राच्या शिकवणुकीचे मूलभूत तत्त्व आहे. हे इच्छास्वातंत्र्य प्रत्यक्षात उपयोगात आणावयाचे तर मानवाला सत्कृत्य करणे किंवा दुष्कृत्याचा पाठपुरावा करणे, एवढेच पर्याय उरतात. मानवी मनाचे स्पष्टीकरण करण्यासाठी झरतुष्ट्राने जुळी मैन्यू किंवा जुळ्या वृत्ती, म्हणजेच, मानसिक प्रवृत्तींचा, दृष्टान्त दिला आहे.

दुष्ट प्रवृत्तींच्या मुळाबद्दल निरूपण करताना झरतुष्ट्र मुरुवातीलाच सांगतो की चांगले व वाईट ह्या जुळ्या प्रवृत्ती विचार–शब्द–व कृत्य ह्या सर्वच बाबींमध्ये परस्परविरोधी आहेत. मानवी मनात त्यांचा मिलाफ होऊन मानवाची मनोवृत्ती द्विधा बनली आहे. मानवाने आपल्या चांगल्या मनाचा वापर केला तर तो जीवन (गय) निर्माण करू शकतो, अहुरामाझदा आणि त्याची दैवी शक्ती आपणाकडे आकृष्ट करून घेऊ शकतो. ह्याउलट जर मानवाने आपल्या दुष्ट प्रवृत्तींचाच वापर केला, तर तो अ–ज्यैयती किंवा अ–जीवनस्थिती निर्माण करतो–म्हणजेच स्वतःचा आध्यात्मिक मृत्यू घडवून आणतो. मग त्याच्या मनात गोंधळ निर्माण होतो. मग त्याची प्रवृत्ती ऐश्म म्हणजे संताप, रक्तपिपासूपणा ह्या दुर्गुणांकडे वळते. ह्या प्रवृत्तींमुळेच मानवी अस्तित्व विखारी बनते.

आपल्या सच्च्या अनुयायांना संतापाच्या तडाख्यापासून वाचवण्यासाठी आहुरमाझदा त्यांच्याकडे आपल्या आशा (दैवी कायदा), वोहुमान (उत्तम मन म्हणजे डॉ. एरच तारापोरवाला म्हणतात तसे आपल्या निर्मितीबाबतचे परमेश्वराचे सर्वंकष प्रेम), क्षत्र (दैवी शक्ती, वैभव, दैवी साम्राज्य) आणि आरामैती (दैवी भक्ती), ह्या चार सर्वश्रेष्ठ सामर्थ्यांना पाठवितो. ही सामर्थ्ये मानवाची आयुष्यभर संगतसोबत करतात. त्याच्या प्रत्येक कृत्यात त्याला मार्गदर्शन करतात आणि त्याला आपले कर्तव्य पार पाडण्यात साहाय्य करतात.

मात्र, आहुरमाझदा दुष्ट मानवांना वाऱ्यावर सोडत नाही. त्यांनाही आपल्या कृतकृत्यांचा पश्चात्ताप झाला की त्यांच्याहीसमोर ईश्वरी शक्ती–सामर्थ्य वोहुमानच्या मार्फत उलगडले जाते. मग, दैवी सत्य व दैवी न्याय ह्या आशाच्या त्या दोन हातांत असत्य कसे सुपूर्द करायचे हे तो त्यांना समजावून सांगतो. मग असत्याची जागा सत्य घेते. झरतुष्ट्र आपल्या निरूपणात शेवटी सांगतो की सुख आणि दु:ख ही मानवाच्या चांगल्या व वाईट कृत्यांची फलिते आहेत. देवभीरूंना शुभ फलित मिळते; तर दुष्टांना दीर्घकाळ पीडा होते. परंतु जेव्हा सर्व गोष्टी पूर्ण केल्या जातील तेव्हा सर्वत्र चिर आनंद पसरेल आणि तेव्हाच फ्राशोकेरेटी–अस्तित्वाचे पुनरुत्थान होईल.

झरतुष्ट्र मानवाचे दोन गट पाडतो–आशावन्त–आशावादी–आशा, म्हणजेच सत्य मानणारे आणि द्रेग्वंत (द्रुज)–असत्य पाळणारे. माणूस जेव्हा जेव्हा कसलाही निर्णय घेतो तेव्हा तो चिन्वतो पेरेतुवरून, म्हणजे विभाजन पुलावरून चालत असतो. हा पूल सत्य व असत्य ह्यांच्या पूजकांना विभागतो–वेगवेगळे करतो. चिन्वत हाच न्यायाचाही पूल आहे. मानवी आत्मा हा पूल मृत्यूनंतर ओलांडतो. गेयुश उर्व ऊर्फ निर्मितीचा आत्मा ह्यालाही चांगल्या मेंढपाळाबरोबर–मोक्षदात्याबरोबर राहायचे, की जो कधी अस्तित्वातच नव्हता त्याच्याबरोबर राहायचे, ह्यातील पसंतीचा पर्याय दिला जातो.

मृत्यूनंतर आशावन्त गारो देमाना–स्वर्गीय गीताच्या महालात जातात. ह्या महालात, अमर्याद प्रकाशाच्या क्षेत्रातून स्वत: आहुरमाझदा झरतुष्ट्र व त्याचे शिष्य आणि मार्गपंथीय ह्यांच्याशी विचारविनिमय करायला येतो. सद्‌गुणी, सजीव, मार्गपंथीय आहुरमाझदाशी दैवी आनंदाच्या प्रार्थनेच्या माध्यमातून बोलतात. ह्याचाच अर्थ गारो देमाना ही अशा तऱ्हेच्या आनंददायी मन:स्थितीचे मूर्त रूप आहे.

ह्या उलट, द्रेग्वंत किंवा दएवपूजक, म्हणजेच जे अनेक ईश्वर मानतात ते लोक, मृत्यूनंतर द्रुजो माना–असत्य महाला–मध्ये जातात. तिथे त्यांना आपली कृत्ये, विचार ह्यांच्याबद्दलची कडू फळे चाखावी लागतात आणि धूरकट उजेड आणि भयाण किंकाळ्या ह्यांच्या संपर्कात राहावे लागते. हा त्यांच्या दुष्ट मनातून जन्मलेल्या दुष्ट बुद्धी व दुष्ट कृत्ये ह्यांचा परिणाम असतो.

आपल्या बरोबरच्या लोकांशी चांगले वागणे हेच झरतुष्ट्राच्या शिकवणुकीचे सार आहे. हुमाता, हुक्त, हुवराष्ट्र किंवा मनश्नी, गवस्नी, कुनाश्नी म्हणजेच चांगले विचार, उत्तम शब्द आणि सत्कृत्य, हेच त्याचे ध्येयवाक्य आहे. पहेलवी ग्रंथात म्हटले आहे की चांगले विचार चांदण्यांनी भरलेल्या स्वर्गात आहेत. ह्याचाच अर्थ चांगले विचार प्रत्यक्षात उतरवले नाहीत तर त्यांचा प्रभाव दूरवरच्या ताऱ्यांइतकाच दुरापास्त ठरतो. चांगले शब्द चांदण्यांनी न्हाऊन निघालेल्या स्वर्गात असतात. कारण गोड भाषणातून चांगली कृती झाली नाही तर वाढत्या वा कलत्या चंद्रकलेच्या रुपेरी प्रकाशांइतकेच ते भाषणही अ-प्रभावी ठरते. चांगली कृत्ये राहतात सूर्यमहालात. कारण चांगली कृत्ये आपल्याच प्रकाशाने झळाळतात. त्यांना आपल्या अस्तित्वाची खबर द्यायला कोणाची गरज भासत नाही.

ह्या धर्माची दोन महान प्रतीके म्हणजे हवारे क्षायेता-झळाळता सूर्य आणि अतार ख्वारेह-झगमगता अग्नी. आहुरमाझदाच्या शरीरावर सूर्याचे आवरण आहे. त्याच्या दैवी शक्ती त्याचाच अविभाज्य भाग होऊन बसल्या आहेत. सूर्याशी एकरूप झाल्या आहेत. अग्नी हे दैवी शक्तीचे प्रतीक आहे. म्हणूनच त्याला आहुरमाझदाचा पुत्र मानले जाते. अग्नी जसा त्याच्यात टाकलेल्या कचऱ्याला जाळून टाकूनही स्वत: पवित्रच राहतो आणि आपले गुण टिकवतो, तसेच असत्याला आपले हृदय आणि मन ह्यातच जाळून टाकायला पाहिजे. म्हणजे मग विचार, शब्द आणि कृत्य हे फक्त सत्याला (आशा) वाहून नेता येतात. त्यासाठीच पवित्र अग्नी-अतार अग्यारीत दिवस-रात्र जळत असतो. त्याला चंदन आणि धूप ह्यांचे इंधन पुरवण्यात येते. त्यांचा सुगंध जसा स्वर्गाला जाऊन भिडतो, तसेच दैवी प्रेमाच्या अग्नीलाही सुंदर प्रार्थनेच्या सुगंधाचे हवन देत राहिले पाहिजे.

परिपूर्णत्व आणि अमरत्व ही आध्यात्मिक जीवनाची दोन फलिते आहेत. दुष्ट प्रवृत्तींशी दीर्घकाळ उग्र झगडा केल्यानंतर मृत्यू आला की ती प्राप्त होतात. तेवढ्यासाठी झरतुष्ट्राचा प्रत्येक शिष्य हा 'आरोग्यसंपन्न व ताकदवान शरीरासह दीर्घायुष्य मिळून अखेरपर्यंत वाइटाशी झगडता यावे' अशी प्रार्थना करीत असतो. सर्व मानवांनी असत्याची पूजा करण्याचे सोडून द्यावे, सर्व अप्रामाणिकपणा सोडून द्यावा, म्हणजे मग लवकरच, एक दिवस मानवाला मृत्यूवर नक्की मात करता येईल, असे झरतुष्ट्राचे सांगणे आहे.

जीवन आणि सत्य ह्याद्वारे मृत्यू आणि दुष्ट प्रवृत्ती ह्यांच्यावर मात करणे ही मानवाची ह्या मर्त्य जीवननाट्यातील भूमिका आहे. ती मानवाला पार पाडावीच लागते. आपल्या प्रत्येक विचाराला व कृत्याला प्रत्येकाने आव्हान द्यावे व त्यातून चांगले निवडून त्यानुसार वागावे अशी झरतुष्ट्राची अपेक्षा आहे. कारण सर्व मानवांनी

दैवी न्याय आणि चांगले मन ह्यांच्या हिरव्यागार कुरणातून चालावे अशी झरतुष्ट्राची इच्छा आहे.

१. परिशिष्ट ‘ अ ’ पाहा.
२. एरच जे. एस. तारापोरवाला– ‘ गाथा मीटर अँड चँटिंग– ’ हा बुलेटिन ऑफ डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिटट्यूट, खंड ३ रा, पाने २१९–२२२ वरील लेख. त्याशिवाय आवेस्ता–भाग १ (हिंदी)–संपादक एम. एफ. कांगा आणि एस. एन. सोनटक्के, पुणे १९६२, पाने xviii (अठरा) आणि xxi–xxii (एकवीस–बावीस)
३. ए. व्ही. डब्ल्यू. जॅक्सन–झोराष्ट्र–न्यूयॉर्क, १९०९
४. एफ्. ए. बोडे व पी. नानावट्टी–साँग्स ऑफ झरतुष्ट्र–लंडन, १९५२, पाने ३० ते ३५.

३. सण–समारंभ–रूढी

झरतुष्ट्राच्या शिकवणुकीतील पावित्र्य–शुद्धता फार काळ टिकली नाही. त्याच्या मृत्यूनतर लवकरच गाथा मागे पडल्या. आणि अनाहिता–जल व संतती ह्यांची देवता, अशासारख्या अनेक देवता झोराष्ट्रियनांच्या प्रार्थनेत परत डोकावू लागल्या. खोर्देह अवेस्ता ह्या दैनंदिन प्रार्थना–ग्रथात अहुर मझदा, आशा वहिष्ट (अर्दिबेहेश्त) सार्वभौम कायदा आणि स्रओषा (सरोष)– दैवी अंत:प्रेरणा, ह्यांच्याबद्दलची स्तोत्रे आहेत; तशीच सूर्य, चंद्र, पृथ्वी, अग्नी आणि तारे रखरखीत शेतांना जीवन देणाऱ्या पावसाचे आगमन सूचित करणारे तिश्त्रिय, ह्यांच्या स्तुतीची स्तोत्रेही आहेत. झोराष्ट्रियनांच्या पिढयानूपिढया आपल्या धर्मग्रंथातील ही विसंगती मान्य करीत आल्या आहेत. ह्या सर्व देवता दैवी शक्तीची अंगे आहेत. म्हणूनच त्या आदरणीय आहेत, असे ते मानीत आले आहेत.

आधुनिक पारशी लोकांच्या समारंभात, रीतिरिवाजात झरतुष्ट्राच्या शिकवणुकीची मूलभूत तत्त्वे अजूनही शिल्लक आहेत. अशा त्यांच्या समारंभांपैकी काही महत्त्वाच्या समारंभांचे वर्णन करू या.

नवजोत :

प्रत्येक पारश्याच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा समारंभ वा घटना म्हणजे नवजोत समारंभ–दीक्षा समारंभ. त्याच्या वयाच्या ७ व्या वर्षापासून १५ वर्षांपर्यंत कधीही तो केला जातो. त्या समारंभाला बटूचे आई–वडील, नातेवाईक आणि मित्र उपस्थित राहतात. झरतुष्ट्राने मान्यतेचे स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचे मानले आहे. त्यामुळे पारशी आईवडिलांचे मूल, त्याने स्वत:चा धर्म स्वत: स्वीकारीपर्यंत पारशी समजण्यात येत नाही. नवजोत समारंभाच्या वेळी सद्रा आणि कश्ती ही त्या धर्माची दोन महत्त्वाची प्रतीके बटूला देण्यात येतात.

नवजोत समारंभ होण्यापूर्वी प्रत्येक बटूला कश्तीची प्रार्थना आणि तिचा अर्थ समजावून सांगितला जातो. सद्रयावर कश्ती कशी बांधायची ते शिकवले जाते.

इराणी परंपरा असे मानते की कश्तीची प्रथा प्रथम यीमा ऊर्फ जमशेद ह्यांनी सुरू केली. ती प्रथा झरतुष्ट्राने स्वीकारली. मात्र त्यात त्याने एक सुधारणा केली–ती म्हणजे

कश्ती सद्र्यावर बांधायची. पहेलवी लेखक सद्र्याला 'वोहुमानिक वस्त्र' म्हणजेच वोहुमानी उत्तम मनाचा पोषाख मानतात. कश्ती विधी करताना 'दिनिक निरंघा' ही खास प्रार्थना म्हणण्यात यावी, अशी आज्ञा झरतुष्ट्राने दिली. अहुराच्या आज्ञेचे मानवाने पूर्णत: पालन केल्याची खूण म्हणजे कश्ती, असे झरतुष्ट्र म्हणतो. कश्तीमुळे पाप आणि दुष्ट प्रवृत्ती ह्यांना दारे बंद होतात. कश्ती हे विनाशाच्या सामर्थ्याविरुद्धचे एक प्रभावी शस्त्र आहे.

कश्ती ही श्रद्धेच्या सूत्रांचे प्रतीक आहे. ती कोकराच्या उत्तमातल्या उत्तम लोकरीच्या ७२ धाग्यांपासून बनवली जाते. हे ७२ धागे यस्ना ह्या प्रार्थनेच्या पुस्तकातील ७२ प्रकरणांची प्रतीके आहेत. पुरोहितांच्या कुटुंबातील व्यक्तींनाच कश्ती विणण्याचा अधिकार आहे. कारण ती विणताना प्रत्येक टप्प्याला खास प्रार्थना म्हणावयाची असते.

सद्रा कोणत्याही पांढऱ्या कापडापासून, साधारणपणे मलमलचा किंवा सुती कापडाचा, बनवतात. त्याचा गळा इंग्रजी 'व्ही' अक्षराच्या आकाराचा असतो. त्या 'व्ही' च्या खालच्या टोकाला एक इंचाचा एक चौकोनी कप्पा असतो. ह्या कप्प्याला 'किस्सेह–इ–कर्फेह'–म्हणजे सत्कृत्यांचा खिसा असे म्हणतात. पांढरा रंग हे निरागसतेचे आणि पावित्र्याचे लक्षण मानले जाते. त्या पांढऱ्या कापडावरचा तो खिसा मानवाला सातत्याने सुचवीत असतो की मानवाने कितीही मोठे सत्कृत्य केले तरी ते परमेश्वराने केलेल्या सत्कृत्यांच्या तुलनेने १ चौरस इंचापेक्षा जास्त असूच शकत नाही. एखाद्या गरिबाला सद्रा बनविण्याइतकेही कापड घ्यायची ऐपत नसली तर तो कापडाचे तुकडे एकत्र जोडून सद्रा बनवू शकतो. त्याचसाठी प्रत्येक सद्र्याच्या खालच्या दोन्ही टोकांना तीन–तीन टाके घातलेले असतात. देवाच्या नजरेत गरीब व श्रीमंत सारखेच असतात, असेच ते टाके सांगतात. सद्रा अंगासरशी घालायचा असतो.

प्राचीन इराणमध्ये नवजोत समारंभ भल्या सकाळी होत असे. आज–काल तो सकाळी होतो किंवा सूर्यास्तापूर्वी होतो.

'नवजोत' असेल त्या दिवशी त्या मुलाला अभ्यंगस्नान (न्हान) घातले जाते. मग त्याला डाळिंबाच्या झाडाचे पान चावायला देतात. थोडा हओमाचा रसही प्यायला देतात. डाळिंबाच्या पानात ज्ञान असते आणि हओमाच्या रसाने अमरत्व मिळते, असे मानले जाते. हे विधी चालू असताना तो बटू आणि पुरोहित विशिष्ट मंत्र म्हणत असतात.

मग पुरोहित त्या मुलाला वेदीवर घेऊन जातो. तिथे आणखी पुरोहित बसलेले असतात. अफरघान (अग्निपात्र) मध्ये चंदन आणि धूप ह्यांचा अग्नी प्रज्वलित करून तो मधोमध ठेवलेला असतो.



कश्ती विणताना ('पारसियाना'च्या सौजन्याने)



विवाहसमारंभ
(सौजन्य : दस्तुर एफ. ए. बोदे)



और्ध्वदेहिक

(सौजन्य : जमशेद जे. भाभा)



दस्तुर मेहेरजी राणा (१५३६-१५९१)
उजव्या टोकाला (मोगल मिनिएचर
मधिल उतारा,
पूर्वीच्या अे. सी. आर्देशीर संग्रहातून)



सुरतचे रुस्तुम माणेक
(१६३५-१७२१)

दादाभाई नौरोजी (१८२५–१९१७)



त्या बटूच्या अंगात एक पांढरा पायजमा–इजार–असते. कमरेच्या वर काहीही वस्त्र नसते. फक्त खांद्याभोवती एखादी शाल नाहीतर पांढरे वस्त्र लपेटलेले असते. नवजोतचा विधी सकाळी होत असेल तर त्या मुलाला पूर्वेकडे तोंड करून उभे केले जाते. समोर पुरोहित उभे असतात. सगळेजण काही मंत्र म्हणत असतात. मग पुरोहित त्या बटूला सद्रा अर्पण करतात, नंतर कश्ती. मुलाची बोटे आपल्या एका हातात धरून भटजी त्या मुलाकडून कश्ती–मंत्र म्हणवून घेतात. शेवटी फ्रावर्नेचे–धर्म-स्वीकृतीचे मंत्र म्हटले जातात.

कश्ताचे तीन वेढे कमरेभोवती दिले जातात. दीक्षा दिलेल्या व्यक्तीने आपला विचार, शब्द आणि कृती आता अहुरामझ्दाच्या सेवेसाठी वाहायला पाहिजेत, असा त्या तीन वेढ्यांचा अर्थ होतो. त्यावर लक्ष वेधावे, ह्यासाठी कश्तीची पहिली गाठ मारली जात असताना 'शाओथेनेनाम' हा शब्द उच्चारला जातो. त्याचा अर्थ 'कृती' असा आहे. त्याच वेळी 'आहुन वइर्य'ची प्रार्थना दोनदा म्हटली जाते.[१] ह्या प्रार्थनेत 'द्रिघु'–पृथ्वीवरील अनाथ, अपंग, निराश्रित–ह्यांच्यावर प्रेम करावे, त्यांची सेवा करावी, असा उपदेश असतो. असे झाले म्हणजे अहुराईचे–क्षाथ्रेम्–अहुराचे सार्वभौमत्व ह्या जगावर प्रस्थापित होऊ शकते.

जुन्या काळी, बर्हिर्दिशेला जाऊन आल्यानंतर, आंघोळीनंतर आणि प्रत्येक जेवणाच्या आधी कश्ती विधी केला जात असे. हल्लीच्या धावपळीच्या जीवनात मात्र झोपेतून उठल्याबरोबर, झोपायला जाण्यापूर्वी, अशा दोनच वेळा कश्तीचे मंत्र म्हणणे, गाठी मारणे वगैरे विधी केले जातात.

विवाहविधी

नवजोतनंतरचा, प्रत्येक झोराष्ट्रियनाच्या आयुष्यातील महत्त्वाचा विधी म्हणजे विवाह. पारशी लोक भारतात राहायला आले, त्या काळापासून पहिल्या महायुद्धापर्यंत त्यांचे विवाहविधी दीर्घकाळ चालत. बारीक सारीक तपशिलाने केले जात. आज ते अगदी त्रोटकपणे, संक्षिप्तपणे होतात.

विवाहविधीच्या सुरुवातीला वधू व वर एकमेकांच्या समोर बसतात. विवाह लावणारा पुरोहित दोघांच्यामध्ये अंतरपाट धरतो व त्याची टोके त्या दोघांच्या खुर्च्यांना बांधून टाकतो. मग वधूचा व वराचा उजवा हात एकमेकांच्या हातात देऊन त्या दोन्ही हातांना दोऱ्याचे सात वेढे दिले जातात. त्याचा सहकारी अफरघान (पवित्र अग्निकुंभ) घेऊन शेजारीच उभा असतो. मंत्र म्हटले जात असतात. मुख्य पुरोहिताने सूचना केली की अग्निकुंभ धरलेला पुरोहित अग्नीला चंदन आणि धूप ह्यांची आहुती

देतो आणि त्याच वेळी वधू–वरांमधील अंतरपाट दूर केला जातो. जमलेले सारेजण टाळयांचा कडकडाट करतात. वधू आणि वर ह्यांच्या डाव्या हातात तांदूळ असतात. ते ते एकमेकांवर उधळतात. त्यांची ती कृती भरभराटीचे प्रतीक असते. एवढे पार पडल्यावर उरलेला विवाहविधी चालू होतो.

हल्ली मात्र वधूवर शेजारी–शेजारी बसतात. आपापल्या अपत्यांच्या मागे आई–वडील व नातेवाईक बसलेले असतात. बाजूलाच विवाहाचे साक्षीदार उभे असतात. वधू–वरासमोर दोन पुरोहित उभे असतात. विधीला सुरुवात होते. विवाहाच्या कायद्याचे पठण सुरू झाले की भटजी वराकडील साक्षीदाराला विचारतात–

'आज, पवित्र इराणच्या सासानी राजवंशातील सम्राट यज्ञदेगार्दच्या अमुक संवत्सरातील अमुक महिन्याच्या अमुक दिवशी अमुक शहरात जमलेल्या ह्या मंडळींच्यासमोर सांगा की तुम्ही अमुक कुमारिकेचा विवाह ह्या वराशी माझ्दायस्नानाच्या विधि अमुक नियमांनुसार लावून द्यायला तयार आहात काय ? तिला शुद्ध, शुभ्र चांदीचे २००० दिराम आणि शुद्ध सोन्याची दोन निशापूर दिनार नाणी द्यायला तयार आहात काय ?

आणि मग वधूच्या साक्षीदाराला विचारले जाते–

'तुम्ही व तुमच्या कुटुंबियांनी सदसद्‌विवेकबुद्धीला स्मरून, सत्य विचार, शब्द व कृती ह्यांना अनुसरून, सदसद्‌विवेकाची वृद्धी व्हावी, ह्या हेतूने ही वधू, कायमची, लग्नात अमक्याला द्यायला समती देता काय ?'

त्यावर साक्षीदार उत्तर देतो, " माझी संमती आहे."

त्यानंतर महत्त्वाचा विधी सुरू होतो. पुरोहित प्रथम वराला व नंतर वधूला विचारतात–

'तुम्ही ह्या विवाहाच्या करारात आजन्म गुंतून राह्यचं ठरवलं, ते चांगल्या विचारानेच ना ?'

हा प्रश्न दोघांनाही तीन–तीनदा विचारला जातो आणि त्यावर दोघांना तीन-तीनदा उत्तर द्यावे लागते–'पसंदे कर्दम'–मला मान्य आहे. त्यांच्यापैकी एकानेही जरी उत्तर दिले नाही तरी विवाहविधी थांबतो, आणि मग दोघांच्या मनाविरुद्ध त्यांचा विवाह करून द्यायला कोणताही पुरोहित धजावत नाही.

ह्यानंतर पझेंद आणि अवेस्तातील काही सुंदर उपदेश आणि आशीर्वाद ह्यांना प्रारंभ होतो. हा सर्व विधी संस्कृतमध्येही म्हटला जातो. पारशी पहिल्यांदा भारतात आले, तेव्हा येथील सुशिक्षित हिंदूंची भाषा संस्कृत होती. त्याचे हे अवशेष असावेत. हे आशीर्वादपठण चालू असताना भटजी वधू–वरांवर तांदळाच्या अक्षता टाकीत असतात. ह्या अक्षता म्हणजे समृद्धी-भरभराटीचे प्रतीक. शेवटचे आशीर्वचन म्हणून झाले की विधी संपतो.

तो संपला की पुरोहितांना सुंदर काश्मिरी शाली आणि दक्षिणा ही दिली जातात. मग वधू–वर आई–वडिलांना आलिंगने देतात आणि पवित्र अग्नीला नमस्कार करण्यासाठी अग्यारीत जातात. तिथे प्रार्थना म्हटल्या जातात. अग्नीला चंदन व धूप ह्यांची आहुती दिली जाते. ' अताशन्यायेश 'चे पठन केले जाते.

मग नव–दांपत्य जमलेल्या मंडळींत परत येते. पाहुणे घरोघर गेले, कुटुंबातील लोकांचे जेवण झाले की वधू वराच्या घरी जाते. तिच्याबरोबर तिचे कुटुंबीय असतात. वधूच्या हातात चांदीच्या भांड्यात झाकलेला वातीचा दिवा असतो. सासरी पोहोचेपर्यंत हा दिवा विझू द्यायचा नसतो. घराच्या उंबरठ्यावर तिची वाट पाहत वर थांबलेला असतो. तो तिला उचलून घरात नेतो. किंवा वधू स्वतःचे उजवे पाऊल पुढे टाकून उंबरठा ओलांडते. नवदांपत्याच्या शय्यागृहात वातीचा तो दिवा रात्रभर जळत राहतो.

मृत्यू

झोरास्ट्रियनांच्या अनेक सुंदर प्रार्थना आणि विधी मृत्यूभोवती गुंफलेले आहेत.

मनुष्य मृत्युपंथाला लागलेला दिसला की, तो जर घरी असेल, तर ज्या खोलीत त्याला ठेवलेला असतो, त्या खोलीचा एक कोपरा धुऊन पुसून स्वच्छ केला जातो. तिथे, जमिनीवरच, पांढरी शुभ्र चादर अंथरली जाते. पुरोहिताला बोलावण्यात येते. तो आल्या आल्या अफरघनमध्ये अग्नी प्रज्वलित करतो, त्याला चंदन व धूप ह्यांची आहुती देतो. ते करीत असताना हलक्या आवाजात मंत्र पुटपुटतो. शरीर सोडून जाणाऱ्या आत्म्याला त्या मंत्रपठणामुळे दिलासा मिळतो, असे मानले जाते.

माणसाचा मृत्यू झाला की त्याचा एखादा जवळचा नातेवाईक किंवा निकटचा मित्र त्याच्या प्रेताजवळ वसून त्याच्या कानात अशेम वोहू [२] किंवा अहुना वइर्यची प्रार्थना पुटपुटत राहतो. प्रेताला आंघोळ घालून त्याला फाटक्या, शुभ्र सद्र्याच्या तुकड्यात गुंडाळणारे लोक येईपर्यंत ही प्रार्थना पुटपुटायची असते.

एकदा प्रेताला आंघोळ घालून ते कपड्यात गुंडाळले की कोणीही त्याला स्पर्श करायचा नसतो. मग प्रेताच्या उशाशी वातीचा दिवा पेटवून ठेवतात. प्रेताच्या दोन बाजूंना दोघे जण बसून अशेम वोहू किंवा अहुना वइर्य प्रार्थना म्हणत राहतात.

मग ह्या कामात तरबेज असलेली दोन माणसे घरात येतात. ती स्वतः आंघोळ करून पवित्र होतात. कश्ती प्रार्थना म्हणतात. अंगात पांढरे स्वच्छ कपडे घालतात आणि मग प्रेत ठेवलेल्या खोलीत येतात. त्या दोघांच्या हातात पायबंद असते. हे पायबंद म्हणजे एक पांढरे कापड किंवा फीत असते. ते हातात असले की त्या माणसाला

प्रेतापासून कसलीही बाधा होत नाही, की कसली लस लागत नाही, अशी समजूत आहे.

ती दोघे ते प्रेत उचलून दिवाणखान्यात आणतात. तिथला एक कोपरा धुऊन पुसून स्वच्छ केलेला असतो. तिथे एक पांढरी चादर अंथरलेली असते. तिथेच, एका फरशीच्या लादीवर, किंवा दगडावर प्रेत ठेवण्यात येते. प्रेताचे हात घडी करून पद्मासनासारखे ठेवण्यात येतात, किंवा ताठ पसरण्यात येऊन दोन्ही घोटे एकत्र बांधून टाकतात. मग फक्त चेहरा उघडा ठेवून बाकीचे शरीर पांढऱ्या चादरीने झाकण्यात येते.

मग लोखंडी कांबीने किंवा खिळ्याने प्रेताभोवती तीन काशा–वर्तुळे–काढली जातात. ती वर्तुळे काढली की प्रेताची बाधा वर्तुळाबाहेरील भागात होत नाही, असे समजतात.

एवढे झाले की सागदिद विधीला सुरुवात होते. सागदिद शब्दाचा अर्थ कुत्र्याचे दर्शन. (साग म्हणजे कुत्रा; दिद म्हणजे दर्शन.) ह्या विधीसाठी खोलीत साखळीला बांधून एक कुत्रा आणण्यात येतो. त्याला त्या प्रेताकडे पाहायला लावतात. प्राचीन इराणमध्ये अशी समजूत होती की मृताच्या अंगात धुगधुगी असली तर ती कुत्र्याला चटकन समजते; तर काहींच्या मते, कुत्र्याच्या नजरेतील जरबेमुळे प्रेत कुजत नाही.

सागदिदच्या ह्या पहिल्या विधीनंतर अफरघानमधील पवित्र अग्नी खोलीत आणून ठेवण्यात येतो. त्याला चंदन आणि धूप ह्यांची आहुती देण्यात येत असते. पुरोहित ह्या अग्नीभोवती बसून ' अवेस्ता 'तील प्रार्थना म्हणत राहतात. प्रेत वाहून नेणारी मंडळी येइपर्यंत हे पठण चालू राहते. प्रेताशेजारी नेहमी एकापेक्षा जास्त माणसे राहिली पाहिजेत असा दंडक आहे.

मृतदेह एखाद्या लहान मुलाचा असला तरी तो उचलायला दोन माणसे लागतात आणि मृत माणूस जर जाडा, दणकट असेल तर त्याला उचलण्यासाठी जादा माणसे लागतात. पण त्यांची संख्या नेहमीच सम असली पाहिजे. ही माणसे भाडोत्री असतात आणि ती तो मृतदेह टॉवर ऑफ सायलेन्स[३] पर्यंत उचलून आणतात.

खोलीत शिरण्यापूर्वी प्रेत वाहून नेणारे लोक आपले हात व तोंड धुतात. कश्ती-प्रार्थना म्हणतात. प्रेताशेजारीच एक लोखंडी तिरडी ठेवलेली असते.

तिथे काही प्रार्थना होतात. मग गेह–सरना विधी सुरू होतो–दोन पुरोहित–प्रेत ठेवलेल्या खोलीच्या दरवाजात उभे राहतात. त्यांच्या तोंडावर पादान–पांढऱ्या कापडाची पट्टी–असते. त्या वेळी पहिली गाथा, अहुनवइती हिचे पठण होत असते. पठण संपले की मृताचे नातेवाईक, मित्र मृतदेहाला अखेरचा निरोप देतात.

हे संपले की प्रेताचा चेहरा झाकला जातो. तिरडीवर मृतदेह पांढऱ्या कापडाच्या पट्ट्यांनी बांधण्यात येतो. ती तिरडी मग, उचलणाऱ्या लोकांच्या हवाली करण्यात येते. तिरडी वाहून नेणारे दोन–दोनच्या जोड्यांनी उभे राहतात. त्यांच्या हातात

पायबंद असतो. पुन्हा एकदा सागदिद विधी करण्यात येतो आणि प्रेतयात्रा सुरू होते. तिच्या अग्रभागी पायबंद घेतलेले पुरोहित असतात. मागे दोन–दोनच्या रांगेने इतर लोक चालत असतात. त्यांनी हातात पायबंद, म्हणजे एखादा रुमाल, धरलेला असतो.

टॉवर ऑफ सायलेन्सच्या दारातच मृतदेह वाहून नेणारे उभे असतात. ते मृतदेह ताब्यात घेतात. तिथे शेवटचा सागदिद विधी होतो. प्रेतयात्रेतील लोक मग मागे फिरतात आणि मृतदेह नेणारी मंडळी देह तिरडीवरून खाली काढतात. त्याचे कपडे काढून टाकतात. ते कपडे कचऱ्याच्या डब्यात टाकले जातात. मग तो नग्न मृतदेह एका पविसवर–टॉवरच्या चबूतऱ्यावरील एका खास विभागात ठेवण्यात येतो. घारी–गिधाडांनी खावा ह्या हेतूने तो देह तिथे ठेवला जातो.

साधारणत: आठवड्यानंतर त्या देहाच्या उरलेल्या अस्थी गोळा केल्या जातात. त्या एका खोल विहिरीत टाकण्यात येतात. त्या विहिरीच्या तळाशी वाळू आणि कोळसा ह्यांचा थर ठेवलेला असतो. तिथे ती हाडे कुजून नाश पावतात.

'टॉवर ऑफ सायलेन्स' मधून परतलेले मृताचे आप्तेष्ट घरी परतल्यावर स्नान करतात. तोपर्यंत मृतदेह ठेवला होता ती खोली धुवून पुसून साफ करण्यात आलेली असते. तिथे एका अफरघनमध्ये पवित्र अग्नी तेवत असता, हा अग्नी तीन दिवस आणि तीन रात्री त्या खोलीत जळत ठेवतात. त्याशिवाय, वातीचा एक छोटा दिवा (पणती) दहा ते तीस दिवस त्या खोलीत तेवत ठेवतात. त्या दिव्याजवळच रोज ताजी फुले फुलदाणीत खोचून ठेवतात. ही फुले सकाळ संध्याकाळ बदलण्यात येतात. सुतकातले पहिले तीन दिवस मृताचे आप्त व मित्रही मांस खात नाहीत. पूर्वी ह्या दिवसांत मृताच्या घरात अन्न शिजवले जात नसे. त्यांचे मित्र किंवा नातेवाईक त्यांना साधे, शाकाहारी जेवण पुरवीत.

इराणी परंपरेनुसार मृताचा आत्मा तीन दिवस आपल्या घराभोवती फिरत राहतो. आपले परिचित वातावरण त्याला सोडवत नाही. आपल्या आप्तेष्टांच्या दुःखाने तोही दुःखी कष्टी होतो. ते तीन दिवस खुद्द त्या मृताचा व सद्‌गुणी मृताचा फ्रावाशी [४] त्या घराचे अनिष्टापासून रक्षण करतात. स्राओशा ही दैवी प्रेरणा त्या आत्म्याजवळ घोटाळत असते. ह्या दैवी प्रेरणेमुळेच आत्मा ईश्वरी इच्छेत सर्वांशाने विलीन होतो.

चवथ्या दिवशी फ्रावाशी आणि स्राओशा आत्म्याला चिन्वताप्रत नेतात. चिन्वत म्हणजे न्यायदानाचा पूल. इथे आत्म्याला रश्नु ही दुसरी दैवी शक्ती भेटते. रश्नु त्या आत्म्याच्या चांगल्यावाईट कृत्यांचा हिशेब देते. त्यावरून न्यायाधीश मिथ्र न्यायनिवाडा देतो.

निवाडा झाला की आत्म्याला त्याचा फ्रावाशी आणि स्राओशा चिन्वत पुलावरून नेऊ लागतात. अर्ध्या वाटेवर आत्म्याला एक अतिसुंदर तरुणी भेटते.

'तू कोण आहेस ?' तो आत्मा आश्चर्याने त्या तरुणीला विचारतो.

'मला ओळखत नाहीस तू ?' ती तरुणी उलट त्यालाच विचारते.

आत्मा नकारार्थी मान हलवतो.

'तू पृथ्वीवर जी सत्कृत्ये केलीस ती मी आहे.' तरुणी त्याला सांगू लागते. मग ती त्या सद्गुणी आत्म्याचा हात धरून त्याला आणि फ्रावाशी व स्राओशाला गारो देमाना येथे घेऊन जाते. गारो देमाना म्हणजे सद्गुणी मृतात्मे राहतात तो दैवी गीत महाल.

हे तीन दिवस मृताच्या घरी आणि त्याच्या आप्तेष्टांनी ठरविलेल्या एखाद्या अग्यारीत रात्रंदिवस प्रार्थना म्हटल्या जातात. मृतात्म्याला प्रौढत्व आणण्यासाठी ह्या प्रार्थनांचा उपयोग होतो. मृत्यूच्या वेळी आत्मा बालकासारखा असतो, असे मानले जाते.

चवथ्या दिवशी आत्मा ऐहिक बंधनांपासून मुक्त होतो. त्या दिवशी स्राओशाचे आशीर्वाद मिळवण्यासाठी सर्वांत सुंदर प्रार्थना म्हणण्यात येतात. ह्या प्रार्थना पहाटे ४ च्या सुमाराला म्हटल्या जातात. पहाटेच्या शांत वेळी ह्या प्रार्थनांमुळे मृताच्या नातेवाइकांना खूप दिलासा मिळतो.

त्या दिवसानंतर, मृताच्या स्मरणार्थ दहाव्या आणि तिसाव्या दिवशी, खास प्रार्थना म्हणण्यात येतात. त्यानंतर त्या सहा महिन्यांनी होतात, आणि शेवटी मृताचे वर्षश्राद्ध केले जाते. त्यानंतर फक्त वार्षिक श्राद्धाच्या दिवशी प्रार्थना केल्या जातात.

मुक्ताद विधी

वर्षातून एकदा सर्व सद्गुणी आत्म्यांच्या फ्रावाशींचे स्मरण करण्यासाठी झोराष्ट्रियन, म्हणजे प्राचीन–इराणी–नवीन–वर्षदिनाच्या म्हणजे २१ मार्चच्या आधी दहा दिवस मुक्ताद विधी केले जातात. ह्या विधीच्या शेवटच्या पाच दिवसांत झरतुष्ट्राच्या पाच गाथांचे दरदिवशी एक ह्या क्रमाने, पठन करण्यात येते.

मुक्ताद हा शब्द संस्कृतातील मुक्तात्मन् ह्या शब्दापासून आला आहे. त्याचा अर्थ मुक्त आत्मा. सर्व झोराष्ट्रियनांच्या घरी आणि अग्यारीत हा मुक्ताद विधी पाळण्यात येतो.

घरातील एक छोटी खोली धुऊन तिच्या जमिनीवर पांढरी चादर अंथरण्यात येते. चादरीच्या मध्यावर अफरघनमध्ये, पवित्र अग्नी ठेवलेला असतो. जवळच्या एका छोटयाशा टेबलावर चांदीच्या चकचकीत फुलदाण्या असतात. त्यांच्यात ताजी फुले भरलेली असतात. प्रत्येक फुलदाणीवर त्या त्या मृतात्म्याचे नाव असते–मग ते आईवडील

असोत, पती वा पत्नी असो वा अपत्य असो. त्या खोलीच्या भिंतीवर निशिगंध, लाल गुलाब आणि जाईच्या फुलांच्या माळा सोडलेल्या असतात. दररोज सकाळी ही फुले बदलण्यात येतात. कुटुंबाचे उपाध्याय सकाळ–संध्याकाळ येऊन प्रार्थना म्हणतात. तेव्हा घरातील सगळे आबालवृद्ध हजर असतात.

एखाद्या कुटुंबाची ऐपत नसेल, ते चांदीच्या फुलदाण्या आणि ताजी फुले ठेवू शकत नसतील तर त्यांना आपल्या पसंतीच्या अग्यारीत जायचे असते. तिथे अशाच चांदीच्या फुलदाण्या ठेवलेल्या असतात. त्यात ताजी फुले असतात. कराचीच्या आणि मुंबईच्या एन. एम. पेटिट फसली अताश कादेह ह्या अग्यारीसारख्या काही अग्यारीत अशी पद्धत आहे.

पुरोहिताच्या बाजूलाच एका धातूच्या तबकात फळे, फुले, मिठाई, थोडे शिजवलेले अन्न, पेलाभर दूध असे जिन्नस असतात. ते सद्गुणी फ्रावाशींना अर्पण करून त्यांचे आशीर्वाद मागितले जातात. हजारोंच्या संख्येने फ्रावाशी 'प्रकाशाच्या स्रोता'त पृथ्वीवर अवतरतात. ज्या ज्या घरातून त्यांचे स्मरण करण्यात येत असते त्या त्या घरांना ते आशीर्वाद देतात, अशी समजूत आहे. फ्रावाशी खालीलप्रमाणे आशीर्वाद देतात—

'आमची स्तुती कोण करील ? आम्हाला नैवेद्य कोण देईल ? आमची आठवण कोण काढील ? मुखाच्या तोलाची प्रार्थना करून आम्हाला कोण आशीर्वाद देईल ?'

मुक्तादच्या दहाव्या दिवशी फ्रावाशी जीवितात्म्यांना आशीर्वाद देतात आणि पुन्हा अमर्याद प्रकाशाच्या क्षेत्रात परत जातात–तिथेच आहुरमाझदा राहतो.

नववर्षदिनी आबालवृद्ध उत्तम कपडे परिधान करून अग्यारीत जातात. तिथे प्रार्थना करतात. त्या दिवशी खास जेवण असते. ताज्या फुलांच्या माळांनी घरे सजवली जातात.

त्या दिवशी पारशी लोक एकमेकांचे अभीष्ट–चिंतन एका विशिष्ट पद्धतीने करतात–त्याला हमाझोर म्हणतात. ज्याचे अभीष्टचिंतन करायचे त्याचा डाव हात अभीष्टचिंतन करणाऱ्याने आपल्या उजव्या हातात घेऊन दाबायचा आणि त्याच वेळी 'हमाझोर हमा अशो बेद' असे शब्द उच्चारायचे. त्यांचा अर्थ–'तुम्ही आमच्या समारंभात सामील व्हा आणि तुम्ही सद्गुणी बना.' हे नाते केवळ दोन मानवांतच जोडले जाते असे नाही; तर मानव आणि निसर्ग, मानव आणि ईश्वर ह्यांच्यामध्येही हीच भावना व्यक्तविली जाते. 'अफ्रिन अर्दाफरोष' ह्या सद्गुणी फ्रावाशींचे आशीर्वाद मागणाऱ्या प्रार्थनेत तर जिवंत मानव, आहुरमाझदा आणि त्याच्या शक्ती ह्यांच्याशीही हमाझोर करतात. मनातल्या–मनात त्यांची प्रार्थना करतात.

इजास्ने

पारशांच्या धार्मिक विधींपैकी सर्वात महत्त्वाचा आणि प्रदीर्घ तपशिलाचा विधी म्हणजे यस्न ऊर्फ इजास्ने विधी.

होआमा झाडाचा रस काढून तो पवित्र करणे, द्रोणा हा पवित्र पाव बनवणे, आणि मग पुरोहितांनी तो पवित्र पाव आणि रस सेवन करणे, ह्या विधीला इजाश्ने विधी म्हणतात.

ह्या विधीसाठी जे साहित्य लागते ते धातूचे असते. त्या साहित्याला 'आलात' म्हणतात. त्यात खल व बत्ता, पाच चाळण्या–त्यातील एका चाळणीला नऊ भोके असतात, त्यातून होआमाचा रस गाळायचा असतो; दोन माहरुई–धातूच्या मांडण्या, असतात. ह्या मांडण्यांना वरच्या बाजूला चंद्रकोरी असतात. त्या मांडण्या समोरासमोर मांडण्यात येतात. त्याशिवाय ह्या विधीसाठी लागणारे महत्त्वाचे साहित्य म्हणजे जीवम्–शेळीचे ताजे दूध; बरसम–डाळिंबाच्या (चिनी) झाडाच्या डहाळ्या (त्याऐवजी आता धातूच्या पातळ तारा वापरतात), खजुरीच्या झाडाच्या पानांच्या धांदोट्या आणि झोर हे पवित्र पाणी असते खजुरीच्या पानांच्या धांदोट्यांना पीळ घालून त्याची एक दोरी बनवतात. तिच्या दोन्ही टोकांना गाठी मारतात. त्यांना बरसम तारा गुंडाळतात. मग पवित्र पांढऱ्या बैलाच्या शेपटीचे तीन किंवा पाच किंवा सात केस काढून त्यांचे वळे बनवून ते त्या दोरीभोवती गुंडाळतात. आणि होआमा रस त्यातून गाळतात. झार हे पवित्र पाणी धातूची भांडी विसळण्यासाठी वापरले जाते.

अफरघनमधील अतार म्हणजे पवित्र अग्नी हा ह्या सर्वच समारंभांत आवश्यक असतो. त्यात चंदनाची लाकडे आणि धूप जाळला जातो. त्यातच आहुरमाझदासाठी नैवेद्य टाकतात. आहुरमाझदाला नैवेद्य दिल्यानंतरच मग पुरोहित आणि इतर माणसे तो प्रसाद प्राशन करतात.

ह्या नैवेद्यातील जीवन हे प्राणि जगताचे प्रतीक आहे. बरसम किंवा डहाळ्या हे वनस्पति–जगाचे; द्राओणा म्हणजे जीवनाला आवश्यक असे अन्न आणि होआमा रस म्हणजे अमरत्व देणारे पेय. बरसमवर झोर ओतणे म्हणजे आकाशातून पडणारा, वनस्पतींना जीवन (प्राण) देणारा पाऊस. माहरुई हे चंद्राचा वनस्पतींच्या वाढीवर होणाऱ्या परिणामाचे प्रतीक. प्राचीन काळी अशा विधींच्या वेळी एक पांढरा बैल बळी दिला जाई. त्याचे आजचे प्रतीक म्हणजे बैलाच्या केसांचे वळे. त्यावर होआमा रस ओतणे हा प्रजोत्पत्तीसाठी केला जाणारा प्रसिद्ध विधी आहे.

हा होआमा विधी पिशदादिन काळापासून सुरू झाला, असे मानतात. यिमाचा पिता विवंघवन्त ह्याने होआमाची उपासना केली होती. त्यामुळेच यिमाचा जन्म झाला,

असे समजतात. झरतुष्ट्राचे वडील पौरुषाष्प ह्यांनीही होआमाची पूजा केली. त्यामुळेच झरतुष्ट्राचा जन्म झाला.

पवित्र ग्रंथांतून चार होआमांचा उल्लेख आहे. होआमा दुराओशा म्हणजे प्रेषित होआमा. हा मृत्यूला जवळ येऊ देत नाही. ह्यानेच होआमा झैरी ह्या वनस्पतीचा शोध लावला. सुवर्ण होआमा म्हणजे एफेड्रा वनस्पती. ह्या वनस्पतीचा रस पिवळट हिरवा असतो. त्याने धुंदी चढते. होआमा फ्राश्मीने तरतरी येते. तो जगाला सुखावतो, त्याच्या भरभराटीसाठी प्रयत्न करतो. सर्व होआमांचा तो पुढारी आहे. होआमा ख्वारेनान्धा म्हणजे शाही वैभव असलेला होआमा. हा संत होआमा आहे होआमा ह्या प्रेषिताने हा होआमा विधी सुरू केला. आपल्या भक्तांना होआमा प्रेषित दीर्घायुष्य, आरोग्य, वाइटाचे पारिपत्य करण्याचे सामर्थ्य, भावी संकटांची चाहूल घेण्याचे सामर्थ्य, ज्ञान, धैर्य आणि आध्यात्मिक महानपणा, ह्या देणग्या देत असे.

होआमा विधी सर्वसाधारणपणे सकाळी सूर्योदय ते माध्यान्हीपर्यंतच्या काळात केला जातो.

द्राओणा व होआमा रस ह्यांचे विधिपूर्वक प्राशन करणे ह्यांना तांत्रिकदृष्टचा चास्नी हे नाव आहे. 'चास्नी 'चा अर्थ चव घेणे. दुय्यम पुरोहित दूध, पाव आणि होआमा रस ह्यांचा नैवेद्य अग्नीतून प्रथम आहुरमाझदाला देतो. मग तो जमलेल्या लोकाना उद्देशून म्हणतो—' हे श्रेष्ठ मानवांना, आपले सद्गुण आणि पावित्र्य ह्यामुळे तुम्ही स्वतःला सुयोग्य बनवले आहे. ह्या पवित्र अन्नाचे आता सेवन करा.'

मग मुख्य पुरोहित पवित्र पावाचा एक तुकडा मोडून आपल्या तोंडात टाकतो हा विधी संपला की उरलेला पाव जमलेल्या मंडळींना वाटण्यात येतो

पाव खाण्याचा विधी संपला की मुख्य पुरोहित होआमा रसाचे तीन घोट पितो. (तो विधी चालू असताना) प्रत्येक घोटाला दुय्यम पुरोहित आहोम वोहुचे पठण करीत असतो.

ह्या विधीची तयारी आणि त्यातील साहित्याचे शुद्धीकरण ह्या विधीला पारा होआमा म्हणतात. प्राशन करण्याचा विधी म्हणजे प्रत्यक्ष यस्न विधी. ह्यावेळी यस्न ग्रंथाचे सारेच्या सारे ७२ अध्याय पठण केले जातात. पवित्र पाव आणि होआमा ह्यांचे सेवन करण्यात येते.

हा सर्व विधी संपला म्हणजे मुख्य पुरोहित व त्याचा साहाय्यक कश्ती विधी करतात. हे सर्व संपले की ती दोघे अग्यारीतील विहिरीजवळ जातात आणि त्यात उरलेले पवित्र पाणी तीन भागात ओततात. त्यावेळी ते खास स्तोत्रे म्हणत असतात. हे पाणी मुळात त्या विहिरीतूनच काढलेले असते. तेच पुन्हा त्या विहिरीत ओतले जाते.

गहंभर

वर्षातून एकूण सहा गहंभर साजरे केले जातात. गहंभर म्हणजे मोसमी सण. हे सण म्हणजे आभारप्रदर्शनाचे समारंभ आहेत. त्यांचे मूळ शेती व्यवसायात आहे. सासानींच्या काळात त्यांचा संबंध अंतराळ–तारे–आकाश ह्यांच्याशी जोडला जाई. गहंभर ह्याचा अर्थ पूर्ण वेळ–म्हणजेच योग्य वेळ

ह्यातला पहिला सण वसंताच्या मध्यावर (मध्यवसंत गहंभर) येतो. तो स्वर्गाशी संबंधित आहे. दुसरा सण मध्यग्रीष्म गहंभर. तो पाण्याशी निगडित आहे. तर शरद गहंभर पृथ्वीशी. गाई–गुरांच्या फलन मोसमाचा गहंभर म्हणजे वनस्पतिनिर्मितीचा सण. मध्य हिवाळ्याचा गहंभर म्हणजे प्राण्यांच्या पुनरुत्पत्तीचा. वसंत गहंभर मानवाशी संबधित आहे.

प्रत्येक गहंभर पाच दिवस चालतो. त्यातला शेवटचा दिवस महत्त्वाचा असतो. त्या दिवशी जाति–भोजन असते. त्यात श्रीमंत–गरीब, शिक्षित–अशिक्षित सर्वजण भ्रातृभावाने सामील होतात. हे पाची दिवस खास प्रार्थना करण्यात येत असतात.

गहंभर हा सण एखादे कुटुंब स्वतंत्रपणेही साजरे करते किंवा अनेक कुटुंबे एकत्र येऊनही हा सण साजरा करतात. नाहीतर, वर्गणी काढून गहंभर साजरा केला जातो. ह्यात भाग घणारे लोक निसर्गाचे त्याच्या देणगीबद्दल आभार मानतात. त्याशिवाय, उत्तम झोराष्ट्रियनाने जी सात प्रमुख उत्तम कृत्ये करायची असतात त्यांचाही हिशेब ह्याच काळात दिला जातो. ह्या सात कृत्यांतील पहिले कृत्य रादिह म्हणजे दान; दुसरे रास्तेह म्हणजे सत्य किंवा सद्गुण आणि तिसरे गहंभर साजरे करणे. उरलेली चार सत्कृत्ये म्हणजे मृत्यूनंतरच्या तिसऱ्या दिवसाची क्रिया करणे, देवपूजा करणे आणि गोरगरीब आणि व्यापारी ह्यांच्यासाठी निवासस्थान निर्मिणे; सर्वांचे भले चिंतणे आणि सर्व चांगल्या लोकांशी मित्रत्वाने वागणे.

गहंभरच्या प्रसंगी प्रत्येकाने आपापल्या दर्जाप्रमाणे दान द्यायचे असते. पहेलवी ग्रंथात सांगितले आहे की श्रीमंताने एक धष्टपुष्ट बकरा किंवा बोकड जेवणावळीसाठी द्यावा. ज्याला एवढे परवडत नाही त्याने पंगतीला उत्तम दारू पुरवावी. हेही ज्याला शक्य नसेल त्याने स्वयंपाक करण्यासाठी सुकी लाकडे किंवा दुसरे जळण पुरवावे. सर्वच्यासर्व जळण पुरवता येत नसेल तर निदान थोडेतरी जळण पुरवावे. पण एवढीही त्याची ऐपत नसेल त्याने आपल्या आप्तेष्टांसमवेत ह्या समारभात भाग घ्यावा, आपला निर्माता आहुरमाझदा ह्याचे स्मरण करावे, त्याला धन्यवाद द्यावेत. गहंभर प्रसंगी जे अफ्रिन आशीर्वचन म्हणण्यात येते त्याला चार महत्त्वाचे शब्द आहेत–याझद, साझद, खुराद आणि देहाद. ह्यांचा अर्थ प्रार्थना करा, तयारी करा, भोजन करा आणि

दान करा. साफसफाई करणे, स्वयंपाक करणे, जेवणाची तयारी करणे, ह्या गोष्टी गरिबालाही करणे सहज शक्य असते.

जशन

गहंभरशी घनिष्ठ संबंध असलेले समारंभ म्हणजे जशनचे. जशनचा अर्थ एखादी सुखद वा दु:खद घटना प्रार्थना व भोजन ह्यांनी साजरी करणे. जमशेदी नवरोज–२१ मार्च हा प्रेषिताचा जन्मदिवस. त्यालाच खोर्दाद साल म्हणतात. झोराष्ट्रियनांचा हा नववर्षदिन. त्या दिवशी जशन असते. फ्रावरदेगनच्या वेळी सद्गुणी फ्रावाशींच्या सन्मानार्थ समारंभ होतो. त्याही दिवशी जशन होते. मेहर, म्हणजे दयेचा देवदूत. त्याच्या सन्मानार्थ होणाऱ्या ' मेहेरांगन 'च्या वेळीही जशन होते. इतरही अनेक प्रसंगी जशन होते.

दीक्षा आणि शुद्धीकरणसमारंभ

नवजोतखेरीज नवार, मर्ताब, हे आणखीही दीक्षासमारंभ आहेत. पुरोहित किंवा उपाध्याय बनायचे असेल तर हे समारंभ केले जातात. त्यांच्या प्रत्येक दर्जासाठी बेरेश-नुम, रिमान, अशासारखे वेगवेगळे समारंभ होतात.

अग्निमंदिरे आणि पवित्र अग्नी ह्यांचे शुद्धीकरण

अग्निमंदिर आणि अतार किंवा अताश म्हणजे पवित्र अग्नी ह्यांचे शुद्धीकरण करण्याचा समारंभ प्रेक्षणीय असतो, विस्ताराने चालतो.

अग्निमंदिरांच्या तीन प्रती असतात. त्यामुळे त्यातील अग्नी गोळा करणे, तो शुद्ध करणे व पवित्र बनवणे, त्यातील अग्नींची एकूण संख्या, हे सर्वच वेगवेगळ्या प्रकारचे असते. अग्निमदिरांच्या प्रती त्यातील अग्नीच्या संख्या, त्यांचे शुद्धीकरण ह्यावरून ठरतात. त्या प्रती अशा–अताश बेहराम–विजयाग्नी हा अताश बेहराम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अग्निमंदिरात असतो. अताश अदारन उर्फ अग्यारी उर्फ दार ए मेहेर म्हणजे करुणेचे द्वार. अताश दादगाह म्हणजे झोराष्ट्रियनांच्या घरगुती देवघरातील अग्नी. दहापेक्षा जास्त झोराष्ट्रियन कुटुंबे असली की तिथे अताश अदारनची स्थापना करण्यात येते. घरगुती अताश दादगाहला पवित्रीकरणाची गरज नसते. हा अग्नी घरच्या चुलीतल्या अग्नीपासून प्रज्वलित करण्यात येतो. प्रार्थना झाली की तो अग्नी स्वयंपाकघरात परत नेण्यात येतो.

अताश बहेराममध्ये १६ तऱ्हेचे अग्नी गोळा करायचे असतात. त्यांचे शुद्धीकरण व त्यांची प्रतिष्ठापना करण्यात येते. त्यातला पहिला अग्नी जळत्या चितेतून मिळवायचा असतो. तो ९१ वेळा शुद्ध करून घेण्यात येतो. दुसरे जे अग्नी असतात ते कुंभाराचा आवा, विटांची भट्टी, सोनाराची ऐरण, लोहाराची भट्टी, बेकरी, दारूची भट्टी, शिपाई– प्रवासी किंवा धनगर आणि गावचा मुख्य, झोराष्ट्रियन उपाध्याय आणि सामान्य झोराष्ट्रियन नागरिक ह्याच्या घरातून मिळवले जातात. ह्यातील गोळा करायला सगळ्यात अवघड असतो तो अग्नी म्हणजे वीज पडून जळलेले घर किंवा झाड ह्यांच्यापासून गोळा करायचा अग्नी. त्यामुळेच हा अग्नी ज्यात ठेवायचा ते अग्निमंदिर पवित्र करून घ्यायला कित्येक वर्षे वाट पाहावी लागते.

पूर्वीच्या काळी उघड्या मैदानात ९१ खड्डे खोदले जात. प्रत्येक खड्ड्यात एकेका फुटाचे अंतर असे. त्यातल्या पहिल्या खड्ड्यात चितेवरचा अग्नी ठेवला जाई. मग प्रार्थना म्हणण्यात येई. मग दुसऱ्या खड्ड्यात चंदनाची पूड आणि धूप ठेवण्यात येई. वारे सुरू झाले की पहिल्या खड्ड्यातील आगीच्या झळीने दुसऱ्या खड्ड्यातल्या वस्तू पेट घेत. त्या आपोआप जळून विझून जात. अशाच पद्धतीने, ठराविक प्रार्थना करून ९१ व्या खड्ड्यातील अग्नी पवित्र झाला, असे समजण्यात येई.

उरलेल्या १५ अग्नीच्या बाबतीतही हीच प्रक्रिया करण्यात येई. प्रत्येक अग्नी कोठून आणला त्यावर त्याला किती वेळा शुद्ध करवून घ्यायचे ते ठरवण्यात येई.

आज मात्र एवढे सगळ्या प्रकारचे अग्नी अग्निमंदिरातीलच एका स्वतंत्र खोलीत शुद्ध केले जातात. जे अग्नी शुद्ध करावयाचे ते खास अफरघनमध्ये ठेवले जातात. मात्र प्रत्येक प्रकारचा अग्नी किती वेळा शुद्ध करून घ्यायचा हे ठरलेल असत.

सोळाचे सोळा अग्नी शुद्ध–पवित्र करण्यात आल्यावर सर्व अग्नी एकत्र करण्यात येतात. त्या दिवशी अहुना वइती ह्या पहिल्या गाथेचे पठण करण्यात येते. हा समारंभ मुक्ताद समारंभातील सद्‌गुणी मृतांच्या फ्रावाशींच्या सन्मानार्थ करण्यात येणाऱ्या समारंभाच्या दिवशीच करण्यात येतो. त्यासाठी एक मोठी अफरघन तयार करण्यात येते. त्यात लाकडी पळीने चितेतला अग्नी उचलून ठेवला जातो. एकेक करीत उरलेले पंधराही अग्नी असेच पळीने उचलून त्या अग्नीत मिसळले जातात. दोन पुरोहित प्रार्थना म्हणत म्हणत ही क्रिया करीत असतात. हा संयुक्त अग्नी मग अग्नि-मंदिराजवळील पवित्र मैदानात नेण्यात येतो.

इथे मग नवीन अग्निमंदिराच्या पवित्रीकरणाचा विधी सुरू होतो. सतत तीन दिवस पुरोहित तीन यस्न आणि तीन वेंदिदाद ह्यांचे रूढीप्रमाणे पठण करीत असतात. त्याशिवाय स्राओशा म्हणजे दैवी अंत:प्रेरणेच्या सन्मानार्थ प्रार्थना करण्यात येतात. पुढचे तीन दिवस तीस यस्न आणि तीस वेंदिदाद ह्यांचे पठण केले जाते. जी जी दैवी

शक्ती ज्या ज्या दिवसाची उपास्य देवता असते त्या त्या शक्तीच्या सन्मानार्थ योग्य ते यस्न आणि वेंदिदाद ह्यांचे पठण केले जाते.

मग तो पवित्र झालेला अग्नी समारंभपूर्वक, गंभीरपणे उचलून मिरवणुकीने, अग्नि-मंदिरातील पवित्र केलेल्या दालनात आणण्यात येतो. ह्या मिरवणुकीच्या अग्रभागी मुख्य पुरोहित असतात. त्यांच्या पाठोपाठ दुय्यम पुरोहित आपापल्या दर्जाप्रमाणे चालत असतात. ह्या उपाध्यायांनी पांढरे कपडे परिधान केलेले असतात. तर दस्तुर, म्हणजे मुख्य उपाध्यायांनी भारी शाली खांद्यावरती गुंडाळलेल्या असतात. ह्या शाली म्हणजे त्यांच्या दर्जाची प्रतीके असतात. त्या पवित्र दालनात जाण्याच्या रस्त्याचे पावी (विभाग केलेले असतात.) हे पगदंड पूर्वीच समारंभपूर्वक शुद्ध केलेले असतात. पवित्र अग्नी ठेवलेली अफरघन दोन पुरोहितांनी धरलेली असतात. ते जोडी–जोडीने चालतात. पगदंडी पगदंडीतून चालत ते पवित्र दालनात येतात.

अग्निमंदिरातील पुढच्या दालनात जशन समारंभ करण्यात येतो. ठराविक प्रार्थना आणि आशीर्वचन ह्यांचे पठण झाल्यावर अग्नीची तख्तानशिनी–प्रतिष्ठापना पूर्ण होते.

अग्निमंदिरातील पवित्र अग्नी कधीही बाहेर काढायचा नसतो. दिवसाच्या २४ तासांचे पाच गह–प्रहर–मानले जातात. ह्या पाची गही उपाध्याय अग्नीसमोर बसून खास प्रार्थना म्हणतो. त्याला चंदन आणि धूप ह्यांची आहुती देतो. त्यावेळी गंभीर आवाजाची घंटाही वाजवण्यात येते. घंटा वाजली की दुष्प्रवृत्ती पळून जातात, अशी समजूत आहे. ह्या विधीला बुइ म्हणतात.

अताश बेहराम ह्या अग्नीला पादशाह–बादशाह म्हणतात. पवित्र दालनाचे छप्पर घुमटाकृती असते–स्वर्गाच्या घुमटाचे ते प्रतीक मानले जाते. ह्या घुमटाच्या मध्या-पासून, अग्नीच्या वर एक धातूचे तबक लटकवलेले असते. त्याला 'ताज' म्हणतात. हा त्या अग्नीचा मुकुट (ताज). खोलीतल्या भिंतीवर दोन तलवारी आणि काही गदा लटकवलेल्या असतात. योद्धा जसा खऱ्याखुऱ्या हत्यारांनी लढतो, तसा आहुर-माझदाच्या सेवेत असलेला शिपाई आध्यात्मिक साधनांनी लढतो, असा त्यांचा अर्थ आहे.

अग्निमंदिराला भेट

एखादा झारोष्ट्रियन अग्निमंदिरात येतो, तेव्हा प्रथम तो विशिष्ट भांड्यात ठेवलेल्या विहिरीच्या पवित्र केलेल्या पाण्याने आपले तोंड व चेहरा धुतो. मग पूर्वेला तोंड करून कश्ती विधी करतो. प्रार्थना करताना स्त्री व पुरुष दोघेही डोके आच्छादून घेतात. मंदिराच्या बाहेरच्या दालनात प्रवेश करण्यापूर्वी पायातले जोडे काढायचे असतात. भिंतीवर प्रेषिताची मोठमोठी चित्रे असतात. तशीच त्या मंदिराला ज्यांनी

देणग्या दिल्या त्यांचीही चित्रे लटकावलेली असतात.

तिथून भाविक पवित्र अग्नी ठेवलेल्या पवित्र दालना (गाभाऱ्या) भोवती बांध-लेल्या दालनात येतो. पवित्र दालनात फक्त पुजाऱ्यानेच प्रवेश करायचा असतो. आत शिरताच भाविक अग्नीला नमस्कार करतो. आणि गाभाऱ्याच्या संगमरवरी पायरीला डोके टेकतो. तिथे आशेम वोहु किंवा अहुना वैर्य किंवा ह्या दोन्हीही प्रार्थना म्हटल्यावर तो उठतो. तेव्हा पुजारी त्याला पवित्र अग्नीतील थोडी विभूती (राख) देतो. त्यातील एक चिमटी भाविक आपल्या कपाळाला लावतो, गळ्याला लावतो. त्याचे दोन अर्थ आहेत. एक—प्रत्येक जण एक ना एक दिवस राख होऊन जाणार आहे. आणि दुसरा—परमेश्वरासमोर लीन होण्याचा हा एक प्रकार आहे. परमेश्वराच्या नजरेत राजा आणि भिकारी दोघेही सारखेच.

नंतर भाविक खोलीतल्या एका कोपऱ्यात जाऊन शांतपणे प्रार्थना करीत बसतो. प्रार्थना करायला बसण्यापूर्वी मंदिराच्या दरवाजातच विकत घेतलेला चंदनाच्या लाकडाचा तुकडा तो पुजाऱ्याजवळ देतो. हा तुकडा गाभाऱ्याच्या संगमरवरी पायरी-वर ठेवला तरी चालतो. भाविकाची आहुती म्हणून पुजारी ते चंदन पवित्र अग्नीला अर्पण करतो. प्रार्थना पुरी झाल्यावर भाविक पुन्हा गाभाऱ्याच्या पायरीवर डोके टेकतो. एक छोटीशी प्रार्थना म्हणतो आणि मगच मंदिरातून बाहेर पडतो.

बहुधा सर्वच पारश्यांच्या (झोराष्ट्रियनांच्या) घरात एक छोटी, इकडून तिकडे हलवता येण्याजोगी, अफरघन असते. एक चिमटा आणि मंदिरात असतो त्या आकाराचा चमचाही असतो. पूर्वी दररोज संध्याकाळी अफरघनमध्ये अग्नी प्रज्वलित करून त्याला चंदन आणि धूप ह्यांची आहुती देण्यात येई. ह्या अग्नीला घरातील लहान—थोर प्रणाम करीत. आशेम वोहु किंवा अहुनावइर्य पठण करीत. मग घरातल्या प्रत्येक खोलीतून ती अफरघन फिरवली जाई. आता चंदन आणि धूप ह्यांचे भाव कडाडले आहेत. त्यामुळे ही प्रथा बंद होत चालली आहे. तरीही अनेक श्रद्धाळू घरातून, एका काचेच्या ग्लासात तेल व वात घालून तो दिवा दिवस—रात्र तेवत ठेवलेला असतो. त्याची वात सकाळ—संध्याकाळ बदलतात. तेल संपणार नाही, ह्याची खबरदारी घेतात.

झोराष्ट्रीयनाचे आयुष्य अग्निमंदिराभोवती गुरफटले आहे; मंदिराशी निगडित असलेल्या विधि—समारंभाशी ते बांधले गेले आहे, ह्याची ह्यावरून कल्पना येईल. पूर्वी घराण्याचा खास उपाध्याय नाही, असे झोराष्ट्रियन घर क्वचितच आढळे. इराण-मधून भारतात आलेल्या झोराष्ट्रियनांचा हा वारसा होता.

१. **अहुना वइर्य—** म्हणजे देवाची इच्छा. संपूर्ण आवेस्तातील ही अत्यंत जुनी आणि पवित्र प्रार्थना आहे. ह्यालाच यथा अहु वइर्यो असेही म्हणतात. ही त्या प्रार्थनेतील पहिलीच ओळ. लहान मुलाला शिकवली जाणारी ही पहिली प्रार्थना. झरतुष्ट्राच्या शिकवणुकीचे सार त्यात थोडक्यात सांगितले आहे. त्याचे भाषांतर असे होऊ शकते–' हे सजीव परमेश्वरा, (वेळ आणि स्थळ ह्यांच्या मर्यादा ओलांडून) जशी तुझी इच्छाशक्ती काम करते, त्याचप्रमाणे तुझा प्रेषित (रातु), आशा, तुझे सत्य, तुझा दैवी कायदा, आशाबद्दलचे प्रेम, ह्यांना अनुसरून मला कार्य करू दे. वोहुमानाची-उत्तम मनाची श्रीमंती त्याला मिळू दे–हा तो म्हणजे जो आपल्या ऐहिक जीवनातील प्रत्येक कृत्य आहुरमाझदाच्या चरणी समर्पण करतो, ध्रीमु–निराधार, अपंग आणि निराश्रित लोकांची सेवा करून, त्यांच्यावर प्रेम करून जो आहुराचे साम्राज्य ह्या जगात स्थापू पाहातो तो.

२. **आशेम वोहू—** ही चार ओळींची दुसरी प्रार्थना मुलाला शिकवली जाते. तिच्यात आशा, दैवी कायदा आणि अनुशासन, परमेश्वरी सत्य, न्याय, सद्गुण ह्यांची स्तुती आहे. ती अशी– आशा, सर्वश्रेष्ठ परमेश्वर, सर्वश्रेष्ठ सुख, ह्यांचे अभीष्ट असो. ज्याची आशेवर, निव्वळ तिच्याच खातर निष्ठा आहे, त्याला आशेचे सुख समजते.

३. परिशिष्ट ' ब ' पाहा.

४. **फ्रावाशी—** म्हणजे प्रत्येक मानवात सापडणारी शुद्ध, संतत दैवी ज्योत. ' फरवरदिन यश्त ' मध्ये तिचे वर्णन केले आहे. रहस्यमय, अवर्णनीय, निरागम, अमर्यादित, सर्वसमावेशक जगभर पसरलेले दैवी तेज, ज्याचा विस्तार अफाट आहे आणि जे सर्वदूर पसरते ते. स्पेन्ता मैन्यू–पवित्र आत्मा आणि वहिष्ट मन (सार्वभौम मन) ह्या आहुरमाझदाच्या दोन सामर्थ्यवान शक्तीतून ते जन्माला येते. आत्मा (उर्वन) आणि बुद्धी (बोओधा) ह्या मानवी शक्ती मानवाच्या फ्रावाशींशी संबंधित राहण्याचा प्रयत्न करतात. ही प्रक्रिया मानवाचा शारीरिक मृत्यू झाल्यावरही चालूच राहते.

४. स्थलांतर आणि भारतात वस्ती

६५१ साली अरबांनी पर्शियन (इराणी) साम्राज्याचा पाडाव केला. तेव्हा काही इराणी निर्वासित गुजरातेत आले. आजचे पारसी हे ह्या इराणी निर्वासितांचे वंशज आहेत. मात्र भारतात आलेले हे पहिले इराणी नव्हते.

सासानी घराण्याच्या कारकिर्दीत (इ. स. २२६ ते ६५१) भारत आणि इराण ह्यांच्यामध्ये व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध होते. त्याशिवाय महाभारत, पुराणे, कालिदासाचा रघुवंश, ह्या ग्रंथांतही पारसिकांचा (पार्स, पारसा; सिका–शक) उल्लेख येतो. रघुवंशात कालिदासाने पारश्यांचे वर्णन करताना म्हटले आहे– अपरान्त (कोकण आणि पश्चिम किनारपट्टी) जिंकल्यानंतर रघू 'गोऱ्या पारसिक योद्ध्यां'ना जिंकण्यासाठी निघाला. आजचे इतिहासकार सांगतात की कुषाण साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर म्हणजेच, चवथ्या व सातव्या शतकाच्या दरम्यान, ह्या गोऱ्या 'पारसिक योद्ध्यां'नी सासानी घराण्याच्या सार्वभौमत्वाखाली राजस्थान व काश्मीर ह्यांच्या दरम्यान एक साम्राज्य स्थापले होते.[१]

गिरनार, कार्ले आणि नाशिक येथील शिलालेखांत पह्लवांचा (पार्थव, पार्थियन) उल्लेख आढळतो. फार पूर्वी म्हणजे ख्रि. पू. १२६ साली पार्थियन सम्राट मेनान्डर (ख्रि. पू. १५५–१३०) ह्याने सौराष्ट्रावर राज्य केले; तर पल्लव राजे नंतर कांजीपुरमचे सम्राट झाले. त्यांनी दक्षिण भारतातील तीन मोठ्या घराण्यांपैकी एका घराण्याची स्थापना केली.[२]

इराणमधून बाहेर पडलेला दुसरा एक गट म्हणजे मागी पुरोहितांचा. हे सिस्तन (सकद्वीप) हून आले होते. दक्षिण मारवाड प्रांतातील माघ किंवा भोजाक ब्राह्मणांत ते मिसळून गेले. ह्या माघी उर्फ भोजाक ब्राह्मणांनीच हिंदूंमध्ये सूर्योपासना सुरू केली.[३]

प्राचीन मध्ययुगातील मुस्लिम बखरकारही, त्याकाळी भारतात इराणी झोराष्ट्रियन होते ह्याची ग्वाही देतात.[४]

इराणी झोराष्ट्रियन अकराव्या शतकात इंग्लंडमध्येही राहिले होते. रोमन सैनिकांनी इराणवर आक्रमण केले तेव्हा हे इराणी इंग्लंडमध्ये राहायला गेले होते.[५]

हे इराणी झोराष्ट्रियन थेट चीनपर्यंत पसरले होते. शेवटचा सासानी सम्राट तिसरा यझदेगार्द ह्याने चिनी सम्राट ताई त्सुंग ह्याच्याकडे मदतीची याचना केली होती.

पण तिचा काही उपयोग झाला नाही. तिसऱ्या यझदेगार्दचा खून झाला. त्याचा मुलगा फिरौझ (चिनी भाषेत पिलॉसे) ह्याने तोखारिस्तानमध्ये आश्रय घेतला आणि तिथे चेग्नान इथे सन ६७७ मध्ये एक अग्निमंदिर स्थापले.[१]

अरबानी आपल्या राजवटीत इराण्यांचे सक्तीने इस्लाममध्ये धर्मान्तर केले. ज्यांनी आपला जुनाच धर्म टिकवला त्यांचा छळ झाला. तेव्हा ती मंडळी खोरासानमधील कोहिस्तान पर्वतावर पळून गेली तिथे ते शंभर वर्षे राहिले, असे म्हणतात. नंतर ते लोक तिथून होर्मुझ ह्या पर्शियन (इराणी) आखातातील बंदरगावी गेले. तिथे ते पुढची पंधरा वर्षे राहिले. तिथून ते 'सात होड्यां'त बसून निघाले असे रेव्हरंड हेन्री लॉर्ड ह्यांनी १६३० मध्ये लिहून ठेवले आहे. ते निघाले ते काठियावाडच्या दक्षिण टोकावरील दिऊ उर्फ दीव ह्या बेटावर आले. तिथे ते एकोणीस वर्षे होते. तिथून ते पुन्हा निघाले आणि गुजरातच्या पश्चिम किनाऱ्यावरील संजान ह्या छोट्या मच्छीमारी गावी आले. ७८५ साली ते संजानला आले तेव्हा तिथे हिंदू राजा जादी राणा उर्फ जाधव राणा ह्याने त्यांना आश्रय दिला.

दीवहून पारशी संजानला जायला निघाले, तेव्हा त्यांची होडी जवळ जवळ बुडणारच होती. मग त्या मंडळींनी देवाची करुणा भाकली, शपथ घेतली की सुखरूप किनाऱ्याला लागलो तर परमेश्वराचे ऋण फेडण्यासाठी ह्या ठिकाणी अताश बेहरामची प्रतिष्ठापना करू. ७९० साली, म्हणजे संजानला पोचल्यावर पाच वर्षांनी, त्यांनी आपली ही शपथ पुरी केली, असे म्हणतात. परंतु काहींच्या मते हे अताश बेहराम संजानमध्ये ७२१ सालीच बांधण्यात आले होते.

पारशांच्या सुरुवातीच्या (भारतातील वसतीच्या) इतिहासाबद्दलचा एकुलता एक लेखी पुरावा म्हणजे 'किस्सा-इ-संजान' (संजानची कहाणी) ह्या नावाचे, बेहमन कैकोबाद संजाना ह्या नवसारीच्या दस्तुराने (मुख्य पुरोहित) रचलेले पर्शियनमधील काव्य. ह्याचा काळ १६०० हा आहे हे अगदी अलीकडचे काव्य असल्याने त्यात काही उणिवा, विसंगती निश्चितच आहेत तरीही 'किस्सा' हा एक मौल्यवान ऐतिहासिक पुरावा आहे. ह्या विषयाचा त्याच्यापेक्षा जुना पुरावा मिळत नाही.

बेहमन कैकोबाद काव्यात लिहितो, "पारशी जेव्हा संजानचा राजा जादी राणा ह्याच्याकडे गेले आणि संजानमध्ये राहायची परवानगी मागू लागले, तेव्हा त्याने त्यांना पाच अटी घातल्या. त्या अटी अशा—ह्या निर्वासितांबरोबर त्यांचा मुख्य पुरोहित आला होता. इराणपासून भारतापर्यंत त्याने पवित्र अग्नी जतन करून आणला होता. त्या पुरोहिताने राजाला झोरास्ट्रियन धर्म समजावून सांगावा; पारश्यांनी गुजरातीचा मातृभाषा म्हणून स्वीकार करावा; पारशी स्त्रियांनी साडी नेसावी; पारशांनी आपल्या जवळची सारी हत्यारे सरकारजमा करावी आणि आपल्या लग्नाच्या वराती रात्रीच्या

अंधारात काढाव्यात. शेवटची अट, बहुधा, निर्वासितांनी स्वतःच केलेल्या विनंतीवरून घालण्यात आली होती. ह्या परक्या जमातीकडे इतर जमातींचे लक्ष वेधले जाऊ नये, हा ह्यामागचा उद्देश असावा.

वेगवेगळ्या संस्कृत आणि गुजराती हस्तलिखितांतून १६ संस्कृत श्लोक आढळतात. त्यांत हिंदू भावनांना गोंजारणाऱ्या शब्दांत पारशी धर्माची साधारण कल्पना दिलेली आहे.[७]

ह्या ' किस्स्या 'पेक्षाही, गुजराती गर्बे, समूहगीते, नृत्ये, इत्यादींमध्ये इराणी निर्वासित आणि राजा जाधव राणा ह्यांच्या भेटीबद्दल विस्तृत तपशील आढळतो. ही सर्व गाणी पारश्यांनीच लिहिली आहेत, आणि नवजोत, विवाह, अशा प्रसंगी पारशी बायका ती गीते गातात. एकेकाळी पद्यात असलेले हे वर्णन मी खाली गद्यात देत आहे :

' जाधव राणाने फर्मान ' काढले की सर्व नागरिकांनी खुल्या मैदानावर (कुरणावर) जमावे. सिंहासन जरीच्या कापडांनी सुशोभित केले होते. त्याच्यावर राजा जाऊन बसला. त्याच्या अंगावर शाही कपडे होते. डोक्यावरचा फेटा भरजरी होता. पायात मखमली, कशिदा काढलेले चढाव होते. त्याच्याभोवती घोड्यावर स्वार झालेले अंगरक्षक होते. त्याच्या अंगात शुभ्र कपडे होते; आणि हातात तळपते भाले होते.

' जाधव राणाने इशारा करताच इराणी निर्वासितांना दरबाराच्या मध्यभागी आणण्यात आले. त्यांच्या म्हाताऱ्या काटकुळ्या पुरोहिताने आपल्या हातात अफरघन धरले होते. त्यात पवित्र अग्नी होता. तो पुरोहित दुभाष्याच्या मदतीने आपल्या गटाचा म्होरक्या ह्या नात्याने, राजाशी बोलत होता.

" हे दूरदेशस्थ पाहुण्यांनो, तुम्हाला आमच्याकडून काय हवे आहे !" जाधव राण्याने विचारले,

" पूजेचे स्वातंत्र्य हवे आहे, महाराज !" म्हातारा पुरोहित म्हणाला.

" दिले ! आणखी ?"

" आमच्या मुळा-बाळांना आमच्या परंपरा नि रूढी ह्यांच्यानुसार वाढविण्याचे स्वातंत्र्य."

" दिले ! आणखी काय ?"

" एक लहानसा जमिनीचा तुकडा. तिथे आम्ही शेती करू. म्हणजे आमचा भार कुणावरही पडणार नाही."

" मान्य. पण ह्या साऱ्याच्या बदल्यात तुम्ही तुमच्या ह्या दत्तक देशासाठी काय करणार ?"

' तेव्हा त्या म्हाताऱ्या पुरोहिताने एक तांब्याचे भांडे मागून घेतले, त्यात दूध घातले व दरबारात आणले. त्या दुधात थोडी साखर घालून ते ढवळले. मग आपल्या थर-

थरत्या हातात ते भांडे धरून त्याने आपला हात उंचावला आणि दरबाराला विचारले– " ह्यातली साखर कुणाला दिसते आहे काय ?" सर्वांनी मानेने नकार दिला.

" महाराज," तो पुरोहित म्हणाला, " तुमच्या मानवी दयाळूपणाच्या दुधातली क्षुल्लक साखर बनण्याचा आम्ही सर्वजण प्रयत्न करू."

' आणि जमलेल्या मंडळींत संमतिदर्शक कुजबूज झाली. मग त्या पुरोहिताने इशारा करताच सर्व निर्वासित स्त्री-पुरुष, मुले पुढे आली आणि सर्वांनी जमिनीवर साष्टांग प्रणिपात घातला. मग प्रत्येकाने आपल्या हातात मूठमूठ माती घेतली आणि ती आपल्या अश्रूभरल्या डोळ्यांना आणि कपाळाला मोठ्या भक्तिभावाने लावली.'

' मग त्यांनी आपले हात आणि तोंड धुतले आणि आपापली तोंडे सूर्याकडे वळवून त्या सर्वांनी कश्तीची प्रार्थना म्हणत कश्ती विधी करायला सुरुवात केली.'

गव्यांचे हे गाणे इतके हृदयस्पर्शी होत असे की मुले उड्या मारून, टाळ्या वाजवून कश्ती प्रार्थना म्हणू लागत. अनेक प्रौढांना आपल्या डोळ्यांतील अश्रू पुसावे लागत.

८ व्या आणि १५ व्या शतकांच्या दरम्यान पारशी लोक गुजरातच्या किनाऱ्या-वरील छोट्या छोट्या बंदरगावांतून पसरले. बेहमान कैकोबाद लिहितो–– ' काहीजण वांकानेरकडे वळले, तर काही भरूचला गेले. थोडी मंडळी वारियावला गेली. तर थोडी अंकलेश्वरला. आणखी थोडी पुढे खंबातला गेली, तर काहींनी आपला मोर्चा नवसारी-कडे वळवला.'

ह्यांपैकी अनेक खेड्यांना पारशांनी नवीन नावे दिली. नवसारी म्हणजे नवीन सारी हे नाव इराणच्या मझेंदरन प्रांताच्या राजधानीच्या ' सारी ' ह्या गावावरून पडले असावे. नवसारीचे मूळ नाव होते नुसारिया. टोलेमीच्या ' मॅप 'मध्ये ह्याच नावाचा उल्लेख आहे. संजान ह्या गावाचे नावसुद्धा राफसंजान गावाशी जुळणारे आहे. राफ-संजान हे येझ्दला जाणाऱ्या रस्त्यावर करमानपासून १९८ किलोमीटर्सवर आहे.

ह्या प्राचीन स्थलांतरितांबद्दल दोन ऐतिहासिक पुरावे सापडतात. कान्हेरी (कृष्णगिरी) लेण्यांच्या भिंतीवरील पहेलवी शिलालेख आणि शिलाहारांच्या सनदा. [८]

कृष्णगिरी लेणी मुंबईपासून साधारणत: ४४ किलोमीटर्सवर आहेत. तिथे एकदा १७ पारशी माणसे वनविहारासाठी गेली होती. त्यांनी तिथल्या भिंतींवर पहेलवी लिपीत आपली नावे कोरून ठेवली. ही तारीख आहे २ डिसेंबर ९९९. त्यानंतर बावीस वर्षांनी पारशांचा आणखी एक गट ह्या लेण्यांत आला. त्याही दहा जणांनी आपली नावे अशीच पहेलवी भाषेत कोरून तारीख लिहिली ५ नोव्हेंबर १०२१.

शिलाहारांच्या सनदा चार कागदपत्रांच्या मिळून आहेत. त्यातील पहिली सनद १०१८ सालची. तिच्यावर केशीदेवचा अरीकेशरी राजा ह्याची सही आहे. दुसरी सनद १०२६ सालची आहे. त्यावर कोकणचा महामंडलेश्वर चितराज देव ह्याची सही आहे.

१०८१ च्या तिसऱ्या सनदेत अनंतदेवने ‘ खोरासन मंडळी ’ना काही ड्रामा (पैसे) दिल्याचा उल्लेख आहे. चवथी सनद १०९४ सालातली आहे. त्यावर कोकणचा राजा प्रसिद्ध अनंतपाल ह्याने सही केली आहे. ह्यापैकी पहिली, दुसरी व चवथी ह्या तीन सनदांत ‘ हंजमान ’ उर्फ अंजुमानचा उल्लेख आहे. अंजुमानचा अर्थ–गट, वसाहती त्याला आवेस्तात ‘ हंजमान ’ असा शब्द आहे. अनेक इतिहासकारांच्या मते शिलाहारांच्या सनदेतील हा उल्लेख संजानविषयीचा आहे. संजानमध्ये तोपर्यंत बऱ्याच मोठ्या संख्येने पारशांची वस्ती झालेली होती आणि ‘ खोरासन मंडळी ’चा हा उल्लेख तर उघड उघड पारशी वसाहतींचाच असावा.

आतापर्यंत पारशी आपल्या दत्तक भूमीशी चांगलेच समरस झाले होते. इ. स. १२०० मध्ये ‘ नेरीओसांग धवल ’ नावाच्या एका पारशी पुरोहिताने सबंध आवेस्ताचे संस्कृतात रूपांतर केले. तत्कालीन हिंदू विद्वानांच्या सोयीसाठी त्याने हा उपक्रम केला असावा. नेरीओसांगने केलेले भाषांतर आजही उपलब्ध आहे.

पारश्यांनी आतापर्यंत शेतकरी, शेतीतज्ज्ञ, फळबागायतदार, ताडीचे उत्पादक, सुतार आणि विणकर म्हणून आपला जम बसवला होता.

पारशी फार सुबक विणकर बनले होते. त्यांनी भारताला तीन प्राचीन कलाकुसरींची देणगी दिली आहे त्या म्हणजे सुरतीघाट, गारो आणि तनचोई. सुरतीघाट हे तलम, मऊ, रेशमी वस्त्र असते एका बाजूचे त्याचे पोत सॅटीनसारखे असते. प्राचीन काळी त्याचा धागा ४ ते ६ वर्षे वयांची लहान मुले विणत. त्यासाठी ही मुले अंधुक उजेडाच्या दमट हवेच्या खोलीत काम करीत. विणून झाल्यावरच तो धागा उजेडात आणण्यात येई. हा रेशमी धागा नंतर वनस्पतिरसात रंगविला जाई. हे रंग मुळचा, औषधी वनस्पती ह्यांच्या चूर्णांपासून बनवलेले असत. त्यातला लोकप्रिय रंग म्हणजे लाल भडक–टोमॅटो रेड, टायटिन (जांभळा), भडक गुलाबी, पारवा आणि केशरी. हा धागा विणीत इतका पक्का असे की त्याला सुरतीघाट–डोंगर म्हटले जाई. हे विणकर मूळ सुरतेचे. आजही सुरत–अहमदाबादच्या गिरण्यांतून असे सुरतीघाट रेशीम भरपूर प्रमाणात काढले जाते. पण त्याचे पोत मात्र पूर्वीइतके अति तलम असत नाही आणि रंगही हातविणीच्या कपड्यांइतके सुंदर नसतात.

गारो आणि तनचोई ही मूळची चीनमधली कलाकुसर. गारो म्हणजे अंगभर चिनी कशिदा काढलेली साडी, त्यावर पक्षी, प्राणी, फुले, चिनी पगोडा, बागा, ह्यांची चित्रे भरलेली असतात. ‘ सली गारो ’ पद्धतीमुळे तो साडी सुबक फांद्यांनीच विणली आहे, असा भास होतो. म्हणूनच त्याला सली म्हणजे फांदी–हे नाव मिळाले आहे. इंचाच्या विसाव्या भागातला धागा काढून हा सली कशिदा काढण्यात येतो. सली गारो ही साधारणतः एकरंगी, डिझाइन नसलेली साडी असते. त्याला सुंदर कशिदा केलेले

रेशमी काठ असतात. हे काठ बहुधा 'पेन्टि पॉईंट'ने भरलेले असतात. गारो (गालो) ह्या शब्दांचा अर्थ फडक्यातून किंवा चाळणीतून गाळणे. आता अशा तऱ्हेच्या कलाकुसरीचे रहस्य लुप्त झालेले असावे. कारण आज ज्या गारो कलाकुसरी शिल्लक आहेत त्या ५० ते ८० वर्षांच्या जुन्या आहेत; आणि ज्या पारशी कुटुंबियांचे पूर्वी चीनशी व्यापारी संबंध होते त्यांच्यात वंशपरंपरेने चालत आलेल्या आहेत. 'सुरती घाटा'-प्रमाणेच गारोचाही रंग जांभळा, शरावी लाल, काळा, ताबूस, असे गडदच असतात. क्वचित पांढरा किंवा क्रीम रंगही त्यात आढळतो.

तनचोई म्हणजे फुलांचे डिझाईन विणलेले तलम, रेशमी ब्रोकेड. तीन पारशी बंधू अनेक वर्षे चीनमध्ये राहिले होते. तिथे ते ही कला शिकले. मग सुरतेत येऊन त्यांनी स्वतःचा विणकामाचा धंदा सुरू केला. तेव्हा त्यांना स्थानिक लोक तनचोई म्हणू लागले. तन म्हणजे तीन आणि चोई म्हणजे चिनी. त्यांचे मूळ आडनाव होते जोशी. त्यांच्या धंद्याची जागा पुढे कित्येक वर्षे 'जोशीनी हवेली'—जोशांची बंगली—म्हणून ओळखली जाई त्यांचाच एक वंशज कैकुश्रु सोराबजी जोशी (मृत्यू १९५८) ह्याने सुरतेच्या मोगलीसराई जिल्ह्यातील तुकवाडी नावाच्या गावी आपले विणकामाचे दुकान काढले. ह्या भारी ब्रोकेडच्या साड्या नवजोत आणि विवाह अशा समारंभ-प्रसंगी नेसल्या जात. जोशी आपल्या कारागिरांची कुटुंबातल्या माणसांप्रमाणे काळजी घेत असत. त्यांची व त्यांच्या कारागिरांची ख्याती देशभर पसरली होती. गांधीजींच्याही ती कानी गेली. तेव्हा गांधीजी पायीच त्यांच्या गावी जायला निघाले. तिथे त्यांनी जे पाहिले त्यामुळे गांधीजींना खूप आनंद झाला. त्यांनी जोशीची पाठ थोपटली आणि सांगितले, 'भारत जेव्हा स्वतंत्र होईल तेव्हा भारत सरकार 'तनचोई कशिदा केन्द्र' देशभर सुरू करण्याची जबाबदारी तुमच्यावर सोपवील." गांधीजींनी आपला शब्द पाळला. १९४८ मध्ये जोशींची अखिल भारतीय हस्तव्यवसाय समितीचे एक वरिष्ठ अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. आपल्या हयातीतच तनचोई साड्या, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, नवनवीन, सुबक डिझाईन्समध्ये बनत असलेल्या पाहण्याचे भाग्य जोशींना मिळाले. ह्या हस्तव्यवसायाची मुख्य केंद्रे सुरत आणि हैदराबाद हीच आहेत.[१]

छोट्या प्रमाणावर पतपेढ्या सुरू करणे आणि दुकाने चालवणे हे व्यवसायही पारशांनीच प्रथम सुरू केले. १४ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत भारतात आलेल्या युरोपीय व्यापाऱ्यांनी आपल्याला भेटलेल्या पारश्यांच्या पद्धती आणि रूढी ह्यांच्याबाबत फार सुरेख वर्णन केलेले आहे.

ओगिलबी हा ब्रिटिश प्रवासी १६७० साली लिहिलेल्या आपल्या 'ॲटलास' ह्या पुस्तकात लिहितो : "एतद्देशीय लोकांप्रमाणेच तेही मोकळेपणी, कुणाचाही विरोध न

होता इथे राहतात. मनाला वाटेल तो व्यापार उदीम करतात. ... त्यांचा मुख्य जीवनव्यवसाय शेतीचा, फळाची खरेदी–विक्री करण्याचा, आणि शिंदीच्या झाडापासून ताडी बनवण्याचा ..." तो पुढे म्हणतो, "पुरुष मोठी थोरली, गोल दाढी ठेवतात. त्यांच्या डोक्यावरही लांबसडक केस असतात. त्यांची नाके पोपटाच्या चोचीसारखी बाकदार असतात. त्यामुळे हजारांच्या जमावांतूनही त्यांना शोधून काढणे सोपे असते."[१०]

मंदेल्स्लो हा इटालियन प्रवासी १६३८ च्या सुमारास पारशी स्त्रियांबद्दल लिहितो– "ह्यांच्या विधवा पुर्नविवाह करू शकतात. व्यभिचार आणि लंपटपणा ही त्यांच्या मते अत्यंत हीन पापे होत...एतद्देशीय स्त्रियांपेक्षा ह्यांच्या स्त्रिया जास्त गोऱ्या आणि सुंदर असतात."[११]

रेव्हरंड जे. ओवींग्टन हे १६८९ त सुरतेला होते. पारश्यांच्या दानशूरत्वाबद्दल ते म्हणतात, "गरजू परंतु कामे करू शकणाऱ्या लोकांना नोकरीला लावून घेण्यामुळे किंवा दु:खी–कष्टी आणि अपंग ह्यांना वेळोवेळी दानधर्म करण्याबाबतच्या त्यांच्या, सर्वत्र आढळणाऱ्या, दयाळूपणामुळे कोणाही परित्यक्ताला मदत मिळाल्याशिवाय राहत नाही; की त्यांच्या जमातीत कोणी भिकारीही आढळत नाही."[१२]

अशी कौतुकास्पद वर्णने लिहिली गेली असूनही पारश्यांच्या तीन वेळा कत्तली झाल्या. चवथी कत्तल टळली ती थोड्याशा युक्तीनेच.

'गॅझेटियर ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी'त लिहिले आहे की खंबातमध्ये महीनदीच्या मुखावरील कुमारिका क्षेत्र मंदिराजवळ राहणारे पारशी श्रीमंत झाले. त्यांचे गावात वजन वाढले आणि त्यांनी त्या भागातील हिंदूंना हाकलून लावले. त्यामुळे खंबातच्या पारश्यांवर कलियानराय (कल्याणराय) ह्या बनियाने दात धरला. तो आश्रयासाठी सुरतेत गेला. तिथे त्याने मोत्यांचा व्यापार सुरू केला. त्यात खूप पैसाही मिळविला. आणि एका रात्री त्याने खंबातमध्ये आपले राजपूत व कोळी सैन्य घुसवले. ह्या सैन्याने पारशांच्या घरांना आगी लावल्या. अनेक पारशांची कत्तल केली. त्यातून बचावलेले पारशी आपला पवित्र अग्नी घेऊन पळाले. तेव्हा त्या बेचिराख गावाच्या भूमीवरच नवीन गाव वसवण्याची कल्पना कल्याणरायच्या मनात घोळू लागली.

दुसऱ्या एका दुर्घटनेचाही उल्लेख बॉम्बे गॅझेटियरमध्ये आहे. अकराव्या शतकाच्या शेवटी शेवटी वारियाव येथे राहिलेल्या पारशांची संपत्ती पाहून रतनपूरचा राजपूत राजा मत्सराने पेटून उठला. त्याने त्यांच्याकडे प्रचंड खंडणीची मागणी केली. ती पारश्यांनी फेटाळली. तेव्हा खंडणी वसूल करण्यासाठी फौजा पाठविण्यात आल्या. त्यांचा पारश्यांनी पराभव केला. त्यामुळे राजा आणखीनच खवळला. त्याने आपल्या दुसऱ्या फौजा त्या गावावर पाठवल्या. त्या फौजा गावात आल्या तेव्हा सर्व पारशी

पुरुष मंडळी सुरतजवळच्या तेना ह्या गावी एका मेजवानीसाठी गेली होती. परंतु त्यांच्या बायकांनी डगमगून न जाता आपापल्या पुरुषांचे कपडे केले, हत्यारे घेतली आणि शौर्याने राजाच्या फौजेशी लढा दिला. त्यांचा जय होत होता. तेवढ्यात एकीचे शिरस्त्राण गळून पडले. आणि ती स्त्री आहे हे उघडकीला आले. तेव्हा मग राजपुतांनी जोर केला आणि शिकस्तीने जय मिळवला. तेव्हा बेअब्रू सहन करण्याऐवजी त्या स्त्रियांनी तापी नदीत उड्या टाकून प्राण गमावणे पत्करले. पुरुष मेजवानीहून परतले, तेव्हा त्यांच्यावर अचानक हल्ला करून त्यांची व मुलांचीही कत्तल करण्यात आली.

तिसरी दुर्घटना घडली ती सुलतान महमूद बेगडा (राज्यकाल १४५९ ते १५११) च्या अलाफखान ह्या सेनाधिकाऱ्याने संजानवर हल्ला केला. तेव्हा १४८४ त सुलतानाने चांपानेरचा किल्ला जिंकून घेतला. आणि संजान जिंकण्याचा हुकूम सोडला. राय झदेह शाह झदेह ह्या संजानच्या हिंदू राजाला ही बातमी कळली, तेव्हा त्याने पारशी प्रमुखाकडे मदतीची मागणी केली. आपल्याच पूर्वजांनी कित्येक शतकांपूर्वी पारशी निर्वासितांना आश्रय आणि जमीन दिली होती ह्याची त्याने पारश्यांना आठवण करून दिली. तेव्हा त्याच्या मदतीला पारशी धावून गेले. त्यांच्यातल्या अर्देसीर ह्या पारशाने १४०० लोकांचे सैन्य गोळा करून मुस्लिमांविरुद्ध पहिला जय मिळविला. तेव्हा सुलतानाने ३००० चे सैन्य पाठवले, पारशी एकजुटीने लढले. परंतु हिंदू राजा व अर्देसीर मारले गेले.

१४२५ साली ठाण्यात पारशांची सर्रास कत्तल होणार होती. ठाण्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरने पारशांना धमकी दिली. तुम्ही सर्वच्या सर्व स्त्रिया–पुरुष–मुले–रोमन कॅथलिक व्हा. नाहीतर तुम्हाला ठार करण्यात येईल पारश्यानी गव्हर्नरचा हा हुकूम मान्य केला फक्त त्यांच्याकडून चार दिवसांची मुदत मागून घेतली. हे चार दिवस आपण आपले सर्व धार्मिक समारंभ, शेवटच्या वेळचे म्हणून उरकून घेऊ, असे त्यांनी सांगितले. गव्हर्नरला पारशांच्या ह्या समजूतदारपणाचा आनंद झाला. त्याने त्यांना समारंभ करण्याची परवानगी दिली. चवथ्या दिवशी पारशांनी एक मोठी मेजवानी आयोजित केली. त्यासाठी गावातील सर्व प्रतिष्ठितांना आमंत्रण देण्यात आले होते. पाण्यासारखी दारू पाजण्यात आली. पाहुणे मनसोक्त दारू पीत असतानाच सर्व पारशी आपला पवित्र अग्नी घेऊन ठाणे गावातून बाहेर पडत होते. इकडे संगीताच्या तालावर नृत्ये चालूच होती. ह्याचे वर्णन बॉम्बे गॅझेटियरमध्ये केले आहे. पारशी चालत चालत ठाण्याच्या दक्षिणेकडील कल्याणला आले. पुढे, ३०० वर्षे त्यांनी पुन्हा ठाण्यात पाऊल टाकले नाही.

भरूच ह्या लहानशा गावात दोन पारशी हुतात्मे झाल्याची नोंद सापडते कामा होमा ह्या भरुच गावच्या एका गरीब विणकराचे एका मुस्लिमाशी पगाराच्या

थकबाकीवरून भांडण झाले. मुस्लिम चिडला. सुडाने पेटला. त्याने भरुचचा नबाब हमाद वेग ह्याच्याकडे तक्रार नोंदवली की त्या पारश्याने त्याला काफर (धर्मभ्रष्ट) अशी शिवी दिली. नबाबाने ताबडतोब कामाहोमाला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. मात्र पारशाने मुस्लिम धर्माचा स्वीकार केला तर त्याचा मृत्युदंड माफ होणार होता. कामा होमाने मृत्युदंड पत्करला आणि वयाच्या ६४ व्या वर्षी, ८ डिसेंबर १७०२ रोजी, त्याचे मस्तक उडवण्यात आले. ह्या घटनेने पारशी जमातीत खळबळ उडाली होती. काय वाटेल ते झाले तरी आपला धर्म सोडायचा नाही, असा ठाम निर्धार पारश्यानी केला. ह्या हुतात्म्याच्या हौतात्म्यादिनी खास प्रार्थना करण्यात येतात. त्याचा गारोथ्मनी कामा बेहृदिन होमा–सर्वश्रेष्ठ सौख्य मिळवलेला–असा उल्लेख करण्यात येतो.

अशीच दुसरी घटना घडली ती होमजी जमशेटजीच्या बाबतीत. एका गरोदर पारशी बाईला लाथ मारून तिच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याचा आरोप होमजीवर ठेवण्यात आला. १७८३ साली त्याला देहदंडाची शिक्षा झाली. तो शेवटपर्यंत 'मी निर्दोषी आहे' असेच सांगत होता. तो म्हणे–'प्रार्थना करताना जो कोणी माझे स्मरण करील त्याला मी आशीर्वाद देईन.' त्याच्या पुण्यतिथीच्या दिवशीही खास प्रार्थना म्हणण्यात येतात.

पारश्यांची संख्या वाढू लागली, तेव्हा त्यांना धार्मिक विभाग–मोहल्ले म्हणजे 'पोळ'–पाडण्याची गरज भासू लागली. ११४२ साली कामदिन झारथोष्ट नावाचा एक पुरोहित संजान ते नवसारी असा फिरता राहून वाटतील गावातील पारश्याचे धार्मिक विधी पार पाडीत असे. १२१५ साली संजानहून नवसारीला त्या गावातील धार्मिक विधी पार पाडण्यासाठी, आणखी दोघा पुरोहितांना बोलावण्यात आले. त्यामुळे मग नवसारीत पाच पोळ निर्माण करण्यात आले.

१२९० साली मग मोठे पांथक–धार्मिक विभाग निर्माण झाले. संजान, नवसारी, गोदावरेह, भरुच आणि खंबात हे ते पाच विभाग होत. ह्या विभागांमुळे पारशी जमातीची धार्मिक विधींची गरज भागू लागली.

पारशी जमातीकडे फारसे धर्मग्रंथ नव्हते. आणि ह्या नव्या जगात (भारतात) आवेस्ता आणि पहेलवी ग्रथांचे ज्ञान अद्ययावत राखणेही त्यांना अवघड जाई. त्यामुळे त्यांना अनेक वेळा धार्मिक विधी आणि धर्मग्रंथांचा अर्थ ह्यातील बारकावे समजावून घ्यायचे कसे, असा प्रश्न पडे. तरीसुद्धा त्यांच्यात एरवाद महयारसारखा एखादा धडपडधा पुरोहित निपजे. महयार बाराव्या शतकाच्या अखेरीला होऊन गेला. महयारने ११७८ साली आपल्या उछ ह्या पंजाबमधील गावापासून सिस्तानची यात्रा केली. इराणात बारा वर्षे राहून तो ११९० साली भारतात परत आला. येताना त्याने

वेन्दिदाद ह्या ग्रंथाचे मूळ पहेलवी हस्तलिखित बरोबर आणले होते. तरीसुद्धा पारशांना आपल्या समस्या सोडवता येईनात.

पंधराव्या शतकाच्या शेवटी मात्र नवसारीचा लोकप्रिय दहेवाड–तलाठी–चांगा बिन आसा (चांगाशाह) ह्याने धार्मिक बाबींवरचे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न एकत्रित केले. ते सारे नरीमान होशांग ह्या नवसारीच्या पारशाकडे दिले आणि त्याला स्वत:च्या खर्चाने इराणला पाठवले. हे प्रश्न इराणमधील दस्तुरांकडे देऊन त्यांच्याकडून त्या प्रश्नांची उत्तरे आणायचे काम होशांगने करावयाचे होते.

अफगाणिस्तानातून खुष्कीच्या मार्गाने इराणला जाणारा नरीमान होशांग हाच बहुधा पहिला भारतीय असावा. अनेक महिन्यांच्या प्रवासानतर अखेर एकदाचा नरिमान होशांग येझ्द येथे पोहोचला. येझ्द येथे इराणी झोराष्ट्रियनांची एक वसाहत होती. त्यांचे इराणी दस्तुर हे धर्मग्रंथांचे अभ्यासक मानले जात. नरिमान होशागला इराणी भाषा येत नव्हती ती त्याने पहिल्या वर्षभरात शिकून घेतली. उपर्जीविकेसाठी तो तेथील बाजारात खजूर विकत असे.

पर्शियन भाषेवर प्रभुत्व मिळवल्यावर नरिमानने येझ्दच्या दस्तुरांकडे आपल्याजवळील प्रश्नांची यादी दिली. दस्तुरांनी नरिमानचे हार्दिक स्वागत करून त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. ती घेऊन १४७८ च्या सुमाराला नरिमान होशांग भारतात परत आला. तेव्हापासूनच भारतातील झोराष्ट्रियन आणि इराणचे दस्तुर ह्याच्यामध्ये प्रश्नोत्तरे चालू झाली. ह्यांनाच ' रेवायेत ' म्हणतात. ही प्रश्नोत्तरे १४७८ ते १७७३ अशी सुमारे तीनश वर्षे चालू होती.

चांगा बिन आशा उर्फ चांगाशाह (१४५० ते १५१५) ही तत्कालीन पारशी जमातीतील एक प्रमुख आसामी होती. बेहमान कैकोबाद आपल्या ' किस्सा 'त त्याच्या दयाळू आणि स्पष्टवक्त्या स्वभावाबद्दल फार प्रशंसेने लिहितो—' पुढील काळात ह्या सद्‌गुणी माणसाने आपला सर्वोत्कृष्ट धर्म अपूर्ण राहू दिला नाही. कोणाकडे सद्रे, कश्ती नसली तर तो स्वत:च्या पैशाने त्या वस्तू गरजूला मिळवून देण्याची व्यवस्था करी...अशी कोणीही पीडित व्यक्ती नव्हती की, चांगाशाहकडे गेल्यावर तिच्या दु:खावर चांगाशाहने फुंकर घातली नाही. केवळ चांगाशाहने केलेल्या उपकारांमुळे अनेक पारशीधर्मीय धार्मिक बनले.'[१३]

चांगाशाहने मोगल दरबारातील आपले वजन खर्ची करून नवसारीच्या पारशांवर बसवण्यात आलेला जीझिया हा मुस्लिमेतरांवर लादण्यात येणारा कर उठवला. देसाई–तलाठी–पद सुमारे १०० वर्षे चांगाशाहच्या घराण्याकडेच चालत राहिले. त्यानंतर, १६०८ साली मात्र ते पद दस्तुर मेहेरजी राणा ह्यांचा पुत्र कैकोबाद मेहेरजी राणा ह्याच्याकडे आले.

दस्तुर मेहेरजी राणा हेही नवसारीचेच. पारशांना त्यांचा सार्थ अभिमान आहे. त्यांनी अकबराच्या दरबारात झोराष्ट्रियन धर्माची महती दाखवून दिली. बादशाह अकबरला सद्रा आणि कश्ती ही त्या धर्माची दोन महत्त्वाची प्रतीके अर्पण केली. १५७६ ते १५७९ च्या दरम्यान फत्तेहपूर सिक्रीला जी धर्मचर्चा चालू होती तीत निरनिराळ्या पंथांचे मुस्लिम, हिंदू पंडित आणि योगी, गोव्याचे जेझुइट, ह्यांच्या-बरोबरीने दस्तुर मेहेरजी राणा यांनीही भाग घेतला होता.

दस्तुर मेहेरजी राणांनी अकबराला निव्वळ सद्रा आणि कश्तीच अर्पण केली नाही, तर झोराष्ट्रियन विधी करून तिथे पवित्र अग्नीची प्रतिष्ठापनाही केली. हा अग्नी अबुल फझ्ल ह्या दरबारी बखरकाराच्या स्वाधीन करण्यात आला होता. तो कधीही विझणार नाही, ह्याची काळजी अबुल फझ्लने घ्यायची होती.

१५७९ च्या मार्च महिन्यात जेव्हा दस्तुर मेहेरजी राणा नवसारीला परत आले, तेव्हा त्यांचे मोठ्या आनंदाने व उत्साहाने स्वागत करण्यात आले. पुरोहितांनी त्यांना दस्तुर निवडले. ही नियुक्ती वंशपरंपरेने चालणार होती. त्यामुळेच दस्तुर मेहेरजींच्या पश्चात त्यांचा मुलगा कैकोबाद दस्तुर बनला.

अकबरला दस्तुर मेहेरजी राणांबद्दल फार आदर होता. त्याने राणांना २० बिघे जमीन उत्पन्नासाठी तोडून दिली होती. त्यांच्या मृत्यूनंतर ती दीडपटीने वाढवून त्यांच्या मुलाच्या नावाने करण्यात आली.

मेहेरजी राणांनी अकबराच्या दरबारात एक चमत्कार दाखवून सर्वांना थक्क करून सोडले होते, असे पारशी परंपरा सांगते. जगद्गुरू–जगाचा आध्यात्मिक गुरू–नावाचा एक ब्राह्मण आपल्याला दैवी शक्ती अवगत आहे असे सांगत असे. त्याने एकदा आकाशात एक भलीमोठी तबकडी सोडली. ती एखाद्या सूर्याप्रमाणेच प्रखरपणे तळपत होती. मग दरबारातील उपस्थितांना त्या ब्राह्मणाने आव्हान दिले, ‘ ज्याच्यात हिम्मत असेल त्याने ही तबकडी खाली आणावी.’ मौलवी आणि उलेमांना काही ती तबकडी खाली आणणे जमेना. पण त्यांना समजले की नवसारीतील कोणा झोराष्ट्रियन माणसाची हे आव्हान स्वीकारण्याची तयारी आहे. तेव्हा त्या झोराष्ट्रियनाला दरबारात बोलावण्यात आले. दरबारात येताक्षणीच दस्तुर मेहेरजींनी दरबाराच्या मधोमध आपला पवित्र अग्नी पेटवला. मग ते आवेस्तातील काही प्रार्थना म्हणू लागले. त्याबरोबर ती तबकडी खळ्ळकन खाली कोसळली !

अकबराच्या दरबारातील प्रसिद्ध गायक तानसेन ह्याने ह्या प्रसंगाची आठवण म्हणून एक सुंदर ख्याल रचला. त्यात दस्तुरचे वर्णन त्याने ‘ लांब दाढीचा पारशी महेर्यार ’ असे केले आहे. त्याने चंदन आणि धूप ह्यांची आहुती दिलेल्या अग्नीची प्रार्थना केली आणि ती देवांना मान्य झाली, असे त्या ख्यालात म्हटले आहे. त्याच

ख्यालात तानसेन, शेवटी, अकबराला सांगतो– ' मेहेरजी राणा हे नंदनवनातील एक पुष्प आहे.' हे काव्य आजही अस्तित्वात आहे. [१४] एका सुंदर मोगलकालीन चित्रात (मिनियेच्यूर) दस्तुर राणांचे चित्र काढलेले आहे. त्यात ते बसलेले दाखवले आहेत. त्यांच्या अंगात पारशी पुरोहित घालतात तसला लांब अंगरखा आहे. डोक्यावर लाल ' फेंटो ' (गोल टोपी) आहे.

दोन असेही प्रसंग घडले की, त्यामुळे जमातीत कडवटपणा येऊन मोठ्या प्रमाणावर दंगलीही उसळल्या.

त्यातील पहिला प्रसंग होता झोराष्ट्रियन पंचांगाच्या गणनेचा. १६३० च्या सुमाराला पारशांच्या असे लक्षात आले की, त्यांचे पंचांग आणि झोराष्ट्रियनांचे पंचांग ह्यात एक महिन्याचा फरक आहे. तेव्हा त्यांनी इराणच्या विद्वान दस्तुरांकडे सल्ला विचारला. इराणी झोराष्ट्रियनांचा मुख्य पुरोहित दस्तुर बेहराम अर्देसीर ह्याने आपला सल्ला १५ व्या रेवायेतमध्ये दिला (१६३५). त्याने पारशांना त्यांचे पंचांग बाजूलाच ठेवून इराणी झोराष्ट्रियनांचे पंचांग स्वीकारण्याची सूचना केली. किंवा पारशी पंचांग दुरुस्त करून ते इराणी पचांगाबरोबर आणण्यात यावे, असेही त्याने सुचवले.

ह्या त्याच्या सूचनेमुळे पारशी जमातीत तीन गट पडले. शहेनशाही पंथियांचे पंचांग शेवटचा सासानी राजा तिसरा येझदगार्द ह्याच्या मृत्यूपासून सुरू होते. तर कदिमी (कदिम म्हणजे अतिम) चे म्हणणे असे की त्यांचे पंचांग सर्वात जुने आहे आणि तेच जास्त अचूक आहे. फसली पंथाचे पंचांग फसल म्हणजे मोसमावर आधारलेले आहे. त्यांच्या पंचांगाप्रमाणे गहंभर त्या त्या योग्य काळात येतात. २१ मार्च हा झोराष्ट्रियन नववर्ष दिन मानला जातो. आजही पारशी स्वतःचे, ख्रिश्चनांचे आणि (जरूर वाटल्यास) हिंदू वा मुस्लिम ह्यांचेही नववर्ष पाळतात. तरीही त्यांच्या जमातीत तंटा नाही. त्यांच्या तीनही पंथियांत बेटी–व्यवहार होत असतो.

दुसरा तंटा उद्‌भवला तो नवसारी आणि संजान येथील पुरोहितांत. नवसारीचे पुरोहित स्वतःला भगारिया म्हणवून घेत, तर संजानच्या पुरोहितांना संजाना असे नाव होते.

संजान १४८५ ते १४८६ च्या दरम्यान उद्‌ध्वस्त करण्यात आले. तेव्हा तेथील पवित्र अग्नी बारा वर्षेपर्यंत बहरोटच्या डोंगरावरील गुहेत लपवून ठेवण्यात आला होता. तेथून तो बांसदाला आणण्यात आला. बांसदाला हा अग्नी १४ वर्षे ठेवला होता. त्यानंतर चांगाशाहच्या भलेपणामुळे तो नवसारीला आणून ठेवला. पारशी निर्वासित जेव्हा इराणहून प्रथम संजानला आले (७८५) तेव्हा त्यांनी हा अग्नी आपल्याबरोबर इराणहून आणला होता. चांगाशाहने, तंटे होऊ नयेत ह्या उद्देशाने आज्ञा दिली की, ज्या तीन संजानाच्या पुरोहितांनी हा अग्नी नवसारीला आणला होता

त्या तिघांनीच त्या अग्नीची पूजा वगैरे करावी. त्यांच्याकडील व त्यांच्या वारसांकडील कौटुंबिक विधी नवसारीच्या पुरोहितांनी करावेत. अशी व्यवस्था केली म्हणजे पुढे आपसात तंटे बखेडे होणार नाहीत, अशी चांगाशाहची समजूत होती.

परंतु २०० वर्षांनंतर नवसारीत आलेल्या संजानच्या पुरोहितांच्या असे लक्षात आले की, अनेक पिढ्यांपूर्वी, त्यांचा विचारही न घेता करण्यात आलेल्या ह्या व्यवस्थेमुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्यांचा आर्थिक तोटा होत आहे. कारण त्यांना कसलेही विधी करण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे त्यांनी तक्रार केली. नवसारीच्या नागरिकांनी त्यांना पाठिंबा दिला.

तणाव वाढत गेले आणि ७ सप्टेंबर १६८६ रोजी दंगल उसळली. संजाना पुरोहितांच्या पाठिंब्याने नागरिकांनी दोन भागारियांना लाथाबुक्क्यांनी ठार केले. त्याचा बदला म्हणून भागारियांनी सहा नागरिकांचा खून पाडला. घरे लुटण्यात आली. १९ दिवस दंगल चालली होती. मग नागरिकांपैकीच काही समजूतदार लोकांनी काझी झियाउद्दीन उस्मानीकडे एक अर्ज केला. तेव्हा २६ सप्टेंबर १६८६ रोजी काझीने एक निवेदन प्रसिद्ध केले. खुनाच्या आरोपावरून चार पुरोहितांना अटक करण्यात आली. सहा नागरिकांना दंगल आणि लूटमार करण्याबद्दल पकडण्यात आले.

परंतु नवसारीचे नागरिक अजूनही धुमसत होते. ८ फेब्रुवारी १६८७ रोजी त्यांनी भागारियांशी एक करार केला. त्या करारान्वये नागरिकांनी आपल्याकडील धार्मिक विधींसाठी विशेषतः, मृत्यू आणि विवाहविधींसाठी आपल्याला हवा तो पुरोहित बोलावण्याचे स्वातंत्र्य मिळाले.

तरीही संजाना आणि भागारिया ह्यांच्यातील मत्सराग्नी शमला नव्हता. १७४० आणि १७४२ मध्ये भागारियांनी बडोद्याच्या गायकवाडांकडून आपल्याला अनुकूल अशा दोन सनदा मिळवल्या. त्याचा परिणाम म्हणून संजानांनी नवसारी पंथक कायमचे सोडून दिले. आपला पवित्र अग्नी घेऊन ते प्रथम बलसाडला गेले. तेथून ते उदवाड्याला आले. उदवाड्याला १७४२ त त्यांनी पवित्र अग्नीची प्रतिष्ठापना केली. हा अग्नी अजूनही उदवाड्याला आहे. अशा रीतीने, एक दीर्घ व कडवट, परंतु टाळता येण्याजोगा, संघर्ष समाप्त झाला.

१. आर. जी. भांडारकर– 'पारसिकाज'– एम. पी. खारेघाट मेमोरियल व्हॉल्यूम, मुंबई १९५३, पृष्ठ १९३–२०१, आर, बी. पेमास्टर, अर्ली हिस्टरी ऑफ द पारसीज इन इंडिया, मुंबई १९५४, पृष्ठ बारा. इकेहार्ड कुल्के–द पारसीज इन इंडिया, दिल्ली १९७४ पृष्ठ २३

२. पेमास्टर– वरील पुस्तक, पृष्ठ–नऊ, एस. के. होडीवाला–पारसीज इन एन्शंट आशिया, दोराब सकलातवाला मेमोरियल सेरीज नं. २, मुंबई, १९२०, पृष्ठ–२८; डी. बी. डिस्कळकर–' द पारसीज इन इंडिया '–द इंडो-एशियन कल्चर–वर्ष ५, अंक ४ एप्रिल १९५७, पृष्ठ ४४६. ए. एस. आळतेकर, द एक्स्टेंट ऑफ द सासानियन पोलिटिकल डॉमिनेशन इन इंडिया,–एम. पी. खारेघाट मेमोरियल व्हॉल्यूम, पृष्ठ–२१ (तळटीप), के. ए. एन. शास्त्री– ए हिस्टरी ऑफ साउथ इंडिया, मद्रास, १९६६, पृष्ठ–१०१; कुलकेनी त्याच्यावरील पुस्तकात पान २३ वर उद्घृत केले आहे. रोमिला थापर–हिस्टरी ऑफ इंडिया–हार्मडस्वर्थ, १९६६, खंड १, पृष्ठ ९४.

३. जे. डचुस्ने– गिवलेमिन–सिम्बॉल्स अँड व्हॅल्यूज इन झोराष्ट्रियानिझम, न्यूयॉर्क, १९६६, पृष्ठ १०९ तळटीप.

४. निझामुद्दीन– अहमद, तबाकत–ई-अकबरी; मौलाना अहमद,–तारीख–ई–आल्फ, तिमूर्स–मलकुआन-ए-तिमुरी (आठवणी), पेमास्टरनी आपल्या वरील पुस्तकात पृष्ठ नऊ–दहावर दिल्या आहेत.

५. सर जॉर्ज बर्डवूड– लेटर टु द एडन्बरो पारशी युनियन. ' द पारशी 'च्या ३० ऑगस्ट १९०८ च्या अंकात प्रसिद्ध केले. पेमास्टरनी आपल्या वरील पुस्तकात पृष्ठ तेरा–चौदावर उद्घृत केले.

६. पेमास्टरांचे वरील पुस्तक, पृष्ठ तेरा.

७. एस. के. होडीवाला– द १६ संस्कृत श्लोकाज–दस्तुर होशांग मेमोरियल व्हॉल्यूम, मुंबई, १९१८, पृष्ठे ७०–९४. पेमास्टरांचे वरील पुस्तक–पृष्ठे १० ते १३.

८. पेमास्टर वरील पुस्तक पृष्ठे १६–२२.

९. गुजरात मित्र, सुरत, एप्रिल १६, १९५८.

१०. पेमास्टर, वरील पुस्तक, पृष्ठ ४५.

११. वरील, पृष्ठ १३

१२. वरील, पृष्ठ ४९

१३. वरील, पृष्ठे १११–११२

१४. परिशिष्ट ' क ' पाहा.

५. सामाजिक रचना आणि सुधारणा

भारतात ब्रिटिश आणि पोर्तुगीज राजवटी सुरू झाल्या. त्याचवेळी 'चिखलाचा दुर्लक्षित तुकडा' मुंबई बेट एक महत्त्वाचे बंदर म्हणून विकसित होत होते. आणि त्याच्याबरोबरच पारशांच्या इतिहासातील नवीन युगाला प्रारंभ होत होता.

ब्रिटिश, फ्रेंच, डच आणि पोर्तुगीज लोक भारतात एकाच वेळी होते. त्या सर्वांमधील मध्यस्थ आणि सर्वांशी व्यापार–उदीम करणारे म्हणून पारशांना आता नवीनच क्षेत्र उपलब्ध झाले. १६०८ साली ब्रिटिशांनी आपली पहिली वखार सुरतेत काढली. डचांनी १६१७ साली आपली वखार उघडली. ह्या सर्व वखारीत दलालांचे काम पारशीच करीत होते.

त्या दलालांपैकी प्रमुख होते सुरतेचे रुस्तम माणेक (सेठ) (१६२५–१७२१)[१]. ते ब्रिटिशांच्या सुरतेतील वखारीत दलाल म्हणून नोकरी करीत. बात्तमच्या राजाचे ते सुरतेतील एजन्ट होते आणि सुरतेच्या पोर्तुगीजांचे ते व्यापारी प्रतिनिधी आणि दुभाषे होते. ६,९०,००० रुपयांच्या देण्यावरून ईस्ट इंडिया कंपनीबरोबर त्यांचा तंटा सुरू झाला. कंपनीने ही रकम त्यांना द्यायचे नाकारले. त्याबद्दलचा रोष मनात ठेवूनच, १७२१ साली, रुस्तम माणेक मरण पावले.

त्यांच्या मृत्यूनंतर फ्रामजी, बोमनजी आणि नौरोजी ह्या त्यांच्या तिघा मुलांनी हा झगडा पुढे चालवला. सर निकोलास वेंत ह्या मुंबईच्या गव्हर्नरांच्या सांगण्यावरून सुरतेच्या नबाबाने फ्रामजीला कैदेत टाकले; त्याचे घरही जप्त केले आणि त्याला ५०,००० रुपयांचा दंड ठोठावला. तेव्हा बोमनजी दाद मागण्यासाठी मुंबईला गेला. पण सर निकोलासने त्याला तिथेच राहत्या घरी स्थानबद्ध केले. धाकटा नौरोजी सॅलिसबरी ह्या ब्रिटिश युद्धनौकेतून, आपल्या एका पारशी नोकराला बरोबर घेऊन, गुपचूप निघाला. 'काळे पाणी' ओलांडून लंडनला पोचणारे बहुधा हेच पहिले भारतीय असावेत.[२] तिथे नौरोजीने ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांपुढे आपली केस मांडली, तेव्हा संचालकांनी नौरोजीला रु. ५,४६,७९० देऊन टाकले. १७२५ ते १७३० च्या दरम्यान नौरोजी भारतात परतला. आणि त्याने माझगाव भागात जमीन विकत घेतली. तेथे दगडांची खाण सुरू केली. ह्या दगडांच्या खाणीमुळे हे कुटुंब मुंबईतील धनाढ्य कुटुंबांपैकी एक बनले.

रुस्तम माणेकने सर्व जमातींतील गरिबांसाठी धर्मशाळा आणि इस्पितळे बांधली. पूल, रस्ते बांधले. विहिरी, तलाव खोदले त्यामुळे आजही त्यांची आठवण कृतज्ञतापूर्वक काढली जाते. १६७२ साली त्याने सुरतेच्या पारशांवरील जिझिया कर रद्द करवून घेतला.

मुंबईच्या पारशी पटेलांनीही अशाच तऱ्हेची कामगिरी केली होती.[३]

दोराबजी नानाभॉय (मृत्यू १६८८) सुरतेजवळच्या मूमारी ह्या गावाहून आपल्या कुटुंबियांसह सन १६४० साली मुंबईत आले. त्यांना गुजराती, मराठी, इंग्रजी आणि मोडकीतोडकी पोर्तुगीझ भाषाही येत होती. त्यामुळे पोर्तुगीझांनी त्यांचा फायदा करून घेतला.

दोराबजींच्या मृत्यूनंतर त्यांचे धाकटे चिरंजीव रुस्तम ह्यांनी त्यांचे काम पुढे चालू ठेवले. त्यांचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी होते की लोक त्यांना रुस्तम जेंद्राल, म्हणजेच जनरल रुस्तम ह्या नावानेच ओळखत. १६९२ साली मुंबईत प्लेगची साथ आली. जवळ जवळ सर्वच युरोपियन्स आणि त्यांची सर्वच्या सर्व पलटण ह्या प्लेगने पछाडली होती. ही संधी चांगली आहे, असा विचार करून शिद्दी मुंबईवर चालून आला. तेव्हा रुस्तमने पुढाकार घेऊन बहुसंख्य कोळी असलेले सैन्य उभे केले. शिद्द्यांवर हल्ला करून त्यांना पिटाळून लावले. डुंगरीचा किल्ला परत मिळवला आणि सुरतेच्या ब्रिटिश वखारीच्या मुख्याकडे दूत पाठवले. हा मुख्य मुंबईला आला तेव्हा त्याने शासनाची सूत्रे त्याच्या हाती सोपवली. ह्या त्याच्या कामगिरीबद्दल रुस्तम दोराबला वंशपरंपरेने चालणारा मुंबईचा पटेल (पाटील) हा किताब देऊन त्याचा सन्मान करण्यात आला. बेटावरचे सर्व कोळी त्याच्या हुकमतीखाली देण्यात आले. ह्या कोळ्यांकडून त्याने कर गोळा केले; त्यांचे आपसातील दावे आणि धार्मिक तंटेही सोडवले. १७६३ साली, वयाच्या ९६ व्या वर्षी रुस्तम दोराब निधन पावला.

पुढची १५० वर्षे मुंबईच्या पारशी पटेलांनी सरकारची इमाने–इतबारे चाकरी केली. त्यांनी संपूर्ण खेड्यांचा कारभार चालवला. वाहन–वाहतूक सुधारली. मचवे बांधले. वरळीचा मासेमारीचा धंदा यशस्वी केला. ईस्ट इंडिया कंपनीच्या गलबतांना पिण्याचे पाणी पुरवण्याची व्यवस्था केली आणि गरिबांच्या कल्याणाच्या योजना सुरू केल्या. त्यांनी वसई आणि ठाणे येथील गरीब पारशांसाठी अग्निमंदिरे आणि टॉवर्स ऑफ सायलेन्स उभारले.

१७९० साली गुजरातेत सर्वत्र दुष्काळ पडला. तेव्हा गुजरातेतील लहानमोठ्या गावांतून फार मोठ्या प्रमाणात पारशी मंडळी मुंबईत येऊ लागली त्यानंतर पारशी मोठ्या संख्येने मुंबईत आले ते १८३७ साली. त्यावर्षी सुरतेत प्रचंड आग लागून निम्मे शहर बेचिराख झाले होते.

१७९० सालापासूनच पारशी लोक मुंबईच्या फोर्ट (कोट) विभागात एकवटू लागले. ह्या भागात तेव्हा मुंबईचा व्यापार–उदीम चालत होता. सध्या जिथे महात्मा फुले (क्रॉफर्ड) मार्केट आहे त्याच्या पाठीमागे पूर्वी यथा आहु वैर्यो स्ट्रीट नावाची एक गल्ली होती. पारशांच्या अत्यंत पवित्र प्रार्थनेतील पहिल्या ओळीवरून ह्या रस्त्याला ते नाव देण्यात आले होते. ह्या ऐतिहासिक गल्लीत अनेक गरीब पारशी कुटुंबे राहात. पुढील काळात त्यांच्यातील अनेकांनी नाव कमावले. पहिले भारतीय बॅरोनेट सर जमशेटजी जीजीभॉय ह्यांच्याचपैकी एका कुटुंबातले. १८०३ साली मुंबईत लागलेल्या प्रचंड आगीत निम्मी मुंबई जवळ जवळ बेचिराख झाली. त्याच आगीत ही गल्लीही भस्मसात होऊन गेली.

जर्मन समाजशास्त्रज्ञ इकेहार्ड कुल्के म्हणतो त्याप्रमाणे खरोखरच १८ व्या शतकाच्या अखेरीपासून मुंबईतील पारशी लोकसंख्येत फार झपाट्याने वाढ होऊ लागली होती.[४] त्याबरोबरच त्या जमातीच्या समस्यांतही भर पडत होती. आपल्याला स्वतंत्र कायदे नाहीत की आपली सुसंघटित समाजरचनाही नाही, ह्याची आता पारशांना जाणीव होऊ लागली होती.

भारतात येऊन स्थायिक झाल्यावर पहिली काही शतके पारशी आपले सर्व सामाजिक आणि धार्मिक प्रश्न आपल्या दस्तुरांसमोर नेत. तरीसुद्धा कटू संघर्ष निर्माण होतच. झोराष्ट्रियन पंचांगावरून उद्भवलेला तंटा आणि संजाना आणि नवसारीच्या भागारियांचा संघर्ष हे अशाच संघर्षांपैकी होते. पारशांनी आपल्या समाजरचनेत हिंदूप्रमाणे पंचायत पद्धती स्वीकारली नसती तर ह्या तंट्यांत भरच पडत गेली असती.

१६४२ साली नवसारीच्या पारशांची स्वतःची पंचायत स्थापन झाली. तीत प्रमुख पुरोहित आणि प्रमुख नागरिक ह्यांचा समावेश होता. मात्र तीत वर्चस्व पुरोहितांचेच होते आणि त्यांच्याकडे इतर शहरांतील धार्मिक तंटेही निवाड्यासाठी येत असत.

नवसारीपाठोपाठ सुरतेतही स्वतंत्र पंचायत स्थापन झाली. त्यात नानाभाई पुंजिया (मृत्यू १६६७) आणि रुस्तम मानेक हे प्रमुख सभासद होते.

मुंबई पारशी पंचायत नक्की कोणत्या वर्षी सुरू झाली ती माहिती मिळत नाही. कुल्के ह्या बाबतची दोन वेगवेगळी वर्षे सांगतो–गुलू शहियारच्या मते पारशी पंचायत १६७३ सालीही अस्तित्वात होती; तर सोराब पी. दावरचे म्हणणे असे की १७२५ ते १७३३ च्या दरम्यान पंचायत स्थापन झाली असावी.

१६७३ साली अस्तित्वात असलेल्या पंचायतीचे सभासद कोणकोण होते ही माहिती मिळत नाही. नंतरच्या पंचायतीच्या पाच संस्थापक सदस्यांची नावे मात्र मिळतात. हे सभासद होते–अध्यक्ष–बानाजी लिमजी; हिरजी वाच्छा (मोदी)–मुंबईतील पहिली दाखमा टॉवर ऑफ सायलेन्स ह्यांनीच बांधली आणि सुरतेच्या रुस्तम माणेकचे

फ्रामजी, बोमनजी आणि नौरोजी हे तीन मुलगे.

पंचायतीचे काम लोकशाही पद्धतीने चालत असे. तिचे 'बंदोबस्त' म्हणजे निर्णय जमातीला लागू करण्यापूर्वी जाहीर सभेत अंजुमाननी ते मान्य करावे लागत. तंटे मिटवणे आणि न्यायनिवाडे करणे ही पंचायतीची कामे होती; तर नेहमीचा कारभार पंचायतीतील ठराविक सभासद पाहत असत. गुजरातच्या ग्रामीण भागातून आलेल्या गरजू, गरीब पारशांना आर्थिक मदत पुरवली जाई. शक्य तेव्हा त्यांना राह्यला जागा देण्यात येई.

१७७८ साली पंचायतीतर्फे मुंबईच्या गव्हर्नरांकडे एक अर्ज सादर करण्यात आला. पंचायत ही पारशी जमातीचे नेतृत्व करणारी संस्था आहे, अशी अधिकृत मान्यता मिळाली; पारशी रूढी–पद्धतीप्रमाणे जे वागणार नाहीत त्या पारशांना सजा देण्याचा गुन्हेगाराला जाहीरपणे जोड्याने मारण्याची शिक्षा देण्याचा अधिकार त्या सभेला आहे, हेही सरकारने मान्य करावे, अशा मागण्या त्या अर्जात करण्यात आल्या होत्या.

१८१८ साली पंचायतीत जमातीतील आणखी सहा जणांचा समावेश करण्यात आला. पारशी जमातीत तोपर्यंत दोन लग्ने करण्याची आणि बालविवाहाची पद्धत पडू पाहत होती. त्या रूढींना आळा घालण्याचे काम ह्या नवीन सहा पंचांनी पुरोहितांच्या सहकार्याने अंगावर घेतले.

१८३० साली पंचायतीने एका गाफील क्षणी अकबार पद्धती बंद केली. अकबार पद्धती म्हणजे पंच निवडून देण्याची पद्धती. आता सभासदांच्या मृत्यूनंतर पंचायतीचे सभासदत्व त्यांच्या मुलांकडे वारसाहक्काने येऊ लागले. त्याचे गंभीर दुष्परिणाम होऊ लागले. पंचायतीचे सभासद स्वत: दोन लग्ने करू लागले. त्यांना शिक्षा होत नसे. मात्र एखाद्या गरीब पारशाने दोन लग्ने केली तर त्याला जबर शिक्षा देण्यात येई. १८३६ साली पंचायतीच्या तीन वयोवृद्ध सदस्यांनी 'तीव्र निषेध' नोंदवून राजीनामे दिले. आणि तेव्हापासून बहुसंख्य पारशांच्या लेखी पंचायतीचे महत्त्व कमी झाले.

पारशी जमातीकडून पंचायतीबाबत कठोर टीका सातत्याने होत राहिली. १८४९ साली पहिले सर जमशेटजी जीजीभॉय ह्यांनी 'द सर जमशेटजी जीजीभॉय पारसी बेनेव्होलेंट इन्स्टिटयूशन' ही स्वत:ची संस्था स्थापन केली. ती १८५१ साली काही प्रमाणात पंचायतीत समाविष्ट करण्यात आली. तेव्हा कुठे मुंबई पंचायतीच्या विश्वस्त मंडळाचे कामकाज बऱ्याचशा नि:पक्षपातीपणे होऊ लागले.

आपल्या जमातीला एकसंघ कायदेकानू नाहीत, ह्याचीही जाणीव आता पारशांना होऊ लागली होती. १८२५ साली मुंबई सरकारने एक कमिशन नेमले. भारतातील पारशी जमातीने ज्या रूढींना कायदा मानले आहे, त्यांची उपयुक्तता आणि त्या जमातीसाठी काही खास कायदे बनवण्याची आवश्यकता, ह्याबाबींची चौकशी ह्या कमिशनने करायची होती. ह्या कमिशनचे अध्यक्ष बोरोदिले होते.

बोरोदिले ने पारशांना आधीच विनंती केली होती की भविष्यकाळातील तंटे-विरोध टाळायचे असतील तर पारशांनी स्वतःचे कायदे स्वतःच बनवावेत. परंतु १८३५ साल उजाडले तरीही पारशानी त्याच्या ह्या विनंतीला प्रतिसाद दिलेला नव्हता. त्या वर्षी एका पारशाने कोर्टात दावा आणला की आपली आई, भाऊ आणि बहीण ह्यांना बाजूला सारून एकट्या त्यालाच घराण्याचा वारस नेमावे. हा दावा कोर्टात दाखल झाल्यावर मात्र पारशांचे धाबे दणाणले. आपल्या जमातीतील अनिश्चितता त्यांच्या लक्षात आली. २० नोव्हेंबर १८३५ रोजी एक जाहीर सभा भरवून तीत सरकारला विनंती करण्यात आली की, पहिल्या अपत्याबाबतचा ब्रिटिश कायदा ह्या खटल्यात ग्राह्य धरण्यात येऊ नये आणि, पारशांना स्वतःचे कायदे करण्याची मुभा द्यावी. ह्यातूनच १८३७ चा पारशी ' चॅटेल्स रिअल ॲक्ट, क्रमांक ९ ' तयार झाला. परंतु त्या कायद्याने पारशांची अर्धीच मागणी पुरी करण्यात आली.

१८५५ साली ३,००० पारशांच्या एका जाहीर सभेत ' पारसी लॉ असोसिएशन 'ची स्थापना करण्यात आली. त्या संघटनेचे अध्यक्ष माणेकजी नसरवानजी पोर्टर होते. चिटणीस होते नवरोजी फर्दुनजी आणि सोराबजी शापुरजी.

पारसी लॉ असोसिएशनने सरकारला एक कमिशन नेमणे भाग पाडले. १८६१ साली नेमण्यात आलेल्या ह्या कमिशनने १८६२ साली आपला अहवाल सरकारला सादर केला. त्या अहवालाच्या आधारे गव्हर्नर जनरलनी दोन कायदे जाहीर केले—१. १८६५ चा ' द पारशी मॅरेज ॲंड डायव्होर्स ॲक्ट, क्रमांक १५; ' आणि २. १८६५ चा ' द पारसी सक्शेशन ॲक्ट, क्रमांक २१ '. ह्या कायद्यान्वये दोन बायका करणे शिक्षार्ह गुन्हा झाला. मुंबई आणि इतर शहरांतून ' पारशी विवाह न्यायालय ' स्थापण्यात आले. सुरुवातीला त्यातील असेसर्सच फक्त पारशी होते. पुढे त्यातील न्यायाधीशही पारशी नेमण्यात येऊ लागले. मात्र १९३७ त जेव्हा ब्रिटिश पार्लमेंटने लंडनला अे. पी. हर्बर्टचे ' बिल ऑफ डायव्होर्स ' संमत केले, तेव्हा १८६५ च्या ' पारसी मॅरेज ॲंड डायव्होर्स ॲक्ट ' मध्येही सुधारणा करण्यात आली.

भारतीय शिक्षणपद्धतीत इंग्रजीचा समावेश झाला नसता तर पारसी जमातीत कायदेकानूंचा प्रसार इतक्या लवकर झाला नसता. १८३५ सालच्या आपल्या ' मिनिट ऑन इंडियन एज्युकेशन'मध्ये लॉर्ड मेकॉले लिहितो : ' हिंदुस्थानात रक्ताने व वर्णाने हिंदुस्थानी, परंतु रुची, मते, नीतिमूल्ये आणि बुद्धिमत्ता ह्यांच्या दृष्टीने इंग्लिश, असा एक समाज बनवणे हे हिंदुस्तानातील शिक्षणाचे उद्दिष्ट असावे.'

पाश्चात्य शिक्षणाचा भारतीय मनावर जबरदस्त प्रभाव पडला. राजा राममोहनराय यांच्यासारखे श्रेष्ठ सुधारक बंगालमध्ये निर्माण झाले. कुल्के तर एल्फिन्स्टन कॉलेजमधून पदवीधर झालेल्या अनेक पारशी नामवतांची यादी सादर करतो.

१८४८ साली दादाभाई नौरोजींच्या पुढाकाराने आणि एल्फिन्स्टन कॉलेजमधील इंग्रजीच्या अध्यापकांच्या सहकार्याने तरुण पारशी व हिंदू सुधारकांच्या एका गटाने 'द स्टुडण्टस लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी'ची स्थापना केली. ह्या सोसायटीची उद्दिष्टे होती : शाळा आणि अल्प वेतनावर काम करणारे किंवा पूर्णपणे सेवावृत्तीने काम करणारे शिक्षक ह्यांच्या सहकार्याने लोकांना शिक्षण मिळवून देणे. दोन महिन्यांतच सोसायटीतर्फे चार पारशी वर्गांकरिता ४४ आणि तीन हिंदू वर्गांसाठी २४ विद्यार्थी मिळवण्यात आले. सहा महिन्यांनंतर सोसायटीला आर्थिक टंचाई भासू लागली. पण त्या संकटातून चार पारशी देणगीदारांनी तिची सुटका केली. त्यातील तीन देणगीदार कामा घराण्यातील होते.

एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये मुलींच्या शिक्षणाची सोय केली जात नव्हती. हे आव्हान सोसायटीने ताबडतोब स्वीकारले. सोसायटीने मुलींसाठी ९ शाळा चालू केल्या. १८५५ साली ७४० विद्यार्थिनींपैकी ४७५ पारशी, १७८ महाराष्ट्रीय हिंदू आणि ८७ गुजराती हिंदू होत्या, अशी आकडेवारी कुल्के देतो.[६] दोन वर्षांनंतर, म्हणजे १८५७ साली, पारशी मुली ज्या शाळेत जात त्या शाळा पारसी गर्ल्स असोसिएशन, ह्या संघटनेने चालवायला घेतल्या. माणेकजी कर्सेटजी (१८०८–१८८७) ह्यांनी १८६३ साली 'अलेक्झांड्रा गर्ल्स नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिटयूशन' सुरू केली. प्रथमच इंग्रजीचा वापर शिक्षण–माध्यम म्हणून करण्यात आला. त्यानंतर इंग्रजी माध्यमाच्या मुलींच्या शाळांचे पेवच फुटले. त्यापैकी प्रसिद्ध शाळा म्हणजे 'द पेटिट हायस्कूल फॉर गर्ल्स'; 'द जमशेटजी जीजीभॉय स्कूल फॉर गर्ल्स' आणि, 'द कावसजी जहांगीर स्कूल फॉर गर्ल्स.'

शेजारच्या गुजरातच्या खेडयापाडयांत राहणाऱ्या आपल्या बांधवांच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, ह्याची जाणीव मुंबईतील अनेक धनाढ्य पारशांना होऊ लागली. त्यांनी त्या भागातील अनेक शाळांना आर्थिक साहाय्य द्यायला सुरुवात केली.

पारशांनी गुजराती भाषेच्या अभ्यासालाही चालना दिली. १८४८ साली, म्हणजे ज्यावर्षी स्टुण्डटर्स लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी स्थापन झाली त्याच वर्षी, दादाभाई नौरोजींनी ज्ञानप्रसारक मंडळीचीही स्थापना केली. ज्ञानप्रसारासाठी स्थापन केलेली ही संघटना अर्थातच फार लोकप्रिय झाली. ही संघटना १८४८ पर्यंत कार्यक्षम होती. १८७० साली एका पारशी गटाने तिचे पुनरुज्जीवन केले. त्या गटात एस. एस. बंगाली हे सुधारक होते; तसेच के. एन. काब्राजी हे पत्रकारही होते.

केखुश्रु नौरोजी काब्राजी (१८४२ ते १९०४) हे नामवत पत्रकार होते. त्यांनी पारशी कौटुंबिक जीवनावर गुजराती भाषेत काही कादंबऱ्या लिहिल्या; आणि 'स्त्री बोध' ह्या नावाचे स्त्रियांसाठी एक नियतकालिकही ते चालवीत असत. हे नियतकालिक

लोकप्रिय झाले. त्याशिवाय ' पारसी मित्र ' आणि ' रास्त गोफ्तार ' (सत्य सूचक) ह्या १८५१ साली दादाभाई नौरोजींनी स्थापन केलेल्या प्रभावी वृत्तपत्रांचे ते संपादकही होते. सुरुवातीची दहा वर्षे ' रास्त गोफ्तार ' हे राजकीय आणि सामाजिक सुधारणांचे मुखपत्र होते. परतु स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ जशी जोर धरू लागली तसे कात्राजी हळूहळू सनातनी, प्रतिगामी बनू लागले. त्यांच्याबरोबरच ' रास्त गोफ्तार ' हे पत्रही प्रतिगामी बनले. ' ब्रिटिश इन्स्टिटच्यूट ऑफ जर्नालिझम'चे सदस्य म्हणून कात्राजींची नियुक्ती झाली. हा मान मिळणारे पहिले भारतीय बहुधा कात्राजीच असावेत.

सुधारणांची प्रवृत्ती धार्मिक क्षेत्रांपर्यंतही पोचली होती. झरतुष्ट्राच्या शिकवणुकीला निसर्गपूजक, द्वैतवादी म्हणून हिणविणाऱ्या ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या टीकेला उत्तर देण्यासाठी म्हणून ' राहनुभाई माझ्दायस्नान सभा ' स्थापन करण्यात आली. पारशी युवकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारावा ह्यासाठी ख्रिश्चन मिशनरी त्यांना तऱ्हेतऱ्हेची प्रलोभने दाखवीत. दादाभाई नौरोजींच्या चरित्रात आर. पी. मसानींनी लिहिले आहे: ' क्रुसाच्या ह्या उत्साही शिष्यांची पद्धत अगदी साधी होती—ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीसाठी एक तास दिला तर इंग्रजी, इतिहास, भूगोल आणि गणित ह्या विषयांना चार तास मोफत ! '[७]

शेवटी धनजीभॉय नौरोजी आणि होर्मसजी पेस्तनजी हे, रेव्हरंड डॉ. जॉन विल्सन ह्यांच्या शाळेत जाणारे, दोन पारशी युवक ख्रिश्चन धर्मात गेले. त्यावरून पारशी जमातीत चीड व संताप उफाळला. पंचायतीने मुंबई उच्च न्यायालयात (हायकोर्टात) एक दावा दाखल करून ब्रिटिश सरकारकडे मदतीची याचना केली. हा दावा कोर्टाने फेटाळून लावला. त्या दोन्ही किशोरांना गुपचूप इंग्लंडला पाठवण्यात आले. तिथे धनजीभॉयने होली ऑर्डर्स घेतले—तो ख्रिश्चन बनला. त्याने आपल्या धर्मांतराबद्दल एक पुस्तकही लिहिले[८] त्याचा परिणाम म्हणून डॉ. विल्सन ह्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ५०० वरून जेमतेम ६० ते ७५ पर्यंत आली.

मात्र, लोक आपल्या धर्मातून परधर्मात जातात ह्याचे कारण आपले पुरोहित आणि सामान्य लोक ह्यांचे आपल्या धर्माबाबतचे अज्ञान होय, हे पारशांनी ओळखले. पुरोहितांच्या शिक्षणाची पातळी वाढवली पाहिजे आणि कुल्के ह्यांच्या शब्दांत सांगायचे तर पुरोहितांना पारंपरिक भाषेचे ज्ञान इतके सखोल असायला हवे की ख्रिश्चन धर्माशी वाद घालणे त्यांना जमले पाहिजे. पुरोहितांना निव्वळ प्रार्थना म्हणायला येऊन चालणार नाही; तर त्यांना पवित्र धर्मग्रंथांचे बुद्धिप्रामाण्यवादी स्पष्टीकरण करता यायला हवे. धर्म आणि धार्मिक बाबींच्या साराचे स्पष्टीकरण त्यांना अशा तऱ्हेने करता यायला हवे, की ते ख्रिश्चन पाद्र्यांसारख्या सुशिक्षितांनाही पटायला पाहिजे.[९]

' रहनुमाय सभा ' ही धर्म चर्चा व स्पष्टीकरणे ह्यासाठीची पुरोहित व सामान्य लोक यांच्या बैठकीची जागा बनून गेली. १८४२ साली, झरतुष्ट्राच्या शिकवणुकीचे समर्थन करण्यासाठी ' रहनुमा-ए-झारथोष्टी ' हे मासिक पत्र सुरू झाले.

त्याच सुमारास पारशी पुरोहितांसाठी तऱ्हेतऱ्हेचे मदरसे व धर्मशिक्षणाच्या शाळा सुरू करण्यात आल्या. [१०]

परदेशात जाऊन मान्यवर पाश्चात्य विद्वानांकडून आवेस्ता समजावून घेणारे पहिले पारशी होते के आर. कामा (१८३१-१९०९)[११]. त्यांनी पॅरीसमध्ये मोह्लच्या हाताखाली आणि एरलान्गन येथे स्पायगेलच्या हाताखाली अभ्यास केला. (१८५८-१८५९). शाळेकरी विद्यार्थी असताना, डॉ. विल्सनच्या सांगण्यावरून कामा सेंट थॉमस कॅथाड्रलमधील प्रार्थना ऐकायला जात. तिथले श्रवणीय चर्च संगीत त्यांना फार आवडे. त्यानंतरची पायरी होती ती त्या किशोराला छोट्या गटात चालणाऱ्या ख्रिश्चन धर्मावरील चर्चेला उपस्थित राह्यला लावण्याची. ह्या ख्रिश्चन सभांना आपला मुलगा नियमितपणे हजर राहतो हे त्याच्या आईच्या कानांवर गेले नसते तर कामा, कदाचित ख्रिश्चन झालेही असते. आईने त्यांची कानउघाडणी केली आणि पुन्हा कधी अशा सभांना जाणार नाही, अशी शपथ त्यांच्याकडून घेववली.

इंग्लंडला जाताना कामांच्या सुदैवाने त्यांचे सहप्रवासी होते दादाभाई नौरोजी. दादाभाई नवसारीच्या एका पुरोहित घराण्यातील. त्यांनी प्रवासात कामांना झोराष्ट्रियन धर्माची तत्त्वे समजावून सांगितली. कामा १८५९ साली मुंबईला परतले तेव्हा त्यांनी आपण इराणी भाषेचे वर्ग सुरू करीत असल्याचे जाहीर केले. फेब्रुवारी १८६१ मध्ये त्याना पहिला विद्यार्थी मिळाला. तो होता इरवाड शेरियारजी दादाभॉय भरूचा. हा नवसारीचा लाजाळू तरुण पुरोहित होता. आणखी काही महिन्यांतच आणखी तीन तरुण पुरोहित वर्गाला येऊ लागले आणि वर्षाअखेरीला कामाच्या वर्गात बारा विद्यार्थी येऊ लागले होते. हा वर्ग तीन वर्षे चालू होता.

१८६४ साली कामांनी ' झारथोष्टी दिननी खोल करनारी मंडली '-झोराष्ट्रियन धर्माचे संशोधन व प्रसार करणारी संघटना-स्थापन केली. सुरुवातीपासूनच ही संस्था तरुण पुरोहितांचे कार्यक्षेत्र बनून गेली.

कामांनी आपल्या कामाचे एक अंग म्हणून ' झारथोष्टी अभ्यास ' नावाचे एक वृत्तपत्र सुरू केले त्याशिवाय धर्माच्या निरनिराळ्या अंगांवर लिहिलेल्या निबंधांसाठी घसघशीत बक्षिसे देऊ केली.

अनेक पारशी ' आवेस्ता विद्वान ' कामांचे शिष्य तरी होते किंवा त्यांचे जीवन-चरित्र आणि कार्य-ह्याने प्रभावित तरी झाले होते. त्यांच्यातील उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे दस्तुर पेशोतान संजाना, एरवाड कावसजी एदुलजी कांगा, दस्तुर एम. एन.

धल्ला (१८७५–१९५६), तेहमुराष्प अंकलेसरिया आणि बेहरामगोरे अंकलेसरिया. एरवाड कावसजी एदुलजी कांगा ह्यांनी संपूर्ण आवेस्ताचे गुजरातीत भाषांतर केले आहे. ते पारशी घरांतून आजही वाचले जाते. दस्तुर सर जीवनजी जमशेटजी मोदी (१८५४–१९३३) ते कामांचे शेवटपर्यंत मित्र राहिले. त्यांनी कामांचे एक चरित्रही लिहिले होते. त्यांच्या लिखाणापैकी 'द रिलिजस सेरेमनीज अँड कस्टम्स ऑफ द पारसीज' हे आजही अत्यंत दर्जेदार समजले जाते. दस्तुर एम. एन. धल्ला (१८७५–१९५६) ह्यांनी झोराष्ट्रियन धर्मशास्त्र (theology) व संस्कृती ह्यांच्यावर लिहिलेले संशोधनात्मक ग्रंथ श्रेष्ठ मानले जातात. दोघाही अंकलेसरियांनी आयुष्यभर अवघड ग्रंथांचे संशोधन व संपादन करून त्यांच्या मान्यता प्राप्त आवृत्त्या तयार केल्या.

कामांबद्दल लिहिताना एस. एम. एडवर्डस हा इंग्रजी चरित्रकार म्हणतो, 'त्यांच्या बुद्धिमत्तेला बऱ्या–वाइटाची जाण होती. मानवी व्यवहाराबाबतचा त्यांचा दृष्टिकोण संयमी होता.' ह्याच कामांनी पारशांत नवीन दस्तुरपद निर्माण केले. कामांनी कराचीचे गरीब पुरोहित माणेकजी नसरवानजी धल्ला ह्यांचे मन वळवून त्यांना मुंबईच्या मदरशात दाखल व्हायला लावले. पुढे त्यांना अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील प्राध्यापक ए. व्ही. डब्ल्यू. जॅक्सन ह्यांच्या हाताखाली शिक्षण देऊन भारतात परत आणले. मग कराचीच्या पारशांना सांगून त्यांना वरिष्ठ पुरोहित बनवले. हे पद दस्तुर धल्लांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत भूषविले. त्यांचे विद्वत्तापूर्ण लेखन, संतासारखे शुद्ध चारित्र्य, ह्यामुळे सर्व पारशी जमात धल्लांवर प्रेम करी, त्यांच्याबद्दल आदर बाळगी.

पारशी लोक केवळ हिंदुस्तानातच धार्मिक सुधारणा घडवून आणून थांबले नाहीत. त्यांना इराणातील इराणी झोराष्ट्रियनांच्या अनुकंपनीय अवस्थेबद्दलही सहानुभूती वाटे. करीम खान हा इराणी टोळीचा प्रमुख सुरुवातीला नादिरशाहच्या सैन्यात एक साधा शिपाई होता. हळूहळू, चढत चढत एक दिवस तो इराणवर राज्य करू लागला. त्याच्या कनवाळू कारकिर्दीत (१७५० ते १७७९) इराणमध्ये संपूर्ण वीस वर्षे शांतता नांदत होती. १७७९ मध्ये त्याचा मृत्यू झाला. आणि राज्यात अंदाधुंदी माजली.'[२] इराणी झोराष्ट्रियनांचा निर्घृण छळ सुरू झाला त्यामुळे ते छोटया छोटया गटांनी, लपत छपत भारतातील पारशांकडे येऊ लागले.

१९ व्या शतकाच्या मध्यावर इराणहून भारतात आलेल्या इराणी झोराष्ट्रियनांची संख्या सर्वांत जास्त होती.

फ्रामजी भिकाजी पांडचे हा एका प्रतिष्ठित पारशी दुकानदाराचा मुलगा. मुंबईत आलेल्या झोराष्ट्रियनांना त्याने तन–मन–धनाने मदत केली. १८३४ साली त्याचा थोरला मुलगा बरजोरजी ह्याने त्या इराणी झोराष्ट्रियनांच्या मदतीसाठी एक फंड सुरू

केला. १८५४ साली त्याचा धाकटा भाऊ मेरवानजी ह्याने इराणातच राहिलेल्या इराणी झोराष्ट्रियनांच्या मदतीसाठी वेगळा फंड काढला. त्यातूनच 'सोसायटी फॉर द अमिलिओरेशन ऑफ द कंडिशन ऑफ द झोराष्ट्रियन्स इन पर्शिया' (इराणातील झोराष्ट्रियनांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणारी संघटना) सुरू झाली. सुरुवातीपासूनच त्या संस्थेचे खजिनदार के. आर. कामा होते. आपल्या मृत्यूपर्यंत त्यांनी ते पद सांभाळले.

ह्या सोसायटीतर्फे माणेकजी लिमजी हतारिया (१८१३–१८९०)[१३] हे पहिले प्रतिनिधी इराणला गेले. सुमारे तीस वर्षे माणेकजी आणि त्यांचे चिरंजीव होर्मुझधार ह्यांनी इराणी झोराष्ट्रियनांची स्थिती मुधारण्यासाठी खूप खटपट केली.

इराणमधील परिस्थिती त्या काळात खूपच हलाखीची होती. हतारियांनी लिहून ठेवले आहे की १८५४ ने १८६४ ह्या दहा वर्षांत खालील गोष्टी घडल्या हे ते शपथ-पूर्वक सांगू शकतात. पाच झोराष्ट्रियनांचा खून झाला. सात जण जखमी झाले व त्यांचा छळ करण्यात आला. तीस ते चाळीस जणांवर जबर हल्ले झाले. झोराष्ट्रियनांची शंभर घरे लुटण्यात आली. आणि शंभरावर झोराष्ट्रियनांची लूटमार करण्यात आली. झोराष्ट्रियन जमात अल्पसंख्य होती–मुस्लिम गव्हाच्या डोंगरातील एक खडा ! त्यांना फारसे शिक्षण नव्हते की उपजीविकेची साधनेही नव्हती. शंभरांपैकी जेमतेम एखाददुसराच काही महत्त्वाचे स्थान मिळवू शके. खेड्यापाड्यात राहणारे लोक तर असहाय अवस्थेत जगत होते.

हतारियांनी इराणी झोराष्ट्रियनांवरील दुष्ट जिझिया कर रद्द करवून घेतला. त्यांनी 'अताश बेहराम' आणि दोखमा ह्यांची दुरुस्ती करवली. शाळा, अनाथालये आणि झोराष्ट्रियनांसाठी धर्मशाळा स्थापन केल्या. वैयक्तिक रीत्या ज्या पारशांना काही दानधर्म करावयाचे होते, त्यांचा मध्यस्थ म्हणूनही हतारियांनी काम केले. १८८२ पर्यंत, तेहरान, कर्मान, येझ्द आणि आसपासची खेडी येथे मुलांच्या १२ शाळा सुरू झाल्या होत्या. त्यांतील पहिल्या शिक्षकांपैकी दोन मुंबईचे पारशी होते निधर्मी शिक्षण, म्हणजेच लिहिणे–वाचणे, गणित ह्यांचे शिक्षण, त्या शाळांतून दिले जाई. ह्या पारशांनी शिकवलेली मुलेच पुढे शिक्षक बनली, आणि येझ्द आणि कर्मान येथील शाळांतून शिकवू लागली. मुस्लिमांचा मुलींच्या शिक्षणाला तीव्र विरोध होता. पण हतारियांनी त्याबाबतीत त्यांचे मन वळवले.

आज तेहरानमधील झोराष्ट्रियन कॉलेज तेहरान विद्यापीठाशी संलग्न आहे. शिवाय रेझा शाह पहेलवी ह्यांनी स्थापन केलेल्या पहेलवी घराण्याच्या स्थापनेपासून इराणी झोराष्ट्रियनांना संपूर्ण नागरिकत्वाचे हक्क मिळू लागले. त्यांचा धर्म आणि संस्कृती हे इराणी राष्ट्रीय वारशाचा भाग समजले जातात. झोराष्ट्रियन धर्म आणि विचार

ह्यांच्याबाबत आंतरराष्ट्रीय परिषदा भरवल्या जातात. ' आवेस्ता 'वरील विचारांची इराणी आणि भारतीय विद्वानांत देवाणघेवाण होते. ह्या सर्वांमुळे भारतीय पारशांचे त्यांच्या संबंध मूळ भूमीशी दृढ होऊ लागले आहेत.

१८५० च्या सुमारास पारशीही थिऑसॉफीकडे आकृष्ट होऊ लागले होते. कुल्के म्हणतो त्याप्रमाणे, " पारशी थियॉसॉफिस्टांना ' आवेस्ता 'चे ज्ञान करून घेणे अवघड होते. कारण १६ व्या व १७ व्या शतकातच पारशी धर्मवेत्ते नाहीसे झाले होते. त्यामुळे हे लुप्त झालेले मार्ग शोधून काढून त्यांचा प्रसार करणे हेच पारशी थियॉसॉफिस्टांचे उद्दिष्ट बनून गेले."[१४] दुर्दैवाने ' आवेस्ता 'चे लुप्त झालेले अर्थ शोधण्याच्या प्रयत्नांत अनेक गैरलागू कल्पना जन्माला आल्या. त्यांचा मूळ धर्मतत्त्वाशी काहीही संबंध नव्हता.

थियॉसॉफिस्टांच्या अशा टीकेला बुद्धिवान पारशांकडून विरोध होऊ लागला. दस्तुर धल्ला आणि इतिहासकार अर्थशास्त्रज्ञ पी. ए. वाडिया ह्यांनी पुढाकार घेऊन १९११ साली ' इरानियन असोसिएशन ' स्थापन केले. त्याच्या पुढल्याच वर्षी ' जर्नल ऑफ द इरानियन असोसिएशन ' सुरू करण्यात आले. आणि त्यातून, झोराष्ट्रियन धर्मग्रंथांच्या थिऑसॉफिकल विश्लेषणांची निरर्थकता स्पष्ट करण्यात येऊ लागली. धर्माचे पावित्र्य राखणे हे त्या पत्रिकेचे उद्दिष्ट होते.

थिऑसॉफीबरोबरीनेच ' फ्री मेसनरी 'कडेही पारशी आकृष्ट झाले होते. १८४४ सालीच ' लॉज रायझिंग स्टार ' हा पूर्णपणे पारशी लॉज स्थापन झाला होता. आणि तो आजही भरभराटीत आहे.[१५]

ह्याच सुमाराला दोन समाजसुधारकांनी आपला ठसा केवळ पारशी जमातीवरच नव्हे, तर सर्व देशावर उठवला. हे समाजसुधारक म्हणजे बेहराम मलबारी आणि सोराबजी शापुरजी बंगाली.

बेहराम एम. मलबारी (१८५३–१९१२)[१६] हे गरीब आई–वडिलांच्या पोटी जन्माला आले. वयाच्या बाराव्या वर्षीच ते अनाथ झाले आणि नशीब काढायच्या उद्देशाने मुंबईत आले. तिथे त्यांनी पत्रकाराचा पेशा पत्करला. आयुष्यभर त्यांनी बालविवाह आणि विधवांना पुनर्विवाहाची बंदी, ह्या हिंदू धर्मातील दोषांविरुद्ध लढा दिला. १८८४ साली त्यांनी ' बालविवाह आणि सक्तीचे वैधव्य ह्या विषयावरील टिपणी ' ही अत्यंत काळजीपूर्वक संशोधन करून लिहिलेली पुस्तिका प्रसिद्ध केली. ती देशातील सर्व प्रमुख नागरिकांना वाटली. आपल्या ' इंडियन स्पेक्टॅटर ' ह्या पत्रकातूनही त्यांनी १८८४ ते १८९१ ह्या दरम्यान ह्या विषयांना भरपूर प्रसिद्धी दिली. देशभर त्यांनी भाषण दौराही काढला. व्हाइसरॉय, गव्हर्नर, भारतीय संस्थानिक, प्रमुख हिंदू व पत्रकार ह्यांच्या भेटी–गाठी घेतल्या.

ह्या विषयावर सामाजिक कायदे तयार करावेत, ह्यासाठी ब्रिटिश लोकमत जागृत करण्यासाठी त्यांनी इंग्लंडला तीनदा भेटी दिल्या.

७ वर्षे चाललेला मलबारींचा हा खटाटोप अखेर यशस्वी झाला. १८९१ साली 'संमती वयाचा कायदा' झाला. आपल्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश मिळालेले पाहून मलबारी सार्वजनिक जीवनातून निवृत्त झाले. त्यांना देऊ केलेला ' सर ' हा किताब (नाईटहूड) त्यांनी नाकारला. दयाराम गिडूमल ह्यांच्या सहकार्याने त्यांनी १९०८ साली सेवासदनची स्थापना केली. हे सेवासदन त्यांनी वाय. डब्ल्यू. सी. ए. च्या धर्तीवर काढले होते. ह्याच दयाराम गिडूमलनी पुढे मलबारींचे चरित्र लिहिले. आजही सेवासदन संस्था कार्यरत आहे. तिच्या शाखा पश्चिम भारतात सर्वत्र पसरल्या आहेत. त्या संस्थेत कोणत्याही जाति–धर्माच्या परित्यक्त स्त्रियांना आश्रय मिळतो. त्यांना आर्थिक मदत मिळते, वैद्यकीय साहाय्य दिले जाते आणि थोडेफार शिक्षणही देण्यात येते.

सोराबजी शापुरजी बंगाली (१८३१–१८९३)[१७] हे मलबारींचे परमस्नेही आणि सहकारी. कामगारांच्या कामाच्या स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणाव्यात अशी मागणी करणारे ते पहिले भारतीय. बंगाली हे ' पारशी लॉ असोसिएशन ' चे चिटणीस होते. त्यांनी टाऊन कौंसिलमध्ये सुधारणा व्हावी ह्यासाठी घेण्यात आलेल्या चर्चेत, १८७१ साली, प्रामुख्याने भाग घेतला. ' फॅक्टरी लॉ ' प्रस्थापित करण्यासाठी कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे, ह्याचा तपशील त्यांनी १८७८ साली मुंबईच्या गव्हर्नरांना सादर केला.

त्या मसुद्याला प्रखर विरोध झाला. तरीही १८८१ व १८९१ साली त्यातूनच ' इंडियन फॅक्टरी अॅक्ट ' अस्तित्वात आले. त्यामुळे कामगारांना आपल्या परिस्थितीची जाणीव झाली; आणि १८९० साली 'मुंबई गिरणी कामगार संघटना' स्थापन झाली. ' हिंदुस्थान व ब्रह्मदेश संयुक्त रेल्वे कामगार संघटना (१८९७), ' कलकत्त्याची प्रिंटर्स युनियन ' (१९०५), ' कामगार हितवर्धक सभा ' (१९०९) ह्या संघटना त्या जाणिवेचाच परिपाक होता.[१८]

आधुनिक कामगार चळवळीचा पायाही एका पारशानेच घातला. हे पारशी म्हणजे बी. पी. वाडिया. हे थिऑसॉफिस्ट होते. डॉ. अनी बेझंट ह्यांचे होमरूल चळवळीतील स्नेही व सहकारी होते. आपल्या पूर्वसूरींपेक्षा वाडियाची दृष्टी दूरवरचा विचार करणारी होती. म्हणूनच त्यांना राष्ट्रीय चळवळीशी कामगार चळवळीची सांगड घालण्याची कल्पना सुचली. १९१८ साली वाडियांनी ' मद्रास लेबर युनियन ' स्थापन केले. ही भारतातील पहिली आधुनिक कामगार संघटना होती, असे कुल्के म्हणतो.[१९]

१९२० साली लाला लजपत रायनी ' ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (इन्टक)' स्थापना केली. इन्टकच्या धोरणांवर वाडिया प्रभाव पाडू शकले नाहीत. तथापि,

त्यांनी कामगारांना कायदेमंडळात स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणी केली. जातिभेद नष्ट करण्यासाठी कामगार चळवळीचे व्यासपीठ वापरावे, अशी त्यांची इच्छा होती. पण ती सफल झाली नाही. कारण, त्याच प्रश्नावर १९२६ साली मद्रास लेबर युनियन बरखास्त करावी लागली.

मात्र, भारतातील घडामोडींकडे आंतरराष्ट्रीय संघटनांचे लक्ष वेधून घेण्यात वाडियांना यश आले. १९१९ साली ते इंग्लंडमध्ये भरलेल्या ट्रेड्स युनियन काँग्रेस आणि ब्रिटिश लेबर पार्टी ट्रेड्स युनियन काँग्रेसपुढे वाडियांनी भाषणही केले. त्यानंतरच 'हिंदुस्थानातील भ्रातृ-कामगार संघटनांना आर्थिक साहाय्य करण्याचे आवाहन' त्या काँग्रेसला संलग्न असलेल्या संघटनांना करण्यात आले.

लीग ऑफ नेशन्सतर्फे वॉशिंग्टन येथे भरलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेसाठी भारतीय प्रतिनिधी म्हणून वाडियांची नियुक्ती झाली होती. त्यानंतर थोड्याच दिवसांनी वाडियांनी कामगार चळवळीचे कार्य सोडून दिले व आपले उर्वरित आयुष्य थिऑसॉफीला वाहून घेतले.

त्यांच्यानंतर कामगार-चळवळीत दोन पारशी काम करीत होते—ते होते एम. एच. झाबवाला आणि फ्रामरोझ जे. जिनवाला.[२०]

झाबवाला स्वतःकडे ५० कामगार-संघटनांचे पितृत्व घेतात. पी. स्प्रॅट आणि एफ. ब्रॅडले ह्या दोन ब्रिटिश कम्युनिस्टांच्या मदतीने त्यांनी १९२० साली भारतात 'वर्कर्स अँड पीझंट्स पार्टी' (कामगार-शेतकरी पक्ष) काढायचा प्रयत्न केला; पण तो अयशस्वी ठरला. १९३०-३३ मधील मीरत कट खटल्यात झाबवालांनाही गोवण्यात आले होते; परंतु त्यांची लवकरच सुटका झाली. त्यानंतर त्यांना इन्टकमध्ये महत्त्वाची जागाही देण्यात आली.

फ्रामरोझ जिनवाला हे मुंबईचे एक प्रमुख कामगार कार्यकर्ते. मुंबईच्या तेरा कामगार संघटनांचे ते अध्यक्ष होते. मुंबईच्या सेंट्रल लेबर बोर्डाचेही ते अध्यक्ष होते.

एक गमतीची गोष्ट अशी की वर उल्लेखिलेल्या तीन पारशांपैकी एकही जण, त्यांनी ज्या कंपनी-फॅक्टरीच्या कामगार संघटना उभारल्या, त्या कंपनी-फॅक्टरीत, कामाला नव्हता. १९३१ साली भारतीय कामगारांसाठी नेमण्यात आलेल्या रॉयल कमिशनपुढे ही गोष्ट उघड झाली. ही मंडळी अशी अलिप्त होती, म्हणूनच त्यांचे कार्य जास्त प्रभावी ठरले.

पारशी जमातीने अशी सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक सुधारणांची कामे पार पाडली. त्यामुळेच दादाभाई नौरोजी, फेरोझशाह मेहता आणि दिनशॉ वाच्छा ह्यांच्या-सारख्या लोकांना राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचा भाग घेता आला.

१. आर. बी पेमास्टर– अर्लि हिस्टरी ऑफ द पारसिज इन इंडिया, मुंबई १९५४, पृष्ठे १२२–१२५.
२. एम. एस. कॉमिसारिएट– 'द फर्स्ट पार्शी इन इंग्लंड' (१७२४–२५)– एम पी. खारेघाट मेमोरियल व्हॉल्यूम, मुंबई, १९५३, पृष्ठ २२१ तळटीप
३. बामनजी बैरामजी पटेल– द पारसी पटेल्स ऑफ बॉम्बे, मुंबई, १८७६. पृष्ठे १ ते ४२.
४. इ. कुल्के– द पारसिज इन इंडिया, दिल्ली, १९७४, पृष्ठे ३ (तळटीप).
५ वरील, पृष्ठ ६१ तळटीप
६ वरील, पृष्ठ ८८
७. आर. पी. मसानी– दादाभाई नौरोजी : द ग्रँड ओल्डमॅन ऑफ इंडिया, लंडन, १९३९, पृष्ठ ३८
८. धनजीभॉय नौरोजी– 'फ्रॉम झोरास्टर टु ख्राईस्ट, एडिंबरा, १९०९– कुल्केच्या वरील पुस्तकात घेतलेला उतारा– पृष्ठ ९४, टीप ११
कार्नेलिया सोराबजीबद्दल जो गैरसमज आजही प्रचलित आहे, आता तो दूर करायलाच हवा. कार्नेलिया पारशी नव्हती. ती मूळची हरिजन ख्रिश्चन वनली इंग्लंडमध्ये तिने वकिलीचे शिक्षण घेतले आणि हिंदुस्थानात परतल्यावर कलकत्ता व संयुक्त प्रांत (आताचा उत्तरप्रदेश) येथे मुस्लिम महिलांमध्ये तिने कार्य केले. सोराबजी हा तिचा नवरा. सुरतेच्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी पळवून नेलेल्या दोन मुलांपैकी. ह्या मुलांना पळवल्याचे कळताच पारशी जमात चिडून गेली. लाठ्या, दगड घेऊन मुलांच्या सुटकेची मागणी करू लागली. तेव्हा ह्या दोन्ही मुलांना शाळेच्या आवारातील एका कोरड्या विहिरीत लपवण्यात आले. जमावाने आवाराचा कोपरा न् कोपरा धुंडाळला. पण त्या विहिरीकडे कोणी गेले नाही. ही घाबरलेली, भुकेली पोरे रात्री अंधार पडल्यावर बाहेर काढण्यात आली त्यांना गुपचूपपणे इंग्लंडला नेण्यात आले. तिथे सोराबजीला वकिलीचे शिक्षण देण्यात आले.
९. कुल्केचे वरील पुस्तक, पृष्ठ ९५
१०. वरील पुस्तक, पृष्ठ ९५, टीप १६

११. एस. एम एडवर्डस– के आर. कामा, लंडन, १९२३; जे. जे. मोदी– के. आर. मोदी, नवसारी, १९३२
१२. पर्सी साईक्स, 'ए हिस्टरी ऑफ पर्शिया, लंडन, १९६९, खंड २ रा, पृष्ठे २७७–२८०.
१३. मेरी बॉइस– 'माणेकजी लिपजी हतारिया इन इराण.' के. आर. कामा ओरिएंटल इन्स्टिटयूट गोल्डन ज्यूबिली व्हॉल्यूम, मुंबई १९६९, पृष्ठे १९ ते ३१
१४. कुल्केचे वरील पुस्तक, पान १००, टीप ३५
१५. डी. एफ. वाडिया– हिस्टरी ऑफ लॉज् रायझिंग स्टार ऑफ वेस्टर्न इंडिया, मुंबई, १९१२–कुल्केने वरील पुस्तकात घेतलेला उतारा, पृष्ठ, ९९ टीप ३३
१६. दयाराम गिडूमल– द लाईफ अँड लाईफ वर्क ऑफ बी. एम. मलबारी, मुंबई १८८८
१७. एन. एस. बंगाली– द लाईफ ऑफ एस. एस. बंगाली, मुंबई (सन नाही.)
१८. कुल्के– वरील पुस्तक, पृष्ठ २०७, टीप ८
१९. वरील, पृष्ठ २०७.
२०. वरील, पृष्ठ २०८–२०९.

६. राजकारण

१८५३ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचे नूतनीकरण व्हायचे होते. त्या वातावरणाचा परिणाम म्हणून की काय १८५० च्या सुमाराला विचारवंत हिंदी लोकांमध्ये राजकीय जागृतीची लाट उसळू लागली. त्यात आघाडीवर होती मद्रास व कलकत्ता ही शहरे. त्या शहरांनी राजकीय संघटना उभ्या केल्या. कलकत्त्याला 'द ब्रिटिश इंडियन असोसिएशन' आणि मद्रास येथे 'द मद्रास नेटिव्ह असोसिएशन' ह्या दोन्ही संस्था १८५१ मध्ये स्थापन झाल्या.

त्यानंतर एक वर्षानेच मुंबईतील काही पारशी व हिंदू तरुणांच्या गटाने दादाभाई नौरोजींच्या नेतृत्वाखाली 'बॉम्बे असोसिएशन' ची स्थापना केली. सुरुवातीपासूनच धोरण आणि आर्थिक मदत ह्याबाबतीत ह्या संघटनेत पारशांचे वर्चस्व होते.' ह्या असोसिएशनचे पहिले अध्यक्ष होते. मुंबईचे प्रमुख व्यापारीपुत्र सर जमशेदजी जीजीभॉय. तिचे दोन चिटणीस होते नौरोजी फर्दुनजी— 'जनतेच्या हक्कांचा विश्वस्त (ट्रिब्युन)'— आणि भाऊदाजी. हे दोघेही पुरोगामी राजकीय विचारसरणीचे होते.

ह्या तरुण बुद्धिवंतांनी व्यापारी सेठियांना आपल्या बाजूला वळवायचे खूप प्रयत्न केले, पण व्यर्थ. पहिल्याच वर्षी असोसिएशनच्या दोन गटांत फूट पडली. १८६० पर्यंत तर सेठियांनी संघटनेतून बुद्धिवंतांना हाकलून दिले होते. १८६२ साली ही संघटनाच नामशेष झाली.

त्या संघटनेचा वारसा घेऊन १८८५ साली बाम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनची स्थापन करण्यात आली. डिसेंबर १८८५ मध्ये इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना होण्याआधीच्या काही महिन्यातील ही घटना. सुरुवातीपासूनच बुद्धिवतांनी 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन' वर पक्का कबजा मिळविला होता.

एकोणिसाव्या शतकातील राष्ट्रीय चळवळीशी तीन पारशांचे घनिष्ठ संबंध आले. ते तीन पारशी म्हणजे दादाभाई नौरोजी (१८२५–१९१७), सर फिरोजशाह मेहता (१८४५–१९१५) आणि सर दिनशॉ वाच्छा (१८४४–१९३६).

'भारताचे पितामह' असा दादाभाई नवरौजीचा गौरव करण्यात येतो. त्यांचा जन्म मुंबईजवळील मांडवी ह्या मच्छिमारी गावात ४ सप्टेंबर १८२५ रोजी झाला. त्यांचे वडील गरीब पुरोहित होते. त्यांचे नाव पालनजी दोरडी. आईचे नाव

माणेकबाई. पदवी मिळवण्यापूर्वीच दादाभाईंनी ' दोरडी ' (सुभ) ह्या आपल्या आड-नावाचा त्याग केला. आपल्या स्वभावातील न जळणाऱ्या पिळाचा उल्लेख करून दादाभाई एकदा बडोद्याचे राजे मल्हारराव ह्यांना म्हणाले होते, " महाराज, मी नावाचा दोरडी आहे. तुम्हाला माहीतच असेल, युवर हायनेस, की सुंभ जळू शकतो पण त्याचा पीळ जाळता येत नाही ! माझंही तसंच आहे. एकदा मी निश्चय केला की पक्का. मग मला त्यापासून कोणीही परावृत्त करू शकत नाही." २

त्याकाळच्या रूढींप्रमाणे दादाभाईंचा विवाह वयाच्या अकराव्या वर्षी, एका सात वर्षांच्या मुलीशी झाला. त्यांच्या पत्नीचे नाव गुलबाई. ती सोराबजी श्राफ ह्यांची मुलगी. हा विवाह दुर्दैवी ठरला. गुलबाई दिसायला साधी होती. ती फारशी बुद्धिवानही नव्हती. आणि तरुण नवऱ्याने कितीही प्रयत्न केला तरी तिने शिकायचे नाकारले. तरीसुद्धा दादाभाईंनी दुसरे लग्न करायचे नाकारले. त्यांनी गुलबाईला अत्यंत प्रेमाने वागवले, आणि मुलाबाळांच्या प्रेमात त्यांनी सुख मिळवले.

दादाभाईंनी एल्फिन्स्टन कॉलेजमधून पदवी मिळवली. नॅचरल सायन्सेस आणि गणित ह्या आपल्या आवडीच्या विषयांत त्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले. त्याच कॉलेजात गणिताचे प्रोफेसर म्हणून त्यांची नेमणूक झाली.

१८४५ ते १८५५ ही दहा वर्षे अत्यंत उलाढालींची गेली. दादाभाईंच्याच शब्दात सांगायचे तर,

' स्त्रीशिक्षण, स्त्री–पुरुषांनी समाजात, सामाजिक व इतर सभांमध्ये मिळून–मिसळून वावरणे, शिशुमंदिरे (बालवाड्या), द स्टुडण्टस लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी, मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या संस्था (सोसायटीज फॉर द डिफ्यूजन ऑफ नॉलेज इन व्हर्नाक्युलर), पारशी सुधारणा, बाल–विवाह बंदी, हिंदू विधवांचा पुन-र्विवाह, पारशी रिलिजस रिफॉर्म सोसायटी (पारशी धर्मसुधारणा संस्था), असे अनेक प्रश्न (त्याकाळी) हाती घेण्यात आले ... ...'३

कामा कुटुंबाने आपल्या ' कामा अँड कंपनी 'त भागीदार होण्याची विनंती दादा-भाईंना केली. इंग्लंडमध्ये प्रस्थापित झालेली ही पहिलीच हिंदी पेढी. तिचे ऑफिस लंडनला होते आणि शाखा लिव्हरपूलला. ह्या लिव्हरपूलच्या शाखेचे प्रमुख दादाभाई राहणार होते. त्यासाठी दादाभाई जून १८५५ मध्ये इंग्लंडला जायला निघाले. त्यांच्याबरोबर के. आर. कामा आणि मंचरजी होर्मसजी कामा हेही होते. हे तिघे भागीदार लंडनमध्ये पारशी थाटामाटात राहत. त्यांचा आचारी आणि बटलर (खासगी गडी) हे दोघे पारशीच होते. १८५८ मध्ये दादाभाई आणि के. आर. कामा ह्यांनी पेढीचा राजिनामा दिला. आणि १८५९ साली दादाभाईंनी स्वतःचा कापसाचा व्यापार इंग्लंडमध्ये सुरू केला. त्यांनी आपल्या कंपनीचे नाव ' दादाभाई नवरोजी अँड

कंपनी ' असेच ठेवले होते. दादाभाईंना इतरही कार्यात रस होता. त्यांनीच १८६१ साली लंडन झोराष्ट्रियन असोसिएशनची स्थापना केली.

हिंदी राष्ट्रभक्त ह्या नात्याने दादाभाईंनी आयुष्यभर तीन आघाड्यांवर लढा दिला. ब्रिटिशांनी हिंदुस्थानची केलेली आर्थिक पिळवणूक त्यांनी उघड केली. स्वत:ची ' ड्रेन थियरी ' (पिळवणूक सिद्धांत) तयार केली आणि आपल्या ' पॉवर्टी अँड अन्-ब्रिटिश रूल इन इंडिया ' ह्या विस्तृत लेखात तो सिद्धान्त स्पष्ट केला (१९०१). त्याखेरीज, शासकीय कारभाराचे भारतीकरण व्हावे. विशेषत: इंडियन सिव्हिल सर्व्हिस (आय. सी. एस.) चे भारतीकरण करावे, ह्यासाठी त्यांनी लढा दिला. आणि तरीसुद्धा १९१५ तही आय. सी. एस. पैकी फक्त १० टक्के सदस्य भारतीय होते. १९२२ सालापासून मात्र आय. सी. एस. साठी भारतीयांची प्रत्यक्ष निवड होऊ लागली. त्यांचे तिसरे कार्य म्हणजे अफगाणिस्तान, ब्रह्मदेश आणि इजिप्त येथील लढायांसाठी करदात्यांच्या पैशावर, परतु इंग्लंडच्या नावारूपासाठी जो भरमसाठ खर्च होत असे, त्याविरुद्ध त्यांनी उठवलेला जोरदार आवाज.

ह्या तीनही विषयांवर ब्रिटिश लोकमत जागृत करावे ह्या हेतून दादाभाईंनी १८६६ साली ' ईस्ट इंडिया असोसिएशन ' सुरू केले. त्याचे अध्यक्ष होते लॉर्ड लिवेदेन आणि चिटणीस स्वत: दादाभाई. १८७१ सालापर्यंत ह्या संघटनेची सदस्य-संख्या एक हजारावर गेली होती.

१८७३ साली दादाभाईंना बडोद्याचे दिवाण नेमण्यात आले. ही अगदी अनपेक्षित घटना होती. त्यानंतरची दोन वर्षे त्यांनी हे जिकिरीचे पद सांभाळले. आपल्या तीन सहकाऱ्यांबरोबर बडोद्याचा राज्यकारभार सुधारण्याचा प्रयत्न केला. तथापि, मल्हारराव गायकवाड ह्यांचा कमकुवतपणा आणि चंचल वागणूक ह्यामुळे त्या चौघाही दिवाणांनी एकदमच राजीनामा दिला. तोही अगदी वेळेवर कारण दुसऱ्याच दिवशी मल्हाररावांना माजी इंग्रजी रेसिडेन्ट कर्नल फायरे ह्याच्या खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. त्यांच्यावर खटला भरण्यात येऊन त्यात त्यांना शिक्षाही झाली.

पुढे काही दिवस दादाभाई भारतातच शांतपणे काम करीत होते ' ड्रेन ' सिद्धांताला पोषक आकडेवारी ते गोळा करीत होते इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेत त्यांचाही महत्त्वाचा भाग होता. त्यांनी मांडलेले अनेक ठरावही संमत करण्यात आले त्याच १८८५ साली, त्यांनी आणखी एक महत्त्वाच्या संघटनेची स्थापना केली. ही संघटना म्हणजे ' बॉम्बे रेटपेअर्स असोसिएशन ' (मुंबई करदाता संघ).

१८८६ साली दादाभाई परत इंग्लंडला गेले. तिथे ' ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्स 'ची निवडणूक त्यांना लढवायची होती. त्याच सुमाराला, म्हणजे १८८८ साली, दादा-

भाईचा गांधीजींशी निकटचा संबंध आला. गांधीजी त्या काळात आफ्रिकेत काम करीत होते. 'दादाभाई माझे खरोखरचे वडीलबंधू (दादा) झाले' असे गांधीजींनी लिहिले आहे.

अनेक अडचणी दूर केल्यानंतर दादाभाईंना अखेरीला, लिबरल पक्षाचा प्रतिनिधी म्हणून, मध्य फिन्सबरी मतदारसंघातून निवडून येण्यात यश मिळाले (८ जुलै १८९२). कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षीय वृत्तपत्रांनी त्यांच्याविरुद्ध वर्णविद्वेष पेटवण्यासाठी जंगजंग पछाडले. अग्निपूजक आशियाई अशी त्यांची संभावना करण्यात आली. 'सेंट स्टीफन रीव्ह्यू' ह्या स्थानिक वृत्तपत्राने लिहिले होते :

"आपल्या संपूर्ण विभागात एखादा इंग्रज, स्कॉटिश आयरिश, कोणीही निवडण्याजोगा सापडला नाही, ह्याची जाहीर कबुलीच, ह्या मुंबईकर अग्निपूजकाला निवडून देऊन, मध्य फिन्सबरीच्या लोकांनी दिली आहे. त्याची त्यांना लाज वाटायला हवी."[४]

अशा विषारी वातावरणातच ६ जुलै १८९२ रोजी मतदान झाले. दादाभाईंना २,९५९ मते पडली. त्यांचा कॉन्झर्व्हेटिव्ह विरोधक कॅप्टन एम. टी. पेन्टन ह्याला २,९५६ मते पडली आणि दादाभाई अवघ्या तीन मतांनी निवडून आले! त्यांचे मतदार त्यांना 'मि. नॅरो मेजॉरिटी' (श्री. जेमतेम बहुमतवाले) म्हणत.

हाऊस ऑफ कॉमन्समध्ये एक हिंदी प्रथमच निवडून गेल्याबद्दल हिंदुस्थानात तर आनंदाचा जल्लोष झालाच. परंतु खुद्द इंग्लंडमध्ये उत्साहाला कमतरता नव्हती. निवडणुकीच्या दुसऱ्याच दिवशी झालेल्या जाहीर सभेत ग्लॅडस्टनने आपले समाधान व्यक्त केले.

ब्रिटिश पार्लमेंटमध्ये प्रवेश मिळताक्षणी दादाभाईंनी त्याच्यापुढे हिंदुस्थानातील ब्रिटिशांच्या अन्यायाचा पाढा वाचायला सुरुवात केली. १८९३ त एक 'इंडियन पार्लमेंटरी कमिटी' नेमण्यात आली. तिचे अध्यक्ष सर विल्यम वेडरबर्न होते. सभासद होते डब्ल्यू. एस. केन, सॅम्युएल स्मिथ आणि इतर. ह्या समितीने हिंदी प्रश्नांचा सखोल अभ्यास करून आकडेवारी गोळा केली. इतर आनुषंगिक माहिती पुरवली. दादाभाईंनी ह्या सर्वांचा पार्लमेंटमध्ये भाषण करताना फायदा करून घेतला. इंडियन नॅशनल कॉंग्रेसची ब्रिटिश समिती १८८९ त अस्तित्वात आली. तिनेही इंडियन पार्लमेंटरी समितीच्या कामाला खूपच साहाय्य केले.

१८९५ मध्ये पार्लमेंट बरखास्त झाले. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष सत्तेवर आला आणि दादाभाईंना राजीनामा द्यावा लागला. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाने सर मंचेरजी भोवनागरी ह्या दुसऱ्या एका पारशाला पार्लमेंटच्या जागेसाठी उभे केले. भोवनागरी कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाशी समरस झाला होता. त्याला हिंदी लोक मि. बाऊ अँड अ‍ॅग्री (श्री. हांजी हांजी) म्हणत. तो इंग्लंडमध्ये हिंदुस्थानाचा प्रतिनिधी आहे, हेच मुळी हिंदी लोकांना मान्य नव्हते.

१९०६ मध्ये दादाभाईंनी पुन्हा एकदा पार्लमेंटची निवडणूक लढवली. परंतु ह्या खेपेला त्यांचा पराभव झाला. त्याच वर्षी त्यांची पुन्हा भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. टिळकांच्या झपाटेबंद नेतृत्वाखालील जहाल आणि त्यांचे नेमस्त विरोधक ह्या दोघांनाही मान्य होतील, असे समन्वयवादी अध्यक्ष दादाभाईच होते.

ह्याच ऐतिहासिक अधिवेशनाच्या वेळी दादाभाईंनी भारतासाठी स्वराज्याची, संपूर्ण स्वातंत्र्याची, मागणी केली. आपल्या देशावरील अन्याय दूर करण्याच्या प्रयत्नात आपल्याला आलेल्या नैराश्यजनक अनुभवांबाबत भावपूर्ण भाषेत बोलताना दादाभाई म्हणाले– 'मी सुरुवातीपासूनच पदरात इतकी निराशा घेतली आहे की तेवढ्या निराशेच्या फटक्याने इतर कोणाचेही मन खचले असते, आणि त्याला वैताग आला असता. कदाचित त्याने बंडही केले असते.'

इंग्लंडला परत गेल्यानंतर दादाभाई ब्रॉंकायटिसच्या विकाराने गंभीर आजारी झाले. तेव्हा निवृत्त होऊन ते मायदेशी परत आले. आपल्या रुग्णशय्येवरूनच ते देशातील आर्थिक व राजकीय घडामोडींशी संबंध ठेवीत असत.

१९१६ साली थोड्या उशिराने का होईना पण, मुंबई विद्यापीठाने दादाभाई व सर फिरोझशाह मेहता ह्या दोघांनाही सन्माननीय 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी देण्याचा निर्णय घेतला. तथापि त्यासाठी आयोजित केलेला खास पदवीदान समारंभाचा दिवस उजाडण्यापूर्वीच सर फिरोझशाह मृत्यू पावले होते. दादाभाई मात्र हा सन्मान स्वीकारायला जातीने हजर होते. रस्ते माणसांनी फुलून गेले होते. पदवीदान समारंभाच्या दालनात (कॉन्व्होकेशन हॉल) माणसांना उभे राहायलाही जागा उरली नव्हती. समारंभ संपल्यानंतर एक मिरवणूक निघाली. तीत दादाभाई एका मोटारीत आपली मुलगी माणेकबाई आणि तिचा पती दादिना ह्यांच्यासह सामील झाले होते. लोकांना घडलेले दादाभाईंचे हेच शेवटचे दर्शन. ३० जून १९१७ रोजी ते वारले, तेव्हा त्यांचे कुटुंबीय व निकटवर्ती त्यांच्याजवळ होते.

दादाभाईंसमवेत देशसेवेचे व्रत घेतलेले आणखी दोघंजण म्हणजे सर फिरोजशाह मेहता व सर दिनशॉ वाच्छा.

फिरोझशाहांचा जन्म १८४५ साली मुंबईत झाला. त्यांचे वडील धनाढ्य व्यापारी होते. त्यांचे वास्तव्य जास्त करून कलकत्त्यास असे. फिरोझशाह मात्र बालपणापासून मुंबईतच राहात, १८६४ साली एलफिन्स्टन कॉलेजमधून त्यांनी पदवी मिळवली. त्यानंतर शिष्यवृत्ती पटकावून ते इंग्लंडला गेले. तिथे लिंकन्स इन येथे त्यांनी वकिलीचा अभ्यास केला. १८६७ त ते बॅरिस्टर झाले. १८६८ त ते मायदेशी परतले. इंग्लंडमध्ये असतानाच त्यांच्यावर दादाभाईंचा प्रभाव पडला होता. पुढील सारी हयात ते दादा-

भाईंचे स्नेही राहिले. त्यांच्याबद्दल फिरोजशाहना आदर वाटत असे. १८६९ साली पुनरुज्जीवित झालेल्या बॉम्बे असोसिएशनचे ते चिटणीस बनले. त्यांच्याबरोबरचे दुसरे चिटणीस होते. बाळ मंगेश वागळे. १८६९ ते १८७६ ही सात वर्षे त्यांनी मुंबई हायकोर्टात वकिली केली. कुशाग्र बुद्धी, हजरजबाबीपणा आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व ह्यामुळे हिंदी लोक त्यांना 'हिंदुस्थानातील सर्वोत्तम वादपटू' म्हणून ओळखू लागले.

मात्र फिरोझशाह हे निव्वळ आतषबाज वादपटू नव्हते. मुंबईच्या टाऊन कौन्सिलचे ते सभासद होते. नंतर त्यांची मुंबई महानगरपालिकेचे सभासद म्हणून निवड झाली. ह्या दोन संस्था आणि इंडियन नॅशनल कॉंग्रेस ह्या संस्थांच्या कार्यांना त्यांनी आपले सारे आयुष्य वाहिले होते.

महानगरपालिकेच्या कारभारात त्यांनी चैतन्य आणले. १८७२ व १८८८ च्या नगरपालिका कायद्यात फिरोझशाहनी सुचवलेल्या अनेक सुधारणांचा समावेश करण्यात आला आहे.

फिरोझशाह कट्टर देशभक्त होते. जमातीचे वेगळे प्रतिनिधित्व व वर्ग-वैशिष्टच ह्यांच्याविरुद्ध त्यांनी जोरदार चळवळ केली. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना हक्क मिळवून देण्यासाठी गांधीजींनी उभारलेल्या लढ्याला फिरोझशाहनी पाठिंबा दिला. गांधीजींनी पुणे व मुंबई येथील सभांतून भाषणे करावीत, ह्यासाठी फिरोझशाहनीच खटपट केली होती. आणि तीही अशा काळी की रानडे, गोखले, चंदावरकर असे अतिरथी–महारथी कीर्तिशिखरावर असताना ! मात्र गांधी–स्मट्स कराराच्या वेळी फिरोझशाहनी गांधीजींना कडवा विरोध केला. समान नागरिकत्वाच्या तत्त्वाचा बळी देण्याने भावी काळात अनेक गंभीर समस्या उभ्या राहतील, असे त्यांचे म्हणणे होते.

फिरोझशाहांबद्दल हिंदुस्थानात इतका जबरदस्त आदर आणि अभिमान होता की १९०३ साली त्यांच्याबद्दल मद्रास स्टँडर्डने लिहिले होते– "मेहता एकछत्री कारभार करतात, हे खरे. तरीही आमच्या अनेक लोकप्रिय लोकशाहीवाद्यांपेक्षा त्यांनीच कॉंग्रेसचे नेतृत्व केलेले आम्हाला आवडेल." गांधीजी गोखल्यांना आपले गुरू मानीत. त्यांनीही फिरोझशाहांना लिहिले आहे– "योग्य मार्गाने माझ्या म्हणण्याप्रमाणे वागण्यापेक्षा अयोग्य मार्गाने पण तुमच्याबरोबर जाणे मी पसंत करीन."[५]

१९११ साली लॉर्ड विलिंग्डननी फिरोझशाहना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू नेमले. त्यानंतर थोड्या दिवसांतच फिरोझशाहनी सरकारी आर्थिक धोरणावर टीका केली. महागड्या लष्करी मोहिमांवर पैसे वाया न घालवता ते शिक्षणावर खर्च करावेत, असे त्यांनी प्रतिपादिले. 'अध्यापन विद्यापीठे' (टीचिंग युनिव्हर्सिटीज) काढावीत अशी मागणी करून त्यांनी विद्यापीठ सिनेटच्या कारभारातही काही सुधारणा सुचवल्या.

१९११ साली फिरोझशाहनी एक संपूर्णतः भारतीयांनी चालवलेली बँक स्थापन केली. ती होती द सेंट्रल बँक. सर सोराबजी पोचखानवाला तिचे मॅनेजर होते. ही बँक म्हणजे पोचखानवालांच्या स्वप्नांची परिपूर्ती होती.

फिरोझशाहसारख्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा काही विशिष्ट गटातील लोकांना मत्सर, हेवा वाटणार हे ओघानेच आले. ह्या मुंबईच्या 'अनभिषिक्त बादशाह'ला खुर्चीवरून खाली ओढावे, असे ब्रिटिशांना वाटणे साहजिकच होते. उच देवदार छाटायलाच हवा होता. 'टाईम्स ऑफ इंडिया'चे संपादक लोवात फ्रेझर ह्यांनी मुंबई महानगरपालिकेत फिरोझशाहविरुद्ध एक चांडाळ चौकडी उठविली. फिरोझशहा हे पुरेसे जहाल नव्हते म्हणून कॉंग्रेसमध्ये टिळकदेखील त्याच्याविरुद्ध गेले

लोवात फ्रेझर व त्याचे सोबती ह्यांनी चालवलेल्या प्रसाराला उत्तर देण्यासाठी १९१३ साली फिरोझशाहांनी 'बॉम्बे क्रॉनिकल' सुरू केला. त्यांच्या प्रत्येक अंकावर छापलेले असे—'सर फिरोझशाहनी १९१३ साली स्थापन केला.'

१९०७ च्या कॉंग्रेसच्या सुरत अधिवेशनात टिळकांनी फिरोझशाहना कॉंग्रेसबाहेर काढले. राष्ट्रीय चळवळीतील आघाडीची जागा फिरोझशाहनी गमावली.

गोखल्यांच्या मृत्यूने फिरोझशाहना मोठाच धक्का बसला. पुढील कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविण्याची लॉर्ड सिन्हा ह्यांची विनंती मान्य करण्यापूर्वीच ५ नोव्हेंबर १९१५ रोजी ते निधन पावले.

लॉर्ड विलिंग्डन ह्यांना पाठवलेल्या संस्मरणीय तारेत लॉर्ड हार्डिंग्ज लिहितात—'फिरोझशाह थोर पारशी होते. थोर नागरिक होते. थोर देशभक्त होते. थोर भारतीय होते.'

राष्ट्रीय चळवळीशी घनिष्ठ संबंध असलेले तिसरे पारशी होते सर दिनशॉ वाच्छा.

सर दिनशॉंचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. १८५८ साली ते एल्फिन्स्टन कॉलेजात दाखल झाले. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी पदवी मिळवली. त्यांचे पुढील आयुष्य संस्मरणीय झाले. तीस वर्षे ते सेंट्रल बँकेचे संचालक होते. तितकीच वर्षे सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचेही संचालक होते. १९२० साली ते इंपीरियल बँकेचे गव्हर्नर झाले. मुंबई कायदे मंडळाचे (लेजिस्लेटिव्ह कौन्सिल) १९१५ ते १९१६ पर्यंत ते सरकार–नियुक्त सभासद होते. मध्यवर्ती कायदेमंडळाचेही (इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल) ते १९१६ ते १९२० च्या दरम्यान सभासद होते. इंडियन मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष आणि व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट आणि एल्फिन्स्टन कॉलेज ह्या संस्थांचेही ते विश्वस्त होते.

राजकारणाची दिनशॉंना प्रथम आवड उत्पन्न झाली ती पत्रकार रॉबर्ट नाईट ह्याच्यामुळे. नंतर फिरोझशाह मेहता ह्यांच्या प्रोत्साहनाने ती आवड कायम टिकली. ते

फिरोझशाहांचे शेवटपर्यंत मित्र होते. १८८५ ते १९१५ पर्यंत ते 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनचे चिटणीस होते. १९१५ ते १९१८ ह्या वर्षी ते त्या संस्थेचे अध्यक्ष होते. १८९४ ते १९१२ ही अठरा वर्षे त्यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे चिटणीस म्हणून काम केले. १९०१ सालच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते.

दिनशॉंनी दादाभाईंच्या 'ड्रेन' सिद्धान्ताचा अभ्यास केला. त्यात ते चांगलेच पारंगत झाले. १८९७ साली 'वेल्बी कमिशन' पुढे त्यांनी स्वत:, दादाभाई, एस. बॅनर्जी, एस. अय्यर आणि गोखले ह्यांनी साक्षी दिल्या होत्या. दिनशॉ सरकारचे निर्भीड टीकाकार होते. विशेषत:, सोन्याचा साठा आणि सोन्याचे प्रमाण ह्या विषयांवर ते प्रखर टीका करीत.

फिरोझशाह मेहता आणि दादाभाई नौरोजी ह्यांच्या मृत्यूनंतर लिबरल पार्टीचा सभासद ह्या नात्याने दिनशॉ भारतीय राजकारणात महत्त्वाची भूमिका करीत होते. १९३६ साली त्यांचे निधन झाले.

राष्ट्रीय चळवळीत स्वत:चे असे खास स्थान निर्माण करणारी पहिली पारशी स्त्री होती भिकायजी कामा (१८६१–१९३६). त्यांचा जन्म मुंबईतला. अलेक्झांड्रा गर्ल्स स्कूलमध्ये त्यांचे शिक्षण झाले. लहान वयातच रुस्तमजी कामा ह्यांच्याशी त्यांचा विवाह झाला. हे रुस्तमजी कामा प्राच्यतज्ज्ञ के. आर. कामा ह्यांचे चिरंजीव. भिकायजींना विवाह करणे पसंत नव्हते. त्यामुळे हा विवाह फारसा सुखाचा झाला नाही. मुंबईत भरलेल्या कॉंग्रेसच्या पहिल्या ऐतिहासिक अधिवेशनाला भिकायजी उपस्थित होत्या. त्या क्षणापासून त्यांचे सारे आयुष्यच बदलून गेले. त्या कट्टर देशभक्त बनून गेल्या.

१९०१ साली, वयाच्या चाळीसाव्या वर्षी, त्या गंभीर आजारी पडल्या. म्हणून औषधोपचारासाठी त्यांना इंग्लंडला पाठविण्यात आले. तिथे बरे वाटल्यावर त्या शामजी कृष्ण वर्मा ह्या क्रांतिकारकाच्या प्रभावाखाली आल्या. ब्रिटिशांविरुद्ध जहाल भाषणे करण्याची एकही संधी त्यांनी तेव्हापासून सोडली नाही. त्यासाठी होऊ घातलेली अटक टाळण्यासाठी त्या मग पॅरिसला गेल्या. तिथे त्या अनेक वर्षे गुप्तपणे राहत होत्या. तिथे लाला हरदयाल, विनायक दामोदर सावरकर, मुकुंद सरदेसाई आणि वीरेंद्र चट्टोपाध्याय ह्यांसारख्या राष्ट्रवाद्यांचा त्यांना आधार मिळाला. वीरेंद्र चट्टोपाध्याय हे कवयित्री सरोजिनी नायडूंचे बंधू. भिकायजीबाईंचे घर सर्व भारतीयांना सर्व काळ उघडे असे. अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्या मदत करीत.

१९०५ साली त्यांनी वन्देमातरम् हे क्रांतिकारी वृत्तपत्र सुरू केले. ते जीनीव्हाला प्रसिद्ध होई. तिथून गुपचूपपणे पॉंडिचेरीमार्गे भारताच्या सर्व भागांत प्रसारित केले जाई. पॉंडिचेरी त्याकाळी फ्रेंचांच्या ताब्यात होते. त्या वृत्तपत्राबरोबरच भारतात

बॉम्ब, स्वयंचलित पिस्तुले, आणि जहाल लिखाणही गुपचूपपणे पाठवले जाई. ह्या ' वन्देमातरम् 'ची बंगाल आवृत्तीही निघू लागली. अरविंद घोष म्हणजेच श्रीअरविंदो ही आवृत्ती काढून तिचा गुप्तपणे प्रसार करीत.

१९०७ साली भिकायजींनी अमेरिका, जर्मनी आणि स्कॉटलंड ह्या देशांचा दौरा केला. प्रत्येक ठिकाणी भारतीय स्वातंत्र्यावर त्या भाषणे देत. ती उत्साही श्रोते लक्षपूर्वक ऐकत भिकायजींना फ्रेंच, जर्मन आणि इंग्रजी भाषा उत्तम येत. १८ ऑगस्ट १९०७ रोजी त्यांनी १,००० जर्मनांसमोर त्यांच्या मातृभाषेतून व्याख्यान दिले. त्या भावपूर्ण भाषणानंतर त्यांनी सभेच्या ठिकाणी एक ध्वज उभारला. ह्याच ध्वजात थोडाफार फेरफार करून तो पुढे भारताचा राष्ट्रध्वज बनला. कवी निर्मल ह्यांनी १८६८ साली एक ध्वज परदेशी नेला होता. खुद्द भिकायजींनीही वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या प्रकारचे ध्वज फडकावले होते. मात्र आजच्या राष्ट्रध्वजाचा पूर्वज ठरला तो भिकायजींनी १८ ऑगस्ट १९०७ रोजी फडकवलेला ध्वज.

१९०९ च्या सुमारास विनायक दामोदर सावरकर आणि शामजी कृष्ण वर्मा ह्यांनी लंडन येथे अभिनवभारत संस्था स्थापन केली. ह्या संस्थेत क्रांतिकारी विचारांचे भारतीय एकत्र येत. इथेच भिकायजींची लाला लजपत राय आणि बिपिनचंद्र पाल ह्यांच्याशी ओळख झाली. त्यांची व्याख्याने आता अधिकच जहाल बनली. त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांची देशातून हकालपट्टी करण्याची मागणी फ्रेंच सरकारकडे केली. पण फ्रेंचांनी त्या मागणीला नकार दिला. तेव्हा ब्रिटिशांची भिकायजींची हिंदुस्तानातील संपत्ती जप्त करून टोला हाणला. त्यावर भिकायजींनी प्रतिटोला मारला तो जीनिव्हात ' तलवार ' हे नवीन वृत्तपत्र सुरू करून. हेही पत्र पाँडिचेरीच्या मार्गे भारतात पाठवण्यात येई.

१९११ ते १३ च्या दरम्यान भिकायजींनी अनेक पारशी तरुणींना प्रभावित केले होते. पण त्यांचा भिकायजींशी चालणारा पत्रव्यवहार ब्रिटिश सरकार अडवीत असे, असे कुल्के म्हणतो. ह्या पारशी युवतींवर सरकारची पाळतही असे.

पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर भिकायजींना अटक करण्याची मागणी ब्रिटनने पुन्हा फ्रान्सकडे केली. ब्रिटन फ्रान्सचे मित्रराष्ट्र होते. त्यामुळे फ्रान्सला ब्रिटनची मागणी अमान्य करणे शक्य नव्हते. भिकायजींना १९१५ ते १८ ही तीन वर्षे स्थानबद्ध करण्यात आले होते. त्या काळात त्यांची तब्येत खूपच ढासळली. परंतु त्यांची जिद्द कायम होती.

भिकायजींना इंग्रजी शिक्षण मिळाले होते. पस्तीस वर्षे त्यांचे वास्तव्य युरोपमध्येच होते. तरीसुद्धा भिकायजींनी देवनागरी लिपीचा प्रसार केला. हिंदी ही भारताची सर्वमान्य भाषा राहील, असेच त्या प्रतिपादीत.

प्रकृती फारच बिघडली तेव्हा भिकायजींना आपल्या देशातच देह ठेवावा, अशी इच्छा होऊ लागली. त्यांनी ब्रिटिश सरकारकडे 'आपल्याला मायदेशी पाठविण्यात यावे ' अशी मागणी केली. ब्रिटिश सरकारने ही मागणी मान्य करण्याची तयारी दाखवली; पण एका अटीवर–भारतात परतल्यावर भिकायजींनी राजकारणात भाग घ्यायचा नाही. भिकायजींनी ही अट मान्य केली. १९३६ च्या जानेवारीत त्या मुंबईला परतल्या. ८ महिन्यांच्या आजारानंतर, ६ ऑगस्ट १९३६ रोजी त्या निधन पावल्या. त्यावेळी त्या एकाकी पडल्या होत्या, विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या होत्या.

रुस्तमजी जीवनजी घोरखोडू (१८६४–१९२४) ह्यांनी स्वातंत्र्य चळवळीत केलेली साधीसुधी पण महत्त्वाची भूमिकाही विसरता येणे शक्य नाही.

रुस्तमजी एका गरीब पारशी कुटुंबात जन्माला आले. थडगी खणून जे काही तुटपुंजे उत्पन्न मिळे त्यावर त्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चाले. म्हणूनच त्यांना घोरखोडू (थडगी खोदणारे) हे नाव पडले होते वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी दर्बानला जायचे ठरवले. त्यांच्या खिशात त्यावेळी एकही दिडकी नव्हती. त्यांनी एका जहाजावर नोकरी धरली.

दर्बानला उतरल्यावर त्यांनी तिथल्या एका मुसलमानाकडे हमालीचे काम पत्करले. हा मुसलमान बाटली बंद पेये (अेअरेटेड वॉटर्स) विकत असे. खडतर कष्ट आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व ह्या दुहेरी गुणांमुळे रुस्तमजी लवकरच त्या कंपनीचे भागीदार झाले. त्या वेळेपासून ते ' पारसी रुस्तमजी ' ह्या नावानेच ओळखले जाऊ लागले.

१८९४ साली महात्मा गांधींनी सत्याग्रह चळवळ सुरू केली. तीत रुस्तमजींनी भाग घेतला होता. ते महात्माजींचे एकनिष्ठ शिष्य बनले. त्यांच्या राजकीय कार्यामुळे त्यांना अनेकदा कारावास भोगावा लागला. त्या काळात त्यांचा खूप छळ झाला. त्यांना फार हाल सोसावे लागले.

रुस्तमजींची सर्वात महान कामगिरी होती गांधीजींचे प्राण वाचविण्याची. दर्बानला गांधीजींनी दुसऱ्यांदा भेट दिली तेव्हा क्षुब्ध जमाव त्यांना मारायला, ठेचायला टपला होता. अशा वेळी रुस्तमजींनी त्यांना आसरा दिला. स्वतःचा जीव व संपत्ती ह्यांना धोका आहे हे माहीत असूनही त्यांनी गांधीजींना सुरक्षित स्थळी पोहोचवण्याची कामगिरी केली.

' नेटिव्ह ओपिनियन ' ह्या गांधीजींच्या क्रांतिकारी वृत्तपत्राच्या संपादनालाही ते हातभार लावीत. १९२१ मध्ये त्यांनी ' एम. के. गांधी फ्री लायब्ररी फॉर आफ्रिकन्स अँड इंडियन्स 'ची स्थापना केली. त्यानंतर त्यांनी एक सभागृह व अनाथालय बांधून त्यांना आपले स्वतःचे नाव दिले. तमिळ कामगारांच्या मुलांसाठी त्यांनी ' एम. के. गांधी तमिल स्कूल ' सुरू केले. १९२४ मध्ये, वयाच्या ६४ व्या वर्षी, केलेल्या श्रमाने आणि तुरुंगातील छळामुळे गलितगात्र होऊन ते निधन पावले.

खुर्शेद फ्रामजी नरिमान (१८८३–१९४८, ह्यांनाही स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सन्माननीय स्थान आहे.

त्यांचा जन्म ठाण्याच्या एका गरीब कुटुंबात झाला. बालपणातच त्यांचे वडील वारले. पुण्यातील डेक्कन कॉलेजातून ते कायद्याचे पदवीधर झाले. मुंबईत त्यांनी व्यवसायाला सुरुवात केली. मुंबई महापालिकेचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाल्यावर त्यांनी महापालिकेत फार महत्त्वाची कामगिरी केली.

बॉम्बे ट्रामवे कंपनीने सार्वजनिक पैशाचा केलेला गैरव्यवहार त्यांनी उघडकीला आणल्यामुळे वार्षिक पंधरा लाख रुपयांची बचत होऊ शकली. बॅकबे डेव्हलपमेंट स्कीमखाली लोकांच्या पैशाचा केवढा मोठा अपहार होणार आहे. हे त्यांनी उघड केले. त्यामुळे नवीन बोर्डाची नेमणूक करणे भाग पडले. 'बॉम्बे रेंट ॲक्ट' करवून त्यांनी पिळल्या जाणाऱ्या भाडेकरूंना दिलासा मिळवून दिला कामगार कायद्यांत सुधारणा घडवून आणून बेकारीच्या काळात त्यांच्या (कामगारांच्या) हक्कांचे संरक्षण करण्यात नरिमानांनीच पुढाकार घेतला होता.

१९२८ साली त्यांना 'बॉम्बे यूथ कॉन्फरन्स'चे अध्यक्ष निवडण्यात आले. त्यानंतर दोनच वर्षांनी–१९३० साली, ते मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाले त्यांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला होता. स्वदेशी चळवळीचे ते पाठिराखे होते. राजकीय कारणासाठी त्यांना तीनदा तुरुंगवास भोगावा लागला. एकूण तीन वर्षांचा काळ त्यांनी तुरुंगात काढला. तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांनी 'व्हिदर कॉंग्रेस ?' (कॉंग्रेस कुठे चालली आहे ?) आणि 'व्हॉट नेक्स्ट ?' (पुढे काय ?) अशी दोन परखड पुस्तके लिहिली.

१९३४ साली ऑल इंडिया पार्लमेंटरी बोर्डाने (अखिल भारतीय सांसदीय समिती) मध्यवर्ती कायदेमंडळाची निवडणूक लढवण्यासाठी त्यांची निवड केली होती. त्याच्या पुढल्याच वर्षी ते मुंबईचे महापौर झाले. मुंबईचे सर्वात लोकप्रिय महापौर बहुधा तेच असावेत. १९३६ साली मुंबई प्रांतिक कायदेमंडळावर निवडण्यात आलेल्या सभासदांत त्यांनाच सर्वांत जास्त मते पडली होती. सरोजिनी नायडू गौरवाने त्यांना 'वीर नरिमान' म्हणत. त्याच नावाने ते कॉंग्रेसगोटात ओळखले जात

मुंबई प्रांतिक कॉंग्रेस पक्ष जेव्हा १९३७ साली सत्तेवर आला तेव्हा आपण मुख्यमंत्री होऊ अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु त्यांची निराशा झाली बी. जी. (बाळासाहेब) खेरांची त्या पदासाठी निवड करण्यात आली. तेव्हा नरिमाननी आपला विरोध दर्शविला. जे. एन. साहनी त्या विषयावर लिहितात–

'चौकशी करण्याचा आदेश देण्यात आला. त्या चौकशीत 'स्वतःसाठी प्रसार करण्याचा' गुन्हा नरिमाननी केला असल्याचे शाबीत झाले. पक्षशिस्तीच्या ते विरोधी

होते. नरिमाननी काही गुन्हा केलाच असेल तर तो सर्वसामान्यपणे केला जाणारा गुन्हा होता. त्यांची कामगिरी मात्र असामान्य होती. त्यानंतर लवकरच नरिमान वारले...[१]

मात्र मृत्यूपूर्वी चार वर्षे ते काँग्रेस पक्षाचे खजिनदार नेमले गेले होते (१९४४–४८).

बरजोरजी फ्रामजी भरुचा (१८८०–१९६३) हे के. एफ. नरिमान ह्यांचे स्नेही होते. त्यांचा जन्म श्रीमंत आई-बापांच्या पोटी झाला होता. त्यांचे वडील जामनगरचे दिवाण होते. नंतर ते काठियावाड संस्थानचे मुख्य न्यायाधीश झाले. शाळकरी वयापासूनच बरजोरजी पक्के देशभक्त होते. त्यांनी अकौंटंटचा अभ्यास पुरा केला. त्या क्षेत्रात त्यांना भरपूर पगाराची नोकरीही मिळाली होती. तरीही ते गुजरातच्या खेड्यापाड्यांतून खादीचे ताग खांद्यावर घेऊन फिरू लागले. ही खादी ते गरीब शेतकऱ्यांना स्वतःच्या पैशाने वाटत असत.

१९२१ साली त्यांनी नोकरी सोडून दिली आणि स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. १९२१ साली नागपूरला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाला ते उपस्थित होते. आणि जवाहरलाल नेहरूबरोबर त्यांचीही काँग्रेसचे चिटणीस म्हणून निवड झाली होती.

आपल्या जमातीची राजकीय जाणीव आणखी सजग व्हावी, ह्या हेतूने त्यांनी 'पारसी राजकीय सभे'ची स्थापना केली. ते 'हिंदी–मित्र' नावाचे एक गुजराती–इंग्रजी वृत्तपत्रही चालवीत. पारशांना चालू घडामोडींचे ज्ञान मिळावे, हा त्यामागचा हेतू होता. पारशी पंचायत रीफॉर्म पार्टी (सुधारणा पक्ष) तून त्यांनी महत्त्वाची कामे केली. मुंबई, पुणे व कलकत्ता येथे गरीब पारशी मुलींसाठी कल्याणकेंद्रे सुरू केली.

जून १९६३ मध्ये ते निधन पावले; तेव्हा दुखवटा व्यक्त करण्यासाठी मुंबईच्या शेरीफनी नागरिकांची एक सभा बोलावली त्याचवेळी १५ हजार पारशांनी पारशी पंचायतीच्या विश्वस्तांकडे एक निवेदन पाठवून समस्त अंजुमानची बैठक घेण्याची विनंती केली होती. परंतु ती फेटाळून लावण्यात आली. तेव्हा पारशी लोकांनी स्वतःच एक सभा सर कावसजी जहांगीर हॉलमध्ये बोलावली. ह्या सभेला सर रुस्तम मसानी अध्यक्ष होते. हजारो पारशी त्या सभेला उपस्थित होते. अनेक प्रख्यात पारशांनी त्या सभेत बारजोरजींच्या पुण्यस्मृतीला आदरांजली वाहिली.

दादाभाई नौरोजी, फिरोझशहा मेहता ह्यांच्या थोर परंपरेतील शेवटले पारशी होते कराचीचे जमशेट नसरवानजी (मेहता)–१८८६–१९५९.

जमशेट एका श्रीमंत व्यापाऱ्याचे चिरंजीव. ते कराचीला जन्मले. त्यांची आई गुलबाई कॅन्सरच्या आजाराने अत्यंत हाल होऊन मेली होती. तिची आठवण जमशेटनी आयुष्यभर मनात जतन करून ठेवली होती. लहानपणापासून ते गंभीर प्रवृत्तीचे होते.



भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन, डिसेंबर १८८५



सर फिरोजशहा मेहता
(१८४५–१९१५)



सर दिनशा वाच्छा
(१८४४–१९३६)

गांधीजींच्या नागरी कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळी २९ मे १९३० रोजी निघालेली
पारशी महिलांची मिरवणूक





अर्देशीर कर्सेटजी वाडिया
(१८०८-१८७७)



सर जमशेटजी जीजीभॉय
(१७८५-१८५९)



डावीकडे :

सर दिनशा पेटिट (१८२३–१९०१)

तळाला :

सर कासवजी जहांगीर (१८५३–१९३६)

मादाम भिकायजी कामा (१८६१–१९३६)

(सौजन्य : अखिल भारतीय महिला परिषद)





चौदा वर्षांचे असताना एकदा ते एका शेतातून चालले होते. तेव्हा एक गाय आणि वासरू घेऊन एक शेतकरी खाटिकखान्याकडे चाललेला त्यांना दिसला. 'त्या गाईच्या डोळ्यांतून रक्ताचे अश्रू वाहत होते,' असे त्या प्रसंगाबद्दल जमशेट पुढे सांगत. त्या वेळी जमशेटनी शपथ वाहिली–कोणत्याही जिवंत प्राण्याला मी कधीही इजा करणार नाही.

१९०५ साली त्यांनी वडिलांच्या पेढीवर काम करायला सुरुवात केली ते स्वत: स्वदेशी चळवळीचे खंदे पुरस्कर्ते होते. १९१८ मध्ये त्यांची कराची महानगरपालिकेचे सदस्य म्हणून निवड झाली. तेव्हापासून तेरा वर्षे ते सतत कराची महानगरपालिकेचे अध्यक्ष होते. १९३३ साली त्यांची कराचीचे महापौर म्हणून नेमणूक झाली. परंतु आठच महिन्यांनी त्यांनी त्या पदाचा राजीनामा दिला. त्या वैभवशाली, थाटामाटाच्या वातावरणात त्यांना गुदमरल्यासारखे वाटू लागले.

१९३६ साली सिंध मुंबई इलाख्यातून बाजूला काढण्यात येऊन त्याचा स्वतंत्र प्रांत बनवण्यात आला. तेव्हा जमशेटनी सिंध लेजिस्लेटिव्ह असेंब्लीकरिता उभे राहावे, ह्यासाठी त्यांचे मन वळवण्यात आले. तेव्हा त्यांनी आपल्या पुढील चार अटी मागितल्या– (अ) मते मिळवण्यासाठी प्रचार मोहीम काढायची नाही; (ब) खर्चाचा अत्यंत प्रामाणिकपणे हिशेब ठेवायचा, (क) सरकारी नियमात दिलेल्या आकड्यांपेक्षा हा खर्च जास्त असू नये; (ड) निवडणुकीसाठी फक्त चवदाच दिवस खर्च करायचे. ह्या त्यांच्या अटी मान्य करण्यात आल्या. तेव्हा जमशेटनी 'दादु' हा छोटासा जिल्हा स्वतःचा मतदारसंघ निवडला. ठरलेल्या कालमर्यादेत ते त्या जिल्हाभर फिरले. त्या वेळची निवडणूक–मोहीम अगदी अपूर्व ठरली. ती प्रत्यक्ष पाहणाऱ्या एकाने लिहिले आहे–

> 'हजारोंवर लोक दूरदूरवरून ह्या साधू माणसाचे दर्शन घ्यायला येत... ही निवडणूक–मोहीम नव्हतीच मुळी प्रत्येक सभा एक धार्मिक मेळावा बनून जाई निवडणूक, मते ह्यांचा त्या सभेत कधी उल्लेखही होत नसे.'[७]

निकाल जाहीर झाले तेव्हा जमशेटना त्यांच्या चारही हिंदू विरोधकांपेक्षा जास्त मते पडल्याचे स्पष्ट झाले मात्र त्यांनी मतदारांना मतदानासाठी आणण्यासाठी कसलेही वाहन वापरले नव्हते. उलट, त्यांचे मतदार मैल–मैल चालत जवळच्या मतदानकेंद्रावर जाऊन मत देऊन आले होते.

निवडून गेल्यानंतर फक्त तीनच वर्षांनी (१९४० साली) जमशेटनी वैतागाने असेंब्लीचा राजीनामा दिला. पक्ष–पद्धतीचा कुचकामीपणा त्यांच्या कुशाग्र बुद्धीला जाणवला होता. ते म्हणतात– 'भावी संसदीय घटनेत पक्ष–पद्धतीला वाव असू नये. आजच्या काळातील जागतिक समस्या बिकट आणि गुंतागुंतीच्या आहेत... पक्षाने

विचार करावा म्हणून त्यांची काही गटवार विभागणी करता येणार नाही. ह्या प्रश्नांच्या निर्णयावर व सोडवणुकीवरच मानवाचे कल्याण आणि सुख अवलंबून आहे. गट वा पक्षांनी परस्परांच्या स्पर्धेत मानवाच्या कल्याणाचा बळी देऊन चालणार नाही.'८

१९४६ नंतर जमशेटनी आपले सारे आयुष्य समाजसेवेसाठी वाहून घेतले. त्यांचे वडील वारल्यानंतर त्यांनी आपले जमशेट एन. मेहता हे नाव बदलून जमशेट नसरवानजी असे नाव धारण केले.

जमशेट कराचीचे अनभिषिक्त बादशाह होते. कराची नगर पाणीपुरवठा ही अत्यावश्यक योजना त्यांनी सुरू केली त्या शहरात त्यांनी भुयारी गटारे सुरू केली. शहरात सुंदर बागा बनवल्या. गरिबांसाठी कमी खर्चाची घरे बांधली, प्रसूतीगृहे बांधली. उत्तम दगडी रस्ते बनवले. ज्या जिल्ह्यात प्राथमिक शिक्षणाची सोय नव्हती, तिथे ती सोय सुरू केली. सभागृहे, ग्रंथालये, गरिबांसाठी विश्रामधामे सुरू केली. भंग्यांच्या वसाहती हा जमशेटच्या खास जिव्हाळ्याचा विषय. त्यांच्या परिचितांना ते 'आपले जमशेट' (आपरो जमशेट) होते. मृत्युशय्येवर त्यांनी आपल्या डॉक्टरांना सांगितले होते-- "डॉक्टर, मी तर आता चाललो. पण तुम्ही गरिबांची सेवा करीत जा."

असाच स्वतंत्र आणि साहसी विचारांचा पारशी होता फिरोझ गांधी (१९१२ ते १९६०). भडोचच्या गांधी ह्या मध्यमवर्गीय कुटुंबातील ते पाचवे अपत्य त्यांचे वडील 'पेनिन्सुलर अँड ओरिएंटल शिपिंग लाईन' (पी. अँड ओ.) मध्ये मरीन इंजिनीयर होते. त्यांची आई रतीमाई सुरतेची. फिरोझचे वडील जहांगीर गांधी १९२१ साली वारले, तेव्हा रतीमाई मुलांना घेऊन अलाहाबादला राहायला गेली.

तिथल्या 'विद्या मंदिर' हायस्कूलमध्ये फिरोझचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाले. ही शाळा पंडित के. डी. मालवीय ह्यांनी स्थापन केली होती. फिरोझ सुतारकामात तरबेज होते. स्वतःचे फर्निचर स्वतःच बनवायला त्यांना फार आवडे. मात्र अभ्यासात त्यांची फारशी गती नव्हती. गणिताच्या तासाला दांडया मारून ते काँग्रेसच्या सभांना हजेरी लावीत.

१९३० च्या आसपास त्यांची नेहरू कुटुंबाशी ओळख झाली. कमला नेहरूंवर तर त्यांचीच भक्ती जडली. त्यांनीच फिरोझला काँग्रेसचा सभासद बनवले. फिरोझ कमलाजींना मातृवत् मानू लागले. कमलाजी खेड्यापाड्यात गेल्या की फिरोझही त्यांच्याबरोबर जात. त्यांचा जेवणाचा छोटा डबा आणि प्यायच्या पाण्याची बाटली ते स्वतःजवळ बाळगीत. कमलाजी आजारी झाल्या की त्यांच्याजवळ बसून राहत. त्यांची छोटी-मोठी कामे करीत.

फिरोझच्या अशा वागण्यामुळे रतीमाई अस्वस्थ झाल्या. त्यानी गांधीजींना विनंती

केली--माझ्या मुलाला परत अभ्यासाला लावा! गांधीजी हसले; म्हणाले, "बहेनजी, तुमच्या मुलाला कधी काही इजा झाली तर मला येऊन सांगा. फिरोझसारखे सात तरुण कार्यकर्ते मला मिळाले तर सात दिवसांत मी स्वराज्य मिळवू शकेन. भावी भारतात तुमचा मुलगा बी. ए. आहे की एम्. ए. असे कोणी तुम्हाला विचारणार नाही. उलट, विचारतील की राष्ट्रीय कार्यासाठी तुमच्या मुलाने किती वेळा तुरुंगवास भोगला आहे."

ह्या क्षणापासून राष्ट्रपिता आणि फिरोझ गांधी ह्यांच्यातील दृढ मैत्रीला सुरुवात झाली. ही मैत्री आयुष्यभर टिकली.

१९३० साली फिरोझनी सत्याग्रहात भाग घेतला आणि त्यांना एक वर्षाची तुरुंगवासाची सजा झाली. १९३२ सालीही त्यांना अटक करून फैझाबादच्या तुरुंगात पाठवण्यात आले होते.

१९३५ साली फिरोझची मावशी डॉ. शिरीन कॉमिसारिएट ह्यांनी फिरोझला शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवण्याची तयारी दाखवली. फिरोझनी मोठ्या आनंदाने त्याला मान्यता दिली. ते लंडन मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला बसले आणि त्यांना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेत प्रवेश मिळाला. तिथे त्यांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि वृत्तपत्र–व्यवसाय ह्यांचे शिक्षण घेतले.

फेब्रुवारी १९३६ मध्ये कमला नेहरूंचे निधन झाले. फिरोझना आपण पोरके झाल्याचे दुःख झाले. त्यांची दुसरी आईच जणू निधन पावली होती. इंदिरेशी विवाह अजून दूर होता. इंदिराजी १७ वर्षांच्या असतानाच फिरोझनी त्यांना मागणी घातली होती. त्या काळात त्या शांतिनिकेतन येथे शिकत होत्या. त्यांनी तेव्हा त्या मागणीला स्पष्ट नकार दिला होता. त्यांनी म्हटले होते-- "असल्या गोष्टींचा विचार करण्याइतपत मोठी झाली नाही मी अजून. मी माझे सारे आयुष्य स्वातंत्र्याच्या चळवळीला वाहणार आहे."

"ते १९३७ साल होते. आम्ही पॅरीसमध्ये होतो." इंदिराजी लिहितात. "आम्ही आमचा वाङ्‌निश्चय करायचे ठरवले. फिरोझने मला एक अंगठी दिली. ती मी बोटात घातली. माझे वडील १९३८ साली इंग्लंडला आले, तेव्हा मी त्यांना ह्या गोष्टीची कल्पना दिली." तोपर्यंत इंदिराजींनी ऑक्सफर्डच्या 'सॉमरव्हिल' कॉलेजमध्ये नाव नोंदवले होते. त्या व फिरोझ दोघेही इंडिया लीगचे सभासद झाले होते आणि एकमेकांना खूपदा भेटत असत.

१९४१ साली फिरोझ मायदेशी परतले. त्यांना टाईम्स ऑफ इंडियाने नोकरी देऊ केली होती. पण त्यांनी ती नाकारली. स्वतंत्र पत्रकार (फ्री लान्स जर्नालिस्ट) म्हणून ते पैसे कमावू लागले. त्याच सुमारास इंदिराजींनी आपल्या वडिलांना सांगितले, "मला

फिरोझशी लग्न करायचे आहे." हा विवाह २६ मार्च १९४२ रोजी अलाहाबादला झाला. कुटुंबीय, आप्तेष्ट व मित्रमंडळी, मोठ्या संख्येने ह्या विवाहाला उपस्थित होती

८ ऑगस्ट १९४२ हा 'भारत छोडो' ठरावाचा दिवस त्याच्या दुसऱ्याच दिवशी सर्व काँग्रेस पुढाऱ्यांना तुरुंगात डांबण्यात आले. त्यात इंदिरा व फिरोझ ह्या दोघांचाही समावेश होता. थोड्याच दिवसांनी इंदिराजींची सुटका झाली. फिरोझला मात्र १९४३ च्या ऑगस्टपर्यंत सोडण्यात आले नाही. त्यांचा थोरला मुलगा राजीव ह्याचा जन्म १९४४ मध्ये मुंबईत झाला. दुसरा संजय १९४६ मध्ये दिल्लीत जन्मला. आपल्या दोन्ही मुलांनी इंजिनीयर व्हावे, अशी फिरोझची इच्छा होती.

१९५२ साली नवीन राज्यघटनेनुसार घेण्यात आलेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत रायबरेली मतदारसंघातून फिरोझची लोकसभेवर निवड झाली १९५७ साली रायबरेलीने त्यांना पुन्हा निवडून दिले.

दोन महत्त्वाची प्रकरणे उघडकीला आणल्याबद्दल फिरोझ सर्वांच्या आठवणीत राहतील. पहिली घटना होती, भारत इन्शुरन्स कंपनीच्या पैशाचा गैरवापर. त्यात उद्योगपती रामकृष्ण डालमिया दोषी ठरले. दुसऱ्या प्रकरणात केंद्रीय अर्थखात्याने हरिकृष्ण मुंदडा ह्यांना दिलेल्या कर्जाचा मुंदडांनी दुरुपयोग केला, असा आरोप होता. ह्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली. त्यात तत्कालीन अर्थमंत्री टी. टी कृष्णम्माचारी ह्यांना राजीनामा द्यावा लागला.

'अरे ! मारलं कुणाला, लागलं कुणाला !' असे, ह्या प्रकरणाबद्दल फिरोझ गांधी दुःखाने म्हणत असत. त्यांनी वार केला होता एकावर, पण तो लागला दुसऱ्यालाच !

ही सर्व प्रकरणे उजेडात आणण्याच्या दुःखद व कष्टदायक कामगिरीमुळेच फिरोझना १९५८ साली हृदयविकाराचा झटका आला. त्यातून ते बरे झाले आणि १९५९ साली संसदेच्या 'जिंजर गटा'चे एक सभासद बनले. संसदेतील शिथिल सभासदांत चैतन्य आणणे हे ह्या गटाचे उद्दिष्ट होते. त्यावेळी इंदिरा गांधी काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या.

डॉक्टरांनी दिलेल्या खबरदारीच्या सूचना धुडकावून लावून फिरोझ दीर्घकाल सतत कामात गुंतलेले असत. त्यांनी धूम्रपानही थांबवले नव्हते. 'अनेकदा ते डॉक्टरांनी सांगितलेले पथ्यही पाळीत नसत.' असे इंदिराजी लिहितात. त्यांच्या मृत्यूपूर्वी थोडेच दिवस अगोदर 'मी त्रिवेंद्रमची महिला सभा रद्द करवते' असे इंदिराजींनी त्यांना सुचवले होते. पण त्यांनी सांगितले, "मला एक भाषण तयार करायचे आहे. त्यासाठी मला एकान्त हवाच आहे."

"७ डिसेंबर १९६० साली त्यांना अस्वस्थ वाटू लागले तेव्हा मी परतीच्या प्रवासात होते." इंदिराजी लिहितात, "मला दिल्लीच्या विमानतळावर उतरेपर्यंत काही कळले नाही. विमानतळावरून मी सरळ विलिंग्डन हॉस्पिटलमध्ये गेले. रात्रभर तिथेच

राहिले. सकाळी त्यांना जरा बरं वाटलेलं दिसलं आणि मी अंघोळ–न्याहारीसाठी घरी जावे, असा त्यांनीं मला आग्रह केला. पण मी त्यांचं एकलं नाही."

त्यांच्यासाठी काही करण्यासारखे उरलेच नव्हते. अखेर जवळ येत होती. त्याच सकाळी, इंदिराजींचा हात हातात धरून त्यांनी शेवटचा श्वास सोडला. मृत्यूसमयी त्यांचे वय ४८ वर्षांचे होते. त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांच्याच शब्दांत असे सांगता येईल : ' माझ्या मते माणसाचा निर्धार सर्वांत महत्त्वाचा असतो. एखाद्या कार्यावर तुमचा दृढ विश्वास असेल तर ते उद्दिष्ट गाठण्यात तुम्हाला जगातील कोणतीही शक्ती अडवू शकत नाही. सगळा खोटा अभिमान टाकून देऊन, विनम्र भावाने तुम्ही तुमच्या उद्दिष्टाप्रत निघाले पाहिजे."

ज्या पारशी उद्योगपतींनी राजकारणात सक्रिय भाग घेतला त्यांत सर कावसजी जहांगीर, सर फिरोझ सेठना आणि सर होमी मोदी ह्यांचा समावेश होतो. त्यांपैकी सर होमी मोदी ह्यांनी राजकारणावर आपली छाप उमटविली होती.

मोदी अनेक कंपन्यांचे संचालक होते. त्यामुळे त्यांना राजकारणासाठी फार थोडा वेळ मिळे. तरीही १९३० साली लंडनला भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेसाठी भारतीय व्यापारउद्योगाचे प्रतिनिधी म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली होती.

१९४१ साली मोदींना व्हॉईसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौंसिलचे सभासद नेमण्यात आले. त्यांच्याच सूचनेवरून कौंसिलमध्ये तीन नवीन खात्यांची भर घालण्यात आली. ती खाती म्हणजे पुरवठा, नागरी संरक्षण आणि माहिती. मोदी त्यांपैकी पुरवठा खात्याचे मंत्री होते. तीव्र विरोधाला तोंड देत त्यांनी आपल्या खात्याची पुनर्रचना केली आणि अकार्यक्षम ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या जागी कार्यक्षम भारतीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली.

१९४२ च्या ऑगस्टमध्ये पुढाऱ्यांना पकडण्यात आल्यावर हिंसाचार वाढू लागला. तेव्हा गांधीजींनी तुरुंगातच प्राणांतिक उपोषणाला सुरुवात केली. त्याबाबतीत सरकारने दुराग्रही भूमिका घेऊन पुढाऱ्यांना सोडण्याचे नाकारले. आठवड्यानंतर मोदी, अणे आणि सरकार ह्या तिघांनी सरकारच्या धोरणाचा निषेध म्हणून व्हाईसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचा राजीनामा दिला.

अपक्ष नेत्यांच्या एका परिषदेत जातीय प्रश्नांचा विचार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. त्या समितीचे एक सदस्य सर होमी होते. १९४५ च्या जूनमध्ये भरलेल्या सिमला परिषदेत काँग्रेस आणि मुस्लिम लीग ह्यांच्यातील कोंडी फोडण्याचा प्रयत्न करण्यासाठी मोदींनाच पाचारण करण्यात आले होते.

जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल ह्यांनाही मोदींच्या स्वतंत्र विचारसरणी-बद्दल आदर होता. सरदार पटेलांनी १९४२ च्या जुलैमध्ये मोदींची घटनासमितीचे

सभासद म्हणून नेमणूक केली. मोदींना मद्रासचे राज्यपालपदही देण्यात आले होते. पण त्यांनी ते नाकारले. त्यांना अल्पसंख्याकविषयक उपसमितीचे सभासद करण्यात आले. त्या समितीचे अध्यक्ष होते डॉ. आंबेडकर. पारशांना स्वतंत्र प्रतिनिधित्व नको, अशी समंजस भूमिका त्या समितीत सर होमींनी घेतली.

उत्तर प्रदेशाच्या गव्हर्नर (राज्यपाल) सरोजिनी नायडू फेब्रुवारी १९४९ मध्ये वारल्या तेव्हा पुन्हा एकदा सरदार पटेलांनी मोदींना गव्हर्नरपद देऊ केले. मोदींनी ह्याही खेपेला नकार दिला. परंतु जवाहरलाल नेहरू आणि राजाजी ह्या दोघांनीही त्यांचे मन वळवले. तीन वर्षे त्यांनी ते पद सांभाळले आणि ते लोकप्रियही झाले. १९६४ साली स्वतंत्र पक्षाचे खजिनदार म्हणून त्यांची निवड झाली. १९६९ साली, वयाच्या ८६ व्या वर्षी, ते निधन पावले.

१९३० च्या सुमाराच्या काही जहाल पारशांपैकी दोन नावे महत्त्वाची आहेत– एक मिनू मसानी–सर रुस्तम मसानींचे चिरंजीव आणि दुसरे सोराब बाटलीवाला (जन्म १९०४). ह्या दोघांनीही १९३४ साली जयप्रकाश नारायण, अशोक मेहता, इ. एम्. एस्. नंबुद्रीपाद, राममनोहर लोहिया, एस्. एम्. जोशी ह्यांच्याबरोबर अखिल भारतीय काँग्रेस सोशलिस्ट पक्षाची स्थापना केली. बाटलीवाला लवकरच त्यातून बाहेर पडून कम्युनिस्ट पक्षाला जाऊन मिळाले. १९४५ पर्यंत ते त्या पक्षाच्या केंद्रीय समितीत होते.

मिनू मसानी (जन्म १९०५) १९३६ साली काँग्रेस सोशलिस्ट पक्षाचे जनरल सेक्रेटरी (सरचिटणीस) झाले. अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांतून त्यांनी त्या पक्षाचे प्रतिनिधित्व केले. त्यावेळी कृष्ण मेनन हे त्यांचे सहकारी होते. १९५९ साली त्यांनी राजाजींच्या सहकार्याने स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. त्या पक्षाचे ते अनेक वर्षे सरचिटणीस होते. मिनूंनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. सध्या ते आपल्या आठवणी लिहीत आहेत. आपल्या 'गव्हर्मेंट अँड पॉलिटिक्स इन इंडिया' ह्या ग्रंथात डब्ल्यू. एच्. मॉरिस हे मसानींचे वर्णन करतात–' ते भारताचे अत्याधुनिक राजकारणी आहेत.'

भारतीय स्त्रियांनी स्वातंत्र्यचळवळीत केलेल्या कामगिरीबद्दल फारच थोडे लिहिले गेले आहे. ह्या स्त्रियांत अनेक पारशी स्त्रिया होत्या. त्यांनी तन–मनाने ह्या चळवळीला वाहून घेतले होते. कुलके लिहितो त्याच्या अगदी विरुद्ध परिस्थिती होती. १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहाला पाठिंबा देण्यासाठी शेकडो पारशी स्त्रिया मुंबईच्या रस्त्यांतून निदर्शने करीत होत्या. गांधीजींच्या आदेशानुसार सर्व ब्रिटिश मालावर बहिष्कार घालीत होत्या.

त्यांच्यात सर्वात चळवळ्या होत्या पेरिन डी. एस्. कॅप्टन (१८८८–१९५८). दादाभाई नौरोजींच्या त्या नात. त्यांचे वडील डॉ. अर्देशीर दादाभाई नौरोजी हे पूर्वीच्या

कच्छ संस्थानातील बंदर मांडवी ह्या गावात असलेल्या स्टेट सिव्हिल हॉस्पिटलचे प्रमुख होते. पेरीनबाईंचे शालेय शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षणही मुंबईत झाले. १८७५ साली त्यांना पॅरिसला पाठविण्यात आले. तिथे त्यांनी सॉरबॉन संस्थेत फ्रेंच भाषा व वाङ्मय ह्यांचा अभ्यास केला. पेरीनना स्वत:च्या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत जसा रस होता, तशीच इतर देशांच्या स्वातंत्र्यचळवळींबद्दलही सहानुभूती होती. पॅरीसमधील पोलिश लोकांच्या वसाहतीने पोलंडबाबतच्या राजकीय सभांसाठी त्यांना आपले प्रतिनिधित्व दिले होते. १९१० साली ब्रुसेल्समध्ये पहिली इजिप्शियन नॅशनल कॉंग्रेस भरली होती. त्या कॉंग्रेसला भिकायजी कामा, पेरीन आणि त्यांची बहीण ह्या तिघींनी ईजिप्तच्या प्रतिनिधी म्हणून हजर राहावे अशी विनंती करण्यात आली होती. त्यानंतर लवकरच पेरीन मायदेशी परतल्या आणि कॅथिड्रल गर्ल्स स्कूल ह्या आपल्या जुन्या शाळेत फ्रेंच भाषेचे अध्यापन करू लागल्या.

१९१९ साली त्यांची गांधीजींशी पहिली भेट झाली. १९५८ त मृत्यू येईपर्यंत त्या कॉंग्रेसच्या एकनिष्ठ सभासद होत्या.

एप्रिल १९२१ मध्ये पेरीनर्नी ' राष्ट्रीय स्त्री सभे 'ची स्थापना केली. भारतातील सर्व गटांच्या स्त्रियांना एकत्र आणणे, हे ह्या संस्थेचे उद्दिष्ट होते. ह्याच हेतूने ' द वुमेन्स युनिटी क्लब 'ही स्थापण्यात आला. ' सभे 'तर्फे राजकारणावर व्याख्याने ठेवण्यात येत. खादी कापड आणि त्यापासून बनवलेल्या गृहोपयोगी वस्तू ह्यांचे प्रदर्शन भरवण्यात येई. परदेशी कापडांची दुकानं व दारूगुत्ते यांच्यासमोर निदर्शने करण्यात येत. खादीसूत कातणे, खादी वापरणे ही ' सभे 'च्या कार्यक्रमाची अंगे होती. त्यांच्यापैकी ' केसरी स्त्री 'हा गट संन्यासिनींप्रमाणे भगव्या खादीची वस्त्रे नेसत. देशाच्या सेवेसाठी आपणही व्रतस्थ आहोत हे त्या दाखवून देत.

१९२० साली मिठाचा सत्याग्रह झाला, तेव्हा पेरीनना मुंबई प्रांतिक कॉंग्रेस समितीच्या युद्ध समितीचे (वॉर कौन्सिल) अध्यक्ष नेमण्यात आले होते. त्याच्या उपाध्यक्ष होत्या लीलावती मुनशी. ह्या दोन्ही स्त्रियांना पोलिसांनी २ जुलै १९३० रोजी अटक केली.

१९३२ मध्ये पेरीनबाई सुटून आल्या आणि दुसऱ्या असहकाराच्या चळवळीच्या तयारीला लागल्या. ह्याही खेपेला त्यांना पकडण्यात येऊन एक वर्षाची सजा ठोठावण्यात आली.

' राष्ट्रीय स्त्री सभा ' १९३० साली बेकायदेशीर ठरवण्यात आली. ' देशसेविका संघ ' ही तिची स्वयंसेविका शाखाही १९३२ मध्ये बेकायदा ठरवली गेली. त्यामुळे वैतागून जाऊन १९३३ मध्ये ' गांधी सेवा सेना ' काढली. हिचे नेतृत्व पेरीनबाईंच्याकडेच होते. ह्या संघटनेचा छळ झाला नाही. कारण ह्या संघटनेने आपले कार्यक्षेत्र

केवळ खादी व ग्रामोद्योग वस्तूंची विक्री; एवढेच मर्यादित ठेवले होते. अनेक वर्षे पेरीन ह्या संघटनेच्या चिटणीस होत्या.

१९३५ साली पुरुषोत्तमदास टंडन ह्यांनी मुंबईत हिंदी प्रचार सभा आणि हिंदी साहित्य संमेलन सुरू केले.

१९४५ साली गांधीजींनी वर्ध्याला हिंदुस्तानी प्रचार सभा सुरू केली. ह्या सभेने देवनागरी व उर्दू ह्या दोन्ही लिप्यांचा वापर केला. ह्या हिंदुस्तानी प्रचार सभेच्या पेरीन उत्साही प्रसारक बनल्या. स्वातंत्र्यानंतर 'हिंदुस्तानी सभे'साठी काँग्रेसने अनुदान द्यावे, ह्यासाठी पेरीननी खूप खटपट केली. पण ती अयशस्वी ठरली. परंतु १७ फेब्रुवारी १९५८ रोजी त्यांच्या अचानक मृत्यूची बातमी काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनात जाहीर करण्यात आली, तेव्हा त्या सभेला मुरारजी देसाई व जवाहरलाल नेहरू हजर होते. जवाहरलाल नेहरूंनी त्याच अधिवेशनात हिंदुस्थानी प्रचार सभेला पाच लाख रुपयांचे अनुदान काँग्रेसकडून देवविले. १९७६ साली ह्या 'सभे'ची पुनर्रचना करण्यात येऊन डॉ. पी. एम्. जोशी तिचे चिटणीस झाले.

दादाभाई नवरोजी ह्यांची दुसरी नात खुर्शेद नवरोजी ह्यांना गांधीजींनी सरहद गांधी खान अब्दुल गफार खान ह्यांच्याबरोबर मुस्लिम महिलांची एक राष्ट्रीय आघाडी बनवण्याचा आदेश दिला होता. खुर्शेद अनेकदा अत्यंत धोकादायक कामगिरी पार पाडीत. अखेरीस त्यांना पकडण्यात येऊन एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली आणि त्यांची रवानगी बान्नू तुरुंगात करण्यात आली.

मिठू पेटिट ह्या आणखी एक प्रमुख कार्यकर्त्या. अनेक वर्षे त्यांनी सुरत व गुजराथची खेडी ह्यात स्वदेशी चळवळीचा प्रसार केला. स्वातंत्र्यचळवळीत प्रदीर्घ कारावास भोगल्यामुळे ज्यांच्या मेंदूवर परिणाम झाला होता, अशा स्त्रियांसाठी एक संस्था चालवण्याचा आदेश गांधींजींनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिठूंना दिला. मिठूंनीही हे आव्हान स्वीकारले पैसे गोळा केले आणि सुरतजवळ मरोली खेड्यात मेंटल हॉस्पिटल सुरू केले. त्याला गांधीजींच्या पत्नीचे—कस्तुरबांचे—नाव दिले. हा कस्तुरबा आश्रम छोटया झोपडयांचा बनला आहे. आपल्या मृत्यूपर्यंत, १९७२ पर्यंत, मिठूंचा ह्या आश्रमाशी घनिष्ठ संबंध होता. आश्रमाचे काम आजही चालू आहे.

गोशी आणि नर्गेश कॅप्टन ह्या दादाभाईंच्या आणखी दोन नाती. त्या पडद्याआड राहून काँग्रेसला मदत करीत होत्या. त्याशिवाय तेहमिना जोशी जहाल भाषणे करून श्रोत्यांना स्वदेशी चळवळ व स्वातंत्र्य संग्राम ह्यात सहभागी होण्याचे आवाहन करीत. शिरीन होर्मसजी दस्तुर ह्या 'देश सेविका संघा'च्या एक सदस्य देशभक्तीपर गीते लिहीत आणि ती वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करीत. नाजू दस्तुर ह्याही 'गांधी सेवा संघा'च्या एक सदस्या. खेड्यातून ग्रामोद्योग विभागाचे त्या काम करीत. शिरीन पी.

जीजीभॉय ह्याही एक देशसेविका होत्या. पेरीन कॅप्टननी स्थापन केलेल्या ' राष्ट्रीय स्त्री सभे 'च्या त्या मानद खजिनदार होत्या.

दिनबाई एफ. एस. पाटक (१८७४–१९६३), मरी क्लबवाला जाधव (मृत्यू १९७५), हिल्ला रुस्तमजी फर्दुनजी (मृत्यू १९५६) आणि मेहेरबाई एस. एच. झाबवाला (मृत्यू १९७०) ह्या सर्व स्त्रिया सामाजिक कार्यकर्त्या होत्या, एकनिष्ठ देशभक्तही होत्या. दिनबाई पाटकनी ' इंडस्ट्रीयल होम फॉर पारशी वुमेन 'ची स्थापना केली. त्यालाच पुढे सर रतन टाटा इंडस्ट्रियल इन्स्टिटय़ूट फॉर वुमेन हे नाव देण्यात आले. श्रीमती फर्दुनजी, मार्गरेट कझिन्स. ह्या ' ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स-च्या संस्थापक चिटणीसाबरोबर काम करीत. देशातील ही सर्वात मोठी महिला संस्था आहे. फर्दुनजी व कझिन्स ह्या दोघी महिलांनी स्त्रियांना नागरी व राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी लढा दिला. मेहेरबाई झाबवाला ह्या फिरोझशाहांची भाची. त्यांचा विवाह कामगार पुढारी एस. एच. झाबवाला ह्यांच्याशी झाला होता. जवळ-जवळ तीस वर्षे त्यांनी ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्सचे काम केले. त्या संघटनेच्या १९६४ व १९६६ अशी दोन वर्षे अध्यक्ष होत्या. ' बापनु घर ' ही परित्यक्त विवाहित महिलांसाठी त्यांनी स्थापन केलेली संस्था. मुंबई महानगरपालिकेच्या मेहेरबाई बारा वर्षे सभासद होत्या. बारा वर्षे त्या ' जस्टिस ऑफ पीस 'ही होत्या.

भारतीय स्त्रियांना मतदानाचे हक्क मिळावे म्हणून झगडणाऱ्यांपैकी पहिल्या महिला होत्या हिराबाई ए. टाटा (१८८९–१९४१) ॲनी बेझंट ह्यांनी १९१७ साली स्थापन केलेल्या ' इंडियन वुमेन्स असोसिएशन 'च्या त्या मानद सचिव होत्या. ही राजकीय दृष्टचा जागरूक स्त्रियांची पहिलीच स्वतंत्र संघटना. त्यातूनच पुढे ' ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स 'ची निर्मिती झाली. व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इ. एस. मॉंटेग्यू ह्यांच्याकडे सरोजिनी नायडूंच्या नेतृत्वाखाली महिलांचे एक शिष्टमंडळ गेले होते. ' मतदानाचा हक्क मिळाला आहे, अशा लोकांत महिलांचाही अंतर्भाव करावा ' अशी ह्या शिष्टमंडळाची मागणी होती. ह्या शिष्टमंडळाच्या हिराबाई एक सदस्य होत्या.

मिठन जमशेट लाम (जन्म १८९८) ह्या हिराबाई टाटांच्या कन्या. त्यांना उदार-मतवादी शिक्षण मिळाले होते. लहानपणापासूनच त्या राष्ट्रवादी वृत्तीच्या. लंडनच्या ' इन्स ऑफ कोर्ट ' मधून बॅरिस्टर होणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला. १९२४ साली मुंबईला परतल्यावर त्यांनी मुंबई हायकोर्टात वकिलीला सुरुवात केली. भुलाभाई देसाईबरोबर त्या काम करीत. भुलाभाइ तेव्हा इंडियन लेजिस्लेटिव्ह कौन्सिल मध्ये विरोधी पक्षाचे पुढारी होते. ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्सशी मिठनचा ४० वर्षे घनिष्ठ संबंध होता. १९६० साली त्या ह्या संघटनेच्या अध्यक्ष होत्या. १९५०

साली ज्याला कायद्याचे स्थान मिळाले. ते हिंदू कोड बिल व इतर कायदे ह्यांचा मसुदा तयार करण्यात मिठमचाही हातभार लागला होता. १९६२ साली त्यांना 'पद्म-विभूषण' पदवी देण्यात आली. आजही त्या 'महाराष्ट्र स्टेट वुमेन्स कौन्सिल'च्या सक्रिय सभासद आहेत.

आजच्या राजकीय जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकला तर १९७० च्या सुमारास राजकीय जीवनावर छाप उमटवलेले पारशी कोणी आढळत नाहीत. एकच व्यक्ती नजरेसमोर उभी राहते. ती म्हणजे पिलू मोदी–सर होमी मोदींचे पुत्र. काही वर्षे स्वतंत्र पक्षाचे सदस्य होते. त्यानंतर त्यांनी भारतीय लोकदलाची स्थापना केली. आता हा पक्ष लोकपक्ष, काँग्रेस (संघटना), जनसंघ आणि संयुक्त सोशलिस्ट पक्ष ह्यांच्यात विसर्जित झाला आहे. एवढ्या सगळ्या पक्षांचे एकत्रीकरण होऊनही ह्या विरोधी पक्षाने राजकीय जीवनावर आपली छाप दुर्दैवाने उठवलेली नाही.

तरीही, ४० कोटी लोकांच्या देशाच्या स्वातंत्र्यपूर्वकाळातील चळवळीत मूठभर पारशांनी महत्त्वाचा भाग घेतला होता, हे सत्य आहे.

१. इ. कुल्के– द पारसीज इन इंडिया, दिल्ली, १९७४, पृष्ठ १६०
२. आर. पी. मसानी, दादाभाई नौरोजी, द ग्रँड ओल्डमॅन ऑफ इंडिया, लंडन १९३८, पृष्ठ २५
३. कुल्केने आपल्या वरील पुस्तकात पृष्ठ ९२ वर उद्धृत केले आहे
४. मसानी वरील पुस्तक, पृष्ठे २७८–२७९
५. कुल्केने वरील पुस्तकात पृष्ठ १८० वर उद्धृत केले आहे
६. ज. पी. साहनी– द लिड् ऑफ : फिफ्टी इयर्स ऑफ इंडियन पॉलिटिक्स, १९२१–१९७१ दिल्ली, १९७१, पृष्ठे १२१–२२
७. जमशेटजी नसरवानजी– ए मेमोरियल, कराची १९५४ पान ११५
८. वरील पृष्ठ १९

७. व्यापार–उदीम आणि उद्योगधंदे

पोर्तुगीज राज्यकन्या ' इन्फंटा कॅथेरिना ऑफ ब्रागान्झा ' हिचा विवाह इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स ह्याच्याशी झाला. तेव्हा पोर्तुगीजांनी विवाहाची भेट म्हणून ब्रिटिशांना मुंबई बेट देऊन टाकले (१६६१). विणकर, मुकादम, सुतार ह्यांना मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली तेव्हा मुंबईचे पहिले ब्रिटिश गव्हर्नर जेराल्ड आँग्यीए ह्यांच्या विनंतीवरून सुरतेच्या इंग्रजांनी ह्या कारागिरांचा पुरवठा केला.

गोद्या उभारणे आणि जहाज बांधणी करणे ह्यात पारशांनीच पहिल्यांदा नाव कमावले. १७०० साली ईस्ट इंडिया कंपनीने तापी नदीवर सुरत गोदी बांधली. ह्या गोदीची देखभाल करण्याचे काम मुख्यत्वे पारशांकडेच होते. त्यांत मुख्य होते लवजी नसरवानजी वाडिया (१७०२–१७७४). वाडिया हे जहाज बांधणारे कारागीर होते आणि सुरत गोदीत मुकादम म्हणून काम करीत होते.

सुरतेत कंपनीची पस्तीस वर्षे चाकरी केल्यावर लवजींना मुंबईतील तीन गोद्या बांधण्यासाठी आणण्यात आले. त्यातली पहिली गोदी १७५४ साली, दुसरी १७६२ साली आणि तिसरी १७६५ साली बांधण्यात आली. त्यानंतरची चाळीस वर्षे वाडियांचे पुत्र–पौत्रच ह्या गोदींची देखभाल करीत होते. त्यांचा विस्तार करीत होते.

जमशेटजी बमनजी वाडिया (१७५६–१८२१) ह्यांनी ब्रिटिश रॉयल नेव्हीसाठी (ब्रिटिशांचे शाही आरमार) युद्धनौका आणि फ्रिगेट्स बांधल्या. ईस्ट इंडिया कंपनीसाठी व्यापारी नौकाही त्यांनी बांधल्या. नौरोजी जमशेटजी वाडिया हे त्यांचे चिरंजीव (१७७४–१८६०). त्यांनी बॅटल ऑफ नवरिनो (ग्रीस–१८२७) त भाग घेतलेली ध्वजनौका बांधली होती. त्याशिवाय ' आशिया ' ही २२३९ टनी, ८४ तोफांची युद्धनौकाही बांधली होती. १८८५ पर्यंत, म्हणजे जवळजवळ १५० वर्षे, मास्टर बिल्डरची जागा वाडिया घराण्याकडेच होती.

अर्देसीर कर्सेजटी वाडिया (१८०८–१८७७) इंजिनीयर बनले. त्यांनी बांधलेल्या जहाजांवर प्रथमच वाफेची इंजिने बसवण्यात आली. मुंबईत गॅसचे दिवेही त्यांनीच प्रथम आणले. १८४१ मध्ये त्यांची रॉयल सोसायटीचे फेलो म्हणून निवड झाली. हा मान मिळवणारे ते पहिले भारतीय.

वाडिया घराण्याच्या मुंबईतील ह्या यशामुळे इतर पारशी कुटुंबांना भारताच्या

इतर भागांत जाऊन उपक्रम करायला प्रोत्साहन मिळाले. सुरतेचे एक पारशी–माणेकजी नौरोजी सेथ, १७३० साली मुंबईत आले. त्यांनी आपल्या उद्योगाची एक शाखा म्हैसूर येथे उघडली. लवकरच पारशी व्यापारी कालिकत, मंगलूर, कनानोर, श्रीरंगपट्टणम, कूर्ग, कोचीन, अलेप्पी, तेलीचेरी, अशा दूरदूरच्या ठिकाणी जाऊन राहिले. १७८० साली मद्रासमध्ये पारशी व्यापाऱ्यांचे महत्त्व वाढले होते. त्या शहरात १७९६ साली पहिला टॉवर ऑफ सायलेन्स (दारेक्त) बांधण्यात आली. पारशी उटकमंडला गेले ते व्यापारी, दुकानदार, म्हणून. ते जाण्यापूर्वीच ब्रिटिशांनी उटकमंडला हिलस्टेशन बनवून त्याला महत्त्व मिळवून दिले होते.

पारशांच्या महत्त्वाकांक्षा आता वाढू लागल्या. त्यांनी चीन आणि ब्रह्मदेशाशीही व्यापार सुरू केला. सुरतेचे एक पारशी बानाजी लिमजी (१६५४–१७३४) हे १६९० साली मुंबईत आले आणि श्रीमंत बनले. त्यांचे वंशज फ्रामजी कावसजी बानाजी (१७६७–१८५२) ह्यांनी चीन व ब्रह्मदेशाशी व्यापार सुरू केला. लवकरच त्यांना ४० जहाजे विकत घेण्याची ऐपत आली. बानाजी तज्ज्ञ शेतकरी होते. मुंबईजवळ पवईला त्यांच्या मोठ्या फळबागा होत्या. १८३८ साली त्यांनी आंब्याचे एक पार्सल राणी व्हिक्टोरियाला पाठवले होते. आंब्याची भेट सम्राज्ञीला पाठवणारे पहिले भारतीय ते होते. रेशमाच्या किडयांची निपज करण्याचा प्रयोगही त्यांनी करून पाहिला. हे किडे त्यांनी आफ्रिकेतील मोझांबिक देशातून आणले होते. लिमजी हे गरिबांना मदत करीत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना, दुष्काळी दिवसांत, ते पिकांबाबत सल्ला देत असत

रुस्तमजी कावसजी बानाजी (१७९२–१८५२) हे फ्रामजींचे धाकटे बंधू. १८१२ साली ते कलकत्त्याला गेले. तिथे व्यापार सुरू करता येईल का ह्याची पाहणी त्यांना करायची होती. त्यांचा तिथे चांगलाच जम बसला. १८३८ साली ते कलकत्त्यात स्थायिक झाले. तिथे ते ' बाबू रुस्तमजी '– कलकत्त्याचे व्यापारी राजपुत्र–ह्या नावाने ओळखले जात. १८३७ साली त्यांनी कलकत्ता डॉकिंग कंपनी भागीदारीत विकत घेतली. त्याशिवाय ' सन इन्शुरन्स कंपनी,' ' द कॉटन स्क्रू मॅन्युफॅक्चरिंग कंपनी,' ' द पेपर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी ' ह्या कंपन्या सुरू केल्या. त्यांनी आपल्या मुलांना जहाज व्यवसाय काढून दिला. त्यात ह्यांची खूपच भरभराट झाली. स्त्रियांचे शिक्षण, समाजातील स्त्रियांचे स्थान, ह्या विषयांवरील रुस्तमजींचे दृष्टिकोण पुरोगामी होते. द्वारकानाथ टागोर, म्हणजे रवींद्रनाथांचे आजोबा ह्यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते.

व्यापारासाठी चीनला समुद्रमार्गे जाणारे पहिले पारशी होते हिरजी जीवनजी. ते १७५६ साली चीनला गेले. त्यांच्या पाठोपाठ अनेक पारशी तिकडे गेले. १७५६ ते १८५६ ही शंभर वर्षे पारशांनी कँटन, मकाव, ह्यांच्याशी भरपूर नफ्याने व्यापार केला. १८४२ मध्ये नानकिंगचा तह झाला. वाफेच्या इंजिनावर चालणारी आधुनिक

जहाजे पारशांजवळ नव्हती. ते जुनाट शिडांच्या गलबतांनीच मालाची ने–आण करीत. त्यामुळे व्यापारात पारशी मागे पडू लागले.

तेव्हा पारशांनी कापसाचा व्यापार वाढवायला सुरुवात केली. ते कच्चा कापूस मोठ्या प्रमाणात बाहेर पाठवीत. लँकेशायरमध्ये त्या कापसापासून कापड बनविण्यात येई. तिथून तो पक्का माल हिंदुस्थानात परत येई. ही अशी उलटसुलट आयात–निर्यात करीत बसण्याऐवजी आपण स्वतःचीच एक कापूस गिरणी काढायची वेळ आली असे पारशांनी ठरवले. हिंदुस्तानात मजुरी स्वस्त होती. कच्चा मालही भरपूर होता. आणि मुंबईत ह्या उत्पादनाच्या विक्रीला वावही खूप होता.

ह्या क्षेत्रातील प्रवर्तक होते कावसजी नानाभाई दावर. त्यांनी १८५१ मध्ये एक स्पिनिंग फॅक्टरी (सूत कातायची गिरणी) काढली. तीन वर्षांनंतर 'बॉम्बे स्पिनिंग अँड वीव्हिंग कंपनी' ही वाफेच्या शक्तीवर चालणारी आधुनिक कापड गिरणी सुरू केली. १८५७ साली त्यांनी आणखी एक गिरणी काढली. त्याच सुमारास म्हणजे १८५७ साली, पेटिट कुटुंबाने ओरिएंटल मिलस सुरू केली. १८६० साली 'मानोकजी पेटिट मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' आणि १८६१ साली 'रॉयल मिल्स' सुरू झाली. १८७० पर्यंत पंधरा कापूस गिरण्या सुरू झाल्या होत्या. त्यापैकी नऊ पारशांच्या मालकीच्या होत्या. म्हणूनच कुलके लिहितो, पारशांनी आपल्या तांत्रिक अर्थशास्त्रीय ज्ञानाच्या आधारे, व्यापारातील जाणकारीमुळे आणि पैशाच्या पाठबळामुळे भारतात हा नवीन आणि आजही महत्त्वाचा ठरणारा उद्योग सुरू केला, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही.'

काही पारशी कुटुंबांनी धाडसी उपक्रम केले नसते तर ही घटना प्रत्यक्षात उतरणे शक्य झाले नसते. ही उपक्रमी पारशी कुटुंबे म्हणजे सर जमशेटजी जीजीभॉय (१७८५–१८५९), सर दिनशॉ माणेकजी पेटिट (१८२३–१९०१) आणि सर कावसजी जहांगीर (१८५३–१९३४).

जमशेटजी हे पाच मुलांतील सर्वांत धाकटे अपत्य. त्यांचे वडील जीजीभॉय चान्जीभॉय वाच्छा हे नवसारीचे एक गरीब विणकर. १७८३ साली हे कुटुंब मुंबईत आले आणि फुले (क्रॉफर्ड) मार्केटच्या मागील 'यथा आहु वैर्य' मोहल्ल्यातील एका पडक्या घरात राहू लागले ह्याच अरुंद, गजबजलेल्या गल्लीत जमशेटजींचा जन्म झाला. त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षी हे कुटुंब नवसारीला परतले. वयाच्या १६ व्या वर्षी ते पोरके झाले आणि पायीपायी किंवा बैलगाडीने, जसे जमेल तसे, ते ३२० किलोमीटर्स अंतरावरील मुंबईला आले. तिथे त्यांचे मामा फ्रामजी नसरवानजी बाटलीवाला ह्यांनी जमशेटजींना आश्रय दिला. जमशेटजींनी बाटल्या धुण्याचे काम पत्करून आयुष्याला सुरुवात केली. लवकरच त्या कष्टाळू खटपट्या युवकाने तावक ह्या आपल्या नातेवाईका-

कडे कॅशियर अकौंटंट म्हणून नोकरी धरली. ताबकच्या वतीने त्यांनी चीनला अनेक सफरी केल्या. १८०३ साली त्यांनी आवाबाई ह्या आपल्या फ्रामजी मामाच्या मुलीशी विवाह केला. आबाबाई तेव्हा दहा वर्षांची होती, तर जमशेटजी वीस (अठरा ?) वर्षांचे होते.

जमशेटजींची भरभराट झाली. त्यांनी मद्रास, बंगाल, सिंगापूर, थायलंड, फिलिपीन्स ईजिप्त आणि इग्लंडमध्ये आपल्या पेढ्या उघडल्या. किनाऱ्यावरील व्यापारासाठी त्यांनी सात मालवाहू बोटी आणि सहा छोट्या बोटी विकत घेतल्या.

जमशेटजी आता मुंबईचे प्रमुख नागरिक झाले होते. मुंबई पारशी पंचायतीच्या पहिल्या चार विश्वस्तांपैकी ते एक होते. त्यांनी 'खोलामेह्-इ-पंचायत' ह्या आपल्या गुजराती पुस्तकात पंचायत कशी चालवावी ह्याबद्दल चाणाक्ष मार्गदर्शन केले आहे. 'जमशेटजी जीजीभॉय पारशी बेनेव्होलेण्ट इन्स्टिटयूशन' ही संस्था १८४९ साली सुरू झाली. ती स्थापण्यासाठी त्यांनी ३,००,००० रुपयांची देणगी दिली. आजही ह्या संस्थेतर्फे मुंबई, सुरत, नवसारी, भरुच, बलसाड, उदवाडा आणि बिलिमोरा ह्या गावांतून सर्व जमातींतील गरिबांसाठी शाळा चालवल्या जातात. आशिया आणि युरोप खंडातील जुने वाङ्मय गुजरातीत भाषांतरित करण्यासाठी त्यांनी जमशेटजी जीजीभॉय ट्रान्सलेशन 'फंड'ही स्थापन केला. त्याशिवाय अग्यारी, टॉवर्स ऑफ सायलेन्स आणि पारशांच्या धार्मिक विधींसाठी बंगल्याही बांधल्या.

त्यांनी काही वसतिगृहे बांधली. काहींना देणग्या दिल्या. विहिरी खोदल्या. तलाव वाढवले. गुजरातमधील खेड्यांत पूल बांधले. त्यांनी पांजरपोळ उभारून आजारी व अशक्त गुरांची देखभाल करण्याची सोय केली. ह्या पांजरपोळांचा खर्च निघावा, गुरांना व्यवस्थित खाऊ-पिऊ घालता यावे, ह्यासाठी व्यापाऱ्यांनी स्वखुषीने कर (लाग) द्यावा, म्हणून त्यांनी श्रीमंत व्यापाऱ्यांचे मन वळवले. १८३७ त भयंकर आगीने सुरतेची २०,००० घरे आणि शेकडो दुकाने जाळून भस्मसात केली; मंदिरे, बाजार जळून गेले. तेव्हा जमशेटजींनी एक जहाज भाड्याने घेतले. त्याच्या कोठ्यात तांदळाची आणि डाळीची पोती भरली, कापडाच्या शेकडो गाठी भरल्या. एकेक रुपयांच्या नाण्यांनी भरलेल्या पेट्या ठेवल्या, आणि ते जहाज सुरतेला रवाना केले. तिथे, त्यातील वस्तू प्रत्येक गरजूला, मग तो पारशी असो वा अन्य जमातीचा, समान प्रमाणात वाटल्या जातील अशी व्यवस्था केली. १८४६ त आयर्लंडमध्ये बटाट्यांचा दुष्काळ पडला, तेव्हाही त्यांनी उपाशी आयरिशांना मोठ्या रकमेची देणगी दिली. फ्रान्समध्ये पूर आला, तेव्हाही जमशेटजींनी मदत दिली. १८४१ त्यांना 'सर' हा किताब देण्यात आला.

'पुणे बंड अँड वॉटर वर्क्स' ह्या भारतातील अशा पहिल्याच प्रकल्पाला त्यांनी आर्थिक मदत पुरवली. ही त्यांनी देशाची मोठीच सेवा केली. हा प्रकल्प १८४५ मध्ये पूर्ण झाला. त्याची पूर्ण कार्यक्षमता १८५० पासून वापरात येऊ लागली.

१८५५ मध्ये जमशेटजींना 'फ्रीडम ऑफ द सिटी ऑफ लंडन' हा बहुमान देण्यात आला. दोनच वर्षानंतर त्यांना बॅरोनेट बनवण्यात आले. हा मान भारतीयाला पहिल्यानेच मिळत होता. हे पद त्यांच्या घराण्याकडे वंशपरंपरा चालणार होते.

१५ एप्रिल १८५९ रोजी जमशेटजी निधन पावले. तेव्हा माहीम आणि कुर्ला येथील साध्यासुध्या गरीब कोळ्यांनी त्यांच्या स्मृतीला वाहिलेली श्रद्धांजली अत्यंत हृदयस्पर्शी होती. हातात झेंडूच्या चुरगाळलेल्या माळा घेऊन ते पायी चालत जमशेटजींच्या प्रेतयात्रेत सामील व्हायला आले होते. ते त्यांचे प्रेम पाहून लेडी आवाबाई भारावून गेल्या. त्यांनी त्या सर्वांना आपल्या घरी बोलावले. त्यातील प्रत्येक स्त्रीला त्यांनी पोटाशी धरले. थोड्याच वेळात आवाबाईंच्या मांडीवर सोनेरी, पिवळ्याधमक झेंडूचा ढीग झाला, आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहू लागला.

असेच दुसरे प्रसिद्ध उद्योगपती म्हणजे सर दिनशॉ पेटिट. दिनशॉंचे आजोबा नसरवानजी कावसजी १७८५ साली एक दुभाष म्हणून मुंबईत आले. त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीत जहाजावरील मालाची चढउतार करणारे म्हणून नोकरी पत्करली. त्यांच्या कर्तबगारीचा फायदा फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीनेही घेतला. ते नसरवानजींना कौतुकाने 'लपेतित पारशी' (नाजुकसा पारशी) म्हणत. कारण नसरवानजी खरोखरच ठेंगणे–ठुसके होते. हेच 'पेतित' टोपणनाव त्यांनी पुढे आडनाव म्हणून धारण केले, असे त्यांच्या कुटुंबातील एका दप्तरावरून समजते.

१८१९ साली नसरवानजी वारले. मागे त्यांचा एकुलता पुत्र माणेकजी होता. ह्याच माणेकजींचे थोरले पुत्र दिनशॉ हे १८२३ साली जन्मले. दिनशॉंना त्यांच्या वडिलांनी सुरुवातीपासूनच उत्तम शिक्षण दिले. दिनशॉ 'कुलाबा लँड' कंपनीत नोकरीला होते. मुंबईच्या किनारपट्टीला भराव घालण्याचे काम ह्या कंपनीकडे होते. नंतर त्यांनी 'फायर इन्शुरन्स कंपनी' आणि 'कुलाबा प्रेस' येथेही नोकरी केली. १८४९ त त्यांनी चीनशी व्यापार करण्याच्या उद्देशाने चार्ल्स ग्रँट हे २००० टनाचे जहाज विकत घेतले. मात्र १८५० नंतर हे सारेच कुटुंब कापसाचा व्यापार करण्यात गुंतून गेले.

अमेरिकेतील यादवी युद्ध १८६५ साली संपले. त्या युद्धाच्या काळात अमेरिकेशी कापसाचा व्यापार करून मुंबईतील व्यापाऱ्यांनी प्रचंड संपत्ती मिळवली होती. त्यातूनच शेअर्सचे वेड सुरू झाले, आणि आर्थिक संकट उद्भवले. त्या मंदीत पेटिट कुटुंबाने ३० लाख रुपयांवर पैसे गमावले. कामा बंधू, दादाभाई नौरोजी आणि इतर अनेकांची तीच गत होती. तथापि, साऱ्या पारशांनी एकत्र येऊन ज्या गरिबांचे जबर नुकसान झाले होते, त्यांना मदत केली. काही वर्षांच्या आतच मुंबई ह्या आर्थिक संकटातून सावरली होती. १८७० ते १८७५ ह्या पाच वर्षांत दिनशॉ आणि त्यांचे बंधू नसरवानजी ह्यांच्या मालकीच्या ७ कापड गिरण्या चालू होत्या व त्या सर्व भरभराटीत होत्या.

१८७५ साली ' मुंबई गिरणी मालक संघटना ' उभी राहिली. तिच्या संचालक मंडळाचे दिनशॉ सदस्य होते. त्याच वर्षी ' बॉम्बे नेटिव्ह स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन ' स्थापन झाले. त्याला दिनशॉंनी आर्थिक मदत केली होती. त्याशिवाय, त्यावेळी बांधल्या जात असलेल्या ' ब्रोकर्स हॉल 'लाही त्यांनी देणगी दिली. हा हॉल १८९९ साली बांधून पूर्ण झाला. त्याला ' सर दिनशॉ एम. पेटिट ब्रोकर्स हॉल ' असेच नाव देण्यात आले. व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटसाठी मुंबईत मध्यवर्ती जागी इमारत बांधण्यासाठी त्यांनी जागा व इमारत ह्यांची देणगी दिली. ह्या इमारतीचे औपचारिक उद्घाटन १० एप्रिल १८८९ रोजी लॉर्ड रे ह्यांनी केले. दिनशॉंनी अहमदनगरला ' स्कूल ऑफ इंडस्ट्रियल आर्ट ' ही संस्था सुरू केली. ती १८९८ त स्थापन झाली. पुणे जिल्ह्याच्या शिरूर गावातील इंडस्ट्रियल स्कूललाही त्यांनी आर्थिक मदत केली.

आपल्या जमातीतील गरीब आणि इराणमधील झोराष्ट्रियन ह्यांच्यासाठी दिनशॉंनी मोठमोठ्या रकमांचे दान दिले. ५ मे १९०१ रोजी त्यांचे निधन झाले, तेव्हा त्यांचे उथम्ना विधी साऱ्या भारतभर करण्यात आले, तसे ते हाँगकाँग व इराणमध्येही झाले. मुंबईच्या दक्षिणेकडील गदग ह्या छोट्या गावातील गुजर आणि लिंगायत दुकानदारांनीही आपली दुकाने बंद ठेवून दिनशॉंवरचे आपले प्रेम व्यक्त केले.

सर कावसजी जहांगीर ह्यांनीही मुंबईतील व्यापाराच्या वाढीला फार मोठा हातभार लावलेला आहे. ह्या घराण्यातील तीन बंधू १७१७ त नवसारीहून मुंबईला आले. त्यांची नावे होती मंचरजी, हिरजी आणि तेमुलजी जीवनजी. हिरजी जीवनजींनी चीनशी व्यापार केला त्यात भरपूर संपत्ती कमावली. त्यांना स्वतःला मुलगा नव्हता; म्हणून त्यांनी आपल्या एका मुलीचा थोरला मुलगा दत्तक घेतला ह्या जहांगीरने आपली एक बहीण (आतेबहीण) मेहेरबाई हिच्याशी लग्न केले. त्यांचा दुसरा मुलगा कावसजी जहांगीर हे पहिल्या बॅरोनेटचे वडील.

ह्यांच्या ' रेडीमनी ' ह्या चमत्कारिक आडनावाचे स्पष्टीकरण बॅरोनेटनी लिहिलेल्या आपल्या वडिलांच्या आठवणीत सापडते. ' अनेक आर्थिक संकटांचे वेळी त्या कुटुंबाने ईस्ट इंडिया कंपनीला मदत केली. त्या संबंधात एक आख्यायिका आजही सांगण्यात येते ती अशी की मराठ्यांशी झालेल्या एका युद्धात त्यांनी कंपनीच्या खजिन्यात अनेक गाड्या भरून चांदी भरली होती.' [१]

पहिले सर कावसजी जहांगीर (१८१२–१८७८) हे ' डंकन गिब अँड कंपनी ' ह्या ब्रिटिश पेढीवर कारकून म्हणून उमेदवारी करीत होते. १८४६ त, निरनिराळ्या ब्रिटिश कंपन्यांचा अनुभव घेतल्यावर त्यांनी स्वतःचा कापसाचा व्यापार केला. १८६५ साली शेअर बाजार गडगडला तेव्हा त्यांना फारशी झळ पोचली नाही. १८६० साली त्यांची इन्कमटॅक्स कमिशनर म्हणून नियुक्ती झाली. १८७२ साली त्यांना नाईटहूड

देण्यात आले. त्यांचा दानधर्म अफाट होता. त्यांनी अनेक इस्पितळांना देणग्या दिल्या. पुण्याच्या सर कावसजी जहांगीर कॉलेजसारख्या अनेक संस्थांना शिक्षण कार्यासाठी मोठमोठ्या देणग्या दिल्या. ते १८७८ त वारले तेव्हा त्यांनी आपल्या सर्व घरगड्यांना मोठमोठ्या रकमांचा वारसा ठेवला होता.

त्यांचे दत्तक पुत्र व वारस सर कावसजी जहांगीर ह्यांचे शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेजात झाले. १८९५ साली त्यांनी स्वतःच्या कर्तबगारीवर 'सर' हा किताब मिळवला. १९०८ मध्ये ते 'बॅरोनेट' बनले. बॅरोनेटचा सन्मान मिळवणारे ते तिसरे भारतीय. त्यांनीही मोठ्या प्रमाणावर कापसाचा व्यापार केला. दानधर्मासाठी आणि शिक्षणासाठी मोठ्या रकमांचे दान दिले. मुंबईतील सर कावसजी जहांगीर हॉल त्यांनीच बांधला. लंडनच्या इंपीरियल इन्स्टिटयूट मधील 'रेडीमनी दालना'साठी त्यांनी देणगी दिली.

दुसरे बॅरोनेट सर कावसजी जहांगीर (१८७९–१९६२) ह्यांनी कुटुंबाची परंपरा पुढे चालू ठेवली. ते निरनिराळ्या बँका आणि विमा कंपन्या यांचे अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे टाटांच्या विविध कंपन्यांचे संचालकही होते. १९३० साली त्यांची मध्यवर्ती कायदेमंडळाचे सदस्य म्हणून निवड झाली. आणि लंडनला भरलेल्या पहिल्या (१९३०) व दुसऱ्या (१९३१) गोलमेज परिषदांना ते उपस्थित राहिले होते.

दादाभाई नवरोजींप्रमाणेच जमशेटजी टाटांचाही जन्म नवसारीच्या एका पुरोहित कुटुंबात झाला. त्यांचे 'टाटा' हे आडनाव 'टामटा' किंवा 'तिख्वा' ह्या शब्दांवरून आले 'टामटा' किंवा 'तिख्वा' ह्या शब्दांचा अर्थ तिखट, भडक. टाटांच्या स्वभावावरून हे नाव त्यांना मिळाले. पदवी मिळवल्यानंतर धंद्याचा अनुभव घेण्याच्या उद्देशाने जमशेटजींना १८६४ साली इंग्लंडला पाठवण्यात आले. तेव्हा ते २० वर्षांचे होते. लंडनला ते पोचले. तेव्हा त्यांच्या खिशात दिडकीही नव्हती. त्याला कारण १८६५ साली शेअर्स बाजार कोसळला होता. 'त्यांनी आपल्या बँकांना आणि धनकोंना आपली परिस्थिती इतक्या योग्य शब्दांत आणि स्पष्टपणे समजावून दिली की बँका व धनको त्यांच्या प्रामाणिकपणावर बेहद्द खुष झाली त्यांनी खुद्द टाटांनाच स्वतःचे लिक्विडेटर नेमले. त्यासाठी त्यांना महिना २० पौंडांचा मेहनताना देण्यात आला.'[१]

कापडधंद्याचा सखोल अभ्यास केल्यानंतर जमशेटजी १८६८ साली घरी परतले. तेव्हा त्यांच्याबरोबर फिरोझशाह मेहताही होते त्या दोघांची मैत्री आयुष्यभर कायम टिकली. नसरवानजी (जमशेटजींचे वडील) टाटांनी अबिसिनियन युद्धाच्या काळात जनरल सर रॉबर्ट नेपियर ह्यांच्या नेतृत्वाखालील मग्दाला लढाईत, लष्करी कंत्राटात ४० लाख रुपये कमावले होते. ते कार्यनिवृत्त झाले आणि त्यांच्या मुलाने आपला कापडधंदा वाढवायला सुरुवात केली.

जमशेटजींच्या योजना दूरगामी होत्या. कच्चा माल, कोळसा आणि पाणी यांचे सान्निध्य असलेल्या ठिकाणी, जिथे जलविद्युत आणि ऊर्जा निर्माण करता येईल अशा जागेजवळ, तयार मालाला बाजारपेठ जवळ पडेल अशा ठिकाणी, त्यांना कापडाची गिरणी उभारायची होती. अशा जागेचा शोध घेता त्यांच्या मनात नागपूरचे स्थळ भरले. १८७४ साली तिथे त्यांनी 'द सेंट्रल इंडिया स्पिनिंग, वीव्हिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' सुरू केली. राणी व्हिक्टोरिया १८७७ साली सिंहासनावर आली तेव्हा, तिच्या सन्मानार्थ त्यांनी त्या गिरणीचे नाव बदलून 'एम्प्रेस मिल' केले. ही गिरणी वाढत गेली, तसा नागपूरचाही विकास होऊ लागला. त्या गिरणीमध्ये सूतकताई, विणणे, ब्लीचिंग करणे, रंगवणे ही खाती सुरू झाली. त्याबरोबरच जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी व मोठी गुदामेही बांधण्यात आली.

नंतर जमशेटजींनी विवाह केला. त्यांना दोराब व रतन ह्या नावाचे दोन मुलगेही झाले. त्यांपैकी दोराब केंब्रिजमध्ये शिक्षण घेऊन परतले आणि १८८४ साली त्यांनी वडिलांच्या कंपनीत काम करायला सुरुवात केली. त्यानंतर दोनच वर्षांनी नसरवानजी वारले. १८८७ साली 'टाटा सन्स' ही कंपनी सुरू झाली. तीत तीन भागीदार होते— जमशेटजी, त्यांचे चिरंजीव दोराब आणि पुतण्या रतनजी दादाभाई टाटा. रतनजी टाटांचा रतन ह्यांचा जमशेटजींच्या 'रतन' नावाच्या मुलाशी घोटाळा होऊ नये म्हणून त्यांना 'आर. डी.' ह्या नावाने संबोधले जाई.

लवकरच जमशेटजी करोडोपती बनले. परंतु आळशीपणात, चैनीत दिवस घालवणारा तो पुरुष नव्हता. त्यांनी मुंबईच्या विकासाच्या प्रश्नात मन घातले. मुंबईत आधुनिक घरे प्रथम त्यांनीच बांधली. सालशेटच्या मलेरियाग्रस्त दलदलीत भराव घालण्याची सूचना त्यांनी नगरपालिकेला केली आणि नंतर वांद्रे, माहीम, जुहुतारा ह्या उपनगरांत टुमदार बंगल्या बांधण्याची परवानगी मिळवली. मुंबईतील पहिले अलिशान होटेल त्यांनीच बांधले 'ताजमहाल' होटेलची पायाभरणी १८९८ साली झाली. १९०३ साली ते प्रत्यक्षात सुरू झाले. तेव्हा त्यात वीस अतिथी उतरले होते. त्या होटेलसाठी कोणताही खर्च करण्यास जमशेटजींनी मागेपुढे पाहिले नाही. सुरुवातीला होटेलला तोटाच सहन करावा लागला. १९१५ नंतर मात्र होटेलने नफा मिळवायला प्रारंभ केला. तो वर्षानुवर्षे वाढत आहे. आज ताज हे भारतातील एक प्रमुख अलिशान होटेल गणले जाते.

ह्याच सुमाराला टाटांनी सागरी व्यापाराला प्रोत्साहन दिले. इंग्लंडमधून दोन व जपानकडून दोन मालवाहू बोटी विकत घेऊन त्यांनी 'टाटा लाईन' सुरू केली व चीनशी व्यापाराला सुरुवात केली. पण पेनिन्सुलर अँड ओरिएंटल कंपनीने स्वतःचे दर कमी केले आणि सागरी विमा (मरीन इन्शुरन्स) अधिकाऱ्यांना गुप्तपणे कळविले

की ' टाटा लाईन 'चे एक जहाज समुद्रावर जाण्याच्या योग्यतेचे नाही. त्यामळे त्यातून कापूसही नेणे शक्य नाही. ह्याने संतापून जाऊन जमशेटजींनी ' द वॉर ऑफ द फ्रेटस् ' (दरांचे भांडण) नावाचे एक पत्रक काढून त्यात ह्या साऱ्या लटपटी उघडकीस आणल्या. पण त्या पत्रकाचा काहीही परिणाम झाला नाही. वर्षभरात टाटा लाईन बंद करावी लागली. त्यांच्या दोन ब्रिटिश नौका इंग्लंडला परत पाठवाव्या लागल्या. पेनिन्सुलर अँड ओरिएंटल कंपनीने पुन्हा आपले जुने दर सुरू केले. जपानी मात्र टाटांच्या कराराशी प्रामाणिक राहिले.

जमशेटजींनी भारतातील व्यापार व उद्योग ह्यांना तीन महत्त्वाच्या व चिरस्मरणीय देणग्या दिल्या आहेत. जमशेटपूरला त्यांनी लोखंड व पोलाद उद्योगाचा पाया घातला. लोणावळ्याला जो जलविद्युत प्रकल्प सुरू झाला तो त्यांच्या दूरदृष्टीची देणगी आहे. त्यांनीच बेंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स'ची भारताला देणगी दिली.

जमशेटजी आर्थिक राष्ट्रीयीकरणाचे खंदे पुरस्कर्ते होते. राजकीय स्वातंत्र्याची सांगड आर्थिक स्वावलंबनाशी घातली नाही, तर त्या स्वातंत्र्याला फारसा अर्थ राहत नाही, असे त्यांचे मत होते.

म्हैसूरच्या महाराजांनी आपले दिवाण सर शेषाद्री अय्यर ह्यांच्या सांगण्यावरून जमशेटजींना विज्ञान–संस्थेसाठी हव्या असलेल्या सर्व सोयी देऊ केल्या. बंगलोर येथे ३०० एकर जागा, त्यावर इमारत बांधण्यासाठी ५ लाख रुपयांची देणगी, त्या इमारतीच्या देखभालीसाठी वार्षिक एक लाख रुपयाचे अनुदान, अशा सोयी होत्या. त्यांचा स्वीकार जमशेटजींनी कृतज्ञतापूर्वक केला. जमशेटजींनी सरकारला संस्था उभारण्याकरिता ३० लाख रुपये देऊ केले. त्या पैशांच्या मोबदल्यात त्यांना स्वतःसाठी वा आपल्या कुटुंबासाठी काहीही फायदे नको होते. जमशेटजींच्या ह्या प्रामाणिकपणाने लॉर्ड कर्झन इतके प्रभावित झाले की त्यांनी ह्या संस्थेच्या योजनेची चर्चा करण्यासाठी जमशेटजींना १८९९ साली सिमल्याला बोलावले. ह्या सगळ्या विचारविनिमयात कालापव्यय मात्र झाला आणि त्या संस्थेच्या इमारतीचा पाया प्रत्यक्षात जमशेटजींच्या मृत्यूनंतर ७ वर्षांनी म्हैसूरच्या महाराजांच्या हस्ते फेब्रुवारी १९११ त घालण्यात आला. 'ही संस्था विज्ञान आणि औद्योगिक क्षेत्र ह्यांच्या विविध शाखांत मूलभूत आणि खास संशोधन करण्याची वृत्ती जोपासणारी एक प्रशिक्षण संस्था बनावी आणि त्यातून देशाच्या सुधारणेचा व भरभराटीचा पाया रोवला जावा,' अशी जमशेटजींची त्या संस्थेबद्दलची भावना होती.

त्याला अनुसरूनच म्हैसूर सरकारने चंदनाचे तेल व साबण ह्यांची चाचणी ह्या संस्थेच्या प्रयोगशाळेत करून घेतली आणि नंतरच ह्या वस्तूंच्या उपादनाला सुरुवात केली. औद्योगिक क्षेत्रात विज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग करण्यामुळे कर्नाटकात पाच

फॅक्टरीज सुरू झाल्या. त्यातील दोन चंदनी तेल बनवणाऱ्या आहेत. एक चंदनी साबण बनवते. एकात सफेद शिशाचे उत्पादन होते आणि पाचवीत शिसपेन्सिली तयार केल्या जातात.

नंतर जमशेटजींनी आपले सारे लक्ष लोखंड आणि पोलाद धंद्याचा प्रसार सर्व देशभर करण्यावर केंद्रित केले. खाणींचा शोध घेणे, खाणी सुरू करणे, ह्याबाबतीतील सर्व सरकारी अहवालांचा त्यांनी काळजीपूर्वक अभ्यास केला. १९२० साली, ह्या विषयातील तज्ज्ञांचा सल्ला घेण्यासाठी, त्यांनी परदेशात दौरा केला. असे तज्ज्ञ त्यांना अमेरिकेत भेटले. त्यांपैकी 'ज्यूलियन केनेडी अँड ऍक्सेल साहलिन अँड कंपनी'चे सी. एम. वेल्ड ह्यांना भारतात एक पाहणी घेण्यासाठी बोलावण्यात आले. दोराब टाटा, शापुरजी सकलातवाला आणि सी. एम. वेल्ड ह्या तिघांच्या गटाने १९०३ साली अशा पाहणीला सुरुवात केली.

पण एवढे होईपर्यंत जमशेटजींची प्रकृती खालावली होती आणि बिहारमधील धोंडी-लोहारा टेकड्यांजवळील धल्ली आणि राजहारा येथे लोखंडाची खाण सापडण्यापूर्वीच, १९०४ साली, जर्मनीमध्ये त्यांचा अंत झाला. वेल्डला ९० मीटर उंचीची लोखंडाची टेकडीच सापडली होती तीत सुमारे २॥ कोटी टन लोहमृतिका होती. तीत ६७·५% लोखंड असावे. त्यात फॉस्फरसचे प्रमाणही बेसेमर मर्यादेपेक्षा किंचित कमीच असावे, असा अंदाज होता.

ह्या आश्चर्यकारक शोधाची बातमी सर थॉमस हॉलंडना मिळाली तेव्हा ते स्वतःच तपासणी करायला आले. त्यांनी त्या बातमीची शहानिशा करून घेतली. मात्र अजून अनेक अडचणी पार करावयाच्या होत्या. त्याच सुमाराला मयूरभंज ह्या जंगलव्याप्त सस्थानच्या राजांनी टाटांना आपल्या छोट्या संस्थानात लोखंडाचा शोध घेण्यासाठी बोलावले. पुन्हा एकदा, तिघा थकल्याभागल्या शोधकांनी आपला शोध चालू केला आणि गुलमैशिनी टेकड्यांवर त्यांना लोहमृत्तिकेचा मोठा साठा सापडला. ही लोह-मृत्तिका अगदी वरच्या थरातच होती. हीही टेकडी सुमारे ९० मीटर उंचीची होती. त्यामुळे ही सोन्याचीच खाण त्यांच्या हाती आली होती. ओकमपाद (सुनैपत) आणि बदामपहाड ह्याही ठिकाणी लोहमृत्तिकेचे आणखी साठे सापडले. मयूरभंज समुद्राला जवळ होते त्याच्या जवळपास कोळशाच्याही खाणी होत्या. त्यामुळे लोहमृत्तिकेपासून कच्च्या लोहपट्टिका बनवून निर्यात करणे शक्य होते. त्यातच रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी मदतीचा हात पुढे केला.

पण सगळ्यात मोठी अडचण होता ती १६,३०,००० पौंडांची भलीमोठी रकम उभी करण्याची. ब्रिटिश सावकारांकडून हे पैसे गोळा करण्यात तीन वर्षे वाया गेली. तेव्हा मग एतद्देशीय लोकांना आवाहन करण्याची सूचना पुढे आली. त्याला जो

प्रतिसाद मिळाला तो ऍक्सेल साहलिनच्याच शब्दांत देणे योग्य ठरेल.

' भल्या पहाटेपासून उशीरा रात्रीपर्यंत टाटांच्या मुंबईच्या कचेरीत ' नेटिव्हां ' ची झिम्मड उडालेली असे. त्या धंद्यांत पैसे गुंतवायला हे सारे लोक उत्सुक होते. त्यांत म्हातारे होते, तरुण होते, गरीब होते, तसेच श्रीमंतही होते. स्त्रिया होत्या, पुरुष होते. ते येत आणि आपली अल्पशी रकम देऊ करीत. तीन आठवडे संपले तेव्हा खाणी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली १६,३०,००० पौंडांची रकम गोळा झाली होती. ही सर्व रकम ८,००० नेटिव्हांनी उभी केली होती. नंतर जेव्हा धंद्यासाठी भांडवल उभारण्याच्या हेतूने डिबेंचर्स विक्रीला काढले तेव्हा सगळेच्या सगळे म्हणजे, ४,००,००० पौंडांचे डिबेंचर्स, एका भारतीय धनाढ्याने विकत घेतले हा भारतीय अमीर होता ग्वाल्हेरचे महाराज शिंदे. [३]

२७ ऑगस्ट १९०७ रोजी सर्व रकम हाती आली आणि त्या महान साहसाला सुरुवात झाली. इथे एक लक्षात ठेवले पाहिजे की टाटांच्या आवाहनाला जो प्रचंड प्रतिसाद मिळाला तो त्याकाळच्या स्वदेशी चळवळीचा परिणाम होता. ह्या चळवळीने लोकजागृती केली होती. प्रत्येक व्यक्ती देशासाठी काहीना काही करायला उत्सुक होती.

'टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या पहिल्या संचालक–मंडळात तीन पारशी व तीन इतर जमातीचे भारतीय होते. मेसर्स ज्यूलिएन केनेडी, साहलिन, अँड कंपनी ची कंस्ट्रक्शन इंजिनियर म्हणून नेमणूक करण्यात आली. कामाच्या योजना आखण्यात सात आठवडे निघून गेले.

कलकत्त्यापासून ३३५ किलोमीटर्स वर असलेल्या साकची येथील जागा ह्या प्रकल्पासाठी निवडण्यात आली होती. ह्या जागेपासून कालिमाता हे रेल्वे स्टेशन फारसे दूर नव्हते. प्रकल्पापासून पंपिंग स्टेशनपर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर आजही हे साकची गाव वसलेले आहे. साकचीच्या अवतीभोवती विकासासाठी भरपूर जमीन उपलब्ध होती. शिवाय खोरखाई आणि सुवर्णरेखा ह्या नद्यांचे मुबलक पाणी उपलब्ध होते. प्रकल्पाची मुहूर्तमेढ २७ फेब्रुवारी १९०७ रोजी रोवण्यात आली. त्याच वर्षीच्या आक्टोबरमध्ये प्रकल्पाची पायाभरणी झाली. एक मोठा पाण्याचा तलाव खोदण्यात आला. तीन वर्षांनंतर, २ डिसेंबर १९११ रोजी, लोहमृत्तिकेचा पहिला हप्ता मिळवण्यात आला. प्रकल्पातील कामगारांची वसाहतही प्रकल्पाभोवतीच उभी राहिली आणि त्या जागेला ' टाटानगर ' नाव पडले. २ जानेवारी १९१९ रोजी लॉर्ड चेम्सफर्डनी त्या प्रकल्पाला भेट दिली तेव्हा त्यांनी ह्या वसाहतीला ' जमशेटपूर ' असे नाव दिले.

जमशेटजींच्या कल्पनेतून निघालेला तिसरा मोठा प्रकल्प म्हणजे 'टाटा जलविद्युत प्रकल्प.' १८७५ साली जमशेटजींना कल्पना सुचली की मुंबईतील कापड गिरण्यांसाठी जलविद्युतचा वापर करावा. अशी वीज निर्मिण्यासाठी त्यांनी जबलपूरच्या धबधब्याची

पाहणी केली. तिथेच जमीन खरेदी करायचे त्यांनी ठरविले. तथापि ते शक्य झाले नाही. १८९७ साली रॉबर्ट मिलर ह्यांनी जमशेटजींना कल्पना सुचवली की आपण दोघांनी एक सिंडिकेट (भागीदारी कंपनी) बनवून पोर्तुगीज भारतातील (गोव्याजवळील) दूधसागर धबधबा विकत घ्यावा. ती जागा विकत घेण्याची परवानगी मिलरनी मिळवली होती. तेव्हा मिलर, जमशेटजी आणी गॉस्लिंग हा एक अनुभवी निवृत्त इंजीनियर, ह्या तिघांनी मिळून 'दूधसागर सिंडिकेट' बनवले.

ह्या सिंडिकेटने आपल्या योजनेविषयी विचारविनिमय सुरू करण्यापूर्वीच गॉस्लिंगने लोणावळ्याजवळ पाणलोट विभाग निर्माण करण्याची शक्यता जमशेटजीजवळ बोलून दाखवली. वरच्या दरीतील तलावात पाणी साठवून ते खंडाळ्याच्या पठाराच्या टोकापर्यंत न्यायचे आणि तिथून मोठमोठ्या नळांद्वारे खोपोलीत घाटाच्या पायथ्यापर्यंत आणायचे. हे पाणी अडविण्यासाठी धरण बांधणे शक्य होते. अशा साठवलेल्या पाण्यातून निर्माण केलेली जलविद्युत मुंबईतील गिरण्या चालवू शकेल, अशी ही योजना होती.

मृत्युशय्येवर असतानाच जमशेटजींना आपला मुलगा दोराब ह्याच्याकडून वचन घेतले की [illegible]
पुरी करायचे ठरवले. त्यांनी जल–विद्युत प्रकल्पासाठी एक सिंडिकेट बनवले. ह्या प्रकल्पांसाठी तीन तलाव खोदण्यात येणार होते. एक लोणावळ्याजवळ, दुसरा वळवण तलावात आणि तिसरा शिरावटा तलावाजवळ. ह्या योजनेबद्दलचा तज्ज्ञांचा अहवाल १९०६ साली तयार झाला. परंतु तो हाती घेण्यासाठी पुरेसा पैसा उभा करणे इंग्लंड किंवा हिंदुस्थान यापैकी कुठेही शक्य झाले नाही. शेवटी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सिडेनहॅम ह्यांनी ह्या योजनेच्या उपयुक्ततेची तरफदारी केली आणि ह्या प्रकल्पाला आर्थिक हातभार लावण्याचे आवाहन भारतीयांना केले, तेव्हा कुठे पैसा मिळू लागला.

७ नोव्हेंबर १९१० रोजी 'टाटा जलविद्युत पुरवठा कंपनी' (टाटा हायड्रो–इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी) ही सार्वजनिक कंपनी (पब्लिक कंपनी) म्हणून रजिस्टर करण्यात आली ती परळ येथे हलवण्यात आली. म्हणजे, मूळ जागेपासून ती ९५ किलोमीटर्स अंतरावर आली. उंच, अवजड, पोलादी मनोऱ्यावरील विद्युत प्रवाहाने भरलेल्या सहा तारा, जमीन आणि पाणी ह्यांमधून मुंबई रिसिव्हिंग स्टेशनवर (प्रक्षेपण केंद्रावर) वीज आणली जाते व तेथून ती गिरण्यापर्यंत पोचवली जाते.

टाटांच्या ह्या पहिल्या वहिल्या यशामुळेच भारतीय रेल्वेचे विद्युतीकरण करण्याची कल्पना पुढे आली.

टाटांच्या संचालकांनी हा प्रकल्प वाढवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा सरकारने त्यांना आंध्रमधील (तेव्हाचा मद्रास इलाखा) भामा–भीमा नद्यांच्या खोऱ्याची पाहणी करण्याची परवानगी दिली. त्यातूनच मग १९१६ साली 'आंध्रव्हॅली पॉवर सप्लाय

कंपनी' सुरू झाली.

आपले तिन्ही प्रकल्प प्रत्यक्षात उतरलेले पाहायला जमशेटजी जगले नाहीत. तथापि त्यांच्या उदाहरणापासून स्फूर्ती घेऊनच टाटांच्या सामान्य कामगारांपासून ज्येष्ठ विश्वस्तांपर्यंत सर्वजण काम करतात. जमशेटजींनी राजकारणात स्वत: भाग घेतला नाही. तरीही मुंबईची पहिली राजकीय संघटना – 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएन' सुरू करण्यात त्यांनी दादाभाई नौरोजींना सहकार्य दिले होते. काँग्रेसच्या सुरुवातीपासूनच ते तिचे सदस्य होते; आणि आपल्या मृत्यपर्यंत (१९०४) ते तिचे सदस्य राहिले. त्यांचे चरित्रकार लिहितात, 'राजकारणी म्हणून त्यांनी नाव कमावले नाही. राजकारण, समाजकारण, व्याख्यानबाजी ही क्षेत्रे त्यांनी इतरांसाठी मोकळी ठेवली. परंतु त्यांची मते पक्की होते. ते कट्टर राष्ट्रभक्त होते.'[४]

लॉर्ड कर्झन जमशेटजींबद्दल म्हणतात–'आजच्या पिढीतील दुसऱ्या कोणाही भारतीयाने औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांत जमशेटजी टाटांच्या तोडीची कामगिरी केलेली नाही.'

जमशेटजींनी सुरू केलेल्या तीन प्रकल्पानंतर टाटा कंपन्यांनी निरनिराळ्या क्षेत्रात प्रचंड झेप घेतली आहे. त्यांपैकी दोन मोठ्या कंपन्या म्हणजे 'टाटा ऑईल मिल्स कंपनी' (टॉमको) आणि 'टाटा इंजिनियरिंग अँड लोकोमोटिव्ह कंपनी' (टेल्को). पहिली १९१७ त सुरू झाली आणि दुसरी १९४५ साली.

तंत्रज्ञानाचा विकास झाल्यावर 'हाऊस ऑफ टाटा'नी अगदी नवीन उद्योगधंदा जन्माला घातला. तो होता नागरी विमान वाहतुकीचा. १९३२ साली 'टाटा एअर लाईन्स'ची स्थापना झाली. १९४८ साली 'एअर इंडिया इंटर नॅशनल' सुरू झाली. त्या दोन्ही कंपन्यांचे १९५३ साली राष्ट्रीयीकरण झाले आणि त्यांची नावे अनुक्रमे 'इंडियन एअर लाईन्स' आणि 'एअर इंडिया लिमिटेड' अशी झाली. त्या दोन्ही कंपन्यांच्या कारभाराशी सरकारबरोबरच टाटांचाही घनिष्ठ संबंध आहे श्री. जे. आर. डी. टाटा हे संस्थापकांचे वंशजच आज (१९७६) त्यांचे अध्यक्ष आहेत.

टाटांनी सुरू केलेली 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस' (टाटा समाजशास्त्र संस्था) ही भारतातील ह्या प्रकारची पहिलीच संस्था. इथे पदवीधरांना समाजकार्याचे शिक्षण दिले जाते. सामाजिक व औद्योगिक संघटनांमध्ये काम करणाऱ्यांना समाजशास्त्राचे शिक्षण देण्यात येते.

कॅन्सरवरचे पहिले संशोधन–केंद्र टाटांनीच १९४१ साली मुंबईत सुरू केले. ते 'टाटा मेमोरियल हॉस्पिटल फॉर कॅन्सर' ह्या नावाने ओळखले जाते.

'टाटा इन्स्टिटयूट फॉर फंडामेंटल रीसर्च (टाटा मूलभूत संशोधन संस्था) ही अणुविज्ञान व गणितशास्त्र ह्या शाखांत सखोल संशोधन करणारी भारतातील पहिलीच

संस्था. ती १९४५ साली मुंबईत सुरू झाली. तिच्या मागे भाभा ह्या अणुशास्त्रज्ञाची प्रेरणा होती. ही संस्था व तिचे संस्थापक ह्यांच्याबद्दलचा तपशील पुढील प्रकरणात देण्यात येईल.

१९५० च्या सुमारास टाटांनी इतरांशी भागीदारीत संस्था स्थापन केल्या. हे भागीदार बहुधा परदेशी होते. लंडन आणि न्यूयॉर्कमध्ये क्लिअरिंग हाऊसेस (पैशाची देवाण घेवाण करणाऱ्या पेढ्या) सुरू करून कामाचा वेग व क्षमता वाढवण्यात आली. त्याच बरोबरीने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टाटा सल्लागार सेवा) सुरू करण्यात आल्या. त्या औद्योगिक क्षेत्रातील एक महत्त्वाची गरज भागवीत आहेत.

टाटांनी सुरू केलेल्या छोट्या प्रकल्पांपैकी उल्लेखनीय प्रकल्प– 'टाटा ॲग्रिकल्चरल अँड रूरल ट्रेनिंग फॉर द ब्लाईंड ' आंधळ्यांकरिता शेती व ग्रामीण प्रशिक्षण प्रकल्प, द टाटा ब्लड बँक अँड ट्रान्स्फ्युजन सर्व्हिसेस (टाटा रक्तपेढी), द टाटा डिपार्टमेंट ऑफ प्लास्टिक सर्जरी आणि रूरल वेल्फेअर बोर्ड (ग्रामीण कल्याण मंडळ) हे होत.

टाटांचा अगदी अलीकडचा उपक्रम म्हणजे ' नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्टस '. तो अजूनही अपूर्ण आहे. ह्याही प्रकल्पाचा तपशील पुढील एका प्रकरणात दिला आहे.

' हाऊस ऑफ टाटाज् 'च्या खालोखाल पारशांनी चालवलेला मोठा उद्योगसमूह गोदरेज लिमिटेड हा आहे.

ह्या उद्योगसमूहाचे संस्थापक अर्देशीर बरजोरजी गोदरेज (१८६७–१९३६) ह्यांचा जन्म एका मध्यमवर्गीय पारशी कुटुंबात झाला. त्यांनी वकिलीचे शिक्षण घेतले होते; आणि नंतर एका सॉलीसिटर कंपनीत नोकरीही धरली होती. परंतु ते काम त्यांना पसंत पडले नाही म्हणून त्यांनी वैद्यकीय उपकरणे दुरुस्त करण्याचे एक दुकान टाकले. त्यात त्यांना इतके प्रचंड यश मिळाले की लवकरच त्यांनी स्वतःच वैद्यकीय उपकरणे बनवायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी आपली दृष्टी कुलुपे व किल्ल्या बनवण्याकडे वळविली आजही कंपनी ह्या दोन वस्तूंसाठी प्रख्यात आहे.

तिजोऱ्यांना आगविरोधी बनवणारे पहिले भारतीय उत्पादक गोदरेज होते. १९४४ साली त्यांच्या ह्या उत्पादनाची कसोटी लागली. त्यावर्षी सोने, कापूस आणि दारूगोळा ह्यांच्या साठ्याला मुंबई गोदीत आग लागली होती. आग विझवल्यावर जेव्हा राखेचा ढीग उपसण्यात आला तेव्हा त्यात फक्त गोदरेजनी बनवलेल्या तिजोऱ्या शाबूत अवस्थेत आढळल्या त्यांच्या आतील चीजवस्तूही सुरक्षित होत्या.

तिजोऱ्या आणि कुलुपे यांच्या उत्पादनात यश मिळवल्यानंतर अर्देशीरनी पिरोजशाह ह्या आपल्या बंधूंच्या हातात तो धंदा सोपवला, आणि ते स्वत: साबण, वनस्पती तेले, छपाईची शाई आणि बूट पॉलिश बनवू लागले. त्यांनी नाशिकजवळ

बरीच मोठी बागायती जमीन विकत घेतली. तिथे त्यांनी सोयाबीनची लागवड केली. इथपासून शेंगदाण्याच्या तेलाचे शुद्धीकरण सुरू झाले. आज गोदरेजचे रिफाईंड शेंगदाणा तेल दर्जेदार उत्पादनात गणले जाते. त्याबरोबरच अर्देशीरनी सौंदर्य-प्रसाधनेही बनवायला सुरुवात केली. त्यातही त्यांना यश मिळाले.

१९४२ मध्ये कोणतीही परदेशी मदत न घेता पहिले यांत्रिक प्रेस व प्रेसब्रेक बनवण्यात आले. १९५८ मध्ये भारतीय बनावटीचा पहिला रेफ्रिजरेटर बाजारात आला. १९६३ पासून गोदरेज फॉर्कलिफ्टस् दिसू लागले. हे फॉर्कलिफ्टस ते अमेरिकन कंपनीच्या सहकार्याने बनवत होते. आज गोदरेज ही औद्योगिक उपयुक्ततेची तैलोत्पादित रसायने बनविणारी प्रमुख कंपनी बनली आहे.

१९६८ साली मलेशियात जोहोर बाहरू ह्या गावी परदेशातील पहिला गोदरेज कारखाना सुरू झाला. तिथे कार्यालयाना उपयोगी फर्निचरचे शंभर प्रकार बनवण्यात येतात.

बँक क्षेत्रातही पारशी प्रवर्तक ठरतात. इतिहासाला ज्ञात असणारे पहिले पारशी बँकर होते. विकाजी (१७८१–१८५३) आणि पेस्तनजी मेहेरजी (१७९९–१८५४) हे दोघे बंधू. ते ठाणे जिल्ह्यातील तारापूर ह्या बंदर गावाचे. ते रेव्हेन्यू कंत्राटदार होते. तशीच थोडी सावकारीही करीत. त्यांच्या सावकारीतील यशाची बातमी हैद्राबादचे निझाम नसर–उद–दौलत ह्यांच्या कानावर पडली. तेव्हा त्यांनी त्यांची नेमणूक आपल्या टाकसाळीवर केली. १८४० साली एक रुपयाचे नाणे त्या टाकसाळीतून बाहेर पडले; त्यावर 'पी. व्ही.' ही आद्याक्षरे होती. 'पेस्तनजी शिक्का' ह्या नावाने हे नाणे ओळखले जाई. अशी २२ लाख नाणी बनवण्यात आली व ती चलनातही आली. पारशाच्या नावाने एखादे भारतीय नाणे ओळखले जाण्याची ही पहिलीच वेळ. हे बंधू थाटामाटात राहात. निझामाला त्यांनी ४१ लाख रुपये कर्जाऊ दिले होते. निझामाने ते कर्ज कधीच फेडले नाही, १८५१ मध्ये हे दोघेही भाऊ इंग्लंडला गेले. तिथे त्यांनी पार्लमेंटकडे ह्या कर्जफेडीबाबत अर्ज केला. परंतु त्याचा काहीही परिणाम झाला नाही. दोघेही दिवाळखोर बनले आणि एकेका वर्षाच्या अंतराने मरण पावले.

एकोणविसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच पारशांनी बँकर्स म्हणून आपले पाय रोवले होते. आपत्काली सरकारलाही साहाय्य करण्याइतकी ऐपत मिळवली होती. आपल्या 'ग्लिम्पसेस ऑफ ओल्ड बॉम्बे' ह्या ग्रंथात जेम्स डग्लस लिहितो, "मुंबईच्या गरजेच्या वेळी १९०२ साली सात सद्गुणी माणसांनी 'नॉर्थर्न लोन' (उत्तरेचे कर्ज) सुरू करून इतिहासातील अत्यंत बिकट प्रसंगी सरकारला मदत केली. त्यांपैकी एक होते दादाभाई पेस्तनजी वाडिया."[५] १८२८ मध्ये जहांगीर आणि नौरोजी नसरवानजी वाडिया ह्या दोघा बंधूंनी आपला स्वतःचा पतपेढीचा व्यवसाय मुंबईत सुरू केला.

त्यांचे एक आप्त फ्रामजी कावसजी वाडिया हे 'बँक ऑफ वेस्टर्न इंडिया'चे चिटणीस होते. त्या बँकेचे ते विश्वस्तही होते.

१८३५ साली ईस्ट इंडिया कंपनीने सर्व देशभर एक चलन सुरू केले. त्यामुळे बँकेचे व्यवहार सुलभ होऊ लागले. बँकिंग चळवळीवर स्वदेशी चळवळीचाही अनुकूल परिणाम झाला. १९०६ ते १९१३ ह्या सात वर्षांत बँकांची संख्या ९ वरून १८ वर गेली.

भारतीय बँकिंगमध्ये क्रांती घडवून आणणारी व्यक्ती होती सर सोराबजी एन. पोचखानवाला (१८८१–१९३७). एका गरीब पारशी कुटुंबातील चार भाऊ व तीन बहिणींतील ते सर्वांत धाकटे अपत्य. ते अवघे सहा वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारले. तेव्हा सगळ्यात थोरल्या भावाने चार्टर्ड बँकेत बुक-कीपर म्हणून महिना १०० रुपये पगाराची नोकरी पत्करली. त्याला हेडक्लार्कची बढती मिळाली तेव्हा त्यांनी बँकेकडून सोराबजींची बुक-कीपर म्हणून नियुक्ती करविली.

१९०५ मध्ये बँक ऑफ इंडिया सुरू झाली. तिचे सारे प्रमोटर्स भारतीय होते. त्यांनी सोराबजींना सब-एजंट नेमले. सोराबजींनी तिथे प्रशासकीय कामाची माहिती करून घेतली. तिथेच त्यांचा व्यापारी व व्यावसायिकांशी घनिष्ट संबंध आला. त्याचा पुढे त्यांना फायदा झाला.

मर्चंट्स बँकेने 'मॅनेजर'साठी जाहिरात दिली, तेव्हा सोराबजींनी मोठ्या आशेने त्या जागेसाठी अर्ज केला. दोन बँकांतला मिळून बारा वर्षांचा अनुभव आणि लंडनच्या बँकर्स इन्स्टिटय़ूटची परीक्षा पास झालेला एकमेव भारतीय, म्हणून आपल्याला ही नोकरी मिळेल, अशी जबर उमेद सोराबजींना होती. परंतु भारतीयांनी बँकेमध्ये वरिष्ठ पदे भूषवावीत ह्याबाबत त्याकाळी इतके पूर्वग्रह होते की बँकेचे एक भारतीय डायरेक्टर सर नौरोजी गामाडिया ह्यांनी सोराबजींना कळवले की त्यांचे वय फक्त सव्वीस वर्षांचेच असल्यामुळे त्यांना बँकेत नोकरी देता येत नाही !

सोराबजींची जबरदस्त निराशा झाली. त्यांनी आपले स्नेही व मुंबईतील एक प्रमुख कापूसव्यापारी कल्याणजी वर्धमान जेटसी ह्यांच्यापाशी आपले मन मोकळे केले. सोराबजींची व्यथा ऐकून कल्याणजींना त्यांच्याबद्दल सहानुभूती तर वाटलीच पण केवळ भारतीयांनीच चालवलेली बँक स्थापन करण्याचे सोराबजींचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचे आश्वासनही त्यांनी सोराबजींना दिले. ईस्टर्न बँकेने एक जागा नुकतीच सोडली होती. त्याच बँकेचे पारशी कॅशियर सोराबजी विकाजी ह्यांच्या मध्यस्थीने त्या दोन तरुणांनी ती जागा भाड्याने घेतली. त्यांच्या नियोजित बँकेचे फर्निचर होते फक्त दोन टेबले आणि दोन खुर्च्या ! 'सोराबजी नवीन बँक काढू पाहतात' असे जेव्हा त्यांच्या बँकेच्या मॅनेजरने ऐकले तेव्हा तो खो खो हसायलाच लागला. त्याने सोराबजींना बोलावून घेतले आणि ही अशक्यप्राय योजना

सोडून देण्यासाठी त्यांचे मन वळवायचा प्रयत्न केला. तरीही सोराबजी आपल्या निश्चयापासून ढळत नाहीत, हे पाहिल्यावर सोराबजींना २४ तासांची नोटीस देण्यात आली. त्या अवधीत त्यांनी नवीन बँक सुरू करण्याचा आपला इरादा तरी रद्द करायचा होता नाही तर नोकरी तरी सोडायची होती. सोराबजींनी स्वप्नाळूपणे दूरवर पाहिले आणि ते शांतपणे म्हणाले, " सर, मी माझा निर्णय पक्का केला आहे. बँकेची नोकरी मी सोडणार आहे." त्या इंग्रज साहेबाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याचा स्वत:च्या कानांवर विश्वासच बसेना. त्याने सोराबजींना पुन्हा विचार करायला सांगितले; पण आता फासा पडला होता.

इंग्लिश बँकेचा राजीनामा दिल्याच्या दुसऱ्याच दिवशी सोराबजी स्वत:च्या नवीन बँकेतील एका खुर्चीवर जाऊन बसले. शेजारच्या खुर्चीवर ईस्टर्न बँकेचे भूतपूर्व कॅशियर सोराबजी विकाजी बसले होते. विकाजींनीही आपली ५०० रुपये महिना देणारी नोकरी सोडून दिली होती आणि ते ह्या दोन स्वप्नाळू तरुणांना येऊन सामील झाले होते. विकाजींच्या कुटुंबियांनी त्यांना वेड्यातच काढले आणि त्यांच्या बँकेचे लवकरच दिवाळे निघेल असे भाकित केले.

इकडे, कल्याणजींनी संचालक मंडळाचा जमवाजमव चालवली होती; नवीन बँकेची घटना ते तयार करीत होते. शेवटी सर फिरोझशाह मेहता त्यांच्या बँकेचे अध्यक्ष झाले.

२८ डिसेंबर १९११ रोजी पाच हिंदू, चार पारशी आणि एक मुसलमान अशा दहा सदस्यांच्या संचालक मंडळाची पहिली बैठक झाली. त्यात फिरोझशाहांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. सोराबजी तिचे मॅनेजर झाले. बँक सुरू झाल्यावर तीनच महिन्यांत वीस लाख रुपयांचे भांडवल उभे करण्यात आले.

पुढच्याच वर्षी बँकिंग व्यवहारात मंदी आली. १९१३ ते १९१७ ह्या चार वर्षांत एकूण ८७ बँका बुडाल्या. त्यातच पहिल्या महायुद्धाची भर पडली. सेंट्रल बँक ऑफ इंडिया (सोराबजींची नवी बँक) ह्या आपत्तीतून कशीबशी सावरली आणि १९२१ साली सरकारने तिचा समावेश शेडयूल्ड बँकांच्या यादीत केला. तिला म्युनिसिपल फंड, असे सार्वजनिक फंड गोळा करण्याचे अधिकार मिळाले होते.

बँकिंगबाबतचा सोराबजींचा दृष्टिकोण संपूर्ण राष्ट्रीय होता. ते देशभक्त होते. टाटा ऑईल मिलसची पुनर्रचना करून सोराबजींनी तिला दिवाळे काढण्यापासून वाचवले. टाटा आयर्न अँड स्टीलला जेव्हा डिबेंचरवरील व्याज देणे अशक्य झाले, तेव्हा त्यांच्या संचालक मंडळाने सोराबजींच्याच सल्ल्यानुसार लोखंड व पोलाद धंद्याची बळकट पायावर उभारणी केली.

१९२३ साली युनियन बँक ऑफ इंडियाला प्रचंड कर्जामुळे आपला कारभार

चालवणे अशक्य होऊन बसले. तेव्हा सोराबजींनी त्यांना भांडवल कमी करून, कायदे-कज्जे न करता कर्ज फेडावे, असा सल्ला दिला. त्या बँकेचे व्यवहार ह्यापुढे सेंट्रल बँकेने पहावे, असेही ठरवले. ह्या धाडशी उपाययोजनेनंतर दहाच वर्षांनी युनियन बँकेचे भांडवल सेंट्रल बँकेने स्वत:कडे जमा केले.

सिमल्याची अलायन्स बँक पंचेचाळीस वर्षे भरभराटीत धंदा करीत होती. १९२३ साली ती एकाएकी कोसळली. तिच्या अपयशाचा धक्का टाटा इंडस्ट्रियल बँकेला बसला. ह्या बँकेच्या शाखा देशभर होत्या. त्या दोन्ही बँका युरोपियनांच्या मालकीच्या होत्या. टाटा इंडस्ट्रियल बँकेतील बहुश: भांडवल मात्र भारतीयांचे होते. त्यामुळे, ह्या बँकेने दिवाळे काढले असते तर प्रचंड राष्ट्रीय नुकसान झाले असते. अशा आपत्काली, सोराबजींनी त्या बँकेचे सेंट्रल बँकेत विलीनीकरण करण्याला मान्यता दिली; आणि तिचा मदतीचा हात कृतज्ञतापूर्वक स्वीकारण्यात आला. 'कॅपिटॉल' ह्या अर्थविषयक वृत्तपत्राने ह्या विलीनीकरणाचे स्वागत करून भारतीय बँकिंग व्यवहारात नवीन युग सुरू झाल्याचा निर्वाळा दिला.

१९३० साली श्रीनगर येथे संस्थानची बँक सुरू करण्यासाठी काश्मीर संस्थानाने सोराबजींना पाचारण केले १९३४ साली ह्याच कारणासाठी त्यांना सीलोनने (श्री लंका) बोलावून घेतले. संयुक्त प्रांत (आताचा उत्तर प्रदेश) सरकारने प्रांताच्या औद्योगिक गुंतवणुकीत सुधारणा सुचवणारा एक अहवाल तयार करायला सोराबजींना सांगितले. ह्या सर्व कामगिऱ्या सोराबजींनी यशस्वी रीत्या पार पाडल्या.

सेंट्रल बँकेत चपराशापासून वरिष्ठ संचालक व अध्यक्ष ह्यांच्यापर्यंत सर्व भारतीयच होते. अशा ह्या भारतीय बँकेविषयी व्यवसायक्षेत्रात मत्सर निर्माण झाला. खोट्या अफवा उठवण्यात आल्या. बँकेचे नुकसान करण्याचे अनेक प्रयत्न झाले. आणि त्या बँकेला नामवंत पारशी अध्यक्षांची मालिका मिळाली नसती तर तिला प्रमुख बँकांच्या यादीत आपले नाव राखणे अवघड झाले असते. १९१५ साली फिरोझशाह वारले; तेव्हा टाटा कंपन्यांतील ए. जे. बिलिमोरिया तिचे अध्यक्ष झाले (१९१५–१९२१); त्यांच्यानंतर सर फिरोझ सेठना (१९२१–१९३८) अध्यक्ष झाले. त्याच काळात सर रुस्तम मसानी हे १९२५ ते १९२८ ही तीन वर्षे हंगामी अध्यक्ष होते. १९३८ ते १९४१ ह्या सुमारे तीन वर्षांच्या काळात सर होमी मोदी ह्या बँकर–राजकारण्याने अध्यक्षपद भूषविले. ह्या काळात, १९४१ ते ४३ पर्यंत हरिदास माधवदास आणि १९४९ ते ५२ पर्यंत दिनशॉ डी. रोमर हे हंगामी अध्यक्ष होते.

सेंट्रल बँकेचे एक उपाध्यक्ष कूवरजी भाभा ह्यांचे सार्वजनिक आयुष्य वैशिष्टयपूर्ण होते. स्वातंत्र्य मिळण्याआधी जेव्हा हंगामी सरकार सत्तेवर आले, तेव्हा ते प्रथम त्यात व्यापार मंत्री होते; नंतर काम, खाणी व ऊर्जामंत्री झाले. १९४७ साली स्वातंत्र्य

मिळाल्यावर कुवरजींची नेमणूक स्वतंत्र भारताचे पहिले व्यापार मंत्री म्हणून करण्यात आली.

दुसरे नामवंत बँकर म्हणजे ए. डी. श्रॉफ. १९५३ साली रिझर्व्ह बँकेने एक 'श्रॉफ कमिशन' नेमले. सरकारच्या अनुमतीने खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांच्या विकासासाठी बँकांची कर्जे कशी उपलब्ध करून देता येतील, ह्या विषयाची पाहणी करण्याचे काम ह्या कमिशनचे होते. कमिशनचे अध्यक्ष श्रॉफच होते. ह्या कमिशनच्या अनेक शिफारशींची अंमलबजावणी सरकारने केली आहे.

आजही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बँक व्यवसायात अनेक कार्यक्षम पारशी स्त्री–पुरुष आहेत. होमी डामरी एकेकाळी रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर होते. सध्या ते वर्ल्ड बँकेचे सेक्रेटरी आहेत. एखाद्या बँकेची शाखा–मॅनेजर होणारी पहिली पारशी महिला म्हणजे शरनाझ जाल इंजिनियर. त्या कित्येक वर्षे बँक ऑफ इंडियाच्या कुलाबा शाखेच्या मॅनेजर होत्या. १९७६ साली त्यांची पॅरीसला नव्यानेच उघडलेल्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेच्या मॅनेजर म्हणून नेमणूक झाली. परदेशात निघालेल्या भारतीय बँकेच्या मॅनेजर बनणाऱ्या त्या पहिल्याच भारतीय महिला. दोसान पेंटी अनेक वर्षे ग्रिंडलेज बँकेच्या मुंबई व लंडन येथील शाखांत काम करीत होत्या. अलीकडेच त्या वरिष्ठ अधिकाराच्या पदावरून निवृत्त झाल्या.

घड्याळे दुरुस्त करण्याच्या क्षेत्रातही पारशी लोक प्रवर्तक ठरले. १७४४ साली सुरतेचे एक नागरिक सोराबजी कावसजी धनजीशॉ (१६७९–१७७२) ह्यांना बादशहा महमदशहांनी दिल्लीला बोलावून घेतले होते. बादशाहला तुर्कस्तानच्या सुलतानाने दिलेले एक घड्याळ त्याला दुरुस्त करवून घ्यायचे होते. त्यासाठी धनजीशाँनी आपला मदतनीस कावसजी रुस्तमजी उदवाडा (१७१६–१७८१) ह्यालाही बरोबर नेले घड्याळ नीट दुरुस्त झाले. दोघांनाही भरपूर बिदागी मिळाली. धनजीशाँना बादशाहनी 'नेक सत्खान' असा किताब दिला. त्या बिरुदावलीचा अर्थ होता–'शुभ वेळ दाखवण्याऱ्या घड्याळांचा बादशाह.' धनजीशाँच्या दोन मुलांना बेहरमंदखान (भरभराटीचा सम्राट) आणि तलियारखान (उत्तम नशीबाचा सम्राट) अशा पदव्या मिळाल्या. उदवाडांना 'मिर्झा खुश्रोबेग' किताब मिळाला. तो वारसाहक्काने त्यांचा मुलगा कैओजीकडे आला. त्यानंतर त्या कुटुंबाने 'मिर्झा' हे आडनाव धारण केले. एकोणविसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत पारशांनी घड्याळे विकणे आणि दुरुस्त करणे ह्याची अनेक दुकाने टाकली होती. ती दुकाने आजही चालू आहेत. त्यांच्याचपैकी डी. आर. पंडोल अँड सन्स ही कंपनी मशहूर आहे.

चष्मा बनवण्याच्या कामातही पारशी प्रसिद्ध आहेत. 'बालीवाला अँड होमी', 'दिनशॉ एम. दस्तूर अँड कं.' ह्या कंपन्या आज जवळ जवळ शंभर वर्षांच्या जुन्या

झालेल्या आहेत.

हॉटेलच्या धंद्यातही पारशी आघाडीवर आहेत. विवाह, नवजोत अशा खास प्रसंगी खाद्यपदार्थ पुरवणारे पारशी केटरर्स खूपच आहेत. स्पेन्सर अँड कंपनी भारतीय रेल्वेवर खाद्यपदार्थांची विक्री करीत असे. ह्या कंपनीने आपला व्याप वाढवून हॉटेले सुरू केली. मद्रास, पुणे, कलकत्ता व मुंबई ह्या शहरांत ह्या कंपनीची हॉटेले आजही आहेत.

ह्या शतकाच्या सुरुवातीलाच पारशांनी 'कॅनिंग'चा (डबाबंद खाद्यपदार्थांचा) उपक्रम सुरू केला. १९०९ साली डॉ. दाराब दिनशॉ रायटर (१८६३ ते १९३५) ह्यांनी टिकली ब्रँडच्या, साखरेचे आवरण दिलेल्या कोयनेलच्या गोळ्या बनवायला सुरुवात केली. त्या धंद्यात त्यांना इतके यश मिळाले की त्यांनी मुंबईत दादरला गोळ्यांचा कारखाना काढला. १९२३ साली त्यांनी कलकत्त्याला दुसरा गोळ्यांचा कारखाना काढला. ते वारल्यानंतर त्यांच्या मुलांनी कॅनिंगचा व्यवसाय सुरू केला, त्यातही त्यांना यश मिळाले. त्यांचे मोरांबे, लोणची, मुरवलेले खाद्यपदार्थ आणि गोळ्यां-सारखे रुचकर पदार्थ आजही तडाखेबंद खपतात. त्याशिवाय 'मालिदो' (हलव्या-सारखा गोड पदार्थ) सारखी खास पारशी पक्वान्ने, 'धन-साकदाळ'सारखे खमंग पदार्थ आज भारतातील इतर जमातींतच नव्हे तर परदेशांतही लोकप्रिय झालेत. 'डिपी'च्या हवाबंद पदार्थांनीही नाव कमावले आहे.

अखिल भारतीय पातळीवर दूधदुभत्याचे उत्पादन करण्यातही पारशांचाच पुढाकार होता. अहमदाबादजवळचे 'आणंद डेअरी फार्म' आणि बंगलोरची डेअरी ह्या कोठावाला बंधूंनी, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारत सरकारसाठी सुरू केल्या.

कोठावालांनी सुरू केलेले हे चांगले उपक्रम पेस्तनजी एदलजी पोलसन (१८७५–१९६२)[१] ह्यांनी पुढे चालू ठेवले. पोलसनचे मूळ आडनाव दलाल होते. पेस्तनजींचा लाडका 'पॉली' प्राणी ह्याच्या नावावरून 'पोलसन' हे व्यवसायाचे नाव ठरवले गेले. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी पोलसन नशीब काढण्यासाठी खेडे सोडून मुंबईत आले. तिथे त्यांनी फ्रेंच कृतीप्रमाणे चिकोरी असलेली कॉफी बनवून पाकिटात घालून विकण्याचा उद्योग सुरू केला. १९१० पर्यंत हा एकहाती उद्योग वाढत जाऊन त्याने प्रथम क्रॉफर्ड मार्केटातील (आताचे फुले मार्केट) काही खोल्या व्यापल्या. मग त्याने 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या इमारतीत आपले बस्तान हलवले. आणि शेवटी तो व्यवसाय जनरल पोस्ट ऑफिसच्या मागील बाजूस स्थिरावला. बोअर युद्ध आणि पहिले महायुद्ध ह्या काळात ब्रिटीश सैन्याला पोलसन्स फ्रेंच कॉफी मोठ्या प्रमाणावर पुरवली जात होती. सैन्याकडूनच चांगल्या प्रतीच्या लोण्याची मागणी येऊ लागली. तेव्हा पोलसननी तेही आव्हान स्वीकारायचे ठरवले. त्यांनी इंग्लंडहून अवजड यंत्र-सामग्री आणवली. त्याचबरोबर त्या यंत्रावर काम करणारे कसबी कामगारही डेन्मार्क-

हून आणले. ह्यातूनच आणंदच्या पोलसन मॉडेल डेअरीचा प्रारंभ झाला. १९४३ सालापर्यंत तिथे दिवसाला १४ लाख किलो बटर बनवले जाई. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात लष्करासाठी भरपूर चीजही बनवले जाई.

दुसऱ्या महायुद्धात पोलसन फ्रेंच कॉफी अमेरिकन सैन्यात इतकी लोकप्रिय झाली की कॉफीचा एवढ्या मोठ्या प्रमाणात पुरवठा करता यावा, यासाठी अमेरिकन सरकारने पोलसनना जागा मिळवून दिली; कॉफी–निर्मितीला आवश्यक ती यंत्रसामग्री आयात करण्याची सुविधा दिली. डबे बनवण्याचा कारखाना उभारता येण्याची व्यवस्था करून दिली; एका दिवसात ३,७०० किलो कॉफी भाजू शकेल असे यंत्रही मिळवून दिले.

पोलसनच्या ह्या कर्तृत्वाची दखल भारत सरकारने १९४५ साली घेतली. सरकारने त्यांना मुंबईच्या 'शुद्ध दूध पुरवठा योजने'चे प्रमुख नेमले. आणंद डेअरीने दररोज ८,००० किलो शुद्ध दूध पुरवून ह्या योजनेचा प्रारंभ केला. १९४६ साली २३,००० किलो दूध मुंबईला पुरवून त्यांनी उच्चांक प्रस्थापित केला. बिहार सरकारच्या विनंतीवरून पोलसननी बिहार राज्यातही मोठ्या डेअरी काढल्या.

पोलसननी सर्व धर्मांच्या धर्मार्थ मंडळांना ४० लाख रुपये दान केले. अनेक गावांतून इस्पितळे उघडली. आणंदालाही 'ख्रिश्चन मिशन हॉस्पिटल' सुरू केले. त्यात एक पारशी वॉर्ड उघडला. खेडा जिल्ह्यात गरिबांसाठी विहिरी खोदल्या.

अनेक पारशी इंजिनियर्स (अभियंता) आणि आर्किटेक्टस (वास्तूशास्त्रज्ञ) बनले होते. त्यांनी बांधकामाच्या व्यवसायातही नाव कमावले होते. त्या सर्वांत नावाजलेले आहेत शापुरजी पालनजी मिस्त्री (१८८७–१९७५)[७]. हे आधुनिक मुंबईचे शिल्पकार आहेत. शापुरजी एका गरीब पारशी कुटुंबात जन्माला आले. १४ व्या वर्षीच त्यांनी 'पालनजी लिटलवूड अँड कंपनी' मध्ये नोकरी धरली. त्यातील त्यांची पहिली कामगिरी होती ती मुंबईच्या चौपाटीवरील फूटपाथ बांधण्याची. नऊ महिन्यांच्या कष्टानंतर त्यांनी २००० रुपये कमावले. कमावत–शिकत त्यांनी हळूहळू स्वतःची कंपनी स्थापन केली. मुंबईतील काही सर्वोत्कृष्ट इमारती त्यांनी बांधल्या. त्यांच्याकडे ५०० इंजीनियर्स आणि अनेक मजूर कामावर होते. १९५० च्या सुमारास त्यांनी भारतातील पहिली रेयॉन गिरणी कल्याणला काढली. त्यांनी व त्यांच्या इंजिनियर्सनी मस्कतला ओमानच्या सुलतानाचा राजवाडा बांधला. कोणत्याही भारतीय कंपनीने तोपर्यंत परदेशात बांधकाम केलेले नव्हते.

एम. एन. दस्तुर (जन्म १९१६)[८] ह्यांनी कलकत्ता येथे 'दस्तुरको' स्थापन केली. त्या पाठोपाठ त्यांनी जर्मनीत ड्युसेलडॉर्फ गावी 'दस्तुर इंजिनियरिंग इंटरनॅशनल जी. एम. बी. एच. स्थापन केली. आंतरराष्ट्रीय कन्सल्टिंग इंजिनियर्स (अभियांत्रिकी

सल्लागार) म्हणून काम करणारी ही पहिली भारतीय कंपनी.

१९३८ ते १९४५ ह्या काळात दस्तुर जमशेटपूरला टाटा आयर्न अँड स्टील कंपनीत नोकरी करीत होते. त्या कंपनीत डयूप्लेक्स प्लँटसंबंधीची कामे करता करताच त्यांनी पोलाद बनवणाऱ्या भट्टयांबद्दलचे (फर्नेस) बरेच ज्ञान मिळवले. नंतर दस्तुर 'मॅसॅच्युसेटस इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी' ह्या संस्थेत दाखल झाले. आणि १९४९ साली त्यांनी त्या संस्थेची डॉक्टरेट मिळवली. पुढची ६ वर्षे त्यांनी निरनिराळ्या अमेरिकन इंजिनियरिंग कंपन्यांतून नोकऱ्या केल्या. अमेरिका, दक्षिण अमेरिका आणि युरोप मध्ये लोखंड व पोलाद प्रकल्पांची कामे केली.

१९५४ साली दस्तुर ह्यांच्या जीवनाला एकदम कलाटणी मिळाली. त्यावर्षी 'मैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स'च्या विकास योजनेसाठी, एका अमेरिकन कंपनीच्या वतीने, सल्लागार म्हणून ते भारतात आले. ह्या वेळी त्यांच्या भारत सरकारच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांशी गाठी-भेटी झाल्या. त्या अधिकाऱ्यांनी त्यांना मायदेशातील पोलाद धंदा वाढवण्याची आवश्यकता पटवून दिली. पंडित नेहरूंशीही त्यांची भेट घडवून आणण्यात आली. आणि, परदेशातील लठ्ठ पगाराची नोकरी सोडून देऊन भारतातच एक, सल्लागार कंपनी सुरू करण्याबाबत पंडितजींनी दस्तुर ह्यांचे मन वळविले. १९५५ साली कलकत्त्यात 'दस्तुरको'ची सुरुवात झाली, तेव्हा तिथे फक्त दोनच माणसे नोकरीला होती. ११६४ पर्यंत कंपनीकडे निरनिराळ्या विषयांतील ८०० तज्ज्ञ माणसे नोकरीला होती. त्यात मेटॅलर्जिस्ट होते, सिव्हील इंजिनियर्स होते, तसेच इलेक्ट्रिकल इंजिनियर्सही होते कंपनीचे सुरुवातीचे पेड-अप भांडवल फक्त दोन लाख होते. ते टप्प्या-टप्प्याने वाढवत ६.७७ लाखापर्यंत आणण्यात आले. कार्यक्षमता टिकवून धरून भांडवल खेळते ठेवणे शक्य व्हावे, ह्या हेतूने हा आकडा कायम राखण्यात आला.

जोरा (ओरिसा) येथील आपला फेरो-मँगॅनिझ प्रकल्प उभा करवण्यासाठी टाटांनी 'दस्तुरको'चीच निवड केली. १९५८ साली भारत सरकारने दस्तुरकोकडे ४ लाख टनाचा 'बोकारो पोलाद प्रकल्प' उभा करण्याबाबतचा पाहणी अहवाल तयार करण्याची कामगिरी सोपवली. दोन वर्षांनी 'दस्तुरको'कडे 'हिंदुस्तान स्टील लिमिटेड'ने आपल्या 'दुर्गापूर अलॉय स्टील' प्रकल्पाचा तपशीलवार अहवाल तयार करण्याचे काम सोपवले. १९६४ साली 'बोकारो पोलाद प्रकल्पा'ची उभारणी करण्यासाठी 'दस्तुरको ने सोव्हिएत सरकारशी सहकार्य केले.

'दस्तुरको' ह्यांची विभागीय कार्यालये दिल्ली (१९५९), मुंबई (१९६१), मद्रास आणि डयुसेलडॉर्फ (१९६९) येथे उघडण्यात आली. सालेम येथील 'अलॉय अन्ड स्पेशल स्ट्रील' प्रकल्प, विशाखापट्टणमचा 'इंटिग्रेटेड पोलाद प्रकल्प', दक्षिण

भारतातील ' मिनी स्टील, स्पाँज आयर्न आणि इतर काही प्रकल्प ह्यांच्या विकासाची गरज लक्षात घेऊन मद्रास येथील कचेरी वाढवण्यात आली.

राष्ट्रसंघ आणि त्याच्या संघटना ह्यांनीही ' दस्तुरको 'चा सल्ला घ्यायला सुरुवात केली. युनो इकॉनॉमिक्स कमिशन फॉर लॅटिन अमेरिका, युनेस्को, यू. एन. इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (युनिड्को) ह्या संघटनांनी लॅटिन (दक्षिण) अमेरिका, भारत, इराण, थायलंड आणि मध्यपूर्वेतील देश ह्या ठिकाणच्या अनेक प्रकल्पांसाठी ' दस्तुरको 'ची मदत घेतली.

' पोलाद प्रकल्पांमुळे वातावरणाचे दूषितीकरण आणि त्याचा प्रतिबंध ' ह्या विषयावर १९७४ साली ' दस्तुरको 'नी एक अहवाल तयार केला. त्यांचा ' लोखंड आणि पोलाद उद्योगां 'वरील एक मोनोग्राफही राष्ट्रसंघाने, विकसनशील देशांतील ह्या व्यवसायाची वाढ व सहकार्य ह्याबाबतचा पायाभूत संदर्भ मानला.

सीलोन (श्रीलंका), मॉरिशस, मोरोक्को, नेपाळ, सीरिया, थायलंड, युगोस्लाव्हिया ह्या देशांच्या सरकारसाठीही दस्तुरकोंनी अनेक पाहण्या केल्या. त्याचप्रमाणे बॉम्बे-बर्मा ट्रेडिंग कार्पोरेशनसारख्या खाजगी संस्थांसाठी काही खास पाहण्या केल्या.

व्यवसाय व उद्योग ह्या क्षेत्रांत काही पारशी स्त्रियांनी नाव कमावले आहे. पेरीन जे. मिस्त्री ही, बहुधा, भारतातील पहिली महिला वास्तुशास्त्रज्ञ. १९३६ साली तिने वास्तुशास्त्राचा अभ्यास पुरा केला; आणि ' मेसर्स मिस्त्री अँड भेदवार ' ह्या आपल्या वडिलांच्या कंपनीत नोकरी पत्करली. कालांतराने ती त्या कंपनीची भागीदार बनली. एअर मार्शल मिनू इंजिनियर ह्यांची पत्नी गूल इंजिनियर, सेलवेल एजन्सीची संचालक आहे. नर्गिस वाडिया[९] ही मुंबईच्या प्रख्यात ' इंटर पब्लिसिटी ' ह्या जाहिरात कंपनीची संस्थापक संचालक आहे. तिचे पतीही त्या कंपनीचे संस्थापक-संचालक आहेत. ह्या कंपनीचा कारभार ती गेली २१ वर्षे सांभाळत आहे. अलीकडेच तिची ' अॅडव्हर्टायझिंग एजेन्सीज असोसिएशन ऑफ इंडिया 'च्या अध्यक्षपदी निवड झाली होती. ह्या संघटनेच्या सदस्य ४९ कंपन्या आहेत. भारतातील ७५ टक्के जाहिराती ह्या कंपन्यांच्यातर्फे दिल्या जातात. नेली सेथना[१०] ही कापडविणाई व त्यावरील डिझाईन्स ह्यात पारंगत आहे. तिनेच अहमदाबादच्या ' नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाइन ' ह्या संस्थेत टेक्सटाईल डिझाइन (कापड डिझाइन) चा विभाग सुरू केला व त्याचा विकास केला. आज नेली ' बॉम्बे डाईंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी 'च्या डिझाइन विभागाची प्रमुख आहे. ' कमलकारी ' ह्या नामशेष होत चाललेल्या आंध्रच्या हस्तकलेचे पुनरुज्जीवन करून ती टिकवण्याच्या उद्योगात ती गढली आहे. आज ही कला आंध्र प्रदेशातील फक्त दोनच ठिकाणी अस्तित्वात आहे.

टाटा कंपन्यांनी नेहमीच स्त्रियांना प्रोत्साहन दिले. त्यांना जबाबदारीच्या जागाही

दिल्या. अशाच स्त्रियांपैकी अगदी सुरुवातीची महिला होती बेहरोझ जे. एम. कर्सेटजी. 'टाटा आयर्न अँड स्टील कंपनी' मुंबई, ह्याची ती तीस वर्षे सेक्रेटरी होती. ती निवृत्त झाल्यावर, जे काम ती एकटी करीत होती, त्या कामांसाठी टाटांना दोन पुरुष नेमावे लागले ! सूना बाटलीवाला टाटा कंपनीत वरिष्ठ अधिकारी होती. पण तिला अपमृत्यू आला. गूल कावसजी गेली २१ वर्षे त्या कंपनीची कायदेविषयक सल्लागार म्हणून काम करीत आहे.

ह्या एकाच प्रकरणात पारशांनी सुरू केलेले व्यापार व उद्योगधंदे, ज्यांच्या विकासाला पारशांनी हातभार लावला, अशी क्षेत्रे सांगणे अशक्यच आहे. त्यांनी ह्या क्षेत्रात सुरुवातीलाच जो प्रमुख भाग घेतला त्याबद्दलच पुरेशी माहिती आतापर्यंत दिली.

१. जे. कावसजी जहांगीर– लाईफ ऑफ सर कावसजी जहांगीर, नाईट सी. एस. आय, लंडन, १८९०, पृष्ठ ८
२. एफ. आर. हॅरीस– जमशेटजी नसरवानजी टाटा, मुंबई (२री आवृत्ती) १९५८, पृष्ठ १०
३. वरील, पृष्ठ १९०
४. वरील, पृष्ठ २५३
५. आर. पी. मसानी ह्यांनी आपल्या एन. एम. वाडिया अँड हिज फाऊंडेशन, मुंबई, १९६१, त्यात पृष्ठ २३ वर उद्धृत केले आहे.
६. पारिसियाना–(संपा.) जहांगीर आर. पटेल, मुंबई, मार्च १९७५, पृष्ठ ३१
७. वरील, पृष्ठ ३२, तळटीप.
८. 'दस्तुरको'– टोटल इंजिनियरिंग लिस्ट ऑफ असाइनमेंट्स (फॉरिन) (परदेशातील कामगिरींची संपूर्ण यादी), प्रकाशक : एन. एम. दस्तुर अँड को. (प्रा.) लिमिटेड, कलकत्ता; एन. डी. त्याशिवाय पाहा–राष्ट्रसंघ–डॉक्युमेंट न. आय. डी./डब्ल्यू. जी. १४६/५०–मे ३, १९०३ (युनिडो) ब्राझिसिलिया (ब्राझिल) येथे १४ ते २१ ऑक्टोबर १९०३ दरम्यान भरलेल्या 'लोखंड आणि पोलाद उद्योगधंद्यावरील तिसरा आंतरराष्ट्रीय परिसंवाद' ह्यात प्रकाशित करण्यात आले.
९. पारिसियाना– मे १९७६, पृष्ठ १९ तळटीप.
१०. वरील, पृष्ठ ४२.

८. व्यवसाय–उद्योग

पारशी लोकांनी भारतातील व्यापार–उद्योगांचा जसा विकास घडवून आणला, तसेच त्यांनी व्यवसायक्षेत्रातही नाव कमावले.

कायद्याच्या क्षेत्राकडे बरेच पारशी आकर्षिले गेले होते. अनेकांनी त्यात पारंगतता मिळवली असली तरी सर दिनशॉ एफ. मुल्ला (१८६८–१९३४) ह्यांच्या तोडीचा दुसरा कायदेतज्ज्ञ पारशांत झाला नाही.

दादाभाई नौरोजी ह्यांच्याप्रमाणेच दिनशॉही नवसारीच्या एका गरीब पारशी पुरोहिताचे चिरंजीव. फर्दुनजी कावसजी मुल्ला हे त्यांच्या वडिलांचे नाव आणि सूनाबाई हे त्यांच्या आईचे नाव. फर्दुनजी हे सर जे. जे. इन्स्टिटच्यूटमध्ये शिक्षक होते. पुढे ते त्या संस्थेचे प्राचार्य झाले. दिनशॉचे शिक्षण अर्थातच त्याच संस्थेत सुरू झाले. पुढे ते मुंबई विद्यापीठाच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून कायद्याचे पदवीधर बनले. १८९५ साली ते सॉलिसिटर झाले. पुढच्याच वर्षी त्यांनी 'मुल्ला अँड हिरालाल' ही स्वतःची कंपनी काढली. तिचेच नाव काही दिवसांनी 'मुल्ला अँड मुल्ला' झाले. आजही ही कंपनी अग्रगण्य सॉलिसिटर कंपनी मानली जाते.

दिनशॉवर सूफी कवींचा खोल प्रभाव पडला होता. वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांनी सूफी कवींच्या 'द सेवंटीफाईव्ह ओडस ऑफ हफीझ (१८९१); शेख सादच्या 'तयबात' (१८९१) आणि अखलाख–ए–मोहसिनी (१८९१) अशा काव्यांची सटीप भाषांतरे प्रसिद्ध केली होती.

१९०० साली दिनशॉनी आपले 'कॉमेंट्री ऑन द कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर' हे पुस्तक प्रसिद्ध केले. ह्या पुस्तकाला तात्काळ यश मिळाले. त्याच्या खास विद्यार्थी–आवृत्तीची मागणी होऊ लागली. दोन खंडांच्या ह्या पुस्तकाची तेरावी आवृत्ती १९६५ साली प्रसिद्ध झाली. १९०० सालीच दिनशॉनी जेरबाई ह्या फर्दुनजी आणि भिकायजी कराका ह्यांच्या कन्येशी विवाह केला.

सर फ्रेडरिक पोलॉक ह्यांच्या सहकार्याने त्यांनी 'इंडियन काँट्रॅक्ट अॅक्ट'वर एक पुस्तक लिहिले. १९०५ साली प्रसिद्ध झालेल्या 'पोलॉक अँड मुल्ला ऑन काँन्ट्रॅक्टस' ह्या पुस्तकाची नववी आवृत्ती १९७२ साली काढण्यात आली. ह्या पुस्तकाने सर्व देशभर प्रसिद्धी मिळवली. त्याच्या पाठोपाठ 'मुल्ला क्लासिक्स' नावाने ओळखले जाणारे

काही उत्कृष्ट दर्जेदार, अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यापैकी प्रिन्सिपल्स ऑफ मोहमेडन लॉ ' (१९०६) हा एक ग्रंथ आहे. त्याची सतरावी आवृत्ती १९७२ साली प्रसिद्ध झाली. ' प्रिन्सिपल्स ऑफ हिंदू लॉ ' (१९१२) हाही त्यापैकीच ग्रंथ. त्याची १४ वी आवृत्ती १९७४ साली निघाली. आणखीही असेच ग्रंथ आहेत.

१९०९ साली मुंबई हायकोर्टातील एक न्यायाधीश सर लॉरेन्स जेन्किन्स (हे पुढे सरन्यायाधीश झाले) ह्यांच्या सांगण्यावरून दिनशॉंनी आपले नाव मुंबई हायकोर्टात वकील म्हणून नोंदवले. ताबडतोब दिनशॉंची नेमणूक ' ट्रायब्यूनल ऑफ अपील 'चे अध्यक्ष म्हणून करण्यात आली. १९२२ साली त्यांची मुंबई हायकोर्टाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर थोड्याच दिवसांनी ते आपल्या वकिलीच्या व्यवसायात परत आले. १९२८ त त्यांना गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्यूटिव्ह कौंसिलचे कायदेमंत्री म्हणून नेमण्यात आले. त्यांना सी. आय. इ. हा बहुमानही देण्यात आला. मुंबईचे ॲडव्होकेट जनरल म्हणून त्यांनी अनेक वेळा काम पाहिले आहे.

दिनशॉंच्या व्यावसायिक कारकिर्दीतील सर्वात मोठा सन्मान त्यांना मिळाला १९३० साली. त्या वर्षी त्यांची निवड इंग्लंडमधील प्रिव्ही कौन्सिलच्या कायदेविषयक समितीचे (ज्युडिशियल कमिटी) सभासद म्हणून झाली. त्याच वर्षी त्यांना ' सर ' हा किताब मिळाला. त्यांनी लंडनमध्येच घर थाटले. ते व त्यांच्या पत्नी ह्यांच्या आतिथ्यशील स्वभावामुळे ते लोकप्रिय झाले. १९३१ साली मुंबई विद्यापीठाने त्यांचा, ' डॉक्टर ऑफ लॉज 'ची सन्माननीय पदवी देऊन, गौरव केला. १९३३ साली त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे ते मायदेशी परत आले आणि १९३४ मध्ये त्यांचे निधन झाले.

पारशी जमातीमधले आणखी एक निष्णात वकील सर जमशेटजी कांगा (१८७५–१९६९). यांचा जन्म सर दिनशॉंच्या जन्मानंतर सात वर्षांनी एका गरीब आणि धार्मिक प्रवृत्तीच्या कुटुंबात झाला. ९४ वर्षांच्या आपल्या प्रदीर्घ जीवनातली ६५ वर्षे त्यांनी मुंबई बारमध्ये काम केले. १९०३ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये वकील म्हणून नाव नोंदवले आणि १९२१ मध्ये, त्यांची अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. १९२३ मध्ये मुंबईचे कायम ॲडव्होकेट जनरल म्हणून नेमणूक झालेले ते पहिले भारतीय होते. पण १९३५ मध्ये त्यांनी स्वेच्छेने या पदाचा त्याग केला आणि ज्या ज्या संकटग्रस्तांना आपल्या सल्ल्याचा व मार्गदर्शनाचा उपयोग होईल अशा लोकांना मदत करण्यासाठी आपले उर्वरित आयुष्य खर्ची घातले. संपत्ति–कर–कायद्यामध्ये ते निष्णात होते आणि त्यावरचा त्यांचा ग्रंथ प्रमाण मानला जातो. मुंबई न्यायालयाच्या परिसरात त्यांच्या उंच शरीरयष्टीचा आणि आनंदी, सौजन्यशील व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव जबरदस्त होता. जीवनात आपण प्रथम एक धर्मगुरू आहोत हे माझ्या मुलाने सतत लक्षात ठेवावे अशी इच्छा त्यांच्या वडिलांनी व्यक्त केली होती.

त्याचे प्रतीक म्हणून ते सदैव डोक्यावर पांढरी पगडी घालत असत आणि खरोखरच आपले हे धार्मिक उत्तरदायित्व सर जमशेटजी कधीही विसरले नाहीत. एका (कनिष्ठ) तरुण वकिलाने त्यांच्याबाबतची आठवण सांगताना म्हटले आहे, सर जमशेटजींच्या चेंबरमध्ये सदैव सूर्यप्रकाशासारखे चैतन्य खेळत असे. आपल्या कनिष्ठ वकिलांना यश मिळाले की त्यांना फार आनंद व्हायचा. स्वत:च्या यशाने ते कधीही चढून गेले नाहीत. त्यांचे वागणे अगदी नम्र आणि निगर्वी असायचे; आणि त्यांच्या स्वभावात एखाद्या बालकाची निष्पाप निरागसता आणि साधेपणा होता. १९५३ मध्ये, मुंबईच्या कायदाविषयक ग्रंथालयामध्ये सरन्यायाधीश एम्. सी. छागला यांनी सर जमशेटजींच्या तैलचित्राचे अनावरण केले. त्यांच्या निधनानंतर मुंबई बार असोसिएशनने (मुंबई वकील संघटना) भरवलेल्या सांत्वनपर सभेत बोलताना सरकारी वकील व्ही. एच्. गुमास्ते म्हणाले, श्री. जमशेटजी आजन्म ब्रह्मचारी असल्यामुळे सांत्वन करण्यासाठी मुले अगर इतर कुटुंबीय आपल्यामागे सोडून गेले नसले तरी निष्णात वकिलांचा प्रचंड परिवार सोडून गेले आहेत. कैक वकील त्यांच्या निधनामुळे पोरके झाले आहेत. हे सर्व वकील त्यांच्या स्मृती मन:पूर्वक जतन करतील."

सर जमशेटजींचे मित्र आणि समकालीन सर नौशेरवान पी. इंजिनियर (१८८४–१९७०) यांनीही वकिली व्यवसायात प्रभुत्व संपादन केले होते. त्यांचा जन्मदेखील एका गरीब पारशी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण आधी वैरामजी जिजीभॉय या धार्मिक संस्थेमध्ये झाले. नंतर एल्फिन्स्टन महाविद्यालयात त्यांनी प्रसिद्ध दक्षिणा फेलोशिप (शिष्यवृत्ती) मिळविली. वकिलीची पदवी मिळविली तरी मुंबई न्यायालयात नाव नोंदवण्याची फी भरण्याइतकीही त्यांची ऐपत नसल्यामुळे उपजीविकेसाठी आणि कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी त्यांनी ॲटर्नीचे काम सुरू केले. त्यांनी ॲटर्नी म्हणून केलेल्या असामान्य कामगिरीने ॲडव्होकेट जनरल सर थॉमस स्ट्रँगमन यांचे लक्ष वेधून घेतले, आणि त्यांनी सर नौशेरवानना १९२२ मध्ये मुंबई न्यायालयात काम सुरू करायला भाग पाडले. १९३६ मध्ये त्यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. परंतु २ वर्षांच्या आतच त्यांनी पुन्हा वकिली करण्यासाठी त्या पदाचा राजिनामा दिला. १९४२ मध्ये त्यांची मुंबईचे ॲडव्होकेट जनरल म्हणून नेमणूक झाली. १९४५ मध्ये 'सर' हा किताब देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आणि त्यानंतरची ५ वर्षे ते महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरलच्या पदावर होते. त्या काळी गाजलेल्या आझाद हिंद फौज खटल्यामध्ये त्यांनी ब्रिटिशांचे वकीलपत्र घेतले. तरीही ज्या भारदस्तपणाने आणि नि:पक्षपातीपणाने त्यांनी हे खटले चालवले त्याचा त्यांच्या विरोधकांनीही कृतज्ञतेने व कौतुकाने उल्लेख केला आहे. सर नौशेरवाननी स्वत:चे मत कटु शब्दांत असे व्यक्त केले होते. "ज्यावेळी अप्रिय

तत्त्वांना (कारणांना/उद्दिष्टांना) अत्यंत अयोग्य प्रकारची अमाप लोकप्रियता लाभते, तेव्हा वकिली–व्यवसायाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची वेळ येते." सर नौशेरवान एक सुसंस्कृत आणि परोपकारी गृहस्थ होते. त्यांना खेळांची आवड होती. त्यांतही क्रिकेट आणि टेनिस या दोन प्रिय खेळांमध्ये त्यांचे विशेष प्रावीण्य होते. स्वतः दारिद्र्याशी झगडून वर आल्यामुळे गरीब मुलांविषयी त्यांना कळकळ वाटत असे. अशी मुले जिथे राहून उत्तम शिक्षण घेऊ शकतील अशी एखादी संस्था स्थापन करण्याची त्यांना नितान्त आवश्यकता वाटे. १९६० ते १९७० या त्यांच्या अखेरच्या १० वर्षांत त्यांना संधिवाताचा असह्य त्रास झाला आणि विलक्षण शारीरिक यातना सोसाव्या लागल्या. तरी देखील त्यांच्या चालू खटल्यांची भाषणे ते न्यायालयात उभे राहून करीत असत. मृत्यूच्या ११ महिने आधी ते एका अपघातात सापडले. त्यानंतर मात्र ते अंथरुणाला खिळून होते. त्या काळात त्यांना क्लेशही अतोनात झाले. अखेर मृत्यूनेच त्यांची त्या यातनांमधून सुटका केली.

समकालीन निष्णात कायदे–पंडितांमध्ये अग्रगण्य स्थान मिळवलेले आणखी दोघे म्हणजे होरमसजी एम्–सीरवाई (जन्म १९०६) आणि नानी ए. पालखीवाला (जन्म १९२०).

होरमसजींचे आजोबा नवसारीचे नसेरवानजी सीरवाई १९ व्या शतकात बडोदा संस्थानचे राजवैद्य होते आणि त्यांची आई सुरतेच्या शिल्पकार वाडिया घराण्यातली होती. त्यांच्यामधली चिकाटी आणि बुद्धिमत्ता होरमसजींच्या कार्यामध्ये व निष्कलंक चारित्र्यामध्ये आढळून येते. मुंबई विद्यापीठातून त्यांनी कायदा आणि तत्त्वज्ञान या विषयांमध्ये पदवी मिळवली आणि १९३२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून कामाला सुरुवात केली. १९३९ ते १९४३ पर्यन्त ते मुंबई विद्यापीठाच्या एल्-एल्. बी. प्रथम वर्षाच्या परीक्षेच्या परीक्षक मंडळाचे अध्यक्ष आणि परीक्षक होते. १९६९ मध्ये सरकारी कायदा महाविद्यालयामध्ये सन्माननीय प्राध्यापक (ऑनररी प्रोफेसर) म्हणून त्यांची नियुक्ती झाली. काही काळ ते मुंबईचे ॲडव्होकेट जनरल होते आणि नंतर १९५७ ते ७४ पर्यन्त महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल देखील होते. दिल्लीमध्ये भरलेल्या चौथ्या आणि एडिंबरो येथे भरलेल्या पाचव्या राष्ट्रकुटुंबीय कायदा परिषदांमध्ये (कॉमनवेल्थ लॉ कॉन्फरन्सेस्) त्यांनी भाग घेतला. विशेषतः एडिंबरोच्या परिषदेमधल्या 'द प्लेस ऑफ लॉ ऑफिसर्स अँड मिनिस्टर्स ऑफ जस्टिस' (कायदा–अधिकारी आणि न्यायमंत्री यांचे स्थान) या विषयावरच्या त्यांच्या भाषणाची अतोनात प्रशंसा झाली. त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांमध्ये भारतीय घटनात्मक कायद्यावरची बरीच पुस्तके आहेत. 'कॉन्स्टिटयूशनल लॉ ऑफ इंडिया' (भारतीय घटनात्मक कायदा) हा त्यांचा अभ्यासपूर्ण ग्रंथ १९६७ मध्ये प्रथम

प्रकाशित झाला. १९६८ मध्ये त्याची पुन्हा आवृत्ती निघाली आणि १९७५–७६ मध्ये त्याची सुधारून वाढवलेली आवृत्ती दोन खंडांमध्ये प्रसिद्ध झाली. भारतीयच नव्हे तर परदेशी टीकाकारांनी सुद्धा या विषयावरचा हा असामान्य आणि प्रमाणग्रंथ असल्याचा निर्वाळा दिला आहे. अलीकडील घटनांच्या घटनात्मक बाजूचे विवेचन करणारा तिसरा खंड १९७९ मध्ये प्रसिद्ध झाला. "फेडरॅलिझम् इन इंडिया" या त्यांच्या पेपरचा मेक्सिको विद्यापीठाच्या विनंतीवरून स्पॅनिश अनुवाद करण्यात आला आणि त्या विद्यापीठानेच तो प्रसिद्ध केला. "द इमर्जन्सी, फ्यूचर सेफगार्ड्स् अँड द हेबियस कॉर्पस अ‍ॅक्ट" हे त्यांचे पुस्तक १९७८ साली प्रसिद्ध झाले. या पुस्तकात १९७५ ते ७७ मधल्या देशातल्या आणीबाणीवर टीका केली आहे. १९७९ मध्ये, मुंबई विद्यापीठाने सर चिमणलाल मेटलवाड व्याख्यानमालेत भाषण देण्यासाठी त्यांना पाचारण केले. "भारतीय घटनेमध्ये न्याय-व्यवस्थेचे स्थान" हा त्यांचा विषय होता. ही व्याख्याने मुंबई विद्यापीठाने प्रसिद्ध केली आहेत. १९७२ मध्ये राष्ट्रपतींनी त्यांना पद्मविभूषण ही पदवी देऊन सन्मानित केले. कायदा आणि तत्त्वज्ञान या विषयांत तर त्यांना रस आहेच पण त्याखेरीज इंग्रजी वाङ्मयाचीही त्यांना उत्कट आवड आहे. इंग्रजी भाषेतल्या महान साहित्यिकांच्या साहित्यातल्या आणि काव्यांतल्या ओळींच्या ओळी त्यांना मुखोद्गत असून त्या मधूनमधून आप्तेष्टांना ऐकवण्याची त्यांना हौस आहे

होमी सीरवाई भारतीय घटनात्मक कायद्यात तज्ज्ञ आहेत तर नानी पालखीवाला आयकर कायद्यात निष्णात आहेत. त्यांचा सर्वांत प्रमुख ग्रंथ "द लॉ अँड प्रॅक्टिस ऑफ इन्कम–टॅक्स" (सातवी आवृत्ती १९७६, पुनर्मुद्रण १९७७) हा आहे. नानींचा जन्म एका गरीब पारशी कुटुंबात झाला. मुंबई विद्यापीठातून इंग्रजी (ऑनर्स) मध्ये पदवी घेतल्यानंतर १९४३ व ४४ मध्ये एल्‌एल्. बी. च्या दोन्ही परीक्षांमध्ये आणि १९४६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या अ‍ॅडव्होकेट (ओरिजिनल साईड) परीक्षेमध्येही ते सर्व प्रथम आले. ते सरकारी महाविद्यालयात कायद्याचे प्राध्यापक होते. तसेच विद्यापीठामध्ये कायद्याचे 'टागोर–प्राध्यापक' हे मानाचे पद त्यांना मिळाले होते. नानींना इतरही अनेक सन्मान मिळालेले आहेत. १९५५ मधल्या पहिल्या तसेच १९५८ मधल्या भारतीय कायदा आयोगाचे ते सभासद होते. १९७५ मध्ये, न्यूयॉर्कच्या अ‍ॅकॅडमी ऑफ पोलिटिकल सायन्सचे सन्माननीय सभासद म्हणून त्यांची निवड झाली आणि त्यानंतर ३ वर्षांनी १९७८ मध्ये त्यांना प्रिन्सटन् विद्यापीठाने एल्‌-एल्. बी. ची सन्माननीय पदवी बहाल केली. मार्च १९७७ मध्ये जनता सरकार सत्तेवर आल्यावर नानींची भारताचे अमेरिकेतील राजदूत म्हणून नियुक्ती झाली. ते टाटा सन्स लिमिटेडचे वरिष्ठ संचालक, टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह कंपनीचे

(टेल्को) आणि टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचे (टिस्को) आहेत. अध्यक्ष तसेच असोसिएटेड सिमेंट कंपनी (ए. सी. सी.) या भारतातल्या सर्वात मोठ्या सिमेंट तयार करणाऱ्या उद्योगसमूहाचेही ते अध्यक्ष आहेत. इतकेच नव्हे तर व्होल्टाज लिमिटेड या भारतातल्या सर्वात मोठ्या व्यापारी संस्थेचे अध्यक्षदेखील नानीच आहेत. पाकिस्तानने कच्छमधल्या काही प्रदेशावर आपला हक्क असल्याचा दावा केला होता. त्याबाबत संयुक्त राष्ट्रांनी जे खास लवाद–मंडळ नेमले होते, त्यापुढे भारताचे कायदेशीर प्रतिनिधित्व नानींनी केले होते (१९६४–६७). पाकिस्तानच्या दाव्यापैकी ९० टक्के भूभागावरचा त्यांचा दावा फेटाळण्यात आला. बांगला देश अस्तित्वात येण्यापूर्वी पाकिस्तानी विमानांना भारतीय भूप्रदेशावरून उड्डाण करण्याची सवलत भारत सरकारने नाकारली, तेव्हा पाकिस्तानने भारत सरकारविरुद्ध मॉंट्रियलच्या आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेकडे या बाबतीत तक्रार केली. त्यावेळी देखील भारताची बाजू नानींनीच मांडली होती. आणीबाणीच्या काळात व्यक्तीच्या मूलभूत हक्कांसाठी त्यांनी कित्येक वेळा आवाज उठवला. आयकरावरच्या त्यांच्या प्रमाणग्रंथाखेरीज, हार्वर्ड विद्यापीठाने जागतिक कर–मालेमध्ये प्रसिद्ध केलेल्या "टॅक्सेशन इन इंडिया" या ग्रंथाचे ते (संयुक्त) सह–लेखक आहेत." द हायेस्ट टॅक्सड् नेशन" या त्यांच्या पुस्तकात भारतीय करयंत्रणेचा सखोल अभ्यास केलेला आहे तर "अवर कॉन्स्टिटयूशन–डीफेस्ड अँड डी–फाईल" या पुस्तकात त्यांनी भारतीय घटनेची मूलभूत अंगे आणि त्यात अलीकडे केलेल्या सुधारणांचे सविस्तर विवेचन केलेले आहे. भारतीय इतिहासामध्ये १९७७ मध्ये श्री. जयप्रकाश नारायण यांनी जी अभूतपूर्व कामगिरी केली तिच्या स्मरणार्थ नानींनी जून १९७७ मध्ये जय-प्रकाश नारायण संस्था स्थापन केली. "द लॉ अँड प्रॅक्टिस ऑफ इन्कमटॅक्स" या त्यांच्या सर्वात प्रसिद्ध पुस्तकाच्या सातव्या आवृत्तीचा संपूर्ण नफा ५ लाख ३० हजार रुपये नानींनी या संस्थेला दान केला.

तरुण पिढीमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव मिळविणाऱ्या वकिलांमध्ये फली एस्. नरीमन (जन्म १९२९) आणि सोली जे. सोराबजी (जन्म १९३०–) यांचा उल्लेख करणे प्रस्तुत होईल.

फली यांचा जन्म रंगूनला झाला असला तरी त्यांचे शिक्षण भारतात झाले. त्यांनी आधी अर्थशास्त्र आणि इतिहास या विषयांत पदवी घेतली आणि नंतर मुंबई विद्या-पीठाची कायद्याची पदवी मिळविली. नानी पालखीवालांप्रमाणेच ते देखील एल्एल्. बी. च्या दोन्ही वर्षांच्या परीक्षांमध्ये सर्वप्रथम आले. त्यांनी रोमन लॉ आणि ज्यूरिस-प्रुडन्स (सर्वसाधारण कायदेशास्त्र) या विषयांसाठी असलेले किनलॉक सुवर्णपदक जिंकले आणि इतरही बरीच बक्षिसे पटकावली. १९५० मध्ये ते बार कौन्सिल

अॅडव्होकेट परीक्षेमध्येही पहिले आले, आणि त्यांना सर चिमणलाल सेटलवाड रौप्य-महोत्सव–स्मृति–पारितोषिक मिळाले. त्याच वर्षी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे वकील म्हणून आणि पुढे १९५८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे वकील म्हणून नाव नोंदवले. मार्च १९७१ मध्ये, मुंबईच्या प्रमुख आणि इतर न्यायमूर्तींनी त्यांना सर्वोच्च न्यायालयातले वरिष्ठ वकील म्हणून मान्यता दिली. मे १९६२ मध्ये त्यांची भारताचे अॅडिशनल सॉलिसिटर म्हणून नियुक्ती झाली. पण जून १९७५ मध्ये तत्कालीन पंत-प्रधान इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर करण्यापूर्वी काही महिने, त्यांना पदाच्या जबाबदारीतून मोकळे करण्याची विनंती त्यांनी केली. १९७१ मध्ये दिल्लीला भरलेली राष्ट्रकुटुंबीय कायदा–परिषद, १९७४–७५ मध्ये दिल्लीला व १९७६ मध्ये माद्रिदला भरलेली आंतरराष्ट्रीय कायदा–संघटनेची परिषद, तसेच १९७६ मध्ये स्टॉकहोम येथे झालेली आंतरराष्ट्रीय बार असोसिएशनची परिषद–अशा अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये त्यांनी भाग घेतला. १९७८ मध्ये मेक्सिको शहरात भरलेल्या सहाव्या आंतरराष्ट्रीय लवाद निवाडा कॉंग्रेसच्या पहिल्या कार्यकारी अधि-वेशनाचे ते अध्यक्ष होते. १९७५ पासून ते भारतीय बार असोसिएशनच्या उपाध्यक्ष-पदावर आहेत. १९५६ मधल्या कंपनी कायद्याच्या आणि १९६९ च्या मक्तेदारी आणि मर्यादित–व्यापारी–व्यवहार–कायद्याच्या अंमलबजावणीचा फेरविचार करण्या-साठी, जून १९७७ मध्ये भारत सरकारने जी तज्ज्ञ–समिती नेमली होती, तिचे सभासद म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. १९५८ च्या चौकशी कायद्याच्या आयोगाच्या अधिकारात मे १९७८ मध्ये सरकारने नेमलेल्या भारतीय वृत्तपत्र आयो-गाचेही ते सभासद आहेत. फली यांनी अनेकदा आकाशवाणी तसेच दूरचित्रवाणीवरच्या अनेक चर्चांमध्ये भाग घेतला आहे व मुलाखतीही दिल्या आहेत. अशा अनेक प्रसंगी त्यांनी अगदी निःपक्षपाती दृष्टिकोनातून सामान्य माणसाला समजेल अशा प्रकारे सरकारी धोरणांचे स्पष्टीकरण दिले आहे.

सोली सोराबजी यांचा जन्म एका मध्यमवर्गीय पारशी कुटुंबात झाला. त्यांनी मुंबई विद्यापीठातून १९५० मध्ये अर्थशास्त्राची आणि १९५२ मध्ये कायद्याची पदवी मिळवली. त्यावेळी त्यांनीदेखील फली नरीमन यांच्याप्रमाणेच रोमन लॉ आणि ज्युरिसप्रुडन्स यामधल्या प्रावीण्याबद्दल, किनलॉक फॉर्बेस सुवर्णपदक जिंकले होते. १९५३ मध्ये त्यांनी वकिली सुरू केली आणि त्यानंतर कित्येक वर्षांनी, म्हणजे १९७१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील म्हणून नाव नोंदवले. नागरी स्वातंत्र्याच्या आणि मूलभूत हक्काच्या त्यांच्या आग्रही समर्थनाबद्दल सोलींची ख्याती आहे. विशेषतः आणीबाणीच्या काळात वृत्तपत्र–स्वातंत्र्यासाठी त्यांनी लढा दिला, तसेच त्यावेळी अकारण तुरुंगात टाकलेल्या लोकांच्या सुटकेसाठी स्वतःची फीसुद्धा न

घेता, सोली विनामूल्य झगडले. जनता सरकार सत्तारूढ झाल्यानंतर १९७७ च्या एप्रिलमध्ये ॲडिशनल सॉलिसिटर जनरल म्हणून आणि नंतर १९७९ च्या ऑगस्ट-मध्ये सॉलिसिटर जनरल म्हणून त्यांची नियुक्ती झाली. 'द लॉ ऑफ प्रेस सेन्सॉर-शिप इन इंडिया' (१९७६) आणि 'द इमर्जन्सी, सेन्सॉरशिप ॲंड द प्रेस इन इंडिया' (१९७५–७७) ही दोन पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. ते बार असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आहेत. १९७८ च्या सप्टेंबरमध्ये मानवी हक्कांच्या विकासासाठी आणि संरक्षणासाठी असलेल्या राष्ट्रीय आणि स्थानिक संस्थांसंबंधी संयुक्त राष्ट्रांनी जिनीव्हा इथे जो परिसंवाद आयोजित केला होता, त्याला गेलेल्या भारतीय शिष्टमंडळाचे ते सभासद होते.

पारशांच्या कित्येक पिढ्या त्यांच्या समाजकार्याबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांच्यापैकी दोन प्रमुख सामाजिक कार्यकर्ते आहेत सर रुस्तम मसानी (१८७६–१९६६) आणि डॉ. जाल वलसारा (जन्म १८९९).

रुस्तम मसानी हे एका मध्यमवर्गीय पारशी कुटुंबाचे सहावे अपत्य. पाणीदार डोळे असलेले रुस्तम हरहुन्नरी होते. त्यांनी मुंबईतील आपल्या शाळा–महाविद्यालयांत आपल्या बुद्धीची चमक दाखविली कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी मुंबई महा-नगरपालिकेत दरमहा १०० रुपये पगाराची कारकुनाची नोकरी पत्करली. १९०२ साली त्यांची ऑफिस मॅनेजर म्हणून बढती झाली आणि ते मनीजेह वाडिया ह्या जहाज बांधणाऱ्या प्रसिद्ध वाडिया कुटुंबातील तरुणीशी विवाह करू शकले. चळवळ्या व महत्त्वाकांक्षी रुस्तमला मनीजेह ही अनुरूप पत्नी मिळाली. १९०८ साली रुस्तमची पालिका-सचिव म्हणून कायम नेमणूक झाली.

सर फिरोझशाह मेहेता ह्यांच्या सांगण्यावरून रुस्तमनी 'इंडेक्स टु प्रोसिडिंग्ज (१८७३ ते १९१२)' ही महापालिकेच्या बैठकीची सूची व नंतर, 'ए हॅंडबुक ऑन लॉ ॲंड प्रोसिजर ऑफ द कार्पोरेशन' अशी दोन पुस्तके प्रसिद्ध केली. ती आजही प्रचलित आहेत. १९१९ साली रुस्तमची नेमणूक दुय्यम महापालिका आयुक्त म्हणून करण्यात आली. १९२२ त त्यांना महापालिका आयुक्त नेमण्यात आले. ह्या महत्त्वाच्या पदावर नेमले जाणारे ते पहिले भारतीय तसेच पहिलेच बिगर आय. सी. एस. अधिकारी. महापालिकेतील आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत रुस्तमनी दोन महत्त्वाच्या सुधारणा केल्या. पहिली होती मतदान-हक्काचा विस्तार आणि दुसरी–म्युनिसिपल कमिटीची सुधारणा.

महापालिका आयुक्त म्हणून नेमणूक झाल्यावर काही महिन्यांनीच रुस्तमनी आपल्या पदाचा व नोकरीचा राजीनामा दिला. त्यांना 'सेंट्रल बॅंके'चे कार्यकारी संचालकत्व देण्यात आले होते. बॅंकिंग व्यवहाराचा अभ्यास करण्यासाठी त्यांना लंडनला पाठविण्यात

आले. तिथून परतल्यावर त्यांना सेंट्रल बँकेचे कार्यकारी संचालक नेमण्यात आले. १९२५ ते १९२८ ही तीन वर्षे हे पद त्यांनी सांभाळले.

पुढची दहा वर्षे रुस्तमनी साहित्यिक कामगिरी आणि सामाजिक सुधारणा ह्यांत घालवली. एच. डब्ल्यू. ब्रायंट ह्यांच्या सहकार्याने रुस्तमनी 'बॉम्बे व्हिजिलन्स असोसिएशन 'ची स्थापना केली. त्यामुळे १९२३ व १९३८ सालातील बॉम्बे प्रिव्हेन्शन ऑफ प्रॉस्टिटट्यूशन ' हे कायदे अस्तित्वात येऊ शकले. त्यानंतर रुस्तमनी ' सोसायटी फॉर द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन इन वेस्टर्न इंडिया ' (पश्चिम भारतातील मुलांच्या संरक्षणासाठी संस्था) स्थापन केली. त्यात त्यांचे सहकारी होते. सर जॉन वॉर्डलॉ मिस्ने. रुस्तमनी सुरू केलेल्या ' बॉम्बे अॅडल्ट एज्युकेशन सोसायटी ' (मुंबई प्रौढ साक्षरता संस्था)चे कार्य आजही जोरात चालू आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रुस्तमना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू नेमण्यात आले. त्या काळात त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या. १९४१ साली पहिलीच ' गुजरात प्राग ऐतिहासिक मोहीम ' सुरू झाली. ह्या मोहिमेला सरकारने पैसे देण्याचे नाकारले. तेव्हा रुस्तमनी ' टाटा एज्युकेशन ट्रस्ट 'ला ह्या मोहिमेला पैसे द्यायची विनंती केली. त्यामुळे गुजरातेत इतिहाससंशोधनाची परंपरा सुरू झाली. ह्या परंपरेतूनच काही अत्यंत चांगले शोध लागू शकले.

' नॅशनल वॉर फ्रंट (राष्ट्रीय युद्ध आघाडी) चे ते प्रमुख होते. ' ग्रो मोअर फूड ' (अधिक धान्य पिकवा) मोहिमेचे ते अध्यक्ष होते. ह्या दोन्ही भूमिकांतून त्यांनी भरपूर काम केले. १९४४ साली त्यांनी मुंबई विद्यापीठात ' इंटरनॅशनल फेलोशिप अँड अंडरस्टॅंडिंग ' (आंतरराष्ट्रीय भ्रातृभाव व सामंजस्य) ह्याचा अभ्यासक्रम आयोजित केला होता. ' इंडियन इन्स्टिटट्यूट फॉर एज्युकेशनल अँड कल्चरल को–ऑपरेशन ' ह्या संस्थेची स्थापना करावी; तीत भारतातील सर्व भागांतील, सर्व थरांतील स्त्री-पुरुष एकत्र येऊन समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी काम करतील, असे त्यांचे एक स्वप्न होते. परंतु ते प्रत्यक्षात उतरू शकले नाही. मात्र, इतिहास, नागरिकशास्त्र, साहित्य, भूगोल आणि गणित ह्या विषयांच्या शालेय पाठ्यपुस्तकांत जागतिक नागरिकत्वाचे पाठ कसे देता येतील ह्या विषयांवर रुस्तमकडून लेखमाला लिहून घेण्यात आली. नंतर ह्या लेखांचे पुस्तकही काढण्यात आले. ' युनेस्को 'च्या मदतीने काढण्यात आलेल्या ह्या पुस्तकाचे नाव होते– ' एज्युकेशन फॉर वर्ल्ड अंडरस्टॅंडिंग ' (१९५४). १९७० साली हारवर्ड विद्यापीठ (अमेरिका) ह्यांनी त्या पुस्तकाची स्वस्त आवृत्ती काढली, हा त्या पुस्तकाच्या उपयुक्ततेचा पुरावाच म्हटला पाहिजे.

१९३० ते ३६ ही सहा वर्षे रुस्तम रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचे अध्यक्ष होते. त्या सोसायटीने रुस्तमना रौप्यपदक सादर केले; तो रुस्तमच्या जीवना-

तील सुवर्णाक्षराने लिहिण्याजोगा दिवस होता.

रुस्तम सिद्धहस्त (prolefic) लेखक होते. त्यांनी गुजराती भाषेत पाच कादंबऱ्या लिहिल्या. दोन शालेय पाठपुस्तके लिहिली आणि नंतर ' चाइल्ड प्रोटेक्शन ' हे आपले इंग्रजीतील पहिले पुस्तक प्रसिद्ध केले. त्यांच्या गुजराती कादंबऱ्या विनोदी आहेत. त्यातील ' बोघलू ' आणि ' अॅबिसिनियानो हबसा ' ह्या आजही वाचनीय वाटतात. चंद्रा चाल, रझिया बेगम आणि भाई–के भर्तार ह्या कादंबऱ्यांत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील जीवनाचे वास्तव चित्रण आढळते. त्यांच्या ' फोकलोर ऑफ वेल्स ' (विहिरीच्या लोककथा) ह्या पुस्तकाने देशात बरीच खळबळ उडवून दिली होती. त्या पुस्तकाचे १९३१ साली ' रेव्हचू द लहिस्तोरे द रिलिजां ' ह्या नावाने फ्रेंचमध्येही भाषांतर करण्यात आले. फरिद–उद–दिन अत्तारच्या ' कॉन्फरन्स ऑफ बर्डस 'चा त्यांनी केलेला संक्षिप्त अनुवाद (१९२४) परदेशातही गाजला. सूफीवादावरील पाठपुस्तक म्हणून ते जीनिव्हा विद्यापीठात नेमण्यात आले. हॉलंडच्या ' सेखीर पब्लिशिंग ' कंपनीने तिचे डच भाषेत भाषांतर प्रसिद्ध केले. जर्मनीतही ते पुस्तक अभ्यासिले गेले. त्यांचे ' कोर्ट पोएटस ऑफ इंडिया अँड इराण ' (१९३८) लोकप्रिय झाले; तसेच ' झोराष्ट्रियानिझम– द रिलिजन ऑफ द गुड लाईफ (१९५४) ह्याही पुस्तकाला लोकप्रियता मिळाली. परंतु रुस्तमचे सर्वात गाजले ते पुस्तक म्हणजे १९३९ मध्ये प्रसिद्ध झालेले दादाभाई नौरोजी हे चरित्र. १९६० साली त्यांनी ' ब्रिटन अँड इंडिया ' हे नि:पक्षपाती निरीक्षणपूर्वक लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध केले. हे पुस्तक भारताप्रमाणेच परदेशातही गाजले. त्यांनी ह्यापूर्वी लिहिलेली ' इव्होल्यूशन ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन बॉम्बे ' आणि ' हिस्टरी ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट ' ही दोन्ही अभ्यासपूर्ण पुस्तके आजही त्या त्या विषयावरीज संदर्भग्रंथ गणले जातात.

' के. आर. कामा ओरिएंटल इन्स्टिटयूट ' ह्या १९१२ साली स्थापन झालेल्या संस्थेचे रुस्तम हे पहिले मानद सचिव होते. रुस्तमनी ही संस्था भक्कम आर्थिक पायावर उभी केली. ते त्या संस्थेच्या कार्यकारिणीचे (गव्हर्निंग बॉडी) सदस्य होते, तसेच तिचे एक विश्वस्तही होते.

आयुष्याच्या अखेरीपर्यंत रुस्तम कार्यमग्न होते. वयाच्या ९१ व्या वर्षी ते वारले.

डॉ. जाल बलसारा (जन्म १८९९) हे दुसरे अग्रगण्य समाजकार्यकर्ते. त्यांचा जन्म गुजरातेतील वलसाड गावचा. १९१७ साली मॅट्रिकची परीक्षा पास होईपर्यंत ते त्या गावात राहिले. नंतर संस्कृत आणि इंग्रजी ह्या विषयात मुंबई विद्यापीठाची पदवी त्यांनी मिळविली. १९२१ साली त्यांनी जे. जे. झारतोष्टी मद्रसा ह्या संस्थेची आवेस्ता आणि पहेलवी भाषा ह्या विषयांतील पदविकाही संपादन केली. १९२४ साली ते वकील झाले आणि १९२५ साली ते समाजशास्त्राच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी

इंग्लंडला रवाना झाले. तिथे त्यांनी डॉक्टरेट मिळविली आणि १९३० साली ते मायदेशी परतले. परतल्यावर त्यांची पारशी पंचायतीचे संयुक्त चिटणीस म्हणून नेमणूक करण्यात आली.

पंचायतीचे काम जालनी अकरा वर्षे केले. त्या काळात त्यांनी पंचायतीत अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी एक मध्यवर्ती नोंदवही तयार केली. समन्वय समित्या स्थापन केल्या, आणि अल्प खर्चाच्या घरबांधणीबाबतचा एक अहवालही तयार केला. त्या अहवालाच्या आधारेच पंचायतीने गरीब पारशांसाठी गामाडिया आणि कॅप्टन ह्या वसाहती बांधण्याच्या कामाला पैशांची मदत दिली. पंचायतीतर्फे 'सामाजिक सल्लामसलत' आणि 'कुटुंबनियोजन' ही कामेही जालनीच सुरू केली.

१९४१ साली जाल मुंबई महानगरपालिकेचे दुय्यम आयुक्त बनले. त्यांनी शहरात आवश्यक असलेल्या अनेक सुधारणा घडवून आणल्या. तशा कर्मचाऱ्यांसाठीही अनेक कल्याणकारी योजना आखल्या. 'बॉम्बे सिटिझनशिप सेरीज' ही निरनिराळ्या तज्ज्ञांनी लिहिलेली लेखमाला जालनी संपादित केली. त्यातील 'बॉम्बे, द सिटी इन द मेकिंग (१९४८)' ही पुस्तिका त्यांनी स्वतःच लिहिली होती.

१९४८ साली अभ्यासपाहणीसाठी जाल परदेश दौऱ्यावर गेले होते. त्यांनी पश्चिम युरोप आणि अमेरिका ह्यातील ३२ शहरांना भेटी दिल्या. एका वर्षाने परतल्यानंतर त्यांनी आपल्या पाहणीचा अहवाल मुंबई महानगरपालिका आयुक्तांना सादर केला.

१९४९ साली राष्ट्रसंघाच्या सामाजिक खात्यातर्फे (सोशल अफेअर्स ब्युरो) जालची आशिया व अतिपूर्वेचे प्रतिनिधी म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांची मुख्य कचेरी बँकॉक इथे होती. राष्ट्रसंघाचे कल्याणकारी कार्यक्रम आयोजित करणे आणि परदेशात शिक्षण घेण्यासाठी राष्ट्रसंघाच्या फेलोशिप्स व शिष्यवृत्त्यांसाठी योग्य माणसे निवडणे ह्यासाठी निरनिराळ्या आशियाई राष्ट्रांशी संपर्क राखणे, ह्या कामासाठी प्रादेशिक प्रतिनिधी निवडण्याची राष्ट्रसंघाची ही पहिलीच वेळ होती. १९५२ साली राष्ट्रसंघाने ब्रह्मदेश सरकारसाठी एक 'सोशल सर्व्हिस मिशन' नेमले. त्याचे अध्यक्ष म्हणून जालचीच नेमणूक केली. १९५३ साली जालनी त्या कामाचा आपला अहवाल सादर केला. त्या अहवालाने प्रभावित होऊन ब्रह्मदेश सरकारने राष्ट्रसंघाला जालना आपले समाजकल्याण सल्लागार नेमण्याची विनंती केली. अहवालात सुचवलेल्या योजना अमलात आणण्यासाठी जालचा उपयोग होणार होता. १९५७ साली जालनी राष्ट्रसंघाची नोकरी सोडून दिली आणि ते मायदेशी परतले, तेव्हा त्यांची नेमणूक केंद्रीय समाज कल्याण मंडळाचे सदस्य म्हणून झाली. नंतर ते त्या मंडळाचे वरिष्ठ सल्लागार बनले.

१९६० साली जालनी योजना समितीवरही काम केले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत समाजकल्याण कार्याची जी योजना मांडण्यात आली होती, तिची आखणी जालनीच केली होती. गलिच्छ वस्ती निर्मूलन गटाचे ते अध्यक्ष होते. १९६१ साली त्यांनी शहर विकास समस्यांवर एक अहवाल सादर केला. तो 'प्रॉब्लेम्स ऑफ रॅपिड अर्बनायझेशन इन इंडिया' ह्या नावाने १९६४ साली प्रसिद्ध करण्यात आला. त्याच्या आदल्याच वर्षी (१९६३) जालनी 'बॉम्बे सिव्हिल ट्रस्ट'ची स्थापना केली होती. त्याचे ते १९७३ पर्यंत संचालक होते. मुंबईसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरांच्या समस्यांचा अभ्यास ह्या ट्रस्टने केला. जालनी लिहिलेल्या 'मास अँड अॅडल्ट एज्युकेशन इन इंडिया' ह्या पुस्तिकेने सर रुस्तम मसानी ह्यांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यातून 'बॉम्बे अॅडल्ट एज्युकेशन असोशिएशन'ची निर्मिती झाली. पुढे ती एक अखिल भारतीय संस्था बनून गेली.

डॉ. जे. कुमारप्पांच्याबरोबर जालनी इंडियन कौंसिल ऑफ सोशल वेल्फेअरची १९४६ त स्थापना केली पुढे ही संस्था इंटरनॅशनल कौंसिल फॉर सोशल वेल्फेअरशी संलग्न करण्यात आली. ह्या राष्ट्रीय संघटनेच्या सुरुवातीपासूनच जाल तिचे मानद सहचिटणीस आहेत.

बडोद्याच्या एम. एस. विद्यापीठाचे जाल हे व्हिजीटिंग प्रोफेसर आहेत आणि वेल्स देशातील स्वान्सिया शहरातील युनिव्हर्सिटी कॉलेजचे ते लेवरशुल्म फेलो आहेत.

समाजकार्यात पारशी स्त्रियांनीही महत्त्वाचा वाटा उचललेला आहे. लेडी हिराबाई कावसजी जहांगीर (१८७४ ते १९७६) ह्यांचा अनेक सामाजिक संस्थांशी संबंध होता. ह्या मुंबईच्या पारशी पंचायतीच्या, १९४६ ते १९६६ ही वीस वर्षे, विश्वस्त होत्या. पचायतीच्या १५३ वर्षांच्या कारकिर्दीत निवडल्या गेलेल्या त्या पहिल्याच महिला सदस्य. १९७५ साली त्यांची पंचायतचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. हाही मान एका महिलेला मिळण्याची ही पहिलीच वेळ. 'इराणी झोराष्ट्रीयन ट्रस्ट'च्या त्या सदस्य होत्या. मुंबईभर पसरलेल्या वसाहतीतून त्यांनी गरीब पारशांसाठी अल्प-खर्चाच्या घरांची उभारणी केली. ही त्यांची सर्वात महत्त्वाची कामगिरी मानली जाते. ग्रामीण भागातील बालसंगोपन गृहावर त्यांनी देखरेख केली. बडोदा, नवसारी, गुनदेवी ह्या ठिकाणी टाटा घराण्याने ज्या शाळा चालवल्या होत्या त्या शाळांच्या संचालक मंडळावर त्या होत्या. मुंबई व इतर शहरांतून त्यांनी आरोग्य व कुटुंब-नियोजन केंद्रे उभारली. १९६७ साली त्यांना नवसारीच्या 'सर कावसजी जहांगीर मद्रसा'च्या अध्यक्ष निवडण्यात आले. नवसारीच्या मेहेरजी राणा ग्रंथालयाच्या देख-भालीसाठी त्यांनी घराण्याच्या विश्वस्त फंडातून हजारो रुपये दिले. 'झोराष्ट्रियन फिजिकल कल्चर अँड हेल्थ सोसायटी'च्या त्या अध्यक्ष होत्या. 'त्यांच्या मृत्यूने

आपल्या इतिहासातील एक युग काळाच्या पडद्याआड गेले ' असे त्यांच्याबद्दल ' जाम–ए. जमशेट 'च्या संपादकांनी लिहिले आहे. आपले थोरले चिरंजीव जहांगीर ह्यांच्या स्मरणार्थ त्यांनी मुंबईला जहांगीर आर्ट गॅलरीची स्थापना केली. हा जहांगीर लंडनला एका अपघातात मरण पावला, तेव्हा तो जेमतेम विशीच्या आसपास होता.

दिनबाई पाटक (१८७४ – १९६३) ह्या अशाच दुसऱ्या समाज कार्यकर्त्या. नवरोजी एच. पाटक आणि शिरीनबाई ह्यांच्या ह्या ज्येष्ठ कन्या. मुंबईत १८९५ ते १९०५ च्या दरम्यान जेव्हा प्लेगची साथ आली तेव्हा पाटक कुटुंबातील अनेक मुले आणि मुली ह्यांनी अनेक कुटुंबांना तातडीच्या शिबिरात (इमर्जन्सी कॅम्प्समध्ये) हलवायला मदत केली. त्याशिवाय प्लेगग्रस्त रोग्यांची ह्यांनी शुश्रूषाही केली. स्वत:ला असलेल्या धोक्याची त्यापैकी कुणीही पर्वा केली नाही. दिनबाईच्या भगिनी गुलबाई ह्या एका प्लेगच्या इस्पितळातच स्वयंसेविका-परिचारिका म्हणून काम करीत. १८९९ साली दिनबाईच्या मातोश्रींनी आपल्या माजघरातच स्त्रियांसाठी सेवाकेंद्रे (वर्कक्लास) सुरू केली. सुरुवातीला ह्या केंद्रात सहाच स्त्रिया येत. लवकरच हा उपक्रम इतका लोकप्रिय झाला की ऑगस्ट १९०३ पर्यंत त्या केंद्रातूनच ' स्त्री झारथोस्टी मंडळा 'ची सुरुवात झाली होती. त्याच्या चिटणीस होत्या दिनबाई आणि अध्यक्ष शिरीन एम. कर्सेटजी. १९१३ पासून १९६३ पर्यंतची पन्नास वर्षे दिनबाई त्या संस्थेच्या अध्यक्ष होत्या. १९१७ साली ' पाटक वर्क क्लास ' स्वत:च्या जागेत हलला. त्याचे नावही बदलून ' इंडस्ट्रिल होम फॉर पारशी वुमेन ' असे ठेवण्यात आले. पुढे १९२८ त लेडी नवाजबाई टाटांनी मलिक इमारत विकत घेतली, आणि हे ' इंडस्ट्रिल होम ' तिकडे नेले. पुन्हा एकदा त्याचे नाव बदलण्यात येऊन ते ' सर रतन टाटा इंडस्ट्रियल इन्स्टिटच्यूट फॉर पारशी वुमेन ' असे करण्यात आले. दिनबाई ह्या संस्थेचे काम करीत होत्याच. पण त्याखेरीज त्यांनी स्वत:च्या तीन तंत्रशाळाही चालविल्या होत्या. त्या तंत्रशाळा म्हणजे– द आर. एच. पाटक इन्स्टिटच्यूट फॉर मेन; द. आर. एच. टेक्निकल इन्स्टिटच्यूट आणि सांताक्रुझचे द पाटक पॉलिटेक्निक. १९३८ साली त्यांची नेमणूक ' १९२५ सालच्या भारतीय वारसा हक्कां 'त सुधारणा सुचवण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीवर करण्यात आली. त्यात पारशांच्या ' विनावारस वारशा 'बाबत त्यांना सूचना करायच्या होत्या. त्या ८९ वर्षे जगल्या. ह्या आपल्या दीर्घायुष्यात त्या अखेरपर्यंत कार्यमग्न होत्या. दारिद्र्याने पछाडलेल्या बायकांना स्वावलंबी बनवून त्यांना दानावर जगण्याची गरज भासणार नाही, असे त्यांचे प्रयत्न शेवटपर्यंत चालूच होते.


मेरी क्लबवाला जाधव (१९०९ ते १९७५)' हे नाव मद्रास आणि नीलगिरी भागात घरगुती होऊन बसले, तर त्यात आश्चर्य काही नाही. मेरीच्या आयुष्याचा

बराच मोठा काळ त्या भागात गेला. हे नाव प्रत्येक पारशी घरातही सुपरिचित आहे. ह्यांचे मूळ नाव मेरी रुस्तमजी पटेल होते. त्यांचे बालपण नीलगिरी भागात गेले. त्यांची आई विवाहापूर्वी अनेक वर्षे इंग्लंडमध्ये राहिली होती. मेरी आपल्या आईबद्दल लिहिते : 'आईने आम्हाला आमच्या बालपणापासूनच गरजवंतांना, गरिबांना मदत करायला उत्तेजन दिले. त्यात आपण काही विशेष करीत आहोत असे आम्हाला कधी वाटलेच नाही.' मेरी १८ वर्षांची असतानाच तिचे नोगी फिरोझ क्लबवाला ह्या तरुणाबरोबर लग्न झाले. मेरी आणि नोगी हे एक अत्यंत सुखी व आनंदी जोडपे होते. सर्वांना ती दोघे फार आवडत. पण नोगीला एकाएकी हृदय-विकाराचा झटका आला आणि त्यातच त्याचे निधन झाले. तेव्हा मेरीने आपले उर्वरित आयुष्य गरिबांच्या सेवेला वाहून घ्यायचे ठरविले.

आपल्या निष्ठापूर्ण सेवेने त्यांनी भोवतीच्या लोकांची मने जिंकून घेतली. १९४६ साली त्यांची मद्रास लेजिस्लेटिव्ह कौंसिलवर नियुक्ती करण्यात आली. १९७२ पर्यंत त्या परिषदेच्या सभासद होत्या. मद्रासच्या पहिल्या महिला शेरीफ होण्याचा मान त्यांनाच मिळाला. आणि पहिल्या काही थोड्या पहिला मॅजिस्ट्रेटपैकी त्या एक होत्या. १९३५ साली त्या उन्मार्गी मुलांच्या (ज्युव्हेनाईल कोर्टात) न्यायालयात बसल्या असताना समोर बसलेल्या त्या असंख्य मुलांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे अशी आत्यंतिक इच्छा त्यांच्या मनात जागृत झाली. ही सारी मुले भोवतालच्या वातावरणा-मुळे बिघडलेली होती. १९५० साली त्यांनी 'बॉईज होम' सुरू केले, तेव्हा त्यात फक्त नऊ मुले होती. आज त्या संस्थेत २०० मुले राहतात, काम करतात आणि शिक्षणही घेतात. बॉईज होम सुरू केल्यानंतर थोड्याच दिवसांनी मेरीसमोर दोन अनाथ मुले उभी राहिली. तो प्रसंग मेरीच्याच शब्दात वर्णन करणे योग्य ठरेल.

'गणेश पाच वर्षांचा असावा, आणि राणी साधारणपणे सहा वर्षांची. गणेशने आपल्या बहिणीभोवती आपला हात लपेटला होता. दोघे माझ्यापुढे येऊन उभी राहिली, तेव्हा मी म्हटले, मी गणेशला ठेवून घेते; पण राणीसाठी माझ्याकडे काही सोय नाही. तेव्हा आता आपणच मुलींसाठी एक अनाथालय उघडावे ...' आणि मेरींनी तसे केले. आज 'आचेन हाऊस' संस्थेत ३०० मुली राहतात, काम करतात. तिथे एक छापखाना आहे, कारखाना (वर्कशॉप) आहे, शिवणखाते आहे, बेकरी आहे आणि फिरता 'पोषक अन्न विभाग'ही आहे. ह्या फिरत्या पोषक अन्न विभागातर्फे गलिच्छ वस्तीतील ४,००० मुलांना रोज जेवण पुरवले जाते.

१९ वर्षे वैधव्यात काढल्यानंतर मेरींनी मेजर चंद्रकांत के. जाधव ह्यांच्याशी विवाह केला. मेजर जाधव १९७२ त वारले. त्यानंतर दोनच वर्षांनी मेरीचा एकुलता एक पुत्रही वारला. ही खाजगी दुःखे मनातल्या मनात दाबून ठेवून, चेहऱ्यावर हास्य



जे. एन. टाटा (१८३४–१९०४) (सौजन्य जे. एन. टाटा ट्रस्ट)



होमी जे. भाभा (१९०९–१९६६) (सौजन्य : टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च)

डी. एन. वाडिया (१८८३–१९६९) (सौजन्य : मेहेर डी. एन्. वाडिया)



राखून, मेरी आपली कामे करीतच होत्या. अखेर शेवटी कॅन्सरच्या दुखण्यामुळे त्यांचा एक पाय जांघेपासून कापावा लागला. ती देखणी, थोराडबाई स्वत:बद्दलच विनोद करू लागली—" आता पहा, मी किती हलकी झाले की नाही ! " पण आता जगण्याची इच्छा मावळली होती. त्यांचे नाव पद्मविभूषण किताबासाठी सुचवण्यात आले आहे, असे जेव्हा मेरीला कळले, तेव्हा त्यांनी हळूवारपणे म्हटले, " पण ही सारी पदके पाहणार कोण ? " फेब्रुवारी १९०५ मध्ये मृत्यूने त्यांची सुटका केली. परंतु ज्या शेकडो मुलांची त्या खरीखुरी आई बनल्या होत्या, ज्या निष्ठावंत कार्यकर्त्यांबरोबर त्यांनी काम केले होते. त्यांच्या दृष्टीने मेरी मरण पावली नव्हती. त्यांच्या दृष्टीने त्या आजही जिवंत आहेत वाऱ्यावरून उधळलेल्या सुवासासारख्या.

जाल बलसारांप्रमाणेच पेरीन वखारिया (जन्म १९२३) ह्याही प्रशिक्षित समाजकार्यकर्त्या. १९३० साली त्यांनी मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान ह्या विषयाची मुंबई विद्यापीठाची पदवी घेतली. पुढील शिक्षणासाठी त्या अमेरिकेला गेल्या. तेथील कोलंबिया विद्यापीठाची त्यांनी ' मास्टर्स ' ही पदवी १९४७ त घेतली. १९५० साली त्यांनी न्यूयॉर्क स्टेट युनिव्हर्सिटीची ' समाजकार्य ' ह्या विषयावर डॉक्टरेट संपादिली. त्यांना राष्ट्रसंघात एक नोकरीही मिळत होती. परंतु बडोद्याच्या एम्. एस्. विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलगुरू सौ. हंसा मेहता ह्यांनी त्यांचे मन वळवले. आणि पेरीननी त्या विद्यापीठाच्या समाजकार्य संस्थेचा (स्कूल फॉर सोशल वर्क) प्रारंभ केला. त्या संस्थेच्या त्या डीन बनल्या. १९५० ते ५७ ही सात वर्षे पेरीन बडोद्याला होत्या. त्यानंतर, १९५७ ते १९७५ पर्यंत त्यांनी राष्ट्रसंघाच्या आर्थिक आणि सामाजिक मंडळावर (इकॉसॉक) समाजकार्य अधिकारी (सोशल अफेअर्स ऑफिसर) म्हणून काम केले. लवकरच त्यांची संचालकपदावर बढती झाली. १९७३ साली त्या एका वर्षाच्या रजेवर मायदेशी आल्या असताना हैदराबादच्या ' निझामिया वुमेन्स एज्युकेशन ट्रस्ट 'च्या संचालकपदी त्यांची नेमणूक करण्यात आली.

केतायुन कामा ह्या पेरीन वखारियांच्या थोडया आधीच्या. त्यांनी ' स्पीच थेरॉपिस्ट ' म्हणून प्रशिक्षण घेतले आणि मुंबईत मूक आणि बधिर मुलांसाठी चांगले काम केले. त्या उन्मार्गी मुलांच्या न्यायालयाच्या मानद् प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट होत्या. त्यानंतर ' युनिसेफ 'च्या एका कामगिरीवर त्या तुर्कस्तानला गेल्या होत्या.

शालेय व विद्यापीठीय शिक्षणाच्या क्षेत्रात पारशांनी फार महत्त्वाची कामगिरी केली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांपर्यंतच्या काळात त्यांनी अनेक शाळा काढल्या. ह्या शाळा मुंबई, नवसारी, सुरत, भडोच व इतर ज्या ज्या शहरांत पारशी जमात राहत होती, त्या त्या शहरांत काढण्यात आल्या. छोटया तंत्रशाळा व उद्योगगृहे सुरू करण्यात आली. गेल्या अनेक

वर्षांत सुरतेच्या टेक्निकल स्कूलप्रमाणे त्यांचीही भरभराट झाली.

मुलींसाठी सुरू करण्यात आलेली एक जुनी शाळा १८८८ त सुरू झाली. त्या गर्टन शाळेच्या संस्थापक होत्या. लहानखुऱ्या बचूबाई अर्देशीर फ्रामजी मूस (१८५३ ते १९४६). १९३२ साली त्यांना १०,००० रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. ती त्यांनी शाळेच्या विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द केली. ते पैसे मुलींच्या शिक्षणाच्या विकासासाठी वापरावेत, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या शिक्षणसेवेबद्दल त्यांना १९४२ साली कैसर–ई–हिंद सुवर्णपदक देण्यात आले. त्यांच्या विद्यार्थिनींनी त्यांना भरघोस थैली व एक सुवर्णकरंडक अर्पण करून त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तेव्हाही त्यांनी रोकड रकम मुंबई इलाख्याच्या ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाच्या सोयी करण्यासाठी वापरण्यात यावी, असे सांगितले. अखेरपर्यंत त्या शिकवीत होत्या. नव्व्याण्णवाव्या वर्षी त्या वारल्या, तेव्हाही त्या कार्यरत होत्या. गर्टन हायस्कूल आजही चांगल्या अवस्थेत चालू आहे.

मुंबईतील माझगाव स्कूल ही मुलांच्या अत्यंत जुन्या शाळांपैकी एक आहे. तिचे संस्थापक होते दोराबजी बी. कांगा (१८६०–१९३२)[२]. हे एक गरीब पारशी पुरोहित. त्यांना मुले प्रेमाने ' दादा मास्तर ' म्हणत कारण ते प्रत्येक विद्यार्थ्याचे ' वडील बंधू ' म्हणूनच त्याच्याशी वागत. ते शाळेतील अत्यंत विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. १९ व्या वर्षी त्यांनी ती शाळा काढली आणि ५३ वर्षे त्यांनी तिची मनोभावे सेवा केली. कमावलेला प्रत्येक पैसा त्यांनी त्या शाळेसाठीच खर्चिला. ते वारले तेव्हा कफल्लक होते. ' माझगाव स्कूल ' आजही आपले पवित्र कर्तव्य पार पाडीत आपल्या संस्थापकाची स्मृती जागती ठेवीत आहे.

भरडा न्यू हायस्कूलची ख्याती त्याहून जास्त आहे. ती शाळा जालभॉय डी. भरडा (१८६४–१९२१)[३] ह्या खगोलशास्त्राच्या विद्यार्थ्याने स्थापन केली. जालभॉय मुंबई विद्यापीठाच्या सीनेटचे सभासद होते. १८९१ मध्ये आपले स्नेही कैकोबाद बी. मर्झबान (१८६७–१९३३) ह्यांच्या सहकार्याने त्यांनी न्यू स्कूलची स्थापना केली. प्रारंभापासूनच ही शाळा चांगली भरभराटली. १९३० साली शाळेच्या पटावर २,६०० विद्यार्थी होते. जालभॉयच्या मृत्यूनंतर तिचे नाव ' भरडा न्यू हायस्कूल ' असे बदलण्यात आले.

नाशिकला १९४४ साली फिरोजशाह एन मेहता [४] ह्यांनी सुरू केलेले ' बॉईज् टाऊन पब्लिक स्कूल ' हे पहिलेच पारशी पब्लिक स्कूल. मेहता हे मोठे भाविक गृहस्थ होते. तसेच ते एक स्वयंसिद्ध आणि यशस्वी उद्योगपती होते. फिरोजशाह (१८७७–१९५६) हे गरीब माता-पित्यांचे अपत्य. भरडा न्यू हायस्कूलमधून मॅट्रिक पास झाल्यानंतर त्यांनी ' व्हिक्टोरिया ज्यूबिली टेक्निकल इन्स्टिटयूट 'मधील कापड विभागात प्रवेश घेतला.

शिक्षण संपल्यानंतर ते दोन वर्षे मँचेस्टर येथे होते. तिथे त्यांनी ' सिटी अँड गिल्डस एक्झॅमिनेशन ' ही परीक्षा दिली आणि ते मायदेशी परतले. परतल्यावर त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला. त्या व्यवसायात हळूहळू पैसा कमावून त्यांनी ' पी. एन्. मेहता एज्युकेशनल ट्रस्ट ' स्थापन केला. नाशिकचे ' पारशी बोर्डिंग स्कूल ' जेव्हा विकायला काढण्यात आले तेव्हा फिरोजशाहनी ते विकत घेतले आणि त्याचेच त्यांनी पब्लिक स्कूल बनविले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या शाळेत इतर जमातींच्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश देण्यात येऊ लागला.

मतिमंद मुलांसाठी पहिली शाळा १९४४ साली जाल एच. वकील ह्यांनी सुरू केली. सुरुवातीला ही शाळा ते स्वतःच्या घरीच चालवीत असत. त्या शाळेला त्यांनी 'होम फॉर चिल्ड्रेन इन नीड ऑफ स्पेशल केअर ' असे नाव ठेवले होते. त्या शाळेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला कसलीही अप्रतिष्ठा सहन करावी लागू नये, हा त्या नावामागचा उद्देश होता. जवाहरलाल नेहरू व इतर अनेक व्यक्तींनी शाळेला साहाय्य केले; आणि म्हणूनच शाळेचा विस्तार होऊ शकला. आज तिच्या पटावर ३०० च्या वर विद्यार्थी आहेत. अलीकडे त्या शाळेत भर पडली आहे बालक मंदिर, मुला–मुलींसाठी व्यवसाय शाळा, मुला–मुलींसाठी दोन स्वतंत्र वसतिगृहे आणि मतिमंद मुलांना शिकवण्याची खास तंत्रे शिक्षकांना शिकवणारे एक अखिल भारतीय प्रशिक्षण केंद्र (ह्या केंद्राला महाराष्ट्र सरकारने मान्यता दिलेली आहे) असा ह्या शाळेचा आता विस्तार झाला आहे. त्याशिवाय ' श्रीमती मोतीबाई ठाकरसी इन्स्टिटच्यूट फॉर रिसर्च इन द फील्ड ऑफ मेंटल रीटार्डेशन ' (मतिमंदत्वाबाबतचे संशोधन करणारी संस्था) ही संस्थाही ह्या शाळेतर्फे चालवली जाते. १९६७ साली शाळेचा रौप्य महोत्सव साजरा झाला. १९७६ साली जाल वकीलना पद्मश्री बहाल करण्यात आली.

वरळीचे 'हॅपी होम फॉर द ब्लाईंड ' ही भारतातील एक सर्वोत्कृष्ट संस्था मानली जाते. आता ह्या संस्थेला वरळीत स्वतःची इमारत मिळाली आहे. ह्या संस्थेच्या प्राचार्य मेहेर जे. बानाजी (१९४३—) ह्या मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर (१९६४). ' ट्रेनिंग इन्स्टिटच्यूट फॉर टीचर्स ऑफ द ब्लाईंड ' ह्या संस्थेतून त्यांनी दृष्टिव्यंग असलेल्यांना शिकवण्याची पदविका मिळविली. १९२५ साली जेव्हा ' हॅपी होम ' सुरू झाले तेव्हा त्यात फक्त उन्मार्गी, कोर्टाने दाखल केलेली किंवा अंध भिकारी, अशी मुलेच येत. त्यांना ह्या संस्थेत आश्रय मिळे. पुनर्वसनाच्या संधी लाभत. १९४८ पासून ' हॅपी होम 'मध्ये एक शाळा सुरू करण्यात आली. महाराष्ट्रातील अशा प्रकारची ही पहिलीच शाळा. ह्या शाळेत कोर्टाने दाखल केलेले, अनाथ, उन्मार्गी अंध विद्यार्थी दाखल करण्यात येतात. त्यातील १०० विद्यार्थी वसतिगृहात राहतात. १९६९ पासून मेहेर त्या शाळेच्या प्राचार्य आहेत. ह्या क्षेत्रातील नवनवीन सुधारणांची त्या माहिती

करून घेतात. तत्संबंधी देशात व परदेशात होणाऱ्या परिषदा, अभ्यासक्रम, ह्यांना उपस्थित राहतात. 'साइट कन्झर्वेशन इन डेवलपिंग कंट्रीज़' (१९७४) (विकसनशील देशांतील दृष्टीची निगा) आणि 'आय कंडिशन्स अँड आय हेल्थ ऑफ ब्लाईंड स्कूल चिल्ड्रेन' (१९७६) (अंध शाळांतील विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची अवस्था व आरोग्य) ही त्यांनी लिहिलेली काही पुस्तके.

शिक्षणक्षेत्रात नाव कमावलेल्या दोन महिलांच्या कामगिरीचा आता परिचय करून घ्यायला हवा. त्या महिला आहेत एमी बी. एच. जे. रुस्तमजी (१८९६–१९७६) आणि मिथन आर. चोकशी (जन्म १९०१). एमींनी १९२२ साली केंब्रिज (इंग्लंड) च्या गर्टन कॉलेजमधून पदवी संपादन केली. मायदेशी परतल्यावर त्यांनी इंडियन एज्युकेशनल सर्व्हिस (भारतीय शिक्षण सेवा) मध्ये नोकरी स्वीकारली. लवकरच त्या इन्स्पेक्ट्रेस ऑफ स्कूल बनल्या. मुंबईच्या 'सेकंडरी ट्रेनिंग स्कूल' (माध्यमिक प्रशिक्षण शाळा) च्या त्या पहिल्या भारतीय प्राचार्य. 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी वूमेन' ह्या संघटनेच्या त्या १९५६ ते ५९ ही तीन वर्षे उपाध्यक्ष होत्या. आशियाई महिलेला हा मान प्रथमच मिळत होता. १९४० च्या सुमारास सुरू करण्यात आलेल्या 'साक्षरता प्रसार मोहिमे'त एमींनी पायाभूत कामगिरी केली. त्यांनी मुलांची ग्रंथालये सुरू केली. भारतात अशी ग्रंथालये प्रथमच सुरू होत होती. स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठीही त्या झटल्या.

मिथन आर. चोकशी ह्या तीव्र बुद्धिमत्तेच्या महिला आहेत. त्या कधी परदेशात गेल्या नाहीत, तरीही त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व असाधारण आहे. महाविद्यालयातील कारकिर्दीत त्यांनी अखेरपर्यंत असाधारण यश मिळविले. मुंबई विद्यापीठाच्या 'दक्षिणा फेलोशिप'चा मान त्यांनी मिळविला. मुंबई विद्यापीठाच्या विल्सन महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे इंग्रजीचे अध्यापन केले. नंतर, शालेय अध्यापन हे जास्त मूलगामी आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी शाळेत अध्यापन करायला सुरुवात केली. मुंबईच्या 'न्यू ईरा स्कूल' ह्या अध्यापन क्षेत्रातील प्रागतिक पद्धती चटकन उचलणाऱ्या विद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या त्या प्रमुख बनल्या. राज्यातील (इलाख्यातील) ३०० ग्रामीण व शहरी शाळांसाठी शालेय आकाशवाणीचा कार्यक्रम त्यांनीच प्रथम सुरू केला. त्यांनी मुलांसाठी अनेक सुंदर पुस्तके लिहिली आहेत. त्यातील काहींचा उल्लेख करायचा तर 'बर्ड्स अँड देअर फॅमिलीज' (पक्षी व त्यांचे कुटुंबीय १९७३) आणि 'वन्स अपॉन अ टाईम (कोणे एके काळी १९७४) ह्यांचा उल्लेख करावा लागेल. त्या दुसऱ्या पुस्तकात कथा आणि लोककथा ह्यांच्या आधाराने भारताचा इतिहास सांगितलेला आहे. इंग्रजी अध्यापन, त्याच्या अभ्यासक्रमाची आखणी व तिची अंमलबजावणी, ह्यासाठी नेमण्यात आलेल्या दिल्ली–मुंबईतील अनेक

समित्यांवर मिथननी काम केले आहे.

लोकसंवाद (मास कम्युनिकेशन) ह्या क्षेत्रात नाव कमावलेली फक्त एकच पारशी व्यक्ती आहे, आणि ती म्हणजे मेहरा मसानी (जन्म १९१३) मेहरा. सर रुस्तम पी. मसानी ह्यांच्या कन्या. ह्या १९३४ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर झाल्या. त्यांना परीक्षेत पहिला क्रमांक मिळाला होता. नंतर त्यांनी लंडन विद्यापीठाची बी. एस्सी. ही पदवी मिळवली. १९३८ साली त्या मायदेशी परतल्या. त्यांची मुंबईच्या ऑल इंडिया रेडियोवर प्रोग्राम असिस्टंट (कार्यक्रम साहाय्यक) म्हणून नेमणूक करण्यात आली. पुढे बढती मिळत मिळत त्या १९४८ साली केंद्र संचालक (स्टेशन डायरेक्टर) झाल्या; मग एक्स्टर्नल सर्व्हिसेस (परदेश–प्रक्षेपण) च्या संचालक बनल्या. १९६७ साली त्यांची दुय्यम सरसंचालक पदावर नेमणूक झाली. लोकसंवाद, आकाशवाणी, उपग्रह दूरदर्शन आणि तत्संबंधी विषयांवर अनेक लेख लिहिले. दोन पुस्तकेही लिहिली आहेत. 'इन्टरनॅशनल ब्रॉडकास्ट इन्स्टिटयूट' (आंतरराष्ट्रीय प्रक्षेपण संस्था) च्या त्या अनेक वर्षे सदस्य आहेत. १९७३ साली त्या संस्थेच्या त्या पहिल्या महिला विश्वस्त निवडण्यात आल्या. १९७५ मध्ये त्यांची संस्थेच्या अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

'सर्व्हे ऑफ इंडिया'त ज्या एका पारशाने नाव काढले ते आहेत कर्नल जमशेद ए. एफ. दलाल (जन्म १९१७). 'सेंटर फॉर सर्व्हे ट्रेनिंग अँड मॅप प्रॉडक्शन' ह्या हैदराबाद येथील केंद्राचे ते संस्थापक–संचालक. १९६९–७१ मध्ये ते भारताचे सर्व्हेयर जनरल होते.

सेनादलांतही पारशांनी आपला ठसा उमटवला आहे. संयुक्त वैद्यकीय संचालनालय बनवण्यात आले तेव्हा आर्म्ड फोर्सेस मेडिकल सर्व्हिसेस (सेनादल वैद्यकीय सेवा) चे पहिले भारतीय संचालक बनले एक पारशी–जनरल मास्टर्स.

हवाई दलात सर्वात जास्त मानसन्मान मिळवले चार इंजिनीयर बंधूंनी. हवाई उड्डाणाच्या प्रारंभीच्या काळात अस्पी इंजिनियर व जे आर. डी. टाटा ह्यांनी एका इंजिनच्या विमानातून (मोनोप्लेन्स) भारत–इंग्लंड–भारत असा प्रवास एकेकटयाने करायचा विक्रम केला होता. अस्पी इंजिनीयरनी 'एअर एस' चा सन्मान मिळवला. ते पुढे भारतीय हवाई दलाचे प्रमुखही (एअर चीफ मार्शल) बनले. नंतर ते भारताचे इराणात राजदूतही होते. पुढे त्यांची नेमणूक इंडो–इरानियन ऑईल कंपनीचे संचालक म्हणून करण्यात आली. त्यांचे बंधू मिनू इंजिनीयर हे भारतीय हवाई दलातून 'एअर मार्शल'च्या हुद्द्यावरून निवृत्त झाले. आतापर्यंत सर्वात जास्त सन्मान मिळवणारे ते एकटेच एअर मार्शल आहेत. त्यांचा आणखी एक भाऊ जंगू, प्रथम टाटा एअरलाईन्स-मध्ये नोकरीला होता. पुढे तो भारतीय दलात गेला. तिथे त्याने आपल्या शौर्याबद्दल

नाव कमावले. गुजरात एअर लाईन्सचे एक विमान चालवीत असताना झालेल्या अपघातात जंगूला मृत्यू आला. सर्वात धाकटा रॉनी हाही एअर मार्शलच्या हुद्द्यावरून निवृत्त झाला. त्यालाही मिनू इतकेच सन्मान मिळाले आहेत. ह्या मुलांच्या आईला आपल्या धाडशी मुलांचा अभिमान वाटे. मात्र मुलांनी आकाशात काही कसरती केल्या की बिचारी घाबरून जाई. मिनू तिची आठवण सांगताना म्हणतात—"आमच्या आईचा फ्लॅट वरळीला होता, तेव्हा मी तिला फोन करून सांगत असे—आई, मी तुला भेटायला येतोय. आणि मग मला भेटायला धावत बाहेर यायच्या ऐवजी ती एका कोपऱ्यात जाऊन प्रार्थना करीत बसे !"[५]

भारतीय नौदलातही पारशांनी बहुमोल कामगिरी केली आहे. ॲडमिरल जाल कर्सेटजी (जन्म १९१९)[६] हे 'नौदल-प्रमुख' बनणारे (१९७६) पहिले पारशी. त्या आधी पाच वर्षांपूर्वी त्यांना परम विशिष्ट सेवा पदक बहाल करण्यात आले होते.

१९३५ साली प्रशिक्षण नौका डफरिनवर कर्सेटजींच्या शिक्षणाचा प्रारंभ झाला. दोन वर्षांनी परीक्षा झाली, तीत ते भारतात सर्वप्रथम आले आणि त्यांची 'रॉयल इंडियन नेव्ही'साठी निवड करण्यात आली. दुसऱ्या महायुद्धाच्या कालात कर्सेटजींनी 'ब्रिटिश रॉयल नेव्ही'मध्ये युद्धाचा अनुभव घेतला. १९४१ त ते भारतात परत आले. त्यानंतर त्यांनी भारतीय नौदलाच्या विविध नौकांवर कामे केली. १९४४ साली त्यांना एच्. एम्. आय्. एस्. बॉम्बे ह्या नौकेचे आधिपत्य देण्यात आले. नौदलाच्या काफिल्याला संरक्षण देणे आणि पाणबुडी-विरोधक कामगिरी करणे, ही ह्या नौकेकडे सोपवण्यात आलेली कामगिरी होती. हैड्रोग्राफी ह्या विषयात त्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले. मलेशियाच्या किनारपट्टीवर टेहळणी करून तेथील किनाऱ्यावर कब्जा मिळवणाऱ्या मित्र—फौजांबरोबर कर्सेटजी होते. १९५० साली 'मरीन सर्व्हे ऑफ इंडिया'चे 'सर्व्हेयर—इन—चार्ज' ह्या बहुमानाच्या जागेवर त्यांची नियुक्ती करण्यात आली. १९५४ साली ध्वजनौका आय्. एन्. एस्. दिल्लीवर ते दुय्यम प्रमुख (सेकंड—इन—कमांड) बनले. १९५५ मध्ये ते भारताचे प्रमुख हायड्रोग्राफर झाले. एका भारतीयाला हे पद मिळण्याची ही पहिलीच वेळ नौदलात त्यांनी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यापैकी एक होती विमानवाहू आय्. एन्. एस्. विक्रान्तचे प्रमुखपद. विक्रान्तने समुद्रावर कामगिरी बजावली तेव्हा ते तिचे प्रमुख होते. वॉशिंग्टनच्या भारतीय दूतावासात भारताचे पहिले नौदल दूत (नेव्हल अटॅची) होते. १९६९ सालात कर्सेटजींना व्हाईस चीफ ऑफ नेव्हल स्टाफ (नौदल उपप्रमुख) म्हणून बढती मिळाली. नंतर १९७३ साली ते पश्चिम विभागाचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग—इन—चीफ झाले. आणि नंतर नौदलाचे प्रमुख बनले.

लष्करातील सर्वात गाजलेली व्यक्ती म्हणजे एकेकाळचे लष्कर प्रमुख सरसेनापती

सॅम माणेकशॉ (जन्म १९१४). खास त्यांच्यासाठी भारत सरकारने फील्ड मार्शलचा हुद्दा निर्माण केला. १९७१ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात सेनादलाचे यशस्वीरीत्या नेतृत्व करणे आणि सेनाविभागांत परस्परांविषयी सामंजस्य राखणे, ह्या त्यांच्या कामगिरीचा बहुमान केला. हा हुद्दा मिळवणारे ते एकमेव भारतीय आहेत.

माणेकशॉंचा जन्म अमृतसरचा. डॉ. आणि सौ. एच्. पी. माणेकशॉ ह्यांचे ते पाचवे अपत्य. १९३२ साली सॅमची इंडियन मिलिटरी ॲकेडमीसाठी निवड झाली. दोन वर्षांनंतर त्यांना कमिशन मिळाले आणि रॉयल स्कॉट्स ह्या पलटणीत एका वर्षासाठी त्यांची नेमणूक झाली. त्यानंतर फ्रॉंटियर फोर्सेस रेजिमेंट ह्या पलटणीत त्यांची कायम नेमणूक करण्यात आली. वायव्य सरहद्दीवरील अहमदेझाई मोहिमेत त्यांनी १९३९ ते १९४१ ही दोन वर्षे भाग घेतला. त्यावेळी जपानने युद्धात प्रवेश केला होता. ह्या मोहिमेत त्यांना जबर दुखापत झाली. रणांगणावर असाधारण शौर्य गाजवल्याबद्दल त्यांना मिलिटरी क्रॉसचा सम्मान देण्यात आला. अपंग म्हणून त्यांना घरी पाठवण्यात आले आणि बरे होऊन परत आल्यावर त्यांची नेमणूक 'रझमाक ब्रिगेड'चे ब्रिगेडियर मेजर म्हणून करण्यात आली. त्यानंतर एक वर्ष त्यांनी क्वेट्टा येथील स्टाफ कॉलेजमध्ये इन्स्ट्रक्टर (अध्यापक) म्हणून काम केले. युद्ध संपता संपता ते पुन्हा ब्रह्मदेश आघाडीवर होते. फ्रेंच इंडोचायनातील व्याप्त फौजाबरोबर ते होते. जपानी युद्धकैद्यांची एक जबाबदार सीनियर स्टाफ ऑफिसर ह्या नात्याने ते देखभाल करीत होते.

१९४५ साली ते भारतात परतले. लष्करी मुख्य केंद्रात जी. एस्. ओ. १ ह्या हुद्द्यावर त्यांची नेमणूक मिलिटरी ऑपरेशन्स डायरेक्टोरेटमध्ये करण्यात आली. तिथे चालू हालचाली आणि भावी योजना ही कामे त्यांच्यावर सोपवण्यात आली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांची नेमणूक डायरेक्टर ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स म्हणून करण्यात आली. त्यांना ब्रिगेडियरचा हुद्दा देण्यात आला. १९५७ मध्ये त्यांची मेजर जनरलच्या हुद्द्यावर बढती झाली. १९६३ मध्ये ते लेफ्टनंट जनरल झाले. १९६४ ते १९६९ ह्या काळात प्रथम पश्चिम विभाग सेनाप्रमुख, नंतर पूर्व विभाग सेनाप्रमुख अशा जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. पूर्व विभागातील नागा व मिझो बंडखोरांशी समझोता करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. ह्या त्यांच्या कामगिरीबद्दल १९६८ साली त्यांना 'पद्मभूषण' किताब देण्यात आला. पुढच्याच वर्षी ते जनरल झाले आणि त्यांची 'सेना दल प्रमुख' म्हणून नियुक्ती करण्यात आली. १९७१ च्या पाकिस्तान–विरोधी युद्धातील कामगिरीबद्दल १९७२ च्या जानेवारीत त्यांना 'पद्मविभूषण' पदवी देण्यात आली. १ जानेवारी १९७३ रोजी त्यांना 'फील्ड मार्शल' चा हुद्दा देण्यात आला.

खेळातही पारशांनी आपली छाप उमटविली आहे. १९४८ साली पारशांनी मुंबईत भारताचा पहिला क्रिकेटक्लब स्थापन केला. हा क्लब सर्व जमातींना खुला होता. मित्रत्वाचे सामने खेळण्यासाठी दोन संघ इंग्लंडला पाठविण्यात आले. डॉ. एम्. ई. पावरी ह्यांनी २४ वर्षे पारशी क्रिकेट संघाचे नेतृत्व केले. २८ वष ते संघातर्फे खेळत होते. १८९५ साली ते मिडलसेक्स परगण्याच्या संघातर्फेही खेळत होते. त्यांनी क्रिकेट-वर एक पुस्तकही लिहिले आहे. ते स्वत: अत्यंत उत्साही समाजकार्यकर्ते होते. अनेक पारशी संस्थांना त्यांनी मदत केली. पावरी निवृत्त झाल्यानंतर पारशी संघाचे कप्तान-पद होमी डी. कांगा ह्यांच्याकडे आले.

समकालीन क्रिकेटमध्ये पॉली उम्रीगर, नरी कॉंट्रॅक्टर, रुसी मोदी, फारुख इंजिनि-यर आणि रूसी सुरती ही नावे प्रख्यात आहेत. त्यांच्याच जोडीने दोन तरुण, होतकरू महिला खेळाडूंचाही उल्लेख करायला हवा. त्या मुली म्हणजे डायना एदलजी आणि शिरीन कॉंट्रॅक्टर. दायना एदलजी १९७६ साली अखिल भारतीय महिला संघातर्फे न्यूझीलंडच्या महिला संघाविरुद्ध खेळली होती. शिरीन कलकत्त्याची आहे. तिच्या फलंदाजीतील प्रावीण्याबद्दल तिला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे.

पारशी हॉकीचेही प्रवर्तक होते. त्यांनी आपला 'पारशी पायोनियर्स' नावाचा एक संघ बनविला. त्या संघाने पुणे आणि मुंबई येथे झालेल्या आगाखान स्पर्धेत पहिल्या दर्जाच्या संघांचा पराभव करून आपले प्रावीण्य पटवून दिले होते. १९२० च्या प्रारंभी त्यांनी 'चेशायर रेजिमेंट'मधील विजेत्यांनाही हरवले होते.

मैदानी खेळांसाठी (अॅथ्लेटिक्स) पारशांनी मुंबईत दोन संघटना उभारल्या. १८८० साली 'झोराष्ट्रियन फिजिकल कल्चर अॅंड हेल्थ लीग' ही संस्था स्त्री-पुरुषांसाठी सुरू करण्यात आली. त्याच सुमाराला सर दिनशॉ एम. पेटिटनी स्वत:चा जिम्नॅशियम (तालीम) सुरू केला. ह्या दोन्ही संस्था उत्तम चालत होत्या. १९४० ते ५० च्या दरम्यान दोन महिला अॅथ्लेटिक्सनी नाव कमावले. त्या होत्या बानू गझदर आणि रोशन मिस्त्री. रोशनने भारतातील पहिल्या क्रमांकाच्या महिला स्प्रिंटर (धावणारी)चा मान मिळवला. त्या दोघींनीही नवी दिल्ली येथे भरलेल्या पहिल्या 'एशियन गेम्स'मध्ये भाग घेतला होता.

पुरुष खेळाडूंत (अॅथ्लेटिक्स) बी. सी. गझदर (जन्म १८७७) ह्यांनी १९३५ सालापर्यंत, म्हणजे वयाच्या ५८ व्या वर्षापर्यंत, मुंबई, ब्रिटन आणि अमेरिका येथे सुवर्ण व रौप्य पदके मिळवली. एन. बी. भरुचा हे प्रसिद्ध खेळाडू आणि वजन उचलणारे होते.

१९३० ते ५० पर्यंत बॉक्सिंग हा पारशांचा आवडता खेळ होता. त्यानंतर मात्र त्या खेळाच्या आवडीला उतरती कळा लागली. फली बिलिमोरिया हा नामांकित

बॉक्सर होता. त्याला 'मोदी बेल्ट'चा सन्मान मिळाला होता. त्याने भारत, श्रीलंका (सीलोन), ब्रह्मदेश आणि सिंगापूर येथील मुष्टियुद्धस्पर्धांत भाग घेतला होता.

पूर्वी 'स्क्वॉश' हा खेळही पारश्यांत लोकप्रिय होता. आज तो तितकासा लोकप्रिय राहिला नाही. भारतात 'स्क्वॉश' खेळायला सुरुवात झाल्यापासून मार्कर घराण्यातील तीन पिढ्यांनी अनेक वर्ष त्या खेळातील जागतिक अजिंक्यपद मिळवले होते. १९०३ ते १९११ पर्यंत जमशेदजी एम. मार्कर हे जागतिक विजेते होते. १९७५ साली ऑस्ट्रेलियात झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचा प्रतिनिधी म्हणून भाग घेणारा एकमेव पारशी खेळाडू होता दिनशॉ फिरोझ पंडोल.

टेनिसमध्ये प्रावीण्य मिळविणारे एकुलते पारशी खेळाडू होते जिमी मेहता. १९४० च्या दरम्यान त्यांनी डेव्हिस कप, विम्बल्डन आणि फॉरेस्ट हिल ह्या स्पर्धांत भारतातर्फे भाग घेतला होता.

टेनिसपेक्षा टेबलटेनिसमध्ये पारशांनी जास्त प्रावीण्य दाखवले. पूर्वी कापडिया बंधूंनी नाव गाजवले तर हल्ली फारुख आर. खोदायजीने अनेक पदके कमावली आहेत. १९६७ साली त्याला अर्जुन पारितोषिक देण्यात आले तर १९७१ साली हा मान त्याची बायको केटी हिने पटकावला.

१८६८ साली मुंबईत एका ब्रिटिश कंपनीने जुन्या घर्तीची (पेनी फार्थिंग) सायकल मुंबईत प्रथम आणली. तिचा पहिला उपयोग पारशांनीच केला. त्यांनी पारशी सायक्लिस्ट क्लब सुरू केला. रुस्तम भामगारा, जाल बापासोला, अदि हकीम इत्यादी धाडशी तरुणांनी आपल्या पेडी–सायकलीवरून जगाची सफर केली. त्यात त्यांनी ५२ देशांना भेटी दिल्या. वाटेत इराण, इराक, सीरिया आणि सिनाईची वाळवंटे पार केली आणि साडेचार वर्षांनी ते मायदेशी परत आले. आज सायकल शर्यतींची जागा मोटारींच्या शर्यतींनी घेतली आहे. ह्या शर्यतीही पारशी–प्रिय झाल्या आहेत. केटी दरायस बाथेनासारख्या महिलाही त्यात उतरत असतात.

जलतरण व वॉटरपोलो ह्या क्रीडांना डॅडी आणि फ्रामरोझ सी. गोलवाला ह्या दोघा बंधूंनी भरपूर प्रोत्साहन दिले. ते मुंबईच्या 'व्हिक्टोरिया स्विमिंग बाथ'चे चालक होते. तिथे ते ह्या क्रीडा शिकवीतही. १८९६ साली 'गोलवाला बाथ' सुरू झाला. सुरुवातीला त्यात फक्त पारशांनाच प्रवेश होता. चार वर्षांनंतर तो सर्व जमातींसाठी खुला करण्यात आला. त्या 'बाथ' ने अनेक उत्तमोत्तम जलतरणपटू तयार केले. त्यांपैकी प्रमुख खेळाडू होती डॉली नाझीर. १९५२ साली हेलेसिंकी येथे झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत तिने भारताचे प्रतिनिधित्व केले होते. आणि त्यात विजेतेपदही मिळविले होते. १९०३ साली गोलवाला बंधूंनी वॉटरपोलोची सुरुवात केली. त्या वर्षी मुंबईत वॉटरपोलोचा एक संघही तयार करण्यात आला.

शिडांच्या होड्या आणि होडगी (यॉटस) हे पारशांचे आजही आवडते खेळ आहेत. के. के. मिनाचर होमजी ह्यांनी आपल्या 'शार्पी' मधून अनेकवार प्रिन्स फिलिप लाँग डिस्टन्स कंबाईन्ड क्लासरेस जिकली आहे. यॉटिंगमधील प्रावीण्यासाठी १९७० साली लेफ्टनंट कमांडर सोराब जमशेद काँट्रॅक्टरला अर्जुन पारितोषिक देण्यात आले.

कुस्ती हा भारतातील सर्वात जुना खेळ. पारशांनी मात्र ह्या खेळाची सुरुवात १८७० च्या सुमारास केली. फ्रामजी मेहेरवानजी अरिया ह्यांनी १८७५ मध्ये झारथोस्टी तालीमखाना सुरू केला. त्याकाळच्या कुस्तीगीरांपैकी दोघांची नावे घ्यावी लागतील– ती म्हणजे उस्ताद अर्देशीर रुस्तमजी सरकारी आणि रुस्तम (एकदस्त) बारिया. १८७८ साली एकदस्तनी, वयाच्या २८ व्या वर्षी, त्याकाळचा भारतीय विजेता गंगाराम चोवा ह्याचा पराभव केला होता.

लांब पल्ल्याच्या एकाकी (सोलो) हवाई उड्डाणातील जागतिक विक्रम करण्याचा मान अस्पी इंजिनीयर आणि जे. आर. डी. टाटा ह्यांचा आहे. त्याशिवाय मुंबई–लंडन–मुंबई अशी एकाकी उड्डाणे सिरीनबाई पेटिट आणि भिकू एस. बाटलीवाला ह्या दोघा पारशी स्त्रियांनीही केली होती. भिकू बाटलीवाला ह्या व्यवसायाने बॅरिस्टर होत्या.

१. पारसियाना–(संपा.) जहांगीर आर. पटेल. मुंबई
डिसेंबर १९०३ पृष्ठ २०, तळटीप
जानेवारी १९०५ पृष्ठ– ३८–३९
२. एच. डी दारुखानावाला– पारशी लस्टर ऑन इंडियन
सॉईल–मुंबई १९३९, भाग १, पृष्ठ २८३
३. वरील पुस्तक, पृष्ठ २७४
४. द मॅन ऑफ फेथ– बॉईज टाऊनचे प्रकाशन,
नाशिक, १९६९, पृष्ठ १ ते ५६
५. पारसियाना– मे, १९७४, पृष्ठ ३७
६. पारिसियाना– फेब्रुवारी, १९७६ पृष्ठ ९, तळटीप.

९. विज्ञान आणि वैद्यक

पारशी ही भारतातील सर्वात जास्त पाश्चात्यीकरण झालेली जमात आहे. त्याचा एक फायदा असा झाला की त्यांना विज्ञान व तत्सम विषयांची गोडी लागली. समकालीन पिढीला ह्या जमातीने दोन प्रमुख शास्त्रज्ञ मिळवून दिले. एक होते होमी जहांगीर भाभा (१९०९–१९६६)[1]. ह्यांनी देशातील अणू–ऊर्जा–संशोधनाचा पाया घातला, त्याचा विकास घडवून आणला. दुसरे होते–दाराशॉ नोशेरवान वाडिया (१८८३–१९६९)[2]. हे भूगर्भशास्त्रज्ञ होते. हिमालयातील मैलोनमैल पसरलेला निर्जन प्रदेश त्यांनी पायी तुडवला. तिथे त्यांना भारतातील पहिली भूगर्भ व भूविज्ञानशास्त्र संस्था सुरू केली.

जहांगीर एच. भाभा आणि त्यांच्या पत्नी मेहेरबाई फ्रामजी पांडचे ह्यांना दोन मुलगे झाले. त्यातील थोरला मुलगा म्हणजे होमी. मेहेरबाई ह्या सर दिनशॉ पेटिट ह्यांच्या नात. भाभांचे टाटांशी नाते आहे. सर दोराब टाटा हे जे. एन. टाटांचे चिरंजीव. त्यांचे लग्न जहांगीर भाभांच्या बहिणीशी–मेहेरबाई भाभाशी झाले. शाळेत असताना होमी दुपारच्या सुट्टीत जेवायला टाटांच्या पिढीजात घरी जाई. तिथे चाललेली लोह–पोलाद धंदे, जलविद्युत्‌निर्मिती आणि अवजड रसायन उत्पादन, ह्यांवरील चर्चा ऐकत बसे. घरी ते व त्यांचे बंधू जमशेद ह्यांच्यासाठी एक सुसज्ज ग्रंथालय होते. त्यात प्राचीन भारतीय व पाश्चात्य कलाकृतींचे नमुने होते. युरोपीय संगीतकारांच्या संगीतकृतींचा मोठा संग्रह होता. त्यामुळे संगीत आणि चित्रकला ही होमींच्या जीवनाचा अविभाज्य अंग होऊन गेली.

होमीचे शिक्षण मुंबईत कॅथिड्रल हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेज, आणि रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ह्या संस्थांमधून झाले. नंतर ते केंब्रिजला गेले. त्यांनी अभियंता बनून जमशेटपूरच्या टाटा आयर्न अँड स्टील कंपनीत नोकरी करावी, अशी त्यांच्या आई–वडिलांची इच्छा होती. परंतु होमींना भौतिकशास्त्रज्ञ व्हायचे होते. तेव्हा तडजोड अशी ठरली की मेकॅनिकल सायन्सेस ट्रायपॉसमध्ये जर होमींना पहिला वर्ग मिळाला तर वडिलांनी होमींना गणित विषयातील उच्च अभ्यासक्रमासाठी पैसे पुरवायचे. होमींनी पहिला वर्ग मिळविला आणि संशोधक विद्यार्थी म्हणून भौतिकशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात केली.

दुसरे महायुद्ध सुरू झाले, तेव्हा होमी भारतात सुट्टीवर आले होते. त्यांना केंब्रिजला परतणे शक्य झाले नाही. तेव्हा त्यांनी बंगलोरच्या (रॉयल) इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स-मध्ये थिओरेटिकल फिजिक्सचे रीडर म्हणून नोकरी धरली. त्यांचे संशोधनाचे काम त्यांना चालू ठेवता यावे ह्यासाठी सर दोराब टाटा ट्रस्टने तिथेच एक छोटी संस्था उभारली. बंगलोरमध्ये होमींनी १९४० ते ४५ ही ऐन तारुण्यातील पाच वर्षे काढली. त्याच काळात त्यांनी आपल्या आयुष्याचे उद्दिष्ट ठरवून टाकले.

१९४१ साली, वयाच्या ३१ व्या वर्षी होमींची लंडनच्या रॉयल सोसायटीचे फेलो म्हणून निवड झाली. त्यावेळी ते सर्वात लहान फेलो होते. त्याच्या पुढच्याच वर्षी केंब्रिज विद्यापीठाने होमींच्या ' द थिअरी ऑफ एलिमेंटरी पार्टिकल्स अँड देअर इंटर-ॲक्शन ' ह्या प्रबंधाला ॲडम्स पारितोषिक दिले. १९४४ हे वर्ष होमींच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले. त्यावर्षी त्यांनी सर दोराब टाटा ट्रस्टचे अध्यक्ष सर दोराब सकलातवाला ह्यांना पत्र लिहून कॉस्मिक किरण आणि आण्विक भौतिकशास्त्र (न्यूक्लिअर फिजिक्स) ह्यांच्या आनुषंगिक प्रायोगिक व प्रयोगक्षम भौतिकशास्त्राचे संशोधन करणारी एक संस्था स्थापण्याची सूचना केली. ह्या संस्थेमुळे औद्योगिक क्षेत्रातील व्यावहारिक उपयोगितेबाबतच्या अनेक समस्या सुटू शकतील, असे होमींनी आपल्या पत्रात लिहिले होते.

ह्या पत्राला सर दोराब सकलातवाला आणि टाटा उद्योगसमूहाचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्या दोघांकडूनही अनुकूल प्रतिसाद मिळाला. होमींनी त्यांना एक योजना सादर केली. त्या योजनेला येणारा खर्चही त्यांनी दिला होता. त्याचाच परिपाक म्हणजे टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ फंडामेंटल रीसर्च (टाटा मूलभूत सशोधन संस्था) आणि ॲटॉमिक एनर्जी कमिशन (अणू ऊर्जा समिती) ची सुरुवात पहिली संस्था १९५४ त सुरू झाली. होमींचा जन्म ज्या पेडररोडवरील घरात झाला होता, त्याच घरात ही संस्था सुरू झाली. तीन वर्षांनंतर ही संस्था रॉयल यॉट क्लबच्या जुन्या इमारतीत हलवण्यात आली. शेवटी, समुद्रकिनारी योग्य जागा शोधण्यात आली. टाटा-समूह, मुंबई राज्याचे सरकार आणि केंद्र सरकार अशा तिघांत एक करार झाला आणि १९५४ साली इन्स्टिटट्यूटचा पायाभरणी समारंभ जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते करण्यात आला. १९६२ साली जवाहरलाल नेहरूंनी संस्थेचे उद्‌घाटन केले. तेव्हा संस्थेचा इंच न इंच देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शास्त्रज्ञांनी व्यापला होता. संस्थेचे काम जोरात चालू झाले होते.

१९४२ साली भारतीय अणू ऊर्जा मंडळाची स्थापना झाली. तिचे अध्यक्ष होमी होते. त्याच वर्षी अणू ऊर्जा कायदा संमत करण्यात आला. देशात अणुऊर्जेचा विकास घडवून आणण्यासाठी अणु-ऊर्जा खातेही सुरू करण्यात आले. त्याचे सचिव होते होमी

भाभा. ते प्रत्यक्ष पंतप्रधानांना जबाबदार होते. जवाहरलाल नेहरू आणि लाल बहादूर शास्त्री ह्या दोन्ही पंतप्रधानांचा विश्वास होमींनी मिळवला होता.

अणू ऊर्जा मंडळाच्या मार्गदर्शनाखाली मुंबईजवळ तुर्भे (ट्रॉम्बे) येथे 'अणू ऊर्जा नगर' (अॅटॉमिक एनर्जी एस्टाब्लिशमेंट) उभारण्यात आले. ४ ऑगस्ट १९५९ रोजी भारताची पहिली अणुभट्टी—अप्सरा—सुरू झाली. ह्या भट्टीचे डिझाईन संपूर्णपणे भारतीय तंत्रज्ञांनी केले होते व ती त्यांनीच उभारली. १९६० च्या जुलैमध्ये सी. आय. आर. (कॅनेडियन इंडियन रीअॅक्टर) ही अणुभट्टी चालू झाली.

त्यांचा विकास करण्यासाठी चार अणू ऊर्जा केंद्रे योजण्यात आली. त्यातील तुर्भेचे केंद्र सुरू झालेलेच होते. दुसरे तारापूर येथे, तिसरे राजस्तानमधील नांगल गावी आणि चौथे मद्रासजवळ कलपक्कम येथे उभारण्यात आले. ह्या चार केंद्रांमुळे झर्लिना आणि सायरस ह्या भट्ट्या सुरू करणे शक्य झाले. त्यासाठी कॅनडाचे सहकार्य मिळाले होते. होमींच्या ह्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी त्यांना १९५४ मध्ये 'पद्मभूषण' ही पदवी देण्यात आली.

१९५५ साली जिनीव्हा येथे राष्ट्रसंघातर्फे 'अणू ऊर्जेचे शांततेसाठी उपयोग' ह्या विषयावर पहिली आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली. तिचे अध्यक्ष होमी भाभा होते. ह्या परिषदेत लॉर्ड पेनींच्या शब्दात सांगायचे तर, जगाला होमींची ओळख झाली ती, 'सर्वांना समजेल अशा भाषेत विज्ञानावर बोलणारे, समजावून देणारे शास्त्रज्ञ' अशी झाली. ह्याच परिषदेत होमींच्या सूचनेवरून एक आंतरराष्ट्रीय अणू ऊर्जा समिती (इंटरनॅशनल अॅटॉमिक एनर्जी एजन्सी) स्थापण्यात आली. तिची मुख्य कचेरी व्हिएन्ना येथे ठेवण्यात आली. त्यामुळे शास्त्रीय विषयांचा अभ्यास करता करताच शास्त्रीय संगीताचाही आस्वाद घेता येईल, ह्याचा होमींना आनंद झाला.

होमींवर सन्मान—गौरवांचा वर्षाव होत होता. अनेक परदेशी विज्ञानसंस्थांनी त्यांना मानद फेलो निवडले होते. त्यातील एक संस्था होती 'वर्ल्ड अकादमी ऑफ आर्टस अँड सायन्सेस' (जागतिक कला व विज्ञान संघटना). १९६५ जुलैमध्ये भाभांची निवड केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून झाली.

इंटरनॅशनल अॅटॉमिक एनर्जी एजन्सीच्या शास्त्रीय सल्लागार समितीच्या व्हिएन्ना येथील बैठकीला जात असताना माँटब्लांक पर्वतावर झालेल्या विमान अपघातात होमी भाभांचे २४ जानेवारी १९६६ रोजी निधन झाले. त्यांच्याविषयी लॉर्ड पेनी लिहितात, "भारतीय शास्त्रज्ञांना भाभांच्या निधनाने बसलेला धक्का इतका प्रचंड की एवढा मोठा धक्का त्यांना ह्या पिढीत मिळणे अशक्यच आहे." दोन दिवसांनंतर 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रीसर्च'मध्ये भरलेल्या शोकसभेत बोलताना होमींचे

१९४९ पासूनचे निकटवर्ती प्रा. रुस्तम चोकशी म्हणाले, "त्यांची राष्ट्रभक्ती अनन्यसाधारण होती. तिचे शब्दांत वर्णन करणे शक्य नाही. ज्या भारतात निष्णात तंत्रज्ञानाचा उपयोग कनिष्ठांतील कनिष्ठ नागरिकाला सुखाचे जीवन जगता यावे, म्हणून केला जाईल, असा उदात्त भारत निर्माण करण्यासाठी त्यांनी आपल्या आबालवृद्ध सहकाऱ्यांबरोबर कष्ट घेतले; उदात्त स्वप्ने पाहिली."[३] होमींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी भारत सरकारने त्यांच्या नावाने पोस्टाचे एक तिकिट काढले.

एक वर्षानंतर, १२ जानेवारी १९६७ रोजी, तुर्भे येथील अॅटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंटला 'भाभा अॅटॉमिक रीसर्च सेंटर' (भाभा अणू संशोधन केंद्र) असे नाव समारंभपूर्वक देण्यात आले. त्या समारंभाच्या अध्यक्ष (तत्कालीन) पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या. आज ह्या केंद्रात ८,००० वर कर्मचारी काम करतात. त्यापैकी १,८०० पदवीधर शास्त्रज्ञ आणि अभियंता आहेत. ते पाच महत्त्वाच्या क्षेत्रांत संशोधन करतात. ह्या संस्थेशी निगडित असलेल्या संस्था म्हणजे टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रीसर्च (टाटा मूलभूत संशोधन संस्था), 'द टाटा मेमोरियल हॉस्पिटल फॉर कॅन्सर' (टाटा स्मारक कॅन्सर (कर्करोग) इस्पितळ), 'द इंडियन कॅन्सर रीसर्च सेंटर (भारतीय कर्करोग संशोधन केंद्र) ह्या मुंबईच्या आणि अहमदाबादच्या 'द साहा इन्स्टिटयूट ऑफ न्यूक्लिअर रीसर्च' (साहा अणुशास्त्र संशोधन संस्था) आणि 'द फिजिकल रीसर्च लॅबोरेटरीज' (भौतिक विज्ञान संशोधन प्रयोगशाळा) ह्या दोन संस्था होत. २१ नोव्हेंबर १९६३ व २९ एप्रिल १९६५ ह्या दोन दिवशी थुम्बाहून सोडण्यात आलेल्या पहिल्या दोन भारतीय अग्निबाणांचे प्रक्षेपण भाभांच्याच मार्गदर्शनाखाली झाले होते. ह्यातील दुसरा अग्निबाण अंतराळातील उपग्रहांचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त होता, तसेच पृथ्वीचे दीर्घकाळ वापरले जाऊ शकणारे नकाशे काढणे व नौकानयनात जास्त अचूकता आणणे ह्यासाठीही त्याचा उपयोग होणार होता. दहा वर्षांनी, फेब्रुवारी १९७५ मध्ये भारताने आपला पहिला अणुस्फोट पृथ्वीच्या गर्भात केला. त्यानंतर थोड्याच महिन्यानंतर, एप्रिल १९७५ मध्ये आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह रशियातील एका तळावरून अंतरिक्षात सोडण्यात आला. ह्या दोन्ही कामगिऱ्या डॉ. होमी सेथना ह्यांच्या कौशल्यपूर्ण मार्गदर्शनाखाली झाल्या. डॉ. होमी सेथना हे होमी भाभांचे स्नेही व सहकारी. होमींच्या मृत्यूनंतर डॉ. सेथनांची नेमणूक भाभा अटॉमिक रीसर्च सेंटरचे अध्यक्ष म्हणून झाली होती.

भारतातील रेडियो अॅस्ट्रोनॉमीच्या विकासाला होमी भाभांनी हातभार लावला. टाटा मूलभूत संशोधन संस्थेने एक ५०० मीटर लांब व ३० मीटर रुंद असा प्रचंड मोठा, गोल, रेडियो टेलिस्कोप नीलगिरी टेकड्यांतील उटकमंड येथे उभारला. तो फेब्रुवारी १९७० पासून कार्य करू लागला. इंग्लंडच्या जॉर्डेल बँक येथील ७० मीटर

तबकडीपेक्षा ह्या टेलिस्कोपची शक्ती चार पटीने जास्त आहे.

होमींनी रेडियो कार्बन लॅबोरेटरीचा एक राष्ट्रीय उपक्रम सुरू केला. १९६१ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेतर्फे सुरू झालेली ही प्रयोगशाळा भारतातील अशा तऱ्हेची पहिलीच प्रयोगशाळा आहे. ह्या प्रयोगशाळेमुळे चाल्कोलिथिक (ताम्रयुग), हरप्पा, निओलिथिक (दुसरे अश्मयुग) व गंगाखोरे संस्कृतींच्या शेकडो अवशेषांचा काळ काटेकोरपणे ठरवणे शक्य झाले.

टाटा मूलभूत संशोधन केंद्राने एक जल-विषयक प्रयोगशाळाही उभारली आहे. पृथ्वीच्या गर्भातील पाण्याच्या साठ्याचे गुणविशेष ह्या प्रयोगशाळेत अभ्यासिले गेले आणि काही महत्त्वाचे निष्कर्ष काढणे शक्य झाले.

टाटा मूलभूत संशोधन केंद्र आणि भाभा अणू संशोधन केंद्र एकमेकांच्या सहकार्याने कामे करतात; एकमेकांच्या गरजा पुरवतात, तशीच एकमेकांच्या योजनांची प्रगतीही घडवून आणतात. १९७०–७१ मध्ये अणू संस्थेचा रौप्य महोत्सव साजरा झाला. तेव्हा तिच्या संचालक मंडळाने ३० आक्टोबर हा होमींचा जन्म दिवस 'फौंडर्स डे' (संस्थापक दिन) म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला.

होमी नसरवानजी सेथना (१९२३) हे भाभा अणू संशोधन केंद्राचे संचालक आहेत. न्यूक्लिअर फिजिक्समधील त्यांची कामगिरी भरघोस आहे. त्यांना अनेक सन्मान मिळाले आहेत. त्यांपैकी एक म्हणजे इंजिनियरींग विज्ञानातील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी मिळालेला पद्मश्री किताब (१९५९). त्याशिवाय, १९६० साली त्यांना एस. एस. भटनागर स्मारक पारितोषिक देण्यात आले. १९६६ मध्ये त्यांना पद्मविभूषण पदवी देण्यात आली. १९७१ मध्ये ब्रिटिश इन्स्टिटयूट ऑफ प्रॉडक्शन इंजिनियर्सनी सर वॉल्टर पकी हे आंतरराष्ट्रीय पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला.

भाभांपेक्षा वयाने ज्येष्ठ असलेले त्यांचे सहकारी दाराशॉ नौशेरवानजी वाडिया (१८८३–१९६९) हे भूगर्भशास्त्रज्ञ होते. ते शास्त्रज्ञ म्हणून प्रख्यात होते. रॉयल सोसायटीचे फेलो होते.

प्रोफेसर वाडिया यांचा जन्म सूरतला झाला. नौशेरवान आणि कुंवरबाई वाडिया यांच्या नऊ मुलांपैकी ते चौथे अपत्य होते. त्यांचे वडील रेल्वेमध्ये अधिकारी होते आणि ते त्यांच्या कामामुळे जास्त काळ घरापासून लांबच असत. प्रोफेसर वाडिया यांचे संगोपन जास्त करून त्यांच्या आजीच्या–आईची आई–कडक देखरेखीखाली झाले. १८९४ मध्ये त्यांचे कुटुंब बडोद्याला आले. प्रोफेसर वाडिया यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण तिथेच झाले. प्रथम ते १९०३ मध्ये वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र या विषयांत बी. एस्सी. झाले. त्यानंतर १९०५ मध्ये त्यांनी पुन्हा एकदा बी. एस्सी.

ची पदवी भूगर्भशास्त्र या विषयात घेतली. त्यावेळी त्यांची बडोदा महाविद्यालयाचे फेलो म्हणून निवड झाली. १९०७ मध्ये, वयाच्या २३ व्या वर्षी जम्मू आणि काश्मीर विद्यापीठामध्ये भूगर्भशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली आणि त्यानंतरची १४ वर्षे त्यांनी तिथेच अध्यापन आणि संशोधन केले. मध्य हिमालयाच्या/हिमाचल पर्वतराजींच्या पूंच भागातल्या, तोपर्यंत संपूर्ण अज्ञात अशा ५,१८० चौ. कि. मी. भूप्रदेशाचा त्यांनी प्रथम नकाशा काढला. आणि पंजाबमधल्या सखल पठाराच्या ५,४३५ चौ. कि. मी. भूभागाची पाहणी केली. १९२८ मध्ये या त्यांच्या कामगिरी-बाबतच्या आठवणी त्यांनी प्रसिद्ध केल्या. ' जिऑलॉजी ऑफ इंडिया ' (१९१९, चौथी आवृत्ती १९७५) हा त्यांचा विद्वत्तापूर्ण ग्रंथ अद्यापही भारतीय विद्यापीठामध्ये मोठ्या प्रमाणात वाचला जातो. १९२१ ते १९३८ या काळात जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियामध्ये (भारतीय भूगर्भ पाहणी विभाग) ते वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम करीत होते. त्या काळी भारतात फक्त कलकत्ता आणि मद्रास या दोनच विश्वविद्यालयांमध्ये भूगर्भशास्त्राच्या शिक्षणाची चांगली सोय होती.

१९३८ मध्ये प्रो. वाडिया जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियामधून निवृत्त झाले. आणि त्यांची लंकेमध्ये भारत–सरकारचे खनिजशास्त्रज्ञ म्हणून नेमणूक झाली. या पदाची जबाबदारी त्यांनी १९४५ पर्यंत अत्युत्तम रीतीने सांभाळली. या महत्त्वपूर्ण पदावर असताना त्यांनी भरीव कामगिरी केली आणि पुष्कळच नवीन गोष्टी सुरू केल्या. खनिज–शास्त्र-विभागाला आणखी एक खाणी-विषयक विभाग, तसेच भूगर्भ-पाहणी–विभाग जोडावा असे त्यांनी सुचवले; लंका बेटाची पद्धतशीर पाहणी करण्याची आणि त्यानंतर लगेच बेटाचा एक संपूर्ण आणि बिनचूक नकाशा तयार करण्याची योजना त्यांनी मांडली; तसेच त्यांच्याच सूचनेनुसार लंका-विज्ञान-संघटनेची (सिलोन असोसिएशन ऑफ सायन्स) स्थापना झाली. या संघटनेचे पहिले अध्यक्षही तेच होते.

१९४५ मध्ये भारतात परत आल्यावर भारत-सरकारचे खनिज-विषयक सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यावेळी नव्यानेच स्थापन झालेल्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन मंडळाचेही ते सभासद होते. त्यांनी १९४६ मध्ये खनिज-माहिती-केंद्र आणि १९४८ मध्ये भारतीय खाणीकेंद्र स्थापन केले. यामधूनच नंतर खाणी व खनिज (नियमन आणि विकास) कायदा ' अस्तित्वात आला. १९४९ मध्ये खनिज-सवलत-नियम आणि पेट्रोल-सवलत-नियम तयार करण्यात आले. दरम्यान होमी भाभा यांचा शिफारशींमुळे भारतीय अणुशक्ती कायदा झाला होता. आणि अणुशक्ती आयोगाची (अॅटॉमिक एनर्जी कमिशन) स्थापनाही झाली होती. या आयोगाच्या कच्चा-माल-विभागाला मार्गदर्शन करण्यासाठी प्रो. वाडियांची नियुक्ती

झाली होती. त्यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली लवकरच हा विभाग अत्यंत संघटित असा झाला आणि त्यात ४७० भूगर्भशास्त्रज्ञ, भूभौतिकशास्त्रज्ञ आणि खाणीविषयक व खोदकामतंत्रज्ञ काम करू लागले.

१९२६ ते २८ या काळात प्रो. वाडिया यांनी लंडनच्या ब्रिटिश म्यूझियममध्ये भूगर्भातील प्राणी आणि वनस्पती–अवशेष–तज्ज्ञ (पॅलिऑन्टॉलॉजिस्ट) म्हणून २० महिने काम केले. हिमालयाच्या जोयामाइर प्रदेशात पेट्रोलियम असल्याचे त्यांनी कितीतरी आधी, म्हणजे १९२९ मध्ये बरोबर वर्तविले होते. तसेच हिमालयाच्या पायथ्याच्या जम्मू टेकड्यांच्या तिसऱ्या पट्ट्याखाली पांचाल ज्वालामुखी खडकांच्या रांगांचे समूह सापडतील, असेही त्यांनी अचूक सांगितले. १९३८ मध्ये हिमालयाच्या प्रचंड भूप्रदेशांखालच्या भुसभुशीत खडकांच्या समस्येचा त्यांनी पुन्हा अभ्यास केला. १९५६ मध्ये त्यांनी राजस्थान आणि उत्तर बिहारमध्ये रत्नांचे (बेरिल) साठे असल्याचे शोधून काढले. तसेच देशामध्ये दोन ठिकाणी युरेनियमचे साठे असल्याचाही शोध त्यांनी लावला. यातला एक म्हणजे उत्तर बिहारमधला प्रचंड भूगर्भअसमतोलाचा १३२ कि. मी. चा पट्टा. त्याच्याजवळच सिंघम् ताम्रपट्टाही आहे. आणि दुसरा राजस्थानमधला जुन्या, आता वापरात नसलेल्या खाणींजवळचा काही भाग ! प्रो. वाडियांच्याच विनंतीवरून सरकारने जमशेटपूरजवळ कच्च्या पोलादाच्या निर्मितीसाठी युरेनियमचा कारखाना सुरू केला. तोपर्यंत प्रो. वाडियांच्या प्रयत्नांना फळ येऊन १४ भारतीय विद्यापीठांमधून भूगर्भशास्त्राची पदवी घेता येत होती. तरीदेखील त्यांचे असे मत होते की, खनिजविषयक तंत्रज्ञान, कच्च्या पोलादावरच्या प्रक्रिया आणि खनिजांचा जास्तीत जास्त उपयोग याबाबतचे अद्ययावत शिक्षण देणाऱ्या संस्था अगर महाविद्यालये देशात नाहीत. अशा काही उणिवा असल्या तरीदेखील १९४५ ते १९५२ या ७ वर्षांमध्ये सरकारला आवश्यक असलेले ३०० भूगर्भशास्त्रज्ञ देशातल्या विविध विद्यापीठांमधून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडले.

१९५४ ते १९५७ या काळात प्रो. वाडिया केंद्रीय भू–भौतिक–शास्त्रज्ञ–मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांना दुसरे सीवर्ड व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले होते. आणि त्यासंबंधातच युनेस्कोने त्यांना आपल्या वैराण–विभाग संशोधन कार्यक्रमासाठी अहवाल तयार करण्याची विनंती केली. १९५७ मध्ये त्यांची रॉयल सोसायटीचे फेलो म्हणून निवड झाली. १९५९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये पहिली इंटरनॅशनल ओशनोग्रॅफिक काँग्रेस भरल्यानंतर प्रो. वाडियांनी १९६० मध्ये, सरकारला सामुद्रिक संशोधनविषयक राष्ट्रीय समिती नेमायला भाग पाडले. या समितीचे अध्यक्ष तेच होते. निरनिराळे कार्यकारी गट तयार करण्यात आले आणि १९६२ मध्ये आंतरराष्ट्रीय सामुद्रिक मोहीम सुरू करण्यात आली.

१९६२ मध्ये प्रो. वाडियांनी देशासाठी केलेल्या असामान्य कामगिरीचा गौरव म्हणून त्यांना राष्ट्रपतींनी पद्मभूषण पदवी (किताब) बहाल केली, आणि त्यांना भूगर्भशास्त्राचे राष्ट्रीय प्राध्यापक नियुक्त केले. हा मान मिळालेले ते पहिले भारतीय होते.

प्रो. वाडियांनी अनेक संशोधन निबंध (रिसर्च पेपर्स) प्रसिद्ध केले. त्यांतल्या अखेरच्या दिवसांतल्या काही संशोधन निबंधांपैकी एकात त्यांनी हिमालयाच्या अभ्यासाशी संबंधित सहा न सुटलेल्या (अनुत्तरित) प्रश्नांविषयी चर्चा केली आहे. हिमालयीन भूगर्भ–संबंधित भारतीय संस्था स्थापन करणे हे त्यांचे स्वप्न होते. त्याची पूर्वतयारी म्हणून, जून १९६३ मध्ये त्यांनी सिमल्याला हिमालयीन भूगर्भ-शास्त्राबद्दलचा पहिला उन्हाळी शिक्षणक्रम (समर स्कूल) आयोजित केला. त्याला इतके यश मिळाले की, अशा प्रकारची संस्था स्थापन करण्याला तात्त्विक मान्यता मिळाली. डिसेंबर १९६५ मध्ये हिमालयीन भूगर्भविषयक भारतीय संस्थेची योजना तयार करण्यासाठी १४ सभासदांची एक तात्पुरती समिती (अॅडहॉक कमिटी) स्थापन करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाने (युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशन) हिमालयीन भूगर्भसंबंधित अशा एका आंतर–विद्यापीठ सुसंबद्ध कार्यक्रमासाठी भूगर्भशास्त्रामध्ये १५ संशोधन शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. ही सर्व संस्थेची पूर्वतयारी होती. मार्च १९६८ मध्ये संस्थेबाबतच्या संपूर्ण योजनेला सरकारी मान्यता मिळाली आणि त्याच वर्षीच्या जूनमध्ये ही संस्था स्थापन झाली. सरकारने या संस्थेसाठी २० लाख रु. मंजूर केले. ही संस्था प्रथम दिल्ली विद्यापीठामधून कार्य करीत होती. १९६९ मध्ये प्रो. वाडियांच्या निधनानंतर तिला वाडिया हिमालयीन भूगर्भसंस्था असे नाव देण्यात आले. या संस्थेची कायमची प्रमुख कचेरी उत्तर प्रदेशात डेहराडूनला असून तिथूनच सध्या संस्थेचे कार्य चालू आहे. पहिल्या १० वर्षांतच या संस्थेने सर्व जगभरच्या वैज्ञानिकांना आणि भूगर्भशास्त्रज्ञांना आस्था असलेल्या हिमालयीन प्रदेशांमध्ये भूगर्भविषयक संशोधनात प्रगती करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रकल्प सुरू केला आहे.

१९६१ ते १९६९ या त्यांच्या अखेरच्या ८ वर्षांत प्रो. वाडिया भूगर्भशास्त्र आणि खाणीविभागांच्या (खाणी आणि धातू मंत्रालय) कार्यक्रम आयोजन मंडळाचे अध्यक्ष होते. या पदावरून ते अणुशक्ती कच्चा–माल–विभाग, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया–दुर्मिळ खनिज विभाग आणि भूगर्भशास्त्र व खाणकामविषयक विविध सरकारी विभागांच्या कार्यक्रमांचे आयोजन करीत असत.

सर जेम्स स्टॅबलफील्ड यांनी ' बायोग्रॅफिकल मेमॉइर्स ऑफ फेलोज ऑफ द रॉयल सोसायटी 'मध्ये लिहिताना जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाची जी प्रचंड वाढ झाली त्याबद्दल पुढीलप्रमाणे आकडेवारी दिलेली आहे. जिऑलाजिकल सर्व्हे ऑफ इंडियामध्ये

१९४७ च्या अखेरीला फक्त ११६ अधिकारी काम करीत होते, तर १९५५ मध्ये २८२, १९६२ मध्ये ५१९ अधिकारी होते आणि १९६६ मध्ये तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत ही संख्या सुमारे १,००० भूगर्भशास्त्रज्ञ, १०० भूभौतिकशास्त्रज्ञ, १५० रसायनशास्त्रज्ञ आणि इतर कित्येक कामगार, एवढी होईल असा अंदाज होता.

अत्यंत नम्र आणि निगर्वी स्वभावाचे प्रो. वाडिया मितभाषी होते. आजकाल दुर्लभ असा जुन्या काळचा दरबारी भारदस्तपणा त्यांच्यात होता. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात श्रीलंकेमध्ये ते काम करीत असताना, तिथल्या एका अधिकाऱ्याने "आसमंतातल्या प्रत्येक दगडाला लाथाडीत जाणारे, खाकी कपड्यातले एकाकी गृहस्थ, असे त्यांचे वर्णन केले होते.

पारशांनी निव्वळ शुद्ध विज्ञानातच महत्त्वाची कामगिरी बजावली, असे नाही; तर वैद्यकीय, परिचर्या (नर्सिंग), इस्पितळे उभारणे, वैद्यकीय संशोधन आणि तत्सम क्षेत्रांतही पारशांनी महत्त्वाचा सहभाग घेतला आहे.

१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत मुंबईत इस्पितळांच्या सोयी जवळजवळ नव्हत्याच. फक्त लष्करी लोकांसाठी एक 'मिलिटरी हॉस्पिटल' होते. सामान्य नागरिकांसाठी मात्र एकही इस्पितळ नव्हते. पहिले सर जमशेटजी जीजीभॉय ह्यांनी एक इस्पितळ सुरू करण्याची तयारी दाखवली. ३ जानेवारी १८४३ रोजी सर जे. जे. हॉस्पिटलचा पाया घातला गेला; आणि २८ मे १८४५ रोजी तिथे रुग्णांची पहिली तुकडी दाखल झाली. त्यानंतर तिथे आठ मजली नवी इमारत उभारली गेली. सर जमशेटजींनी मुंबई-तील पहिल्या प्रसूतिगृहालाही देणगी दिली. सर कावसजी जहांगीर (१८१२–१८७८) ह्यांनी सुरतेला पहिले सिव्हिल हॉस्पिटल सुरू केले (एप्रिल १८६३). सर कावसजी जहांगीरनी मुंबईला भायखळ्यात पहिले डोळ्यांचे इस्पितळ उघडले.

लेडी साकरबाई ह्या पहिले सर दिनशॉ पेटिट ह्यांच्या पत्नी. त्यांनी १८७४ साली ह्या देशातील पहिले पशू इस्पितळ सुरू केले. त्याच वर्षी 'द सोसायटी फॉर द प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टु द ॲनिमल्स् (प्राण्यांना क्रूरतेपासून वाचवणारी संघटना) स्थापण्यात आली. पशू इस्पितळाला 'द लेडी साकरबाई हॉस्पिटल फॉर ॲनिमल्स' असे नाव देण्यात आले. १८८४ त त्यात तीन वॉर्डांची भर घालण्यात आली. त्यांतले दोन वॉर्ड्स गुरांसाठी होते आणि एक घोड्यांसाठी. १८८६ त एक पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले. तिथे पशुवैद्य विनामोबदला काम करीत. ह्या महाविद्यालया-साठीही सर दिनशॉंनी आर्थिक मदत केली होती. १८८८ त लेडी साकरबाईंनी ६० गुरांना बांधता येईल असा एक गोठा (शेड) त्यात वाढवला. त्याच्या पुढच्या वर्षी सर दिनशॉंनी एक आयसोलेशन वॉर्ड (लस लागू नये म्हणून रुग्णाला इतरांपासून वेगळा ठेवण्याचा वॉर्ड), एक पॅथो-बॅक्टीरिऑलॉजी प्रयोगशाळा आणि एक नाल-

बंदीची शेड बांधण्यासाठी पैसे दिले.

सर जमशेटजींनी मुंबईत पहिले प्रसूतिगृह उभारले असले तरी मुंबईत स्त्रियांसाठी व मुलांसाठी स्वतंत्र इस्पितळ नव्हते. असे हॉस्पिटल नंतर सर दिनशाँनी उघडले. त्याचा पाया १८९० त घालण्यात आला. आणि १८९२ त त्या इस्पितळाचे औपचारिक उद्घाटन झाले. १८९८ त दिनशाँच्या मालकीच्या जागेवर 'द मराठा प्लेग हॉस्पिटल' सुरू झाले. १९०१ साली, मृत्युशय्येवर असतानाच, सर दिनशाँनी ती जागा सरकारला देणगी म्हणून दिली. त्याबरोबरच २॥ लाख रुपये रोख दिले. त्यातून ४० पारशी रुग्णांची सोय होईल असा एक वॉर्ड बांधावा, पारशांचे मृतदेह दोखमामध्ये (टावर्स ऑफ सायलेन्स) नेले जाण्यापूर्वी ठेवता येतील असे एक दालन बांधावे, अशी अट घातली. पेटिट कुटुंबाने आपली उदात्त परंपरा पुढेही चालू ठेवली. त्या कुटुंबाने दिलेल्या पैशांतूनच 'द डी. एम्. पेटिट पारशी जनरल हॉस्पिटल' बांधण्यात आले. ते १९१२ सुरू झाले आणि आजही ते जोरात चालू आहे. आता त्यात वाढही झाली आहे.

मुंबईतील दुसरे ख्यातनाम प्रसूतिगृह म्हणजे बाई मोटलाबाई वाडिया (१८११–१८९७) यांनी स्थापलेले बाई मोटिलाबाई ऑब्स्टेट्रिक्स हॉस्पिटल. मोटलाबाईंनी त्यासाठी १६,६२० चौ. कि. मी. ची जागा आणि १,५२,००० रुपयांची देणगी दिली होती. त्यांच्याच वंशजांनी 'जेरबाई वाडिया हॉस्पिटल फॉर चिल्ड्रेन' १९२९ त सुरू केले.

१८९५ ते १९०१ च्या दरम्यान मुंबईत प्लेगची साथ जोरात सुरू होती. त्याच काळात डॉ. कैखुश्रू नसरवानजी बहादुरजी (१८६०–१८९८)[४] ह्यांनी 'पारसी व्हीवर हॉस्पिटल' स्थापन केले. बहादुरजी हे लंडन येथून एम्. डी. होणारे पहिले भारतीय. त्यांनी अहोरात्र गरिबांची शुश्रूषा केली. वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी ते वारले, तेव्हा सर्व जमातीच्या लोकांना दुःख झाले.

कर्करोग संशोधन, हृद्रोग, कुष्ठरोग, डोळ्यांचे आरोग्य, व्हायरॉलॉजी (व्हायरस विज्ञान) ह्या क्षेत्रांतही पारशांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

१९४१ त टाटा मेमोरियल हॉस्पिटल स्थापन झाले. तेव्हा डॉ. जाल कावाशा पेमास्टर (१९०८–) ह्यांना असिस्टंट सर्जन नेमण्यात आले. मुंबई विद्यापीठातून त्यांनी वैद्यकीचा अभ्यासक्रम पुरा केला. आणि १९३८ त ते एडिम्बरोच्या रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सचे फेलो बनले. १९४० साली त्यांना न्यूयॉर्कच्या मेमोरियल हॉस्पिटल फॉर कॅन्सरमध्ये शिकण्यासाठी सर दोराब टाटा स्कॉलरशिप मिळाली. तिथे त्यांनी दीड वर्ष काम केले. १९४४ त डॉ. पेमास्टरना टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये चीफ सर्जन म्हणून बढती मिळाली. १९५७ त जेव्हा हे हॉस्पिटल सरकारच्या सुपूर्द करण्यात आले तेव्हा पेमास्टर त्यांचे सुपरिंटेंडेंट झाले. दहाच वर्षांनंतर त्यांची 'टाटा मेमोरियल सेंटर'चे संचालक म्हणून नेमणूक झाली. ह्या केंद्रात इस्पितळ व कर्करोग

संशोधन केंद्र ह्यांचा समावेश आहे. १९७३ ला त्या पदावरून ते निवृत्त झाले.

१९५९ मध्ये डॉ. पेमास्टरना पद्मभूषण पदवी देण्यात आली. त्यांनी तोंड व घसा यांचा कर्करोग ह्या विषयात केलेल्या महत्त्वाच्या संशोधनासाठी व अशा कर्करोगावरील उपचारांचे तंत्र सहजसुलभ बनवण्यासाठी केलेल्या कामगिरीचा हा गौरव होता. त्यांच्याच पुढाकाराने कर्करोगावरील उपचाराची नवीन तंत्रे टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये यशस्वीपणे वापरली जाऊ लागली.

निवृत्तीनंतर डॉ. पेमास्टर ह्यांची नियुक्ती बॉम्बे हॉस्पिटलमधील मेडिकल रिसर्च सेंटरच्या ऑन्कॉलॉजी (टयुमरचा अभ्यास करणारे) खात्याचे प्रमुख म्हणून झाली. ते इंडियन अॅकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सेस, अमेरिकन कॉलेज ऑफ सर्जन्स, द इंटरनॅशनल कॉलेज ऑफ सर्जन्सचे फेलो आहेत; जेम्स युविंग सोसायटी, अमेरिकेतील सोसायटी ऑफ हेड अँड नेक सर्जन्स ह्यांचे सभासद आहेत. कर्करोगाच्या विविध प्रकारांबद्दल त्यांनी लिहिलेली पन्नासावर शास्त्रीय प्रकाशने उपलब्ध आहेत.

डॉ. रुस्तम जाल वकील (१९११–१९७४) हे कार्डिऑलॉजीत (हृद्रोग–उपचार) प्रमुख मानले जातात. परदेशातील वैद्यकीय नियतकालिकांनी त्यांचा उल्लेख 'भारतातील कार्डिऑलॉजीचे जनक' असाच केला आहे. डॉ. वकिलांचे वैद्यकीय व कार्डिऑलॉजीचे शिक्षण लंडन येथे झाले. १९३५ साली ते रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्सचे फेलो झाले; त्यावेळी ते फक्त २४ वर्षांचे होते. नंतर लवकरच त्यांनी लंडनची एम. डी. ही पदवी मिळवली. भारतात परतल्यावर त्यांच्या मुंबईतील अनेक इस्पितळात नेमणुका झाल्या; त्यातीलच एक के. ई. एम. (किंग एडवर्ड मेमोरियल) हॉस्पिटल हे एक होते. लवकरच त्यांनी हृद्रोगतज्ज्ञ म्हणून नाव मिळवले. वाढत्या रक्तदाबासाठी (हाय ब्लडप्रेशर) 'रॉवोल्फिया सर्पेन्टिना' ह्या वनस्पतीचा उपचार त्यांनीच प्रथम सुरू केला. ह्या वनस्पतीचा रुग्णावर झालेल्या परिणामाबाबत लिहिताना 'प्री इन्फार्क्शन सिनड्रोम' असा शब्द त्यांनीच प्रचारात आणला. १९५७ त त्यांना वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय लास्कर पारितोषिक देण्यात आले. १९५८ साली त्यांना 'पद्मभूषण' किताब मिळाला. त्यानंतरही त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळाली. लंडन विद्यापीठाची चार सुवर्णपदकेही त्यांनी मिळवली. विसापेक्षा जास्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विज्ञानसंस्थांचे डॉ. रुस्तम फेलो निवडले गेले होते. वैद्यकीय नियतकालिकांतून त्यांनी ३८० पेक्षा जास्त लेख लिहिले. हृद्रोग व संबंधित विषयांवर त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली.

त्यांच्या मृत्यूपूर्वी दोनच महिने आधी डॉ. वकील यांना अभिमान वाटण्याजोगा मान मिळाला होता. २८ सप्टेंबर १९७४ रोजी मुंबईच्या गव्हर्नरांनी के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये डॉ. रुस्तम जाल वकील इन्स्टिटयूट ऑफ कार्डिऑलॉजी अँड रीसर्च ह्या संस्थेचे

उद्‌घाटन केले. ह्याच संस्थेत भारतातील कार्डिऑलॉजिस्ट (हृद्रोगतज्ज्ञ) संशोधनासाठी व शिक्षणासाठी येत असतात.

डॉ. वकील यांनी हृद्रोगतज्ज्ञ म्हणून नाव कमावले, तर डॉ. नोशिर होरमासजी आन्टिया (१९२२) हे भारतातील अग्रगण्य प्लास्टिक सर्जन आहेत. मुंबई विद्यापीठाचा वैद्यकीय शिक्षणक्रम त्यांनी पुरा केला आणि ते उच्च शिक्षणासाठी परदेशी गेले. १९५० साली सर हॅरोल्ड गिलिस आणि १९५४ साली एडिंबरो येथे ए. बी. वॉलेस ह्या दोन प्रख्यात प्लास्टिक सर्जन्सच्या हाताखाली त्यांनी काम केले. १९५२ साली डॉ. आन्टिया लंडनच्या रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सचे फेलो निवडले गेले. मायदेशी परतल्यावर पुण्याच्या कोंढवा लेप्रसी हॉस्पिटलचे ते संचालक नेमले गेले. कुष्ठरोग्यावर त्यांनी केलेल्या वैशिष्टचपूर्ण प्लास्टिक सर्जरीमुळे त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानसन्मान मिळाले. ते 'इंटरनॅशनल सोसायटी फॉर द रिहॅबिलिटेशन ऑफ द डिसएबल्ड' (अपंग पुनर्वसन आंतरराष्ट्रीय संघटना) ची संचालक समिती आणि 'वर्ल्ड कमिशन ऑन लेप्रसी ऑफ द सोसायटी' ह्या संघटनेचे सभासद आहेत. त्याशिवाय, इंडियन कौंसिल ऑफ मेडिकल रीसर्चच्या एक्स्पर्ट कमिटी ऑन लेप्रसी (कुष्ठरोग तज्ज्ञ समिती) चे ते सभासद आहेत. महाराष्ट्र राज्याच्या कुष्ठरोग सल्लागार समितीचेही ते सभासद आहेत. महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ सायन्सेस, मुंबईची सोसायटी फॉर रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी रीहॅबिलिटेशन अँड रीसर्च, मुंबईचीच नॅशनल सोसायटी फॉर इक्वल ऑपरच्युनिटीज टु द हँडिकॅप्ड' ह्या संस्थांचेही ते संस्थापक सदस्य आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या कुष्ठरोगतज्ज्ञ समितीवरही ते होते.

भारतातील डोळ्यांच्या उपचाराबाबतही पारशी सुरुवातीपासूनच आघाडीवर आहेत. लेफ्टनंट कर्नल सर जमशेटजी नसरवानजी डग्गन (१८८४–१९५८)[५] हे एक अत्यंत ख्यातनाम नेत्रविशारद. त्यांनी देशात व परदेशात शिक्षण घेतले. त्यानंतर ते मुंबईच्या सर कावसजी जहांगीर ऑफ्थॅल्मिक हॉस्पिटलचे सुपरिंटेंडेंट झाले. शिवाय ग्रँट मेडिकल कॉलेजात ते ऑफ्थॅल्मिक मेडिसिन व सर्जरीचे प्रोफेसरही होते. ते कॉलेज ऑफ फिजिशियन्स अँड सर्जन्सचे अध्यक्ष होते. जस्टिस ऑफ पीस होते; आणि मानद (ऑनररी) प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटही होते. ह्या सगळ्या व्यापातून वेळ काढून त्यांनी डोळ्यांच्या आरोग्यावर अनेक लेख लिहिले.ते आजही महत्त्वपूर्ण व अभ्यासू मानले जातात.

त्यांच्याच इतकी ख्याती मिळवली डॉ. अदरबाद इराणी (मृत्यू १९७४) आणि डॉ. फिरोझ बानाजी ह्यांनी दोघांनीही आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली. ते मध्यपूर्व व आफ्रिका ह्या देशात खास कामगिरीवर सामील झाले होते आणि मोतिबिंदू, ट्राकोमा, आणि इतर नेत्ररोग झालेल्या गरिबांवर त्यांनी उपचार केले.

मुंबईबाहेरचे डॉ. सोराबजी पी. श्रॉफ (१८७८–१९६४) ह्यांनी दिल्ली येथे

१९१४ साली ' डॉ. श्रॉफ चॅरिटी आय हॉस्पिटल ' उघडले. पाच लाख रुपये जमा करून त्यांनी त्यांचा एक विश्वस्त निधी बनवला; आणि आपल्या मृत्यूनंतरही आपले कार्य पुढे चालू राहील ह्याची व्यवस्था केली. डॉ. श्रॉफ ह्यांचा जन्म मुंबईचा. त्यांचे पुढील आयुष्य पंजाबात गेले आणि १९०४ साली पंजाब विद्यापीठातून त्यांनी आपला वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केला. पुढची दोन वर्षे त्यांनी जम्मू–काश्मीर सरकारची नोकरी केली. मग ते परदेशात उच्च शिक्षणासाठी गेले. १९१३ त त्यांनी दिल्लीमध्ये नेत्रविशारद म्हणून व्यवसायाला सुरुवात केली. त्याच्या पुढच्याच वर्षी त्यांनी स्वतःचे इस्पितळ उघडले. त्यांनी केलेल्या गरिबांच्या सेवेसाठी त्यांना १९३३ त ' कैसर–इ–हिंद सुवर्ण पदक ' देण्यात आले. १९६३ साली त्यांना ' पद्मश्री ' मिळाली. डॉ. श्रॉफ एकनिष्ठ राष्ट्रभक्त होते. दिल्लीच्या नागरी कारभारात त्यांनी बराच रस घेतला होता. त्यांची दिल्ली म्युनिसिपल कमिटीचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती. एप्रिल १९१९ मध्ये ड्यूक ऑफ कनॉट ह्यांच्या भेटीच्या वेळी दिल्लीत दंगे झाले. म्हणून दिल्लीकर नागरिकांवर ४०,००० रुपयांचा दंड बसवण्यात आला होता. तो रद्द करवून घेण्यात डॉक्टरांचा प्रमुख हातभार होता. १९४४ ते १९५६ पर्यंत ते ' दिल्ली पारशी अंजुमान 'चे अध्यक्ष होते. त्यावेळी दिल्लीमध्ये एक अॅग्यारी, एक सभागृह (हॉल) आणि एक धर्मशाळा बांधण्यासाठी त्यांनी अडीच लाखांची निधी गोळा केला होता. १९५६ साली ते निवृत्त झाले; तेव्हा त्यांना अंजुमानचे पेट्रन नेमण्यात आले.

डॉ. मिनू श्रॉफ हे डॉ. एस. श्रॉफ ह्यांचे चिरंजीव. ते आता त्यांच्या हॉस्पिटलचे प्रमुख आहेत. गेली तीस वर्षे त्यांनी डोळ्यांचे तज्ज्ञ शस्त्रवैद्य म्हणून नाव कमावले आहे. वडिलांच्या इस्पितळाची वाढ करून नाजुक शस्त्रक्रियांसाठी लागणारी उपकरणेही त्यांनी आणली आहेत. एक कॉंटॅक्ट लेन्स (अदृश्य भिंग) क्लिनिकही उघडले आहे. त्याशिवाय कान–घशांच्या रुग्णांसाठी एक स्वतंत्र विभाग उघडण्यात आहे. दिल्लीच्या जवळपासच्या भागात एक शास्त्रशुद्ध नेत्रशिबिर दरवर्षी घेण्यात येते. हे डोळ्यांचे इस्पितल उत्तर भारतात अग्रगण्य आहे.

व्हायरॉलॉजी (व्हायरस जंतूंच्या अभ्यास) क्षेत्रात डॉ. खोर्शेद मिनोचर पावरी (१९२७––) ह्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. त्या मुंबई विद्यापीठाच्या एम. एस्सी. आहेत. त्यानंतर त्यांनी मायक्रोबायॉलॉजी विषयात पीएच. डी. मिळवली. नंतर त्या फुलब्राईट मण्ड्ट फेलोशिप मिळवून अमेरिकेत गेल्या. तिथे त्यांनी व्हॉय-रॉलॉजी विषयातील डॉक्टरेटोत्तर अभ्यासक्रम पुरा केला. मायदेशी परतल्यावर त्यांची पुण्याच्या व्हायरस रीसर्च सेंटरच्या डेप्युटी डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली. डॉ. पावरींनी ६० पुस्तके लिहिली. व्हायरॉलॉजीवरील निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय परिषदां-तून भारताचे प्रतिनिधित्व केले. जागतिक आरोग्य संघटनेच्या व्हायरस रोग तज्ज्ञ

समितीच्या त्या सदस्य आहेत. १९७६ साली त्यांना वैद्यकीय व्हायरॉलॉजीतील महत्त्व-पूर्ण संशोधनासाठी बासन्तीदेवी अमीरचंद पारितोषिक देण्यात आले.

प्रशासकीय वैद्यक विभागात अनेक पारशांनी ख्याती मिळवली. त्यांपैकी डॉ. कावस चिनॉय हे एकेकाळी हैदराबाद येथे डायरेक्टर जनरल ऑफ हेल्थ सर्व्हिसेस होते. नंतर त्यांची नेमणूक ब्रह्मदेशात जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी म्हणून झाली. ह्या संघटनेची कचेरी जेव्हा इंडोनेशियात उघडण्यात आली तेव्हा त्या संस्थेचे पहिले प्रति-निधी म्हणून डॉ. नौशीर के. जंगलवाला (१९१२) ह्यांची नेमणूक झाली (१९५२–५५). ते नवी दिल्ली येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ एज्युकेशन अँड अॅडमिनिस्ट्रेशनचे संस्थापक–संचालक होते.

वनस्पति–उपचारातही पारशी तज्ज्ञ समजले जातात. ह्या शास्त्रातील पहिले तज्ज्ञ होते एदलजी पेस्तनजी हकीम (१८३५–१९११). त्यांनी युनानी पद्धत स्वीकारली. वनस्पती व लेप कसे वापरायचे ह्याचे शिक्षण घेतले. व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे एक सभासद सर चार्ल्स प्रिचार्ड ह्यांच्या पायाला झालेली एक जखम चिघळली. तेव्हा एदलजींना बोलवण्यात आले. त्यांनी आपल्या वनस्पत्यौषधींनी तो पाय पूर्ण बरा केला.

त्यांचे पुत्र रुस्तमजी एदलजी हकीम (जन्म १८६१) ह्यांनी टिश्यूची निर-निराळ्या प्रकारची सूज उतरवली. त्यांच्या 'बझाना' गोळ्या फार लोकप्रिय ठरल्या. १९२५ त ग्वाल्हेरच्या महाराजांनी हकीमना पॅरीसला बोलावून घेतले. त्यांची एक चिघळलेली जखम पॅरीसमधले डॉक्टर बरी करू शकले नव्हते. रुस्तमजींनी ती जखम बरी केली. त्याबद्दल त्यांना भरपूर मोबदलाही मिळाला.

हकीम कुटुंबातीलच डॉ. सोराब अर्देशीर हकीम (मृत्यू १९७६), ह्यांनी काही विशिष्ट प्रकारच्या कर्करोगांवर वनस्पती औषधींचे प्रयोग करून पाहिले.

पारशी पुरुषांप्रमाणेच पारशी महिलांनाही वैद्यकीय व्यवसायाचे शिक्षण घेण्याची हौस होती. लंडनला एम. डी. पदवी मिळवणारी पहिली पारशी महिला होती डॉ. दोसीबाई दादाभॉय. त्यांनी मुंबईला स्वतःचे प्रसूतिगृह उघडले आणि मिस वझीफदार ह्या दुसऱ्या महिला डॉक्टरांच्या मदतीने ते उत्तम चालवले. हे प्रसूतिगृह सुरू होऊन आता ५० वर्षे उलटली आहेत. आजही ते उत्तम स्थितीत चाललेले आहे. डॉ. शिरीन कॉमिसॉरिएट ह्या रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सच्या पहिल्या महिला फेलो. त्यांचीच शिष्या डॉ. गुलबानू पटेल ह्यांनीही लंडन एफ. आर. सी. एस. ची पदवी मिळवली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंडियन मेडिकल सर्व्हिसचे दार महिलांसाठी खुले झाले. त्यात प्रथम प्रवेश मिळवणाऱ्या महिलांत दोन पारशी होत्या– कॅप्टन फिरोझा

दावर आणि कॅप्टन एमी. के. जंगलवाला (१९४२). त्यांपैकी जंगलवाला ह्या यशस्वी बालरोगतज्ज्ञ आहेत. त्यांनी रंगून विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळवले आहे.

नर्सिंग (शुश्रूषा) क्षेत्रातही पारशी महिलांनी पुढाकार घेतला. भारत सरकारच्या डायरेक्टोरेट ऑफ हेल्थ सर्व्हिसेसमध्ये नर्सिंग सल्लागार म्हणून नेमणूक झालेली पहिली भारतीय होती तेहमीना के. अद्रानवाला.

मिस अद्रानवाला (१९०८) ह्यांनी मुंबईच्या जे. जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स-मधून परिचारिकेचे शिक्षण घेतले. नंतर त्यांनी लंडनच्या क्वीन शार्लोट हॉस्पिटल-मध्ये प्रवेश घेऊन सीएमबीचे सर्टिफिकेट मिळवले. त्यांनी हेल्थ व्हिझिटर्सचा शिक्षण-क्रम पुरा केला. त्या शिक्षणक्रमात माता–बाल संगोपन, शालेय आरोग्य, क्षयरोग नियंत्रण ह्या विषयांचा समावेश होता. हा शिक्षणक्रम त्यांनी लंडनच्या नॅशनल हेल्थ सोसायटीत पुरा केला. १९३०–३७ च्या काळात जे. जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटलमध्ये नोकरी करीत असतानाच त्यांनी ह्या पदविका मिळवल्या. १९३७ मध्ये त्या असिस्टंट मेट्रन झाल्या व १९३९ त मेट्रन. १९४६ त त्या लंडनला गेल्या. तेथील रॉयल कॉलिज ऑफ नर्सिंगमधून त्यांनी नर्सिंगची पदविका संपादन केली. मायदेशी परतल्यावर त्यांना भारत सरकारच्या नर्सिंग सल्लागार नेमण्यात आले (१९४८). ह्या पदावर त्यांनी १८ वर्षे काम केले.

१९६६ मध्ये त्या सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्या आणि त्यांची जागतिक आरोग्य संघटनेच्या नर्सिंग तज्ज्ञ समितीवर सदस्य म्हणून नेमणूक झाली. १९६६ डिसेंबर ते जुलै १९६७ पर्यंत त्या नेपाळमधील एका प्रकल्पावर काम करीत होत्या. जागतिक आरोग्य संघटनेने पुन्हा त्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा घेतला, तो भारताच्या राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रमातील परिचारिका विभाग स्थापन करण्यासाठी. मिस अद्रानवाला आंतरराष्ट्रीय कौन्सिल ऑफ नर्सेसच्या उपाध्यक्ष होत्या.

१. लॉर्ड पेनी–"होमी जहांगीर भाभा" बॉयॉग्राफिकल सेरीज ऑफ फेलोज ऑफ द रॉयल सोसायटी, लंडन, १९६७, भाग १३, पृष्ठे ३५–५५.
२. टाटा रीव्ह्यू, वर्ष १, अंक ४, जानेवारी १९६६
३. एच. डी. दारुखानावाला–पारसी लस्टर ऑन इंडियन सॉइल, मुंबई, १९३९, खंड १, पृष्ठ १६०
४. वरील पृष्ठ १६३

१०. कला आणि वाङ्मय क्षेत्रे

विज्ञान आणि वैद्यक या दोन शास्त्रांत पारशांनी आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवली तरी कला आणि वाङ्मय ह्या क्षेत्रांत मात्र त्यांनी फारशी नावाजण्याजोगी कामगिरी केली नाही.

कागदोपत्री उल्लेख असलेला पहिला पारशी चित्रकार म्हणजे पेस्तनजी बोमनजी (१८५१ ते १९३८)[१]. १८६४ साली पेस्तनजी बोमनजींनी मुंबईच्या सर जमशेटजी जीजीभॉय स्कूल फॉर आर्ट ह्या संस्थेत प्रवेश घेतला. अजिंठा लेण्यात मुख्य ड्राफ्टसमन म्हणून काम केले. १८७७ साली दिल्लीत भरलेल्या दरबाराची चित्रे काढायला वाल प्रिन्सेप्स ह्या चित्रकाराला बोलावण्यात आले होते. त्याच्या हाताखाली पेस्तनजींनी शिक्षण घेतले. १८९५ साली काही कालापुरते बोमनजींनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे हंगामी प्राचार्य म्हणून काम पाहिले. १९०५ साली बोमनजींनी बादशाह पाचवा जॉर्ज आणि सम्राज्ञी ह्यांची आणि अनेक गव्हर्नर्स व भारतीय संस्थानिक ह्यांची व्यक्तिचित्रे (पोर्ट्रेट) रेखाटली.

मंचेरशॉ फकीरजी पिठावाला (१८७२–१९३७)[२] हे बोमनजींचे स्नेही आणि समकालीन. त्यांचे सगळ्यात प्रसिद्ध चित्र म्हणजे लंडनच्या बर्लिंग्टन आर्ट गॅलरीत टांगण्यात आलेले सर (पहिले) जमशेटजी जीजीभॉय ह्यांचे पोर्ट्रेट.

पारशांपैकी सर्वोत्कृष्ट व्यक्तिचित्रकार (पोर्ट्रेट पेंटर) म्हणजे एरच ए. भिवंडीवाला (जन्म १८९८)[३]. एरच हा एका गरीब पारशी कुटुंबातील ८ वा मुलगा. आपल्या मुलाच्या चित्रकलेतीस कसबाला वळण लावण्याची त्या कुटुंबाची ऐपत नव्हती. त्यांनी त्याला कलकत्त्याच्या 'जे. एफ. मादन आणि कंपनी'त शिकाऊ उमेदवार म्हणून नोकरीला लावले होते. एरच आपला सारा फुरसुतीचा वेळ चित्रे काढण्यात आणि ती रंगवण्यात घालवी. जे. पी. गांगुली ह्या बंगाली चित्रकाराला त्या गरीब पोराची दया आली. त्यांनी त्याला फुकट शिकवले. एरच १८ वर्षांचा झाल्यावर त्याने कलकत्त्यातील सेंट्रल बँकेच्या शाखेत नोकरी धरली. अखेर एक दिवस त्याला रतन टाटा स्कॉलर्शिप मिळून तो चित्रकला शिकण्यासाठी लंडनला रवाना झाला.

एरच प्रथम चेलशिया स्टुडियोत गेले; तिथून स्लेड स्कूल ऑफ आर्टमध्ये. नॉर्थब्रुक सोसायटीने त्यांना फ्रान्समध्ये शिक्षण घेण्यासाठी एक स्कॉलर्शिप दिली. त्यांनी

एक वर्षभर पॅरीसच्या 'अकादमी द ला क्ल्यूज' मध्ये शिक्षण घेतले. पॅरीसहून परतल्यावर त्यांची लंडनच्या रॉयल सोसायटी ऑफ आर्टचा फेलो म्हणून निवड झाली. असा सन्मान मिळवणारे ते पहिलेच भारतीय. त्यांच्या तैलचित्रांपैकी सर जॉर्ज लॅन्सबरी, ह्रोवेची कौन्टस, लेडी चेम्सफर्ड, आणि जपानचे युवराज व युवराज्ञी काया ही प्रसिद्ध आहेत. त्याशिवाय एरचनी सर जमशेटजी जीजीभॉय, सर शापुरजी सकलातवाला आणि सर एम्. एम्. भावनगरी ह्यांचीही चित्रे काढली आहेत. एरचचे नाव भारतापेक्षा परदेशांतच फार गाजले. त्यांचे वर्णन 'ऑरफेन ऑफ इंडिया' (अनाथ/पोरका भारतीय) असेच केले जाते !

अलीकडच्या काळात डोकावले तर तीन चित्रकारांची नावे डोळ्यांसमोर येतात— शिव्हाक्स चावडा (१९१४–)[४], जहांगीर साबावाला (१९२२–)[५] आणि होमी जे. भाभा (१९०९–१९६६)[६].

शिव्हाक्स नवसारीच्या एक मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मले. त्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून शिक्षण घेतले; आणि सर रतन टाटा स्कॉलर्शिप मिळवून ते उच्च शिक्षणासाठी परदेशी गेले. प्रथम त्यांनी 'स्लेड स्कूल ऑफ आर्ट'मध्ये शिक्षण घेतले, आणि नंतर पॅरिसच्या 'अकादमी द ला ग्राँ शॉमिये' ह्या संस्थेत काम केले. ड्राफ्ट्समनच्या कामातील प्रावीण्य आणि रेषांचा प्रवाहीपणा ही त्यांची त्या मुक्कामातील कमाई. त्यांच्या पेन व पेन्सिल स्केचेसमधून (रेखाचित्रातून) आणि पूर्णचित्रांतून ही रेषांची सफाई आजही दिसून येते.

स्वदेशी परतल्यावर शिव्हाक्स साऱ्या देशभर फिरले. ह्या देशातील सर्वोत्कृष्ट कलाकृतीचा त्यांनी अभ्यास केला आणि स्वतःची एक वैशिष्टयपूर्ण शैली बनवली. ब्रह्मदेश, मलेशिया, इंडोनेशिया, अशा देशांतही ते हिंडले. जिथे जिथे ते गेले तिथे तिथे त्यांनी प्राणी, मुले, खेडयांतील सामान्य माणसे ह्यांची चित्रे काढली. रंगसंगतीबद्दल त्यांचे स्वतःचे खास तंत्र आहे. 'एका तरुणाचे डोके' (हेड ऑफ अ यंग मॅन) हे त्यांचे तैलचित्र आकर्षक आहे. नेहमीपेक्षा ते वेगळे आहे; तर 'कथ्थक नर्तक (कथ्थक डान्सर)' ह्या टेंपरातील चित्राचे गांभीर्य (पॉइज), त्यांचे अर्धोन्मीलित डोळे (नेत्र) आणि चेहऱ्यावरील उदात्त गांभीर्य अविस्मरणीय आहे.

जहांगीर साबावाला हे एक वेगळ्या धर्तीचे चित्रकार. त्यांचेही शिक्षण प्रथम मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये व नंतर लंडनच्या हीथरली स्कूल ऑफ आर्टमध्ये झाले. कोवळ्या वयात ते पॅरीसला होते. अकादमी ज्यूलिएँ आणि अकादमी आन्द्रे ल्होते येथे अनेक वर्षे काढल्यावर ते एक वर्ष अकादमी द ला ग्रां शॉमिए येथे राहिले. त्यांनी स्वतःच्या चित्रांची अनेक प्रदर्शने भरवली. अनेक आंतरराष्ट्रीय कलाप्रदर्शनांत त्यांनी भाग घेतला. जहांगीरना साबुरॉ आणि कॅवॅलिएसारख्या प्रसिद्ध फ्रेंच 'इंप्रेशनिस्टां'

बरोबर काम करायची संधी मिळाली. आंद्रे ल्होते येथे त्यांनी क्युबिझम आणि ॲब-स्ट्रॅक्ट चित्रकलेचे शिक्षण घेतले. तरीही आज ह्या साऱ्यांचे संस्कार झुगारून देऊन ते स्वतःची एक वैशिष्टयपूर्ण शैली निर्माण करू पाहात आहेत. १९५०–५५ च्या काळा-तील स्थिरचित्रणातील भरगच्च व समाधानकारक रंगसंगती; १९६० च्या सी गल्स अँड सेल्स (सी गल्स व शिडे) ह्या चित्रातील आकर्षक निमक्यूबिस्ट निर्मिती १९६३ च्या 'जर्नी ऑफ द मागी (मागीचा प्रवास) आणि १९६५ मधील 'द एम्बार्केशन' (प्रारंभ) ह्या दोन्ही तैलचित्रांतील अलौकिक नजाकत ह्यांच्या पार पलीकडे आता जहांगीर गेले आहेत. स्वतःचे खास तंत्र निर्माण करून ते परिपूर्ण करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

परंतु आश्चर्य म्हणजे आपल्या आधुनिक (मॉडर्न) चित्रकारांपैकी सर्वोत्कृष्ट चित्रकार होते होमी भाभा, एक शास्त्रज्ञ ! भाभांचा मृत्यू अवेळीच म्हणायचा ! तरीही त्यांनी अनेक सुंदर चित्रे, रेखाचित्रे आणि थोडीफार रंगचित्रेही मागे ठेवली आहेत. त्यांच्या पेंटिंग्जमधील रंगांची उधळण आणि भावांची हळुवारता ह्यांची तुलना फक्त टिटियन आणि टिन्टोरेट्टोसारख्यांच्या पेंटिंग्जशीच करता येईल. त्यांच्या व्यक्ति-चित्रांपैकी सर्वात स्पष्ट व आकर्षक चित्र आहे. 'लेडी विथ ए ग्लास ऑफ शेरी' (शेरीचा ग्लास घेतलेली) हे. त्या स्त्रीची भावुक जिवणी, गाल, हनुवटी आणि गळा ह्यांचे सौंदर्य, खोल डोळयांतील निरागसता आणि हेलावून सोडणारी भावुकता आणि त्या सर्वांची छाया–प्रकाशाशी होणारी सरमिसळ पाहिली की आश्चर्याने श्वास रोखला जातो. तिच्या खांद्यावरील एका डहाळीच्या ब्राँझ–हिरव्या रंगाचे तिच्या केसांच्या ब्राँझ छटेत पडलेले प्रतिबिंब आणि तिच्या हिरवट–उदट रंगाच्या डोळयांचे हातातील मद्याच्या प्यालावर पडलेले प्रतिबिंब, हे सारेच विलक्षण आहे. तिच्या अंगावरील गर्द वैंगणी रंग पार्श्वभूमीच्या ऑलिव्ह हिरव्या अन् ब्राऊन रंगात सर-मिसळून जातो. डावीकडेच्या छोटया गवाक्षातून शुभ्र, हळूवार उजेडाचा किरण येऊन तिचे कपाळ अन् गाल कुरवाळून जातो. हे चित्र निव्वळ व्यक्तिचित्र (पोर्टेट) नाही; तर काळ–स्थळाच्या बंधनात अडकवून टाकलेला चिरस्थायी भाव आहे. होमींना अबस्ट्रॅक्ट आकार आणि अतिवास्तव (सररियालिस्ट) विषय ह्यांचे आकर्षण होते. 'दावो सोनो इ बेली मोमेन्ती' नावाचे अतिवास्तववादी चित्र हे होमींचे सर्वोत्तम चित्र मानले जाते. ही कलाकृती त्यांनी मोझार्टच्या 'मॅरेज ऑफ फिगारो' ह्या कलाकृती-तील भारावून टाकणाऱ्या धूनमुळे–(अरिया)–जिथे कौंटेसला, कधीही न परतण्या-साठी निघून गेलेल्या अनेक आठवणी होतात. होमींची निसर्गचित्रे रंगच्छटांनी संपन्न आहेत. त्या रंगच्छटा रेषांच्या गर्दीशी समन्वय साधतात.

शिल्पकारांत तिघांची नावे घेता येतील–कै. शेरू सिध्वा, आणि दोघे सम-

कालीन–पिलू पोचखानवाला आणि अर्देशीर एम्. देविएरवाला.

शेरू सिध्वाने फक्त ख्यातनाम पारशांचे छोटे मोठे पुतळे बनवले. तिची सर्वोत्कृष्ट कलाकृती म्हणले सर होरमसजी सी. दिनशॉ एडनवाला ह्यांचा पूर्णाकृती संगमरवरी पुतळा. ज्यांनी एडनला पाणीपुरवठा केंद्र, उत्तम रस्ते, वगीचे आणि घरे मिळवून दिली त्यांचा गौरव करावा, ह्या हेतूने मुंबईकर पारशांनी तो पुतळा मुद्दाम करवून घेतला होता.

पिलू पोचखानवालाचे प्रतिकृती निर्माण करण्याचे कौशल्य लहानपणापासूनच दिसून येत होते. पिलू मुंबई विद्यापीठाच्या कॉमर्सच्या पदवीधर. नंतर त्या शिल्पकलेकडे वळल्या. त्यांनी आपल्या शिल्पकलेची सुरुवात केली ती, वाया गेलेले धातू, दगड, लोखंड, शिसे, लाकूड आणि परस्पेक्स ह्यांच्यापासून. आपल्या माध्यमातून त्यांनी अनेक भावना व्यक्त केल्या. बागेत उभारण्याची प्रचंड शिल्पे तयार केली, तसे कलेचे नाजूक, हळुवार नमुनेही बनवले. लाकूड आणि परस्पेक्स ह्यातून निर्माण केलेल्या त्यांच्या 'ट्रिपल अॅसेंट' ह्या शिल्पातून प्रकट होणारा शांतभाव व सोज्वळता अपूर्व आहे. ह्या उलट, 'द प्रे' हे ड्रिप लेडमधील शिल्प मनाला अस्वस्थ करून सोडते. ते शिल्प म्हणजे धावणारी एक आकृती आहे. ती आकृती एका प्राण्याच्या तोंडात सापडलेली आहे. त्या प्राण्याची मान म्हणजे निव्वळ हाडांचा सांगाडा आहे. ती मान त्या धावणाऱ्या मानवी आकृतीच्या डाव्या पायाखाली रुतली आहे. त्या प्रेताच्या चेहऱ्यावरील कोमजलेले हसू आणि त्याचे डोळे ह्यांच्यावरच पाहणाऱ्याची नजर खिळून राहते. ह्या कलाकृतीभोवती मृत्यू आणि सर्वनाश ह्यांची छाया दाटून राहिली आहे. त्यातून शारीरिक विघटनाच्या काटेकोर बंधनात अडकून पडलेल्या मानवी आत्म्याचे दर्शन होते. त्या मध्यवर्ती आकृतीच्या डोळ्यातून दिसणारी शांत वेदना असह्य होते. ह्या सर्वोत्कृष्ट परंतु दु:खदायी कलाकृतीवरून नजर जेव्हा ९ मीटर उंचीच्या भव्य 'फ्लेम' ह्या कृतीकडे वळते तेव्हा हायसे वाटते. इथे मऊ पोलादाचा वापर केला आहे. पार्श्वभूमीतील विटांची भिंत आणि उघडा जिना ह्यामुळे या शिल्पकृतीच्या अलौकिक सौंदर्यात भर पडली आहे.

अर्देशीर एम दविएरवाला (१९२२–१९७५)[७] हे आणखी एक समकालीन शिल्पकार. त्यांनी आपल्या आयुष्याची सुरुवात एक केमिस्ट म्हणून केली. १९४५ ते १९५९ ही चौदा वर्षे त्यांनी केमिस्टची नोकरी केली. १९५९ मध्ये त्यांनी ती नोकरी सोडली आणि ते शिल्पकलेकडे वळले. ते स्वयंशिक्षित होते. सुरुवातीला त्यांनी संगमरवर दगड आणि लाकूड ह्यातून शिल्पनिर्मिती केली. त्यानंतर शिसे, ब्राँझ, वेल्डेड पोलाद (पोलादी पोकळ सळया), प्लास्टिक आणि अॅल्युमिनियम ह्यातून कलाकृती निर्माण केल्या. उमेदवारीच्या काळात त्यांच्यावर ग्रीक आणि ख्रिस्ती विषयांचा फार मोठा

प्रभाव होता. आग्ऱ्याच्या दगडात खोदलेली त्यांची 'इडिपस' ही कलाकृती डॉ. होमी भाभा ह्यांनी टाटा इन्स्टिटय़ूट ऑफ फंडामेंटल रीसर्च संस्थेसाठी खरेदी केली. परंतु ह्या शिल्पकाराच्या गुणांचे सर्वोत्तम दर्शन घडते ते त्यांच्या अॅबस्ट्रॅक्ट कलाकृतीतून. सिव्हर्न लाकडात खोदलेल्या 'ड्रायद'ची किंवा ब्राँझमधील 'अॅबस्ट्रॅक्ट स्टडी'ची सहज मुक्तता त्यांची उमेदवारीच्या कालानंतरची प्रगती स्पष्ट करतात. १९६७ साली केलेल्या 'जेनेसिस' मधील परिपूर्ण सुसंगती आणि तोल आणि दोन वर्षांनी बनवलेल्या 'डेथ केम श्रीकिंग' मधील ताकदवान कठोरता ह्यातील विरोधाभास डोळ्यात भरण्याजोगा आहे. १९६९ साली खोदलेल्या 'कॉस्मिक बॅलन्स' आणि 'कफ्रंटेशन' मध्ये शुद्ध गणिती आकार सुस्पष्ट होतो. १९७० साली त्यांनी एक प्रदर्शन भरवले होते. त्यातील कलाकृतीतील स्पष्ट सुसंगती वाखाणण्याजोगी होती. विशेषत: 'अॅनिमेटेड सस्पेन्शन' ह्या चुंबक आणि अॅल्युमिनियम ह्यातून बनवलेल्या शिल्पात तर ती सुस्पष्ट दृग्गोचर होते.

संगीताच्या क्षेत्रात फार थोडय़ा पारशांनी नाव कमावले आहे. १९२० मध्ये कैखुश्रु शापूरजी सोराबजी (१८९२–१९७४)[८] ह्यांनी पाश्चात्य संगीतात आपले कौशल्य प्रकट केले. परंतु त्यांचे नाव आज फारच थोडय़ा भारतीयांना ठाऊक आहे. त्यांचा जन्म इंग्लंडच्या इसेक्स परगण्यातील एपिंग गावचा. त्यांचे वडील पारशी होते आणि आई स्पॅनिश. त्यांचे शिक्षण इंग्लंडमध्येच झाले. लहान वयातच त्यांनी ऑर्गन आणि पियानोसाठी संगीत द्यायला सुरुवात केली. पण हे त्यांचे संगीत फार क्लिष्ट आणि प्रदीर्घ असे. त्यामुळे ते लवकर कालबाह्य ठरले. तरीसुद्धा 'म्युझिक अँड म्युझिशियन्स' ह्या मासिकात त्यांच्याबद्दल लिहिताना पीटर जे. पायरी म्हणतात : सोराबजी आणि वॅन डिरेन ह्यांचे संगीत पूर्णपणे विस्मरणाच्या पडद्याआड गेले तर ते अनिष्ट ठरेल. मात्र आपले संगीत नामशेष व्हावे, अशीच सोराबजींची इच्छा असावी, हे उघड दिसते. वॅन डिरेनच्या बऱ्याचशा संगीत कृतींचे पुनरुज्जीवन व्हायला हवे. सोराबजींची 'सेकंड पियानो कॉन्सर्टो' ही संगीतकृती आज ऐकायलाही मिळत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे."[९]

झेनोबिया वकील, तेहमी गझदर आणि नेविल चिनॉय ह्या पियानोवादकांनी संगीतक्षेत्रात आपापले स्थान निर्माण केले. झेनोबिया वयाच्या चौथ्या वर्षापासून पियानो वाजवू लागली आणि नवव्या वर्षी तिने पियानोवादनाचा एक सार्वजनिक कार्यक्रमही सादर केला होता. मुंबईतील शिक्षण संपवल्यावर १९५२ साली तिने साल्झबर्गमधील मोझार्ट अकादमी ऑफ म्युझिकमध्ये नाव नोंदवले. १९५५ मध्ये तिला त्या संस्थेची पदवी मिळाली. त्या संस्थेतून पदवी घेणारी ती पहिली भारतीय महिला. म्युनिकमध्ये तिला पूर्वपश्चिम जर्मनीची देवाण–घेवाण शिष्यवृत्ती मिळाली.

त्यामुळे फ्रेडरिक व्युहररकडे शिक्षण घेण्याची तिला संधी मिळाली. त्याखेरीज भारत सरकारचीही शिष्यवृत्ती तिला मिळाली होती. मोझार्टच्या द्विशताब्दी महोत्सवाप्रसंगी झेनोबियाने प्रख्यात मोझार्ट पारितोषिक पटकावले. जवाहरलाल नेहरू ऑस्ट्रियाला गेले होते, तेव्हा ऑस्ट्रियन सरकारने त्यांच्या सन्मानार्थ एक स्वागत समारंभ आयोजिला होता. त्या समारंभात झेनोबियाला पाहुणी कलाकार म्हणून बोलावण्यात आले होते. आज मात्र झेनोबियाच्या संगीतातील पूर्वीची चमक, उल्हास लुप्त झालेला आहे.

पियानो वादनातील कौशल्य तेहमी गझदरने मात्र सातत्याने राखले आहे. तिचे शिक्षण लंडनच्या रॉयल अकादमी ऑफ म्युझिकमध्ये झाले. त्यासाठी तिला रॉयल स्कूल्स ऑफ म्युझिकची स्कॉलर्शिप मिळाली होती. ब्रायटन आणि बल्हाम येथे झालेल्या संगीत स्पर्धांमध्ये तिने मेंडेल्सॉहन, बाख आणि बीथोवेन ह्यांच्या संगीत-कृती भावुकपणे सादर करून प्रथम पारितोषिके पटकावली. मुंबई, दिल्ली, गोवा, कोलंबो येथील कार्यक्रमांतून तिने पाहुणी कलावंत म्हणून पियानोवादन सादर केले आणि आकाशवाणीच्या 'संगीताच्या राष्ट्रीय कार्यक्रमा'तही तिच्या पियानोवादनाचा कार्यक्रम प्रसारित करण्यात आला होता.


ह्याच तेहमी गझदरचा नेविल चिनॉय हा तरुण पियानोवादक शिष्य होता. वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी तो वारला. फार लहान वयात नेविलने आपल्या पियानोवादनाचे कार्यक्रम मुंबई, दिल्ली, कलकत्ता आणि पुणे येथे केले होते. पियानो-वादक केंडेल टायलरकडे शिकण्यासाठी त्याला लंडनला पाठवण्यात आले होते. तिथून तो एक अमेरिकन शिष्यवृत्ती मिळवून फिलाडेल्फियाच्या 'कर्टिस इन्स्टिटय़ूट ऑफ म्युझिक' ह्या संस्थेमध्ये दाखल झाला. ह्या संस्थेचे संचालक रुडॉल्फ सकिन ह्यांच्या मते 'नेविल असामान्य गुणी होता' तर व्लादिमीर अस्केनाझी त्याच्याबद्दल म्हणतात, "त्याच्या संगीताच्या जाणकारीमुळे मी फार प्रभावित झालो. अशी जाणकारी त्याच्या वयाच्या मुलांत सहसा आढळत नाही." तीन वर्षांचा त्याचा अभ्यासक्रम जवळजवळ सपत आला होता. भारतातील आपल्या आप्तेष्टांना भेटून नेविल परत येत असतानाच त्याच्या विमानाला अपघात झाला आणि त्यात नेविलचा मृत्यू झाला.

गायनाचा विचार केला तर त्यात नाव कमावणारी एकच पारशी व्यक्ती आढळते. ती म्हणजे झरीन घडियाली. बव्हेरियन रेडियोच्या गायकवृंदात ती प्रमुख आल्टो गायक आहे. पश्चिम जर्मनीत हा गायकवृंद अग्रगण्य मानला जातो.

संगीतक्षेत्रात आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवणारा पारशी म्हणजे आर्केस्ट्रा (वाद्यवृंद) कंडक्टर (संचालक) झुबिन मेहता (१९३६)[१०]. झुबिनचे वडील म्हणजे प्रख्यात व्हायोलिनवादक मेहली मेहता. हे मुंबईच्या फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्राचे (१९३५)

संस्थापक; आणि पूर्वीच्या लिव्हरपूल फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्रातील अग्रणी. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर झुबिनला पाश्चात्य संगीताचे बाळकडू पाळण्यातच मिळाले होते. वयाच्या दुसऱ्या वर्षी त्याला स्वत:चा टेपरेकॉर्डर मिळाला होता. आपले वडील संगीत शिकवू लागले किंवा चेंबर म्युझिकच्या तालमी घेऊ लागले की तो खोलीच्या कोपऱ्यात बसून मोठमोठ्या डोळ्यांनी ते पाहात राही. मोठा झाला तसा क्रिकेट खेळताना, सायकल चालवताना तो पागानिनीच्या कॅप्रायसेसची शीळ घाली. तो सांगतो, "मी सिंफनी ऐकण्यापूर्वीच माझा परिचय क्वार्टेटशी झाला होता आणि संगीताचे नोटेशन वाचता येण्यापूर्वीपासून मी संगीत गाऊ शकत होतो." वयाच्या ७ व्या वर्षी तो पियानो वाजवायला शिकू लागला. वयाच्या १६ व्या वर्षी वडील परगावी दौऱ्यावर असताना, त्याने बॉम्बे फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्राचे संचालन केले होते. झुबिनला वैद्यकीय शिक्षणक्रम घ्यायला लावण्याचा प्रयत्न झाला. पण झुबिन म्हणतो, "मी परीक्षेचा पेपर लिहायला किंवा एखादा बेडूक कापू लागलो की डोक्यात ब्राह्मची सिंफनीच घोळत राही. १८ व्या वर्षी त्याच्या वडिलांनी त्याला व्हिएन्नाच्या अकादमी ऑफ म्यूझिक मध्ये शिकायला पाठवले. तिथे ऑर्केस्ट्राचे संचालन, ऑर्केस्ट्रा-संगीतनिर्मिती (कंपोझिशन), पियानो, तंतुवाद्य वाजवण्याचे शिक्षण घेताघेताच तो शहरातल्या निरनिराळ्या ऑर्केस्ट्रात व्हायोलिन वाजवीत असे. १९५७ त त्याने ऑर्केस्ट्रा–संचालनाची पदविका मिळवली. 'मुंबईचा वंडर बॉय' म्हणून त्याचा गौरव करण्यात आला. लिव्हरपूलमध्ये १९५८ साली 'पहिली तरुण ऑर्केस्ट्रा संचालक स्पर्धा' भरवण्यात आली होती. पाश्चात्य देशांतून १०० तरुण संचालक त्या स्पर्धेत उतरले होते. तीत झुबिनने पहिले पारितोषिक पटकावले. पारितोषिकाचा एक भाग म्हणून झुबिनला लिवरपूल ऑर्केस्ट्राचे संचालन करण्याची संधी मिळाली आणि त्यावेळी झुबिनच्या लक्षात आले की व्यावसायिक ऑर्केस्ट्राचे संचालन करण्याइतपत आपण अजून तयार झालेलो नाही! 'हे मला समजले; पण त्यांचं नुकसानच झालं!' 'मला त्याचा फायदाच झाला.' असे झुबिन आज खेदाने म्हणतो.

२३ व्या वर्षी त्याने आपल्या व्यावसायिक आयुष्याची मुहूर्तमेढ अमेरिकेत केली. १९५९ साली त्याने लुईसाहन स्टेडियम सिंफनीचे संचालन न्यूयॉर्कमध्ये केले. त्यापुढील वर्षी त्याची नेमणूक मॉंट्रियल सिंफनी ऑर्केस्ट्राचा संचालक म्हणून झाली. १९६१ साली लॉस एंजेलिस फिल्हार्मोनिक आर्केस्ट्राशी त्याचा पहिल्यांदा संबंध आला त्यावर्षी त्या आर्केस्ट्राचा संचालक फ्रिट्झ रीनर आजारी पडला; तेव्हा त्याच्याऐवजी झुबिनने त्या आर्केस्ट्राचे संचालन केले. त्यात त्याला एवढे घवघवीत यश मिळाले की त्याला ताबडतोब लॉस एंजेलिस ऑर्केस्ट्राचा संचालक म्हणून नोकरी देण्यात आली. तथापि दोन टोकाला असलेल्या दोन ऑर्केस्ट्रांचे संचालन एकाच वेळी करता येणार नाही,



जे. आर. डी. टाटा (१९१३)

के. आर. कामा (१८३१–१९०९)
(के. आर. कामा ओरिएन्टल इन्स्टिटयुटच्या सौजन्याने)



मोटलीबाई एम. एन. वाडिया
(१८११–१८९७)





झुबिन मेहता (१९३६) (सौजन्य : जाल. एन. मेहता)

अशी झुबिनला भीती वाटली. तथापि, ऑर्केस्ट्राशी संबंधित मंडळींनी त्याचे मन वळविले व त्याने ही नवीन कामगिरी स्वीकारली. त्याने लॉस एंजेलिस ऑर्केस्ट्रात नवीन चैतन्य आणले आणि पाश्चात्य जगातील एक अग्रगण्य ऑर्केस्ट्रा म्हणून त्याला स्थान मिळवून दिले. १९६४ च्या साल्झबर्ग वार्षिक महोत्सवात त्याला कॉन्सर्ट (संगीत कार्यक्रमाचे) संचालन करण्यासाठी पाचारण करण्यात आले. त्याच्या कामगिरीने श्रोते भारावून गेले होते. एका वार्ताहराने त्या समारंभाचे वर्णन करताना म्हटले आहे— ‘दोन हजार लोकांनी त्याच्या संगीताला ताल दिला होता; ते टाळ्या वाजवीत होते. त्याला प्रोत्साहन देत होते. ते पाहून बीटल्सना मिळणाऱ्या प्रतिसादाची आठवण येत होती.’ तेव्हापासून, दरवर्षी झुबिन मेहता साल्झबर्ग महोत्सवाच्या वेळी प्रारंभीच्या ऑर्केस्ट्राचे संचालन करीत आला आहे. इस्राएल फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्राचा पाहुणा-संचालक म्हणून त्याने लोकप्रियता मिळवली आहे. व्हिएन्ना आणि बर्लिन फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्रा ह्यांचा सर्वात तरुण संचालक म्हणूनच इतिहासात झुबिनच्या नावाची नोंद होईल. १९६७ मध्ये झुबिनला पद्मभूषणाचा सन्मान देण्यात आला. त्याच वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये झुबिन लॉस एंजेलिस ऑर्केस्ट्रा घेऊन मुंबईत आला होता. ‘माझा स्वतःचा ऑर्केस्ट्रा मी (भारतात) प्रथम मुंबईतच सादर करीन’ असे झुबिन त्यावेळी मोठ्या अभिमानाने म्हणाला होता. मॉन्ट्रियलला एक्स्पो '६७ भरले असताना बर्लिओझचा ‘सिफनी फँटास्टिक्’ (संगीताची उधळण) असा एक कार्यक्रम करण्यात आला. त्यात झुबिनने मॉन्ट्रियल व लॉस एंजेलिस संयुक्त ऑर्केस्ट्रा पेश केला होता. त्यात २१५ वादकांचा ताफा होता. त्यावेळी त्याने कार्यक्रमाच्या आयोजकांना सांगितले होते, “ह्यामुळे माझ्या कलागुणांत काहीही भर पडणार नाही. माझा ऑर्केस्ट्रा न्यूयॉर्क फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्रापेक्षा सरस आहे. न्यूयॉर्क ऑर्केस्ट्रातील वादक संचालकालाच खाऊन टाकतात.” ह्या उद्गारांमुळे काहींच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. पण पुढे ते प्रकरण मिटले आणि आता, सप्टेंबर १९७८ पासून झुबिनने न्यूयॉर्क फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्राचे संचालकत्व स्वीकारले आहे. ऑर्केस्ट्राचे प्रदर्शन करणारा, ‘गोंगाटालाच उल्हास मानणारा,’ ‘घाईगर्दीला उत्तेजना समजणारा’ असे आरोप झुबिनवर करण्यात येतात. त्यावर संगीत-समीक्षक वित्रॉप सार्जंट म्हणतो, ‘त्याच्याकडे उच्च प्रतीचा संगीतकार (माएस्ट्रो) होण्याचे तंत्र व भावनिक ताकद आहे. त्याच्या ह्या गुणांचा क्वचित अतिरेकही होत असेल. पण तो फाजील होत नाही. त्याच्याजवळ तेवढी ताकद निश्चित आहे. त्या ताकदीचा शतांशही जरी कोणापाशी असेल तर परिपूर्ण गडबडी (फिनिकी) पेक्षा ते शतपटीने चांगले ठरेल.’ युजिन ऑर्मंडीसारखा फिल्हार्मोनिक ऑर्केस्ट्राचा अनुभवी संचालक म्हणतो, “झुबिन तरुण असेल; पण त्याच्यात कौशल्य (निपुणता) निश्चित आहे.”

दुसरी ख्यातनाम पारशी ऑर्केस्ट्रा संचालक म्हणजे कूमी वाडिया. तिच्या कर्तबगारीला थोड्या मर्यादा आहेत. ती परांजोती अकादमी कोरसचे संचालन करते. १९७४ साली ह्या कोरसने युरोपचा दौरा केला, तेव्हा पोलंडमधील मिएन्डझायड्रोजे ह्या गावी झालेल्या ९ व्या आंतरराष्ट्रीय वृंदगान महोत्सवात पहिले पारितोषिक पटकावले होते.

दुर्दैवाने कोणाही पारशाने शास्त्रोक्त गायन वा वादनकलेत नैपुण्य दाखवले नाही. त्याला अपवाद फक्त हैदराबादच्या झरीन दारुवाला आणि मुंबईच्या आबन इ-मिस्त्री यांचा. झरीन दारुवाला एक उत्तम व हळुवार सरोदवादक आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनवर तिचे अनेक कार्यक्रम झालेले आहेत. आबन तबलापटू आहे. शिवाय ती शास्त्रोक्त गायनही करते.

व्यावसायिक नर्तकांत नावाजण्याजोग्या तिघीच-शिरीन, रोशन आणि खुर्शीद वझीफदार ह्या भगिनी. त्या अनाथ होत्या. १९५० ते ६० च्या दशकात त्यांनी भारतातील मोठ्या शहरांतून भरतनाट्यमचे कार्यक्रम सादर केले होते. एक रोहिंटन कामा सोडली तर गेल्या दोन दशकांत भारतीय शास्त्रीय नृत्यात कोणाही पारश्याने नाव कमावले नाही. रोहिंग्टन आज १९–२० वर्षांची आहे. वैजयंतीमाला बाली ह्यांच्याकडे तिने नृत्याचे शिक्षण घेतले आणि आपल्या गुरूच्या पथकाबरोबर मॉरिशस, हाँगकाँग, थायलंड, फिलिपीन्स, येथे नृत्याचे कार्यक्रम केले.

भारतातील नाट्यसृष्टीच्या विकासाचे मात्र पारशी प्रवर्तक ठरतात. १८५० सारख्या जुन्या काळातसुद्धा एल्फिन्स्टन कॉलेजात पारशी ड्रामॅटिक असोसिएशन ही संस्था इंग्रजी नाटके करीत असे. १८६२ मध्ये ह्या संस्थेने सिंगापूरमध्ये आणि १८८५ त इंग्लंडमध्ये आपली नाटके सादर केली होती.[11]

त्याच सुमारास अनेक पारशी गटांनी गुजराती नाट्यमंडले स्थापन केली. तत्कालीन राजकारण व समाज–स्थिती ह्यावर आधारित नाटके बसवली. फार्सिकल आणि उपहासगर्भ नाटके सादर करण्यात पारशांचा हातखंडा होता. त्यातही मर्झबान कुटुंब ह्या बाबतीत आघाडीवर होते. फर्दूनजी मर्झबाननी ' मुंबई समाचार ' हे पहिले गुजराती वृत्तपत्र सुरू केले. त्यांच्याच कुटुंबातील जहांगीर बैरामजी मर्झबान (१८४८–१९२८)[12] आणि त्यांचे पुत्र पिराजशा जहांगीर मर्झबान (१८७६–१९३३)[13] ह्यांनी अनेक गुजराती नाटके लिहिली. ही नाटके त्याकाळी तुफान लोकप्रिय झाली. पण त्यानंतरच्या काळातही, काळमानानुसार काही फेरफार केल्यानंतरही त्या नाटकांची लोकप्रियता टिकून राहिली. पिरोजशा मर्झबान हे ' पिजाम ' ह्या टोपण नावाने लिहीत.

जहांगीर मर्झबानना 'पारशी मार्क ट्वेन' म्हणत ते एक साधे मुद्रित-शोधक होते. तिथून चढत जाऊन ते संपादक बनले. आणि नंतर जाम-ए जमशेद ह्या आजही

भरभराटीत असलेल्या, पारशी वृत्तपत्राचे मालक बनले. जहांगीर विनोदी नाटककार होते. ते दानशूर होते. मुंबईच्या मसिना हॉस्पिटलचे ते एक संस्थापक सदस्य. तसेच देवळालीचा बहादुरजी सॅनाटोरियम आणि खंडाळ्याचा सॅनाटोरियम ह्यांचेही ते संस्थापक–सदस्य होते. ब्रिटिश सरकारने त्यांना सी. आय. इ. हा किताब दिला. हा किताब मिळवणारे ते पहिलेच पारशी होते.

जहांगीरचा मुलगा फिरोजशा उर्फ फिजाम वडिलांच्या पावलावर पाऊल टाकणारा निघाला. त्यांनी गुजरातीत १५ कादंबऱ्या लिहिल्या. त्या सगळ्या विनोदी होत्या. त्याशिवाय त्यांनी ७ नाटके लिहिली. त्यांना नागरी सुधारणांत रस होता. ते मुंबईच्या कायदेमंडळाचे सदस्य होते. जस्टिस ऑफ पीस होते; मुंबईचे शेरीफही होते. त्यांना सी. आय. ई. प्रमाणेच ' कैसर–इ हिंद रुपेरी पदक मिळाले होते. आदी मर्झबान आज आपल्याच पूर्वजांची परंपरा पुढे चालवीत आहेत.

स्लॅप्स्टिक (हलके फुलके विनोदी) नाटकातील बहुतेक नट सहसा पारशी असत. हे विशेष करून वैद्यकीय कॉलेजातील तरुण विद्यार्थी असत. विनोदी, उत्स्फूर्त हजरजबाबीपणा हा त्यांचा खास गुण. नाटकात बायकांनी बायकांची कामे करावी किंवा नाही, हा आता वादाचा विषय राहिला नाही. १८९० मध्ये मात्र व्हिक्टोरिया थिएट्रिकल कंपनीमध्ये हा वादाचा विषय झाला होता. गंमत अशी की, पारशी नाटकांचे चाहते जास्त करून गुजराती हिंदू प्रेक्षक असत.

भारतीय चित्रपटसृष्टीत मात्र अनेक पारशांनी नाव मिळवले आहे. अभिनेता–निर्माते सोहराब मोदी ह्यांनी चित्रपटसृष्टी वीस वर्षे गाजवली. ' पुकार ' व ' सिकंदर ' ह्या चित्रपटांचे ते निर्माते होते. त्यातील प्रमुख भूमिकाही त्यांनीच केल्या होत्या. जमशेट बी. वाडिया हे त्यांचे समकालीन. आपल्या ' वाडिया मूव्हीटोन ' तर्फे त्यांनी अनेक अनुबोधपट काढले. जहांगीर एस. भावनागरी ह्यांचे वडील पारशी होते, आणि आई फ्रेंच. त्यांचे मित्र जहांगीरना ज्याँ नावाने हाक मारतात. ते १९५४ ते ५७ आणि १९६५ ते ६७ पर्यंत भारत सरकारच्या चित्रपट प्रभागात होते. त्यांच्या अनुबोधपटांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिके पटकावली. ' खजुराहो ' ' राधा अँड कृष्ण ' आणि ' अकबर ' हे त्यांचे गाजलेले अनुबोधपट. त्यापैकी शेवटचे दोन स्वत: त्यांनीच बनवले होते. १९४८ ते ५४ आणि पुन्हा १९५७ ते ६५ पर्यंत ते ' युनेस्को 'साठी काम करीत होते. १९६८ मध्ये त्यांना पद्मश्री पदवी मिळाली. त्या वर्षीपासूनच त्यांची ' युनेस्को 'च्या ' वृत्तपत्र आणि दृक्–श्राव्य माहिती प्रभागा 'त वरिष्ठ चित्रपट व दूरदर्शन अधिकारी म्हणून नेमणूक झाली. ' नाचणाऱ्या दगडा 'चे त्यांचे नवीन तंत्र बिमल रॉयनी आपल्या ' गौतम द बुद्ध ' ह्या अनुबोधपटात सुधारून वापरले.

फ्रेनी वारियावा ही आजच्या काळातील नावाजलेली चित्रपट–निर्माती. ' अंकुर ' आणि ' निशांत ' ह्या तिच्या चित्रपटांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळवली.

भारतीय चित्रपटांतील पहिली स्त्री–संगीत–दिग्दर्शक म्हणून खुर्शीद मिनोचर होमजींचे नाव घेता येईल. त्या सरस्वती देवी म्हणून ओळखल्या जातात. ' अछूतकन्या ' आणि ' झूला ' ह्या चित्रपटांना त्यांनी संगीत दिले होते.

जून १९६६ त सर दोराब टाटा ट्रस्टतर्फे ' नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस ' स्थापण्यात आले.[१४] त्या केंद्रामुळे संगीत, नृत्य, नाट्य ह्या कलांना उत्तेजन मिळाले. त्या केंद्राचे एक संस्थापक–विश्वस्त जमशेद भाभा ह्यांनी डिसेंबर १९६३ मध्ये एक योजना मांडली. भारताच्या अभिजात आणि लोक कला, भारतीय संगीत, नृत्य आणि नाट्य ह्यांचे जतन करण्यासाठी, त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी एक राष्ट्रीय संस्था (अकॅडमी) उभारण्यात यावी, अशी ती योजना होती. अशा तऱ्हेची एकही राष्ट्रीय संघटना त्यावेळी भारतात नव्हती. त्यामुळे नामवंत कलाकारांची अडचण होत असे. आपली कला जतन करून नवीन पिढीला तिचा वारसा देणे अशक्य होते, अशी त्यांची तक्रार येई. ते काम करायचे तर प्रशिक्षण संस्था उभी करणे आवश्यक होते.

मग वीर नरीमन पॉइंटवर ४०,००० चौ. मीटर जागा ४५ लाख रुपये खर्च करून, भराव घालून, मिळवण्यात आली. समुद्रकाठची जागा महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारला देणगी म्हणून दिली. हे केंद्र पुरे होईल तेव्हा ते अथेन्सच्या अक्रॉपॉलिससारखेच भव्य, राजेशाही होईल. त्याचा स्टुडियो युनेस्कोकडून देणगी मिळाला आहे. त्या स्टुडियोमुळे शहरांतील कार्यक्रमांचे ध्वनिमुद्रण करता येते. केंद्राच्या फिरत्या ध्वनिमुद्रण यंत्रणेसाठी एक हलती–फिरती यंत्रणा जे. डी. रॉकफेलर (तिसरे) फंडाने भेट दिली. भारताच्या ग्रामीण भागात लोकसंगीताचे ध्वनिमुद्रण करणे ह्या यंत्रणेमुळे सहज शक्य होईल.

जे. आर. डी. टाटा अध्यक्ष, जमशेद भाभा विश्वस्त सदस्य आणि प्रा. रुस्तम चोकशी कार्यकारी विश्वस्त, अशा तिघा सदस्यांचे एक उच्चाधिकार मंडळ नेमण्यात आले आहे. केंद्राच्या आंतरराष्ट्रीय विभागाची आखणी करण्याचे काम ह्या समितीकडे आहे. ह्या विभागामुळे नवनवीन कल्पनांची देवाणघेवाण शक्य होऊन भारतीय कला देशाच्या सीमेपार, बाहेरच्या बदलत्या जगात निरनिराळ्या दिशांना पसरली जाऊन तीत बदल व सुधारणा घडवून आणता येईल.

वाङ्मयाच्या क्षेत्रात पारशांच्या नव्या व जुन्या पिढ्यांतील संघर्ष प्रकर्षाने जाणवतो. तीन पिढ्यांपूर्वी पारशी जमात गुजराती जमातीत सरमिसळलेली होती. पर्शियन (इराणी) संस्कृतीत, विशेषत: सूफी कवींच्या वाङ्मयीन कृतीत, त्यांना रस होता. अर्देशीर खबरदारसारखा असामान्य कवी गुजरातीत काव्य करीत असे. त्याचे काव्य

हिंदू गुजरात्यांना आवडत असे. फारच थोडे पारशी अर्देशीरचे काव्य वाचू शकत व त्याचा आस्वाद घेऊ शकत. कैखुश्रु काब्राजी, फिरोजशा मर्झबान ह्यांसारखे पत्रकार गुजरातीत अनेक विनोदी, रसाळ कादंबऱ्या लिहीत. सर रुस्तम मसानींनी इंग्रजी लेखन करण्यापूर्वी पाच गुजराती कादंबऱ्या लिहिल्या होत्या. पुण्यात एका खोलीत राहणारी फ्रेनी दलालही १९५० च्या सुमाराला पारशी कौटुंबिक कादंबऱ्या सुरेख लिहीत होती. त्या कादंबऱ्या प्रथम क्रमशः जाम–ए–जमशेद मधून प्रसिद्ध होत. त्या पारशी कुटुंबांत मोठ्या चवीने वाचल्या जात. आज मात्र लेख, कादंबरी, काव्य वा गंभीर पद्य गुजरातीतून लिहिणारा पारशी आढळत नाही. विद्यापीठातही गुजराती वाङ्मयात पदवी मिळवणारा पारशी क्वचित एखादाच. पदव्युत्तर अभ्यास करणारा तर नाहीच. एकेकाळी विद्यापीठात दुसरी भाषा (सेकंड लँग्वेज) म्हणून पर्शियन लोकप्रिय होती. पण आज तिची जागा फ्रेंच भाषेने घेतली आहे. जमातीच्या पाश्चात्यीकरणाने आता कळस गाठला आहे.

इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे पारशी लोकांनी वृत्तपत्रव्यवसायामध्ये बराच वरचा दर्जा प्राप्त केला. समकालीन पारशी पत्रकारांची चर्चा करण्यापूर्वी, आधीच्या काळांत पारशी वृत्तपत्रांनी जी महत्त्वाची कामगिरी बजावली, तिचा उल्लेख करणे योग्य होईल.

'बॉंबे समाचार' हे गुजराथी भाषेतले पहिले वृत्तपत्र १८२२ मध्ये सुरू झाले. फर्दूनजी मर्झबान त्याचे संपादक होते. भारतीय भाषेतील पहिले वृत्तपत्र बंगालीमधले 'संगवद कौमुन्दी' हे 'बॉम्बे समाचार'च्या आधी सात महिने सुरू झाले होते. कुल्के म्हणतो, की अगदी सुरुवातीपासून बॉम्बे समाचारने गुजराती हिंदू आणि पारशी या दोन्ही समाजांचा दृष्टिकोन विचारात घेतला होता आणि म्हणून गुजराती आणि इंग्रजी या दोन्ही भाषांचा मिलाफ केला होता. या वर्तमानपत्राला हिंदू, जैन, बोहरा, खोजा, भाटिया, मेमन आणि पारशी असा सर्व प्रकारचा वाचकवर्ग लाभला होता. या वृत्तपत्राचे सध्याचे मालक पंचेरजी नसेरवानजी कामा यांनी १९३३ मध्ये त्यांची सूत्रे हाती घेतली व आपले पुत्र नसेरवानजी आणि रुस्तमजी यांच्या मदतीने ते गुजरातीमधले सर्वात जास्त लोकप्रिय वृत्तपत्र करण्यात यश मिळविले. त्याचा खप १ लाख ६० हजार प्रतींचा आहे. पारशांसमोर आज उभ्या असणाऱ्या समस्यांबाबतचा पुरोगामी दृष्टिकोन त्याचे कार्यक्षम आणि निडर संपादक जेहान दारुवाला अत्यंत समर्थपणे मांडतात.

बॉम्बे समाचार सुरू झाल्यानंतर ८ वर्षांनी नौरोजी दोराबजी यांनी 'मुंबई वर्तमान' चालू केले (१८३०–४३). १८३२ मध्ये पेस्तनजी माणेकजी मोतीवाला यांनी मुंबई पारशी पंचायतीच्या मदतीने 'जाम–ए–जमशेद' सुरू केले. अद्यापही

जाम–ए–जमशेद सर्वात सनातनी विचारांचे पारशी वर्तमानपत्र आहे. त्याच वर्षी नौरोजी दोराबजी यांनी 'मुंबईना चाबूक'च्या प्रकाशनाला सुरुवात केली. (१८३२–५०). १८४४ ते ५२ या काळात 'समाचार–दर्पण' अस्तित्वात होते. नौरोजी गेई त्याचे संपादक होते. अल्पकाळ प्रकाशित झालेले 'चित्तरंजन दर्पण' (१८४५–४६) बेहरामजी जमशेटजी गांधी यांनी चालवले होते.

'दिग्द–दर्शन' हे मराठीतले पहिले वृत्तपत्र होते. गुजराती हिंदूंनी काढलेले पहिले गुजराथी वृत्तपत्र 'वर्तमान' १८४९ मध्ये अमदाबादहून प्रकाशित होऊ लागले. त्यावेळी या क्षेत्रात आधीच सहा पारशी गुजराती वृत्तपत्रे होती.

समकालीन पारशी वृत्तपत्रांमध्ये जास्तीत जास्त लोकप्रिय असलेली दोन म्हणज 'ब्लिटझ्' आणि 'करन्ट'. पैकी ब्लिटझ्चे संस्थापक–संपादक रुसी के. करंजिया (जन्म १९१२–) आहेत आणि करन्टचे संस्थापक–संपादक डी. एफ्. कराका (१९११–१९७४) होते.

ब्लिटझ् १९४१ साली सुरू झाले आणि ते इंग्रजी, हिंदी, उर्दू आणि मराठी एवढ्या भाषांमधून प्रसिद्ध होत असल्यामुळे त्याला लवकरच मोठा वाचकवर्ग मिळाला. त्याचे संस्थापक रुसी करंजिया यांनी वृत्तपत्रव्यवसायाचे प्रशिक्षण भारतात आणि इंग्लंडमध्ये घेतले. त्यांनी या व्यवसायाची सुरुवात 'द टाइम्स् ऑफ इंडिया'चे बातमीदार म्हणून केली. लवकरच ते उपसंपादक आणि विशेष बातमीदार या पदापर्यंत चढले. नंतर ते 'संडे स्टँडर्ड'चे उपसंपादक म्हणून लागले आणि अल्पावधीतच 'संडे स्टँडर्ड' आणि 'मॉर्निंग स्टँडर्ड' म्हणजे आत्ताचा 'इंडियन एक्सप्रेस' या दोन्हीचे प्रमुख संपादक झाले. ते मुंबईच्या प्रगतिशील गटाचेही संस्थापक–अध्यक्ष होते. तसेच त्यांनी ब्लिटझ् राष्ट्रीय व्यासपीठ (ब्लिटझ् नॅशनल फोरम) आणि 'मुंबई वाचवा' समितीचे आयोजन केले. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांपैकी 'माइन्ड ऑफ अ मोनार्क' (१९७७) हे त्यांच्या आणि इराणच्या माजी शहांच्या संभाषणाबद्दलचे पुस्तक अत्यंत वाचनीय तर आहेच, पण शिवाय इराणमधल्या अलीकडील घडामोडी लक्षात घेता ते अतिशय हृदयस्पर्शीदेखील वाटते.

ब्लिटझ्नंतर आठ वर्षांनी १९४९ मध्ये दोसाभॉय फ्रेमजी कराका यांनी करन्टची स्थापना केली. १८८४ मध्ये सर्वप्रथम संपूर्ण समावेशक असा पारशांचा इतिहास दोन खंडांत लिहिणारे डी. एफ्. कराका यांचे ते नातू. करन्टचा खप जवळजवळ ब्लिटझ् इतकाच आहे. करन्टचे वाचकांना आवडणारे वैशिष्टय म्हणजे बातम्यांचा सविस्तर तपशील आणि खमंग विनोद ! त्याचे संस्थापक कराका यांचे शिक्षण ऑक्सफर्डला झाले. इतकेच नव्हे तर ऑक्सफर्डमधल्या विद्यार्थी संघटनेचे (स्टुडण्टस् युनियन) अध्यक्ष म्हणून निवड झालेले ते पहिले भारतीय होते. लंडनच्या लिंकन्स् इन मधून ते

बॅरिस्टर झाले. आय. सी. एस्. मध्ये जाण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर त्यांनी आपली निर्मितिक्षम प्रतिभा वृत्तपत्रव्यवसायाकडे वळवली. त्यानंतरच्या काळात त्यांनी कित्येक पुस्तके, कादंबऱ्या, आठवणी, चरित्रे वगैरे लिहिले. हे सर्व लिखाण त्यांनी त्यांच्या परिश्रमी आजोबांच्याच आद्याक्षरांनी केले. त्यांची अनेक पुस्तके परदेशातूनही प्रसिद्ध झाली आहेत. त्यांतली दोन विशेष स्मरणीय आहेत. 'आऊट ऑफ डस्ट' (१९४०) आणि 'देन केम हझरतअली.' (१९७२) पैकी पहिल्या पुस्तकात गांधीजींच्या भारतीय शेतकऱ्यांशी असलेल्या निकट आणि जिव्हाळ्याच्या संबंधांचे दर्शन घडवले आहे, तर दुसऱ्यामध्ये लेखकाच्या स्वत:चा सबंध आयुष्याचा केंद्रबिंदूच (दृष्टिकोन) बदलून टाकणाऱ्या गूढ अनुभवाचे वर्णन आहे. हझरतअलीचा दुसरा भाग ते लिहिणार होते, परंतु तो पूर्ण होण्याआधीच ते निधन पावले.

ए. डी. गोरवाला (१९००–) यांनी १९६० मध्ये सुरू केलेले 'ओपिनिअन' हे एक वैशिष्ट्यपूर्ण साप्ताहिक आहे. श्री. गोरवाला आय. सी. एस्. होते आणि त्यांनी सिंधमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली. आणीबाणीच्या काळात 'ओपिनिअन'चे प्रकाशन त्यांना बंद करावे लागले. परंतु मार्च १९७७ मध्ये जनता सरकार सत्तेवर येताच पुन्हा नव्या जोमाने ते सुरू झाले. अविचल निडरपणाने गोरवाला सरकारच्या धोरणावर टीका करतात. त्यांची तीक्ष्ण शैली आणि नि:संदिग्ध विचारधारा त्यांच्या पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होते–"माणसांच्या कृती इतिहास घडवतात; त्यांच्या भावना नव्हे ! त्याचप्रमाणे सरकार चांगले वा वाईट ठरवले जाते ते सत्तेवर असलेल्या लोकांच्या कृत्यांनी अगर दुष्कृत्यांनी ! त्यांच्या शब्दांनी नव्हे !" सुमारे दोन दशके (२० वर्षे) जुलूम आणि भ्रष्टाचार यांच्याविरुद्ध त्यांनी दिलेल्या एकाकी लढ्यामुळे अनेक विचारवंत भारतीयांच्या मनात त्यांच्याबद्दल कौतुकाची आणि सौहार्दाची भावना निर्माण झाली आहे. त्याचे मूर्त रूप त्यांच्या ७५ व्या वाढदिवसा-निमित्त अनेकांनी लिहिलेल्या निबंधांच्या संग्रहामध्ये दिसते. मात्र हा संग्रह 'से नॉट द स्ट्रगल' या शीर्षकाने त्यांच्या पच्याहत्तरीनंतर एक वर्षाने प्रसिद्ध झाला.

डॉ. पी. बी. वॉर्डन यांनी 'पारसियाना' हे साप्ताहिक सुमारे वीस वर्षांपूर्वी चालू केले. विविध क्षेत्रांतल्या सर्व पारशी लोकांना एकमेकांशी सुसंवाद साधता यावा आणि परस्पर हितसंबंधाच्या बाबीबद्दल चर्चा करता यावी, या हेतूने एक सामाईक व्यासपीठ म्हणून डॉ. वॉर्डन यांनी त्यावेळी पारसियाना सुरू केले. तरीदेखील प्रत्यक्षात गेल्या पाचएक वर्षांतच आबालवृद्धांमध्ये पारशी जमातीसमोर उभ्या असलेल्या समस्यांची जाणीव दिसते आणि परिणामी पारसियाना हा आता देशात तसेच परदेशात पारशांचा आवाज उठवणारा ध्वनिक्षेपक झाला आहे. त्यांच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच भारतीय पारशी जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातल्या त्यांच्या झोरोष्ट्रियन बांधवांशी सतत

निकटचे संबंध ठेवू शकतात. याचे बरेचसे श्रेय पारसियानाचे धडाडीचे तरुण संपादक जहांगीर आर. पटेल यांच्या तळमळीच्या आणि प्रभावी कार्याला आहे. तिसऱ्या जागतिक झोरोष्ट्रियन कॉंग्रेसचा (मुंबई, जानेवारी १९७८) त्यांनी दिलेला विस्तृत अहवाल, त्यानंतरच्या सामूहिक चर्चा, पंचायतींच्या अध्यक्षांच्या आणि आघाडीच्या उद्योगपतींच्या महत्त्वपूर्ण मुलाखती या सर्वांमुळे भारतातल्याच नव्हे तर न्यू साऊथ वेल्स, कॅनडा, सिंगापूर, जपान, इंग्लंड, इराण आणि अमेरिकेमधल्या दूरदूरच्या सभासदांना आजच्या समस्यांची जाणीव व्हायला मदत झाली.

पारसियाना आणि ओपिनिअन ही त्या मानाने अलीकडील प्रकाशने आहेत. पण 'कैसर–ए–हिंद' हे साप्ताहिक मात्र सुमारे शंभर वर्षांपूर्वीचे आहे. बॉम्बे समाचार-प्रमाणेच कैसर–ए–हिंदमध्येही इंग्रजी व गुजराथी या दोन्ही भाषांमधले लेख प्रसिद्ध होतात. त्याचे संपादक जाल हीरजीबेहदीन यांचा पारशी जमातीच्या व्यवहारांबद्दल प्रगतिशील दृष्टिकोन आहे.

दारा आर. मेहेरहोमजी (१९१०–१९७७) हे आणखी एक प्रख्यात पारशी पत्रकार होऊन गेले. त्यांना या व्यवसायाचे प्रशिक्षण असे मिळाले नाही. अनुभवाच्या खडतर शाळेमध्ये ते स्वतःच ही कला शिकले. 'इव्हिनिंग न्यूज ऑफ इंडिया' या मुंबईच्या इंग्रजी दैनिकाचे ते दहा वर्षे संपादक होते. आपल्या बत्तीस वर्षांच्या पत्रकार–कारकिर्दीत त्यांनी या क्षेत्रातल्या इतरही बऱ्याच जबाबदारीच्या जागा भूषविल्या.

तथापि पारशी समाजातले आजचे सर्वात अग्रगण्य पत्रकार निःसंशयपणे 'स्टेटस्-मन'चे सरसंचालक सी. आर. इराणी (जन्म १९३०) होत. आणीबाणीच्या काळात (१९७५–७७) त्यांच्या निर्भय व सडेतोड लिखाणावर त्यांना दोन आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळाली.–न्यूयॉर्कच्या फ्रीडम हाऊसचे फ्रीडम अॅवॉर्ड (स्वतंत्रता पारितोषिक) आणि लंडनच्या कॉमनवेल्थ प्रेस युनियनचे अॅस्टर अॅवॉर्ड 'बेंगॉल–द कम्युनिस्ट चॅलेंज' या त्यांच्या अभ्यासपूर्ण पुस्तकात त्या राज्यातल्या परिस्थितीची अगदी निर्भीड आणि काळजीपूर्वक फेरतपासणी केली आहे. ते लंडनच्या इन्स्टिटयूट ऑफ डायरेक्टर्सचे सभासद आहेत. लंडनच्याच इंटरनॅशनल प्रेस इन्स्टिटयूटच्या कार्यकारी मंडळाचे सभासद आहेत. तसेच कॉमनवेल्थ प्रेस युनियनच्या आंतरराष्ट्रीय कार्यकारी समितीचेही सभासद आहेत.

सध्याच्या इतर काही लोकप्रिय पत्रकारांपैकी बर्जोर के. करंजिया हे 'फिल्म–फेअर'चे संपादक आहेत, तर फ्रेनी तल्यारखान 'ट्रेन्ड' या महिलांच्या मासिकाच्या कार्यक्षम संपादिका होत्या. त्यांनी हे मासिक बरीच वर्षे चालविले. दीना वकील फेमिनाच्या सहसंपादिका आहेत, तर 'इलस्ट्रेटेड वीकलीच्या' उपसंपादक–पदावर बची करकरिया आहेत, आणि दीना मेहता याच साप्ताहिकाच्या ललित–साहित्य–

विभागाच्या संपादिका आहेत. बचींच्या जहाल, बोचऱ्या लेखणीने पारशी लोकांच्या कितीतरी हास्यास्पद/चमत्कारिक गोष्टींवर प्रहार केला आहे. मेहेर एच्. मूस या आणखी एक तरुण ललित–लेखिका आहेत. बाह्य मंगोलियाच्या आसपासचा वैराण भाग, त्याचप्रमाणे दक्षिण ध्रुवासारख्या जगाच्या काही अत्यन्त दुर्गम प्रदेशांमध्ये त्यांनी केलेल्या सफरीचे सुरस वर्णन करणाऱ्या त्यांच्या लेखांची पुष्कळ प्रशंसा झाली आहे.

लघुकथा–लेखकांपैकी दीना मेहतांच्या कथा लंडन मॅगझिनने तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दक्षिण अफ्रिका आणि हाँगकाँगमधल्या अनेक प्रकाशनांनी स्वीकारल्या आहेत. एवढेच नव्हे तर ॲलन रॉस यांनी लंडन मॅगझिनमधल्या सर्वोत्कृष्ट लघु-कथांच्या संग्रहासाठी त्यांच्या तीन कथांची निवड केली आहे. अलीकडेच बी. बी. सी. जागतिक प्रसारण सेवेच्या (वर्ल्डसर्व्हिस) पहिल्याच नाटचलेखन स्पर्धेमध्ये (१९७९) त्यांनी मानाचे स्थान मिळवले आहे. नरगिस दलाल देखील चांगल्यापैकी लघुकथा लेखिका आहेत. १९५४ मध्ये जागतिक पारितोषिक कथास्पर्धेत त्यांनी प्रथम पारितोषिक पटकावले. 'द सॅक्रिफाइस' (त्याग) ही त्यांची कथा, ओडहॅम्सनी प्रसिद्ध केलेल्या लघुकथा–सग्रहासाठी आलेल्या १,००,००० कथांमधून निवडलेल्या एकेचाळीस कथांपैकी एक आहे. 'द न्यूड' (नग्न) या नावाने त्यांच्या उत्तम लघुकथांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे (१९७७). फिरोज दस्तुर यांच्या तीन कथा अलीकडेच बी. बी. सी. ने त्यांच्या जागतिक-लघुकथा–कार्यक्रमात ध्वनिक्षेपित केल्या. ए. डी. गोरवाला यांचे 'द क्वीन ऑफ ब्यूटी अँड अदर टेल्स' हे पुस्तक वाचनीय असून त्याकडे अधिक लक्ष वेधले जायला हवे. गोरवालांची प्रभावी शैली आणि खमंग विनोद वाचकाला नेहमीच आकर्षून घेतात. मुना के. सर्व्हेयर यांच्या 'टेल्स फ्रॉम कालिदास' या पुस्तकामध्येही एक प्रकारचा रसाळपणा आणि संवेदनशीलता आढळून येतात.

गेल्या दशकात पारशी लेखकांनी कादंबरी लेखनाला सुरुवात केली. पेरीन भरुचाची 'द फायर वर्शिपर्स' (१९६७) ही पारशी जीवनावरील बहुधा पहिलीच इंग्रजी कादंबरी असावी. तीत उपाध्याय, कनिष्ठ मध्यमवर्ग आणि उच्च मध्यमवर्ग हे पारशी समाजातील तीन स्तर मोठ्या कौशल्याने रंगवलेले आहेत. कादंबरी विनोदी आहे, उल्हासजनक आहे. तीतील चविष्ट विरोधाभासामुळे वाचनीय ठरते. नर्गीस दलालांची 'मिनारी' ही १९६७ साली प्रसिद्ध झाली. तीत संपूर्णत: पारशी कुटुंबाचे चित्रण नसले तरी एक प्रौढ पारशी दांपत्य आणि त्यांचा फर्डी नावाचा मुलगा ह्यांची खुसखुशीत व्यक्तिचित्रणे त्यात आहेत. ह्या कादंबरीच्या घटना एका थंड हवेच्या ठिकाणी घडतात. त्यातील व्यक्तिचित्रणे जिवंत आहेत. काळाच्या पडद्याआड गेलेल्या भारतीय जीवनाची विविध अंगे तीत रंगवली आहेत. त्या पहिल्याच कादंबरीत

आढळणारे लेखिकेचे सूक्ष्म निरीक्षण व दृष्टिकोणातील ताजेपणा पुढे तिच्या 'थ्री सिस्टर्स' (१९७३) व 'द इनर डोअर' (१९७५) ह्या साहित्यकृतीत जास्त प्रकर्षाने आढळतात. ह्या पार्श्वभूमीवर बेहराम के. करंजियांची 'मोअर ऑफ अॅन इंडियन' (१९७०) ही कृती नुसतीच सनसनाटी, बेंगरूळ ठरते. मात्र त्यातील घूर्त वास्तववाद, अत्युत्साह ह्यामुळे वाचक भारावून जातो. ह्या कादंबरीत पारशांच्या भारतातील इतर जमातींवर पडणाऱ्या प्रभावाचे वर्णन आहे. सरोस कावसजी हा पारशी वडील व इंग्लिश आई ह्यांचा मुलगा. १९६३ सालापासून तो कॅनडा विद्यापीठात इंग्रजीचे अध्यापन करतो. त्याची 'गुडबाय टु एल्सा' (१९७४) ही कादंबरी अति वास्तववादी, अतिरिक्त वासनामय आहे. त्यात भारतीय विद्यार्थ्यांच्या परदेशातील खुळचट वागणुकीचे भयंकर विनोदी चित्रण आहे; डेहराडूनच्या कॅडेटच्या जीवनाचे उपरोधक वर्णन आहे आणि कॅनडातील विद्यापीठात चालणाऱ्या 'आतल्या भानगडी' चे तपशील आहेत. ए. डी. गोरवालांची 'ए टेल फॉर द न्यू इयर' ही कादंबरी त्यांच्या 'ओपीनियन' ह्या नियतकालिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली होती. परंतु ती पुस्तकरूपात प्रकाशित झालेली नाही; त्याला कारण कदाचित त्या कादंबरीतील कटू सत्ये असू शकतील.[५]

समीक्षात्मक लेखनात फिरोझ ई. दस्तूर ह्यांच्या 'सरोजिनी नायडू' (१९६१) ह्या पुस्तकाचा उल्लेख करायला हवा. हे पुस्तक 'भारतीय लेखक व त्यांचे साहित्य' ह्या मालेत प्रसिद्ध झाले. 'लेखक व त्यांच्या कृती' ह्या मालेतील सरोस कावसजीने लिहिलेले 'सीन ओ' कॅसी' (१९६४) हे आयरिश नाटककारावरील समीक्षणात्मक पुस्तक आहे. दस्तूरचे वाङ्मयीन लेख 'द वर्ल्ड ऑफ वर्ड्स' ह्या संग्रहात १९६८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. त्यात विषयांची विविधता आहे; ते वाचनीय आहेत.

इंग्रजीत काव्य लिहिण्याच्या बाबतीत मात्र पारशी लेखक कच्चे आहेत. तरीसुद्धा, ज्या बारा भारतीयांची इंग्रजी काव्ये प्रसिद्ध झालीत. त्यातील चार पारशी आहेत. हे चार पारशी कवी म्हणजे केकी दारुवाला, कर्सी कात्रक, गेव पटेल आणि अदिल जसावाला.[६] त्यांच्यापैकी सफाईदार वाटतात दारुवाला. लक्षणीय वाक्ये तयार करण्यात ते पटाईत आहेत. आधुनिक जीवनावरील त्यांची टीकाटिपणीही अर्थपूर्ण असते. दारुवालांचा जन्म १९३७ मध्ये लाहोर येथे झाला. लुधियानाच्या गव्हर्मेंट कॉलेजमध्ये त्यांचे शिक्षण झाले. दारुवाला पोलीसखात्यात नोकरी करतात. त्या जीवनामुळे मी वास्तवाच्या अधिक जवळ जातो. मला लोकांचे कच्चे दुवे लवकर सापडतात असे ते म्हणतात. त्यांची कविता गेल्या सहा वर्षांपासूनच छापून येऊ लागली आहे. त्यांना नाव मिळू लागले आहे. त्यांचे 'अंडर ओरायन' (१९७०), 'अपारिशन इन एप्रिल' (१९७१) आणि 'क्रॉसिंग ऑफ रिव्हर्स' (१९७६) हे

काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. अनेक आधुनिक कवीप्रमाणे दारुवालानाही मृत्यू, नाश ह्यांनी पछाडलेले दिसते. त्यांची वास्तव उघड वर्णने पुढे दीर्घकाळ मनात रेंगाळत राहतात. त्यांच्या ' वाराणसी विनेटस ' मधील पुढील उतारेच पाहा ना–

द लाइट इज ग्रीनिंग
डिस्पेअर टर्निंग टु मोल्ड
इन ए पिकल जार...
उजेड हिरवा होतो आहे
निराशेचा साचा बनतो आहे
एका लोणच्याच्या बरणीत...

द लँडस्केप इज सो ग्रे
दे आर मिल्किंग द सन
फॉर लाईट...
निसर्ग कसा करडा बनलाय
प्रकाश मिळविण्यासाठी ते
सूर्याचे दोहन करीत आहेत...

वॉकिंग टु द गायनेक वॉर्ड
आय फाइंड इट इज
द मॉर्च्युरी
प्रसूतिगृहाच्या वॉर्डमधून मी
फिरतो आहे
पण मला वाटतं–मी शवागारातच आहे... (विनेट–३)

काइट्स हँग इन द अेअर
इन सस्पेंडेड अॅनिमेशन
शॅडोज हँग लाइक बर्डस
ऑन ए डेड विंड
पतंग हवेत अधांतरी टांगलाय
तिथेच हालचाल करतोय
मृत वाऱ्यावर पक्षी टांगावेत
तशा सावल्या टांगल्या आहेत

अब्लाइंड मॅन्स फिंगर्स
ग्रोप अक्रॉस माय फेस
अ साधू आइज मी
अनब्लिंकिंग फ्रॉम हिज नेव्हल
 अंधाची बोटे माझ्या चेहऱ्यावरून
 फिरताहेत
 एक साधू त्याच्या बेंबीतून
 माझ्याकडे एकटक पाहतो आहे. (विनेट–२)

'हरा नाग' ही त्यांची सर्वोत्कृष्ट कविता मानायला हरकत नाही. त्यातील उपमा रानटी उत्कटतेला जाऊन पोहचतात.

द बाम्बू जंगल ग्र्यू अराउंड
अवर हाऊस
अॅन अथ्रायटिक फॉरेस्ट
ऑफ टॅंग्ल्ड बोन
स्पाईक्ड विथ लीफ
 आमच्या घराभोवती
 बांबूचे जंगल वाढले होते
 त्या जंगलाला सांधे दुखी लागली होती
 हाडे एकमेकांना गुंतली होती
 त्यांना पानांचे काटे लागले होते

यू कुडन्ट कट इट––
द स्टेम्स हॅड हार्डन्ड सो
द चॉप्ड लिम्ब्स कुड नॉट बी मुव्हड
दे वेअर इंटरलेस्ड लाइक बोन–शार्ड्स
इन ए मल्टिपल फ्रॅक्चर
 ते कापता येणार नाहीत––
 बुंधे कडक झालेत
 कापलेले अवयव हलवता येणार नाहीत
 अस्थि-मज्जेसारखे ते एकमेकांत गुंतलेत
 ती हाडे पिचली आहेत

ह्या उलट, ' डेथ ऑफ अ बर्ड ' (द मोनल) ह्या कवितेत त्यांची हळवी काव्यात्मकता प्रकट होते.

हर हेड इज ऑन माय हार्टबीट,
हेअर लॉक्ड इन माय फिंगर्स......
लेट विथ अवर ड्रीम्स
फॉर द मून केम आऊट जस्ट
फॉर अॅन अवर ऑर टू
अॅंड द मोनल विंग्ज केम फेदरींग डाऊन
इन अ पॅशन ऑफ डस्कि गोल्ड अॅंड ब्ल्यू
        तिचे मस्तक माझ्या छातीचे
        स्पंदन ऐकते आहे
        माझी बोटे तिच्या केसात गुंतली आहेत
        रात्र फुलली आहे, जरा उशीराच,
        आमच्या स्वप्नांनी...
        चंद्र आता, तासा-दोन तासांपूर्वीच उगवलाय
        चंद्रकिरणे पिसांसारखी खाली उघळलीत
        सगळीकडे कसे सोनेरी–निळसर झाले आहे

कर्सी डी. कात्रक (जन्म १९३६) हे दीक्षा घेतलेले उपाध्याय होते. पण नंतर त्यांनी उपाध्येपण सोडून दिले. ते रोमनकॅथलिक बनले. आता ते एका जाहिरात कंपनीचे कार्यकारी–संचालक आहेत. त्यांच्या कवितांचे दोन संग्रह प्रसिद्ध झालेत– ' अ जर्नल ऑफ द वे ' आणि ' डायव्हर्शन्स बाय द रोड साइड.' ओपिनियन ह्या पत्रातही त्यांच्या बऱ्याच कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. कात्रक विसंवादी कवी आहेत. त्यांच्या सर्वोत्कृष्ट उपमा डब्ल्यू. बी. यीटस्, जॉन डन् आणि जेरार्ड मॅनली हॉपकिन्स ह्यांची आठवण करून देतात. ' मडोन्ना, ऑन द बीच अॅट सनसेट 'च्या प्रारंभीच्या ओळी, ' दुर्गा : ऑन द हिल टॉप 'मधील शेवटच्या ओळी ह्यातून वैभवसंपन्न उपमांची उधळण आहे. त्यामुळे वाचक भारावून जातो.

शी नो लॉंगर बीस्ट नॉर बिच
        नॉर गॉडेस बट सिंपली वूमन
युवर बिलव्हेड इन द किंग्डम ऑफ फ्लेश

ट्रस्ट हर अँज शी लीडस
थ्रू द हॉलो डोमेन्स ऑफ युवर स्पाइन
थ्रू सिक्रेट नेव्हल्स ओपनिंग टु टेम्पल्स
डोम्स अंडर हिडन स्टार लाइट,
अराइज् किंग,
एंटर द प्लेस ऑफ थ्रोनहुड
बाय कँडललाइट बाय मॉथलाइट बाय द
हुडेड इनकँडेसन्स ऑफ ग्लो वर्मस
गाइडेड बाय हर स्ट्रेंज सॉफ्ट फरी बीस्टस
टु द फीट ऑफ लव्ह
ती आता पशूही नाही की देवताही नाही,
उरली आहे फक्त स्त्री
मांसाच्या ह्या राज्यात तुझी प्रेयसी आहे
ती तुला घेऊन चाललीय, तिच्यावर विश्वास ठेव
ती तुला तुझ्याच बरगड्यांच्या सापळ्यातून नेतेय
तुझ्या गुप्त नाभीतून मंदिरांकडे नेतेय
चांदण्यात लपलेल्या घुमटात नेतेय, राजा ऊठ !
तुझ्या सिंहासनाच्या जागेत जा
मेणबत्तीच्या प्रकाशात जा; किड्यांच्या प्रकाशात जा
काजव्यांच्या अस्पष्ट, अपारदर्शक,
झाकोळलेल्या प्रकाशात जा
तिचे मऊ, खरबरीत स्तन तुझी सोबत
करताहेत
तुला प्रीतीच्या चरणापाशी
घेऊन जाताहेत

गेव्ह पटेल (जन्म १९४०) हे वैद्यकीय व्यावसायिक कवी. तीन वर्षे त्यांनी संजानच्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर नोकरी केली. संजान हे तसे खेडेच आहे. आजही १००० वर्षांपूर्वीचेच वातावरण तिथे आढळते ! आता पटेल मुंबईत व्यवसाय करतात. त्यांचा 'पोएम्स' संग्रह १९६६ त प्रसिद्ध झाला. 'प्रिन्स' हे नाटकही त्यांनी लिहिले. मुंबईच्या थिएटर ग्रुपने १९७० साली त्याचे प्रयोगही केले. गुजराती वाङ्मय वाचून त्याचा आस्वाद घेणाऱ्या अगदी थोड्या पारशांपैकी ते एक आहेत. त्यांनी काही

गुजराती साहित्याचा इंग्रजीत अनुवादही केला आहे. दारुवालासारख्या प्रखर–तीव्र-भावना पटेलांच्या नाहीत, की कात्रकांची भावपूर्णताही त्यांच्यात नाही. मात्र पटेलांच्या काव्यातील मृदु–कडवटपणामुळे वाचक त्यांच्या काव्याकडे आकर्षिला जातो. डाक्यामध्ये विद्यार्थ्यांवर निर्घृण गोळीबार झाला तेव्हा पटेल लिहून गेले–

दे टू वेअर शॉट
टु द लास्ट थ्रेटनिंग टु फेल द असासिन्स
अँड वाय शुड आय मोन ?
यस्टरडेज चिकन मील सॉ नो लेस
सिग्निफिकंट अ स्लॉटर
कॅन डोमेस्टिक फाऊल कॅलक्युलेट
राइट इन देम फ्रॉम रॉंग !
त्यांनाही ठार करण्यात आले,
अगदी शेवटपर्यंत मारेकऱ्याला
मारण्याची धमकी दिली
पण मी का दुःख करावे ?
कालच्या कोंबडीच्या खाऱ्याने
काही कमी कतली पाहिल्या नाहीत
घरच्या कोंबड्यांना थोडंच
बऱ्या वाईटाचं गणित येतं ?

'हाउ डु यू विथस्टँड बॉडी' हा पटेलांचा दुसरा संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला.

अदिल जसावाला (१९४०) हे ऑक्सफर्डचे पदवीधर. पाच वर्षे त्यांनी लंडनच्या एका भाषा शिकवणाऱ्या संस्थेत अध्यापनाचे काम केले. 'न्यू इंडियन रायटिंग' ह्या पेंग्विनच्या संग्रहाचे ते संपादक होते. हा संग्रह बहुशः भाषांतरित साहित्याचा होता. सध्या जसावाला मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक आहेत. 'लँडस एण्ड' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९६२ साली प्रसिद्ध झाला. वयाच्या १७ व्या वर्षी ते इंग्लंडला गेले, ते वास्तुशास्त्राचे शिक्षण घ्यायला. परंतु तिकडे गेल्यावर वास्तुशास्त्र शिकण्याऐवजी त्यांनी दोन नाटके लिहिली, एक संगीतिका लिहिली आणि मग ऑक्सफर्डला इंग्रजीचे अध्यापन केले. बावीसाव्या वर्षापासूनच जसावाला कविता लिहू लागले. त्यांच्या काव्यातील ताजेपणा आणि प्रगल्भता आश्चर्यकारक आहे. 'अ बॉम्बसाइट' मधील जिवंत वर्णन वाचा.

अॅज इफ द ब्रोकन स्टेप्स वेअर अ गर्ल्स
स्टार्व्हड शोल्डर अॅज इफ द डस्कि रबल
वेअर हर हेअर स्टारफिश्ड अक्रॉस द पिलो...
ते तुटके खुंट जणू काही एखाद्या पोरीचे
उपाशी खांदे; अंधारलेला तो डबराचा
ढीग म्हणजे उशीवर पसरलेले तिचे केस...

आय वुड प्रेस माय बोन्स इंटु द बोनी
शोल्डर्स ऑफ दीज स्कार्ड होम्स...
ह्या जळक्या घरांच्या हाडकुळ्या खांद्यावर मी
माझी हाडं दाबली असती...

बट चिल्ड्रेन थ्रोइंग स्टोन्स, ट्रेंच्ड बिहाइंड माऊंट्स्
हॉलर अॅंड किल अॅंड क्रम्पल लाइक स्टेल न्यूजशीटस
अनसॅटिस्फाइड विथ स्पॉटलेस स्काईज ऑफ पीस
पण पोरं दगड फेकत आहेत
ढिगापलीकडे बसून कोकलत आहेत
मारताहेत, जुन्या वर्तमानपत्रासारखे चुरगाळताहेत.
शांत निरभ्र आकाशानेही ते असमाधानी आहेत.

एवढं असलं तरी जसावाला खेदाने कबूल करतात :
थिंग्ज टॉक नो मोअर
दो आय लिसन
अॅंड ओन्ली ए कोल्ड
अझम्प्शन ऑफ अरोगन्स इज माइन,
मी काळजीपूर्वक ऐकतो खरा
पण वस्तू आता बोलतच नाहीत
उरते हातात फक्त थंड, उद्धटपणाची भावना...

ह्या कवींचा जीवन आणि व्यवसाय ह्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण काय आहे, हे अभ्यासणे मनोरंजक आहे. आपले काव्य आणि आपला परिसर ह्यांची अविभाज्यता व्यक्त करताना दारुवाला म्हणतात, ' आधुनिक कविता अनाकलनीय (ऑब्स्क्युअर)

नाही. आधुनिक काळाला साजेलसेच आधुनिक काव्य आहे.' कात्रक बोलून चालून स्वप्नाळू. ते आपल्या खाजगी जगात मश्गुल झालेले असतात. त्यांचे मत दारुवालांच्या अगदी उलट आहे. " आधुनिक काव्य अनाकलनीय आहे. कारण ज्या विषयांशी ते निगडित आहे ते विषयच अनाकलनीय आहेत. हेतुतः ते अनाकलनीय नाही. फक्त त्यात अनाकलनीय जगाचे प्रतिबिंब पडते एवढेच." तर, पटेल ठाम निश्चयाने सांगतात, " मी म्हणतोय तो कदाचित विरोधाभास वाटेल. पण माझ्या मते काव्य म्हणजे एक कृती आहे. अगदी एखादी शारीरिक कृती करावी, तशीच. एखादी कविता सुस्पष्ट, विचारांनी केलेली, हेतुपूर्ण, तर्कसुसंगत आणि प्रामाणिक असेल तर ती बरेच काही बदलू शकते. प्रथम ती खुद्द कवीलाच बदलू शकते... ती कवीला बदलू शकली नाही, तर कवी काव्यच करू शकणार नाही."

ह्या चौघाही कवींच्या मनात एक चमत्कारिक अस्वस्थ करणारी भावना रेंगाळत आहे. आपण एखाद्या पोकळीत निर्मिती करीत आहोत, अशी त्यांना भावना असावी. दारुवाला म्हणतात, " सर्वच कलेला रसिक हवे असतात. मला प्रतिक्रिया मिळाल्या नाहीत तर चुकल्यासारखे होते. एखाद्या पोकळीत निर्मिती केल्यासारखे वाटते." कात्रकांच्याही मनात अशीच भावना आहे. मात्र ते ती वेगळ्या शब्दांत व्यक्त करतात— ' मूलतः कवी एकमेकांशी बोलत असतात; इतर थोडेफार श्रोते असतात. पण ते जरा चोरूनच ऐकणारे !' जसावाला जरा कठोर आहेत. ते म्हणतात, ' पोकळीत काव्याची चर्चा करणे व्यर्थ आहे. त्यात लोकांना रस नाही.'

एकूण कादंबरी आणि नाटके ह्याच वाङ्मयप्रकारांचे पारशांच्या मनाला आकर्षण दिसते. त्यात त्यांना आपली लांबलचक वाक्ये पेरता येतात. गुजराती हिंदू सावत्र आईला ' सावकी मा ' म्हणतात तर त्यासाठी पारशांचा खास शब्द आहे—' मात्राई ' —मोहरीची आई ! एखाद्या निरुद्योग्याने पारशाला सतावले तर पारशी त्याला शिवी हासडतो, ' मर, मर मोचीने बारणे !' (जा, जा, मर जाऊन चांभाराच्या दारात.) त्याचा गर्भितार्थ, ' तू इतका नालायक आहेस की मेल्यानंतर तुझ्या कातड्याचा जोडे बनवायलाही उपयोग करता यायचा नाही !'

सारांश, कला आणि साहित्याच्या क्षेत्रात पारशांनी थोडी फार कमाई केली आहे. एखादा झुबिन मेहताच्या तोडीचा कलावंतही निर्माण केला आहे. तथापि भारतीय कला आणि साहित्य ह्यांत त्यांना अजून प्रावीण्य कमवायचे आहे. आजतागायत ते त्यांना कमावता आले नाही, ह्याचे कारण ह्या जमातीचे झालेले अतिरेकी पाश्चात्त्यीकरण. रविशंकरच्या तोडीचा संगीतकार पारशांमध्ये नाही की यामिनी कृष्णमूर्ती इतकी चांगली नर्तिकाही त्यांच्यात नाही. त्यांच्यात कोणी बेगम अख्तर किंवा सुब्बलक्ष्मीही नाही. रोशन आणि खोर्शेद वजीफदार ह्या अनाथ भगिनींनी १९५० त

भरत नाटयमचे कार्यक्रम पेश केले. त्याला कारण त्या वांद्र्याच्या पेटिट अनाथालयात वाढल्या. तिथल्या समजूतदार प्राचार्यांनी त्यांना भारतीय शास्त्रीय नृत्यकला, संगीत आणि वादन शिकवले. पाश्चात्त्यीकरणाचा हा प्रश्न पारशी जमातीपुढचा मोठा प्रश्न आहे. तो प्रश्न आणि पारशांचे भवितव्य ह्यांचा विचार पुढील प्रकरणात करू.

१. एच. डी. दारुखानावाला– पारशी लस्टर ऑन इंडियन सॉईल, भाग १, मुंबई १९३९, पृष्ठे १८८–८९
२. वरील पुस्तक, पृष्ठे १९०–१९२
३. वरील पुस्तक, पृष्ठे १९४–१९५
४. चावडा– 'कंटेंपररी इन्डियन आर्ट' मालेतील पुस्तक, नवी दिल्ली (एन. डी.)
५. साबावाला– मोनोग्राफ इन सदांग सेरीज ऑन कंटेंपररी इंडियन आर्ट, मुंबई–१९६६
६. होमी भाभा अँड आर्टिस्ट (संपा.) जमशेट भाभा, मुंबई, १९६६
७. ए. एम्. दविएरवाला– 'कंटेंपररी इंडियन आर्ट' मालेतील पुस्तक, नवी दिल्ली, १९७१
८. ऑक्सफर्ड कंपॅनियन टु म्युझिक– ऑक्सफर्ड १९६७, पृष्ठे ९७५–७६
९. पीटर जे. पायरी– द लॉस्ट जनरेशन– म्युझिक अँड म्युझिशियन्स मे १९७२, पृष्ठे ४०
१०. स्पॅन, आक्टोबर १९६७, वर्ष ८, अंक १०; पृष्ठे २ ते ५. टाईम्स–जानेवारी १९, १९६८; पृष्ठे ४४–४८. डोरोथी शँडलर, पॅव्हेलियन, वर्ष ३, अंक १, पृष्ठे ९ व १०
११. इकहार्ड कुल्के– 'द पारसीज इन इंडिया', दिल्ली १९७४, पृष्ठे १०७ व ११६
१२. पारसी लस्टर– भाग १, पृष्ठे २९८–२९९
१३. वरील पुस्तक, पृष्ठे ३०० ते ३०१
१४. जमशेद भाभा– नॅशनल सेंटर फॉर द पर्फार्मिंग आर्टस– जेनेसिस अँड डेव्हलपमेंट ऑफ द प्रोजेक्ट–टाटा रिव्ह्यू, वर्ष ३ रे, अंक ३ आणि 'नॅशनल सेंटर फॉर द पर्फार्मिंग आर्टस, इंडिया, ३ री आवृत्ती–टाटा पब्लिकेशन्स, एन. डी.
१५. जे. आर. पटेल–'दॅट इर्रिप्रेसिबल गॅडफ्लाय'–ए. डी. गोरेवाला–फ्रीडम फर्स्ट–जाने. ७२, पृष्ठे ४ व ५
१६. गीता डॉक्टर–'द पारसी क्वार्टेट', पारिसियाना, मे ७४, पृष्ठे १४ ते २१– अँन अँथॉलॉजी ऑफ इंडो–इंग्लिश पोअेट्री (संपा.)–गौरी देशपांडे, दिल्ली–१९७६

११. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ चालू होती, तेव्हा बहुसंख्य पारशी राजकारणापासून अलिप्त राहिले. त्यातही काही थोडे अपवाद होते. परंतु स्वातंत्र्याची चिन्हे दिसू लागताच पारशांनी नवीन राजवटीबद्दलची आपली निष्ठा ठामपणे प्रकट केली.

७ ऑगस्ट १९४७ रोजी एक पारशी राष्ट्रवादी संमेलन भरवण्यात आले. त्याच्या अध्यक्षपदी त्या काळच्या मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. बा. गं. उर्फ बाळासाहेब खेर होते. संमेलनात सर कावसजी जहांगीर, सर होमी मोदी आणि बँकर श्री. ए. डी. श्रॉफ अशा सर्वमान्य, उदारमतवादी लोकांनी प्रमुख भाग घेतला होता. आपल्या भाषणात श्री. श्रॉफ म्हणाले-- " उद्याच्या हिंदुस्थानातील आपले स्थान हे आपले कर्तृत्व आणि कौशल्य ह्यावर ठरवले गेले पाहिजे. संख्येचा विचार करता आपण दुर्लक्षणीय, मूठभर आहोत. अल्पसंख्य म्हणून सवलती मागण्यापेक्षा आपण भारतीयांशी सरमिसळून जाणे हेच योग्य. देशाला आपली गरज आपणच जाणवून द्यायला पाहिजे."[१]

ह्या राष्ट्रवादी संमेलनापाठोपाठच, १० ऑगस्ट १९४७ रोजी मुंबईचे पारशी महापौर अर्देशीर पी. साबावाला ह्यांनी पारशांची एक जाहीर सभा बोलावली. त्या सभेपूर्वी साबावालांनी पारशांच्या एका मिरवणुकीचे नेतृत्व केले होते. ही मिरवणूक दादाभाई नौरोजी, फिरोझशाह मेहता आणि दिनशॉ वाच्छा ह्यांच्या पुतळ्यांना प्रदक्षिणा घालून नंतर आलबलेस बाग येथे विसर्जित झाली. आलबलेस बाग हे पारशांच्या सभांचे ठराविक ठिकाण होते. ह्या सभेत दस्तुर कैखुश्रो कुतार, सर शापुरजी बिलिमोरिया (पारशी पंचायतीचे अध्यक्ष) ह्यांसारख्या सनातनी आणि प्रतिगामी विचाराच्या लोकांनी भाषणे केली. सर शापुरजींनी सभेला सांगितले की काँग्रेसने पारशी जमातीला असे आश्वासन दिले आहे की पारशांचे धार्मिक विधी, रूढी आणि पद्धती ह्यांच्यात ढवळाढवळ केली जाणार नाही. शापुरजी पुढे म्हणाले, आम्हीही सरकार आणि देश ह्यांची सेवा करण्याची परंपरा चालू ठेवू."

आज पारशी जमातीपुढे अनेक समस्या उभ्या आहेत. त्यांचे योग्य मूल्यमापन करायाचे तर ह्या छोटया छोटया जमातींचे भवितव्य घडविण्याच्या बाबतीत महत्त्वाच्या ठरणाऱ्या प्रभावांचा विचार करणे आवश्यक ठरते. ह्यापैकी सर्वात महत्त्वाचा प्रभाव म्हणजे औद्योगिक क्रांतीचा. पारशी जमात त्यांच्या दत्तक भूमीशी समरस होते न होते

तोच तिला जहाजबांधणीचे कारखाने, सूत आणि जिनिंग गिरण्या, पाणीपुरवठा आणि गॅसचे दिवे पुरवणारी केंद्रे, पोलाद व लोखंडाच्या फौंड्रीज, इत्यादी कारखाने व उद्योगधंदे चालू करण्याची संधी मिळाली. तिला गृहनिर्माण आणि नगररचना क्षेत्रात आपली पावले पक्की रोवता आली. गुजरातेतील ग्रामीण भागातून पारशांचा ओघ हळूहळू मुंबईकडे वळू लागला होता. १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत त्यांची ८५% जमात शहरी बनली होती; उद्योगप्रधान झाली होती. उरलेले १५ टक्के लोक खेड्यापाड्यात खडतर जीवन जगत होते. आपल्या मुलांना शिक्षण प्रशिक्षणासाठी मुंबई–बडोदा–अहमदाबादसारख्या शहरांतून पाठवता यावे, ह्यासाठी धडपडत होते.

औद्योगिक क्रांतीबरोबरच विज्ञान व तंत्रज्ञान ह्यांत सुधारणा झाल्या. त्याचाही पारशी जमातीवर फार मोठा परिणाम झाला. वैद्यकशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, समाजशास्त्र, शुद्ध व उपयोजित शास्त्रे, अशा जीवनाच्या सर्वांगीण क्षेत्रांतील शास्त्रीय घडामोडींचा अभ्यास करायची संधी त्यांनी सोडली नाही. हे ज्ञान त्यांना पाश्चात्यांकडून, म्हणजेच ह्या देशावर, त्याकाळी, सत्ता गाजवणाऱ्या इंग्लंडकडून मिळत होते. त्यामुळे साहजिकच पारशी लोक अति–इंग्रजाळले गेले. त्यांनी इंग्रजी भाषा आत्मसात केली; त्याबरोबरच आपल्या दैनंदिन जीवनातही त्यांनी इंग्रजी आचारपद्धती, रूढीही अंगीकारल्या.

एवढे होऊनही पारशी लोकांनी आपला धर्म सोडला नाही. म्हणूनच ते नामशेष न होता त्यांनी स्वतःचे वेगळेपण कायम राखले. एका पिढीपूर्वीचा पारशी पुरुष सूर्योदयापूर्वी उठत असे. अंघोळ करून घरातील एका शांत कोपऱ्यात जाऊन अवेस्तातील प्रार्थना, एखादा तास तरी म्हणत असे. सकाळच्या त्या प्रसन्न वेळची शांतता त्याच्या मनाला व हृदयाला स्पर्शून जाई आणि दिवसभराचे काम कितीही जिकीरीचे असले तरी ते शांत चित्ताने घाई–गडबड न करता तो उरकू शके. पारशी बायका घरकामाची दगदग उरकल्यावर प्रार्थना, देवाशी हितगुज, इत्यादींसाठीच वेळ राखून ठेवीत असत.

हा दिनक्रम स्वातंत्र्यानंतर आस्ते आस्ते बदलू लागला. भारत हा धर्मातीत लोकशाही बनला. शाळा–महाविद्यालयांतून कोणत्याही एका धर्माची शिकवण दिली गेली तर भुवया उंचावल्या जाऊ लागल्या. तथापि देशभर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शाळा–महाविद्यालये चालवली होती; त्यांनी तक्रारी केल्या आणि आपल्या ख्रिस्ती व ख्रिस्त्येतर विद्यार्थ्यांना ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देणे चालूच ठेवले. पारशी मुले जेझुइटांच्या शाळा, रोमन कॅथालिक कॉन्व्हेंटस, इथे शिकत होती. कारण तिथे जास्त चांगले क्रमिक शिक्षण मिळत असे. त्यामुळे, ते तिथल्या धार्मिक वातावरणाकडे दुर्लक्ष करीत. परिणामतः आताच्या पारशी तरुण पिढीला झरतुष्ट्रापेक्षाही ख्रिस्ताबद्दल जास्त माहिती आहे.

पारशी जमातीचे महत्त्व कमी व्हायला इतरही काही कारणे होती. त्यांचा विचार करायलाच हवा. १८३० पर्यंत पारशी आपल्या पंचायतीकडून नेतृत्वाची अपेक्षा करीत. १८३० मध्ये, कसल्यातरी क्षुल्लक कारणावरून, मुंबईतील पारशी पंचायतीने अकाबार पद्धत—पुढारी निवडण्याची पद्धत—बंद करून पारशी पंचायतीचे सदस्यत्व वंशपरंपरा पद्धतीने मिळण्याची पद्धत पाडली. त्याचाच अर्थ पंचायतीचे विश्वस्त मृत्यू पावले किंवा निवृत्त झाले, तर त्यांच्या जागेवर त्यांच्या मुलांची नियुक्ती होऊ लागली. परिणामत: पंचायतीत प्रचंड गोंधळ माजला. लोकांचा पंचायतीवरील विश्वास उडाला. आजही, एक विश्वस्त ३८० लोकांनी निवडलेला असतो. ह्या ३८० लोकांत, एका वेळी, फक्त तीनच महिला असू शकतात. त्या ३८० पैकी फक्त निम्म्यांनाच मतदानाचा हक्क आहे. परंतु तो लोकशाहीतील नियमाप्रमाणे मिळत नसून, ज्या कोणी ५०० रुपये देणगी दिली असेल त्यालाच तो मिळतो. मतदानाचा हा अधिकार अधिक प्रातिनिधिक व उदार झाल्याखेरीज पंचायतीकडून उत्साही नेतृत्वाची अपेक्षा करता येणार नाही. सध्या पंचायत ही एक व्यवस्थापकीय संस्था आहे. निरनिराळ्या विश्वस्त—निधींचा व्यवहार ती पाहते. तो पाहत असताना त्या निधींचे नियम—उपनियम ह्यांचे अडथळे येत असतात.

पारशांनी पंचायतीकडे पाठ फिरवली. तसे ते आपल्या उपाध्यायांच्या दुर्दशेकडेही लक्ष देत नाहीत. एकेकाळी त्यांचे उपाध्याय जमातीतील लोकांच्या हातात हात घालून जमातीच्या कल्याणाची कामे करीत. परंतु एकोणविसावे शतक उलटले आणि त्यावेळी आलेल्या विज्ञान—तंत्रज्ञानाच्या झंझावाताने पारशांना हलवून सोडले. उपाध्यायांच्या प्रतिष्ठेकडे लक्ष द्यायला जमातीला फुरसदच मिळाली नाही; अन् इच्छाही उरली नाही. आज उपाध्याय मंडळी आपल्या उपजीविकेसाठी सर्वसामान्य लोकांवरच अवलंबून आहेत. ते निरनिराळ्या अग्यारींत कामे करतात. तिथे, मूळ ग्रंथांतील प्रार्थना म्हणणे, निरनिराळे विधी पार पाडणे, ही त्यांची कामे. नवज्योत, विवाहविधी, मृत्युविधी, ही त्यांची जबाबदारी. त्यासाठी लोक त्यांना थोडे फार पैसे देतात. ह्या उपाध्यायांचा स्वत:चा विश्वस्त निधी नाही की त्यांना पगार मिळत नाही. प्रत्येक अग्यारीचा एक स्वतंत्र विश्वस्त निधी असतो. त्या निधीचे विश्वस्तमंडळ असते. ते त्या पुजाऱ्याला अग्यारीत फुकट राहू देते. क्वचित थोडाफार पगार देते. हे उपाध्याय साधारण हायस्कूलपर्यंत शिकलेले असतात. एखाद्या विद्यापीठात जाऊन आपल्या धर्मग्रंथांचे अध्ययन करण्याचे कोणी ठरवले तर त्याचा त्यालाच मार्ग शोधावा लागतो. प्रवचने करणे, धर्माची सूत्रे स्पष्ट करणे, ह्यांचे शिक्षण उपाध्यायांना मिळालेले नसते. ख्रिश्चनांच्या संडे स्कूलसारखी प्रथा पारशांत नाही. त्यामुळे त्यांच्या उपाध्यायांचा पारशी मुलांशी फारसा संबंध येत नाही. पूर्वीच्या काळी प्रत्येक कुटुंबाला एक उपाध्याय असे. आता मात्र उपाध्याय आणि सामान्य माणूस ह्यांच्या-

तील दरी वाढतच आहे.

स्वातंत्र्यानंतर पारशी जमातीला इतर जमातींशी आर्थिक स्पर्धा करणे फार अवघड झाले आहे. त्यामुळे त्यांना आपल्या जमातीत एकोपा राखणेही अवघड होऊन बसले आहे. आता पारशी जमात इतरांनी हेवा करण्यासारख्या परिस्थितीत नाही. आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी, आपले राहणीमान पूर्वी इतक्याच उच्च दर्जाचे राहावे, ह्यासाठी अनेक पारशी परदेशी गेले आहेत. तिथे जाऊन आपली भरभराट घडवून आणायची, नव-नवीन व्यावसायिक क्षेत्रे स्वत:साठी खुली करवून घ्यायची, ह्याचे पारशी तरुणांना आकर्षण वाटू लागले आहे. इतर असंख्य भारतीय तरुणांप्रमाणेच त्यांनाही आपल्या देशात वैफल्य येऊ लागले आहे.

इतक्या सगळ्या बाबींचा विचार केल्यावर आता पारशांपुढील समस्यांचा अभ्यास करता येईल. आपल्या जमातीची झपाट्याने खालावत चाललेली लोकसंख्या हा पारशांपुढील सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. १९६१ च्या ' सेन्सस ऑफ इंडिया 'अनुसार पारशांची संख्या १,००,००० होती. ती १९७१ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार ९१,२६६ इतकी खाली आली. हे पुस्तक लिहिले जात असताना (१९७६) हाच आकडा ८५,००० च्या आसपास आलेला आहे. परदेशी स्थायिक होणे, हे ह्या खालावणाऱ्या संख्येचे एक कारण असले तरी त्यामुळे खालावणाऱ्या संख्येचे प्रमाण अगदीच क्षुल्लक असते. उशिरा होणारे विवाह, आंतरधर्मीय विवाह, परधर्मांतर, ही खालावणाऱ्या लोकसंख्येची इतर कारणे. आजकाल, पुरुष व स्त्रिया दोघेही अधिकाधिक प्रमाणात नोकरी-व्यवसाय करू लागले आहेत. ही मंडळी विशी उलटल्यावर, क्वचित तिशीही उलटून गेल्यावर, विवाह करतात. गेली कित्येक शतके पारशी लोक आपापसात विवाह करीत आहेत. त्याचा त्यांच्या जननक्षमतेवर परिणाम झाला आहे. त्यातच स्वस्त घरांच्या टंचाईची भर पडत चालली आहे. ह्या समस्येवर पारशी पंचायतीला तोड काढण्यासारखी आहे. त्यांच्याजवळ मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध आहे. तिचे फेरवाटप व एकत्रीकरण केले तर घरटंचाईचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल. अशी जमीन उपलब्ध करून दिली गेली तर त्या जमिनीवर मोठमोठ्या वसाहती उभ्या केल्या जातील. आणि मग पारशी तरुणांना लहान वयात लग्न करणे शक्य होईल.

हल्ली पारशी जमातीत आंतरधर्मीय विवाहांचे प्रमाण वाढले आहे. पारशी तरुणांनी आंतरधर्मीय विवाह केले तर ते ' आजच्यापेक्षाही अधिक प्रमाणात भारतीय बनतील ' असा प्रचार केला जातो. पण हे जर भारतात जन्मलेल्या पारशांच्या बाबतीत खरे ठरते, तर इतर जमातींच्या बाबतीतही का खरे ठरू नये ? असे जर खरेच होणार असेल तर हिंदूंनी मुस्लिमांशी; मुस्लिमांनी जैनांशी, विवाह केला, तर ही सर्वच

मंडळी अधिक प्रमाणात भारतीय बनणार नाहीत काय ? इथे जॉर्ज ऑरवेलच्या 'ॲनिमल फार्म' पुस्तकातील पहिल्या वाक्याची आठवण होते–'सर्व मानव जन्माने समान आहेत; तथापि त्यातील काही मानव इतरांपेक्षा जास्त समान आहेत !'

तथापि, एक गोष्ट मात्र खरी की शाळा–महाविद्यालयांत तरुण–तरुणी एकत्र येतात. समान आवडीमुळे त्यांचे संघटन होते आणि त्यातून विवाह जमतात. मग प्रश्न येतो की ह्या विवाहातून जन्माला आलेले मूल कोणत्या धर्माचे ? आईच्या, की वडिलांच्या, की त्यापैकी कोणाच्याच धर्माचे नाही ? प्रौढांप्रमाणेच मुलांनाही एक आध्यात्मिक केंद्रबिंदू असणे आवश्यक आहे. त्या आधारावरच ते मूल वाढत असते. त्या मुलाला जर एकाच वेळी अनेक धर्मांची शिकवण मिळत गेली, तर त्याचा वैचारिक गोंधळ उडण्याची शक्यता असते. मुलाला एकाच धर्माचे ज्ञान होणे आवश्यक आहे. आस्ते आस्ते ते इतर धर्मांचा जाणीवपूर्वक व डोळसपणे अभ्यास करू शकेल आणि मग अनेकधर्मीयांची भूमी असलेल्या ह्या भारताच्या आध्यात्मिक परंपरेचे वैभव ते स्वीकारू शकेल.

पारशी जमात बुद्धिवंत मानली जाते. तरीही त्यांचे आंतरधर्मीय विवाह कायदे अतिशय मागासलेले आहेत. पारशी पुरुषाने बिगर–पारशी तरुणीशी विवाह केला तर त्याला आपली संतती झोराष्ट्रियन पंथीय म्हणून वाढवता येते. त्याची अनौरस संततीही झोराष्ट्रीय ठरते. परंतु पारशी तरुणीने पारशीतराशी विवाह केला तर तिच्या संततीला हा हक्क नाही. ही एक चमत्कारिक विसंगती आहे. खरे पाहता, आईच मुलांना वाढवीत असते. त्यांच्यावर संस्कार करते. तीच मुलाला पहिली प्रार्थना शिकवते.

पारशांशी विवाह केलेल्या अनेक बिगर–पारशांना झोराष्ट्रियन पंथात यायची इच्छा असते. परंतु पारशी जमात हे स्वातंत्र्य त्यांना देत नाही. झरतुष्ट्राच्या शिकवणुकीच्या हे अगदी विरुद्ध आहे. 'खोर्देह आवेस्ता' ह्या पारशांच्या दैनंदिन प्रार्थनेच्या पुस्तकातील प्रत्येक 'न्यायेश' व 'यस्त'चा शेवट होतो तोच मुळी असा–

'माझदाच्या ह्या सर्वोत्कृष्ट धर्माच्या आज्ञांची कीर्ती, ज्ञान आणि महत्त्व जगात वाढत राहो; जगाच्या सातही भागात पसरत राहो. असेच होत राहो. मला हे ध्येय गाठले पाहिजे–मला हे ध्येय गाठलेच पाहिजे.'

शिवाय तीत असेही लिहिले आहे की 'परदेशात जाऊन सद्‌गुणी देवाच्या सद्‌गुणांचा प्रसार करणाऱ्या मिशनरी लोकांचा सन्मान करतो.'

धर्मबाह्य विवाहाबरोबर परधर्मात प्रवेश हेही ह्या छोट्या जमातीची संख्या कमी होण्याचे एक कारण आहे. 'दुष्ट प्रवृत्तीची उत्पत्ती' ह्या आपल्या पहिल्याच प्रवचनात झरतुष्ट्र म्हणतो–'प्रत्येक मानवाने आपले जागृत मन सदा जागरूक ठेवून धर्माची

निवड करावी.' तेवढ्याचसाठी नवज्योत विधीची आवश्यकता त्यांनी सांगितली. झोराष्ट्रियन धर्माचा स्वीकार करण्यापूर्वी प्रत्येक पारशी मुलाला ही दीक्षा घ्यावी लागते. नवज्योतपूर्वी त्या बालकाला कश्तीची प्रार्थना शिकवली जाते; तिचा अर्थ समजावून सांगितला जातो. कश्ती विधीचे महत्त्व समजावून दिले जाते. मात्र त्या विधीनंतर त्या बालकाला धार्मिक शिक्षण दिले जात नाही. कर्सी कात्रक हा कवी म्हणतो–' मला उपाध्यायाची दीक्षा मिळाली खरी, पण आता तो माझा धर्म उरला नाही. पारशी ही एक स्वतंत्र जमात आहे. तथापि तिचा धर्म अर्थपूर्ण नाही. आज जे ह्या धर्माचे अवशेष उरलेत ते, अलेक्झांडरने प्रेसिपोलीसचे ग्रंथालय जाळल्यानंतर उरलेले अवशेष आहेत. त्यावरून एकसंध जागतिक दृष्टिकोन मिळत नाही.[२] कात्रक आणखी दोन आरोपांचा उल्लेख करायला विसरला आहे–द्वैत आणि निसर्गपूजा. खिस्ती मिशनऱ्यांबरोबर आपल्या धर्माची चर्चा करताना पारशांच्या तोंडावर हे आरोप नेहमी फेकले जातात. कात्रकला झोराष्ट्रियन धर्मोपदेशक व उपाध्याय बनण्यासाठी शिक्षण मिळाले असते तर त्याला मन:शांती मिळवण्यासाठी दुसऱ्या धर्मात जायची गरज भासली नसती आणि तो झरतुष्ट्राप्रमाणे म्हणाला असता–' मी जेव्हा तुला आपल्या नजरेत भरून घेतले, तेव्हा, हे माझदा, मी तुला मनातल्या मनात समजावूनही घेतले. तूच ह्या जगातील पहिला आणि शेवटचा आहेस...'

(गाथा अहुन वइति–य. ३१·८)

पारशांत आपल्या आध्यात्मिक परंपरेबाबत अज्ञान व अलिप्तपणा दिसतो. तो दूर करून त्यांना त्यांच्या प्रेषिताच्या शिकवणुकीबद्दलचे सखोल आणि संपूर्ण ज्ञान मिळवून देणे अत्यावश्यक आहे. तसे झाले तरच पारशी लोक, गेली १४०० वर्षांहून अधिक काळ जो देश त्यांची मायभूमी बनला आहे, त्या महान देशाला, काही देऊ शकतील.

' हे माझदा, खरे पाहता, सर्व पवित्र जीव तुझेच आहेत–आजपर्यंत जे होऊन गेले, जे आता आहेत आणि पुढेही होणार आहेत, ते सर्वच तुझे आहेत. तुझ्या प्रेमाला अनुसरून तू त्यांचे कौतुक करतोस...'

' हे जीवित ईश्वरा, तुझ्या सामर्थ्याच्या व इच्छेच्या बळावर तू आम्हाला आत्म्याच्या सत्य व पुनरुज्जीवित जीवनाचे पांघरूण घाल.'

– गाथा अहुन वइति–य–३३–१०, ३४·१५

१. इ. कुल्के–द पारसीज इन इंडिया, पृष्ठे २६३–६४

२. गीता डॉक्टर–' द पारसी क्वार्टेट', पारसियाना, मे १९७४, पृष्ठ १८

परिशिष्ट–अ

कायानी राजांचा वंशवृक्ष

कावा कावाने (कै कावद)	अंदाजे सन ख्रि. पू. २०५१
कावा उसा (कै कौस)	,, सन ख्रि. पू. २०३३
कावा हुस्रावाह (कै खुश्रो)	,, सन ख्रि. पू. १९९७
औरवताष्प (लोहराष्प)	,, सन ख्रि. पू. १९७९
कावा विष्ताष्प (कै गुष्ताष्प)	,, सन ख्रि. पू. १९६१

कायानी राजांच्या मागे कै उपाधी लावली जाते ती कावा नावाच्या एक गरीब लोहाराच्या स्मृतिप्रीत्यर्थ. ह्या लोहाराने इराणला प्रथमच स्वातंत्र्य मिळवून दिले. कवी ह्या शब्द वेदांतून घेतला आहे. वेदांत 'कवी'चा अर्थ ऋचांचा निर्माता असा होतो. पण तोच शब्द राजघराण्याला लावला की त्याचा अर्थ सामर्थ्यवान, दैदीप्यमान असा होतो. 'गाथा'मध्ये झरतुष्ट्राच्या संरक्षकाचा नेहमीच 'कावा विष्ताष्प' असा उल्लेख येतो, हे विशेष आहे.

अकिमिनियन वंशावळ

१. अकिमिनीज (हकमनीश) ख्रि. पू. ७००–६७५

२. तीस्पेस (चैस्पीश) ख्रि. पू. ६७५–६४०

३. सायरस (कुसरु) पहिला (ख्रि. पू. ६४०–६००)

४. अरियारम्नेस (अरियारम्ना) (ख्रि. पू. ६४०–५९०)

५. अरसामेस (अर्षमा) (ख्रि. पू. ५९० (कम्बायसिस पहिला ह्याने राज्यत्याग करायला लावला)

६. कम्बायसिस पहिला (ख्रि. पू. ५९०–५५९)

७. सायरस दुसरा, थोर सायरस (ख्रि. पू. ५५९–५३०)

८. ह्याप्तापोश (विष्ताष्प) (कम्बायसिस पहिला ह्याचा मुलगा; पर्सिस (पार्शिया)चा राज्यपाल; त्याचाच मुलगा थोर दर्युष (ख्रि. पू. ५५२–४८६)

परिशिष्ट–ब

टॉवर्स ऑफ सायलेन्स

दाखमा ऊर्फ दोखमा ह्या मूळ शब्दावरून 'टॉवर्स ऑफ सायलेन्स' हा इंग्रजी शब्द-प्रयोग रॉबर्ट झेवियर मर्फीने बनवला. मर्फी काही काळ मुंबई सरकारचा इंग्रजी भाषांतरकार होता. (१९ व्या शतकाच्या अखेरीला.)

पृथ्वी, अग्नी आणि पाणी हे अकिमिनियन्सच्या मते अत्यंत पवित्र होते. त्यामुळे मृतदेह पुरणे; जाळणे किंवा पाण्यात बुडवणे त्यांच्या मते अत्यंत अयोग्य होते. म्हणून मग मृतदेह पर्वत शिखरांवर ठेवण्यात येत; किंवा त्यासाठी खास बांधलेल्या मनोऱ्यांत ठेवले जात. प्राचीन इराणी त्या देहांच्या अस्थी नंतर गोळा करून त्या अस्थि–कलशांत ठेवीत अथवा थडग्यात पुरून टाकीत. ही थडगी दगडांची बांधली जात, अथवा दगडांत कोरली जात.

दाखमाचा अर्थ मृतदेह ठेवण्याचे पात्र–भांडे. शक्य तिथे हा दाखमा उंच जागेवर बांधण्यात येतो. हा मनोरा म्हणजे प्रचंड दगडांची प्रचंड इमारत असते. तिचा घेर ९० मीटर्सच्या जवळपास असतो. तळापासून निघालेल्या पायऱ्या एका लोखंडी दरवाजापर्यंत जातात. हा दरवाजा एका गोलाकार पारावर उघडतो. हा पार दगडी असतो. त्याच्या मध्यभागी एक विहीर असते. पाराला मोठमोठ्या दगडी फरश्या असतात. त्यांच्या तीन रांगा असतात. त्यात उथळ, उघडे, कोनाडे असतात. पहिली रांग पुरुषांसाठी, दुसरी स्त्रियांसाठी आणि तिसरी मुलांसाठी असते. विहिरीच्या आतल्या बाजूला छिद्रे असतात. त्यांतून पावसाचे पाणी वाहून मनोऱ्याच्या तळाशी असलेल्या चार भुयारी गटारांपर्यंत नेले जाते. ही चारी गटारे चार भुयारी विहिरींना जोडलेली असतात. त्या विहिरींच्या तळाशी वाळूचा जाड थर पसरलेला असतो. प्रत्येक गटाराच्या तोंडाशी कोळशाचे तुकडे आणि सॅंडस्टोनचे तुकडे (वाळूचे) असतात. हा कोळसा वरचेवर बदलला जातो. त्यामुळे अस्थींवरून वाहणारे पावसाचे पाणी जमिनीत झिरपण्यापूर्वी शुद्ध होते. जमीन अशुद्ध केली जाऊ नये ह्या प्राचीन आज्ञेचे त्यामुळे पालन होते. (गिर्शमान–इराण, पृष्ठ १६२; जे. जे. मोदी–द रिलिजस सेरेमोनीज अँड कस्टम्स ऑफ द पारसीज, मुंबई, १९३७; पृष्ठे ६५–७०; २३१–२३८)

परिशिष्ट क

मियां तानसेनांनी दस्तुर राणावर रचलेला ख्याल

१. याहू पारशी पढेशो कबूल
इया घंणो पारशी पढेशो कबूल
अगर की पीठ चन्दन लपटैऊ
जेशोई सुखड पडे
अरे व्वा ! पारशांची प्रार्थना मान्य झाली
अरे व्वा ! पारशांनी विनंती केली
की ती मान्य होते आहे
सुवासिक चंदन आणि धूप ह्यांच्या
ज्वलनातून धुराचा ढग
वर उसळतोच आहे.

२. याहू पारशी पढेशो कबूल
लंबी लंबी दाढी शाह मेहर यार
तेरे मुख पर बरशत नूर
याहू पारशी पढेशो कबूल
अरे व्वा ! पारशांची मागणी मान्य झाली
हे शाह मेहर यार तुझ्या लांब–
लचक दाढीमुळे तुझे मुख
दैवी प्रकाशाने चमकत आहे

३. कहे तो मिया तानसेन
शुनो शाह अकबर
यही बहेशत को फूल
याहू पारशी पढेशो कबूल ::
अरे व्वा ! पारशांची मागणी मान्य झाली
मिया तानसेन म्हणतो, हे बादशाह
अकबर ऐक ! इथे नंदनवनातील
फूल * (सूफी संत) नांदत आहे
अरे व्वा ! पारशांची मागणी मान्य झाली

[* सूफी संताना साधारणपणे नंदनवनातील फूल म्हणण्याचा प्रघात आहे.]

सूफी संत जेव्हा जिरका (एक प्रकारचा मंत्रजागर) ' अल्लाह ' हा शब्द श्वास घेताना म्हणतात; आणि उच्छ्वासाच्या वेळी ' याहू ' शब्द उच्चारतात.

बेहराम जे. पीठावाला ह्यांच्या मते ' याहू ' हे शब्द झोराष्ट्रियनांच्या अत्यंत पवित्र प्रार्थनेच्या सुरुवातीच्या ओळीतील ' यथा आहु वैर्यो ' ह्या शब्दाला उद्देशून आहेत. दस्तुर मेहेर राणांनी हे शब्द अकबराच्या दरबारात प्रज्वलित केलेल्या अग्नीसमोर उभे राहून म्हटले असावेत. (बेहराम डी. पीठावाला--द इरानियन बेसिस ऑफ द देवनागरी संस्कृत अल्फाबेट, मुंबई, १९७४, पृष्ठ ३७)

परिशिष्ट ड

पारशांपैकी दुसरे प्रमुख शास्त्रज्ञ म्हणजे नानाभाई अर्देसर मूस (१८५९–१९३६) विद्यु-चुंबकीय शास्त्राचे (इलेक्ट्रोमॅग्नेटिझम) ते एक प्रमुख तज्ज्ञ होते. त्यांनी दोन वेधशाळाही स्थापन केल्या.

नानाभाईंचा जन्म मुंबईच्या एका बुद्धिमान कुटुंबात झाला. त्यांचे आजोबा फ्रामरोझ हे पहिल्या चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य होते; तसेच नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचेही ते सदस्य होते. ह्याच सोसायटीने पुढे एल्फिन्स्टन कॉलेजची स्थापना केली.

पॅरीसमध्ये १६६७ सालातच भू चुंबकीय शास्त्राधारे हवामानाचे अंदाज व्यक्तविण्यात आले होते. तरीसुद्धा १८४० सालापर्यंत जगभर जेमतेम एक डझनभर वेधशाळा अस्तित्वात होत्या. १८४०–४१ ह्या एका वर्षात मात्र १५ लघुवेधशाळा सुरू झाल्या. त्यापैकी दोन इंग्लंडमध्ये, दोन रशियात, तीन अमेरिकेत, एक जर्मनीत, तीन भारतात (कुलाबा, मद्रास व त्रिवेंद्रम), एक मलायात, एक दक्षिण आफ्रिकेत आणि एक तास्मानियात अशी विभागणी झाली.

कुलाबा वेधशाळेत नानाभाईंनी भूकंपशास्त्राची शाखा उघडली. त्या काळात रेडियो व टेलिफोनचे दळणवळण अगदी बाल्यावस्थेत होते. तरीही त्या काळात नानाभाईंनी ६० वर्षांपूर्वीपासूनची शास्त्रीय माहिती गोळा केली आणि आपला ' टेरेस्ट्रियल मॅग्नेटिझम ' (अंतराळीय चुंबकत्व) हा ग्रंथ दोन खंडांत प्रसिद्ध केला.

मुंबईमध्ये विजेवर चालणारी ट्राम गाडी चालू करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला, तेव्हा नानाभाईंनी हा निर्णय थोपवण्याचा सल्ला संबंधित अधिकाऱ्यांना दिला. विद्युत प्रवाहामुळे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात प्रदूषण होऊन भू-चुंबकीय अंदाजात अडथळे येतील, असे त्यांचे प्रतिपादन होते.

नवीन वेधशाळेसाठी मुंबईच्या ईशान्येस ४० मैलांवर अलीबाग येथे जागा पक्की करण्यात आली. १९०४ च्या एप्रिलमध्ये ही वेधशाळा पूर्ण झाली. आज ती जगातील अग्रगण्य चुंबकीय वेधशाळांत गणली जाते. कुलाबा–अलीबाग हा चुंबकीय तपशील गेल्या १२० वर्षांच्या सलग कालावधीचा आहे. कराचीजवळ मनोरा येथेही नानाभाईंनी एक छोटी वेधशाळा उभारली.

नानाभाई १९१९ साली निवृत्त झाले. मात्र त्यांचे आपल्या आवडत्या क्षेत्रातील संशोधन चालूच होते. १८८६ साली त्यांचे ' स्ट्रेंग्थ ऑफ मटेरियल्स अँड स्ट्रेन्स ' हे पहिले पुस्तक लंडन येथे प्रसिद्ध झाले. १२ जून १८९७ रोजी जो भूकंप झाला त्या काळात कुलाबा वेधशाळेतील चुंबकीय व भूगर्भशास्त्रीय उपकरणांत झालेल्या बदलांवर नानाभाईंनी केलेले टिपण एडिंबरोच्या रॉयल सोसायटीने प्रसिद्ध केले. ' मॅग्नेटिक

ऑब्झर्व्हेशन्स ऑफ डिस्ट्रक्शन (१८९४–९५–९६)' आणि रेकॉर्डस ऑफ डाईव्हज प्रेशर टयूब ॲनॉनॉमॉमीटर ' हे त्यांचे दोन प्रबंध प्रांत सरकारने प्रसिद्ध केले.

१९७१ च्या एप्रिलमध्ये कुलाबा व अलीबाग ह्या वेधशाळेतील चुंबकीय व भूगर्भ-शास्त्रीय विभाग वेगळे करण्यात आले. आज ह्या दोन वेधशाळा ' इंडियन इन्स्टिटयूट ऑफ जीऑ–मॅग्नेटिझम ' ह्या राष्ट्रीय संस्थेच्या घटक आहेत.

परिशिष्ट ई

कलासमीक्षकांयातील एक अग्रगण्य कार्ल जे. खंडाळावाला हे देशात व परदेशातही ख्यातनाम आहेत.

खंडाळावाला व्यवसायाने बॅरिस्टर आहेत. ते प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट आहेत. १९७८ साली ते शहा आयोगाचे वकील होते. तसेच ते मुंबईच्या दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीशही होते. मध्ययुगीन भारतीय शिल्पकला व चित्रकला ह्यांचे नमुने शोधण्यासाठी त्यांनी सारा भारत पायाखाली घातला आहे. १९३८ साली त्यांचे पहिले पुस्तक—इंडियन स्कल्प्चर अँड पेंटिंग्ज—प्रसिद्ध झाले. त्या पुस्तकामुळे कार्ल देशातील कलासमीक्षकांच्या नजरेत भरले. सामान्य कलाप्रेमींना त्यांनीच प्रथम पहाडी आणि किशनगढ चित्रकलेचा परिचय करून दिला. (पहाडी मिनिएच्यर पेंटिंग १९५८; किशनगढ पेंटिंग—१९५९—ह्या पुस्तकांचा त्यांचा सहलेखक होता एरिक डिकिन्सन) ललितकला अकादमीने प्रसिद्ध चित्रांच्या प्रतिकृतींचे खंड प्रसिद्ध केले आहेत. त्यामागे कार्लचीच प्रेरणा आहे. त्या खंडांपैकी 'भागवत पुराण इन कांगरा पेंटिंग (पोर्टफोलियो नं. १)' आणि 'शुजानपूर–निराची भित्तिचित्रे (पोर्टफोलियो नं. ८)' हे दोन खंड अत्यंत सुबक व तपशीलवार आहेत. कार्लनी भारतीय शास्त्रीय संगीताचा अभ्यास केला, आणि रंगमाला मिनिएच्यरचा अर्थ सांगायचा प्रयत्न केला. अमृता 'शेरगिल' हा त्यांचा मोनोग्राफ दर्जेदार (क्लासिक) मानला जातो. (कै.) डॉ. मोतीचंद्र ह्यांच्या सहकार्याने त्यांनी लिहिलेले 'न्यू डॉक्यूमेंटस ऑफ इंडियन पेंटिंग्ज (१९६९) हा त्यांचा ग्रंथ आश्चर्यकारक माहितीने परिपूर्ण आहे. त्यांचा सर्वात अलीकडचा (१९७४) ग्रंथ म्हणजे 'डेव्हलपमेंट ऑफ स्टाईल इन इंडियन पेंटिंग.' हा त्यांनी हेरास इन्स्टिटयूट ऑफ इंडियन हिस्टरी अँड कल्चर ह्या संस्थेतर्फे पुरा केला. सध्या कार्ल अहमदाबाद वस्तू संग्रहालयातील 'एन. सी. मेहता संग्रहा'तील पहाडी चित्रांची सूची तयार करण्यात गढले आहेत. त्यांना एपिग्राफी व जुनी नाणी जमवणे ह्याचा छंद आहे.

परिशिष्ट–फ

गतकाळात पारशी वृत्तपत्रांनी केलेल्या महत्त्वाच्या कामगिरीचा आढावा इथे घेणे उचित ठरेल.

गुजराती भाषेतून प्रसिद्ध झालेल पहिले वृत्तपत्र म्हणजे 'द बॉम्बे (मुंबई) समाचार' (१८२२). फर्दुनजी मर्झबान त्याचे पहिले संपादक होते. तथापि भारतीय भाषेतील पहिले वृत्तपत्र म्हणून उल्लेख करायचा तर बंगालीतील 'संगबद कौमुदी'चा करावा लागेल. 'बॉम्बे समाचार' सुरू होण्याच्या ७ महिने आधीपासून हे वृत्तपत्र सुरू झाले होते. कुलके म्हणतो त्याप्रमाणे 'बॉम्बे समाचार'च्या डोळ्यांपुढे गुजराती भाषिक हिंदू व पारशी असे दोन वाचकवर्ग होते. म्हणूनच त्याचे स्वरूप गुजराती व इंग्रजी असे द्विभाषिक ठेवण्यात आले. त्याचे वाचक हिंदू, जैन, बोहरी, खोजा, भाटिया, मेमन आणि पारशी असे भिन्न पंथीय राहिले. 'बॉम्बे समाचार'चे सध्याचे संपादक मंचेरजी नसरवानजी कामा ह्यांनी १९३३ साली हे पत्र विकत घेतले. आणि नसरवानजी व रुस्तमजी ह्या आपल्या दोन चिरंजीवांच्या मदतीने त्यांनीं बॉम्बे समाचारचा खप १,६०,००० प्रतींवर नेऊन त्याला सर्वात जास्त खपाचे वृत्तपत्र बनवण्याचा मान मिळवून दिला.

'बॉम्बे समाचार'ला ८ वर्षे झाल्यावर नौरोजी दोराबजी ह्या दुसऱ्या एका पारशाने 'मुंबई वर्तमान' सुरू केले (१८३०–१८४३). १९३२ साली पेस्तनजी माणेकजी मोतीवाला ह्यांनी मुंबई पारशी पंचायतीच्या मदतीने 'जाम ए जमशेद' हे वृत्तपत्र सुरू केले. आजही हे वृत्तपत्र अत्यंत सोवळे पारशी दैनिक मानले जाते. त्याच वर्षी नौरोजी दोराबजींनी 'मुंबईना चाबूक' सुरू केले (१८३२–१८५०). १८४४ ते १८५२ च्या दरम्यान नौरोजी गाय ह्यांच्या संपादकत्वाखाली 'समाचार दर्पण' निघाले; तर 'चित्रांजन दर्पण' (१८४५–४६) ह्या अल्पायुषी वृत्तपत्राचे प्रकाशक होते बेहरामजी जमशेदजी गांधी.

मराठीतील पहिले वृत्तपत्र दिग्दर्शन * १८३७ त प्रसिद्ध झाले. हिंदू, गुजराती भाषिकांनी पहिले गुजराती 'वर्तमान' अहमदाबादला १८४९ साली सुरू केले. तोपर्यंत गुजरातीतून पारशांनी सहा वृत्तपत्रे चालू केली होती.†

* मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' होते. (भाषांतरकार)

† कुलके 'द पारसीज इन इंडिया' –पृष्ठ १३६.